१८८८
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
दा. क्र.

म. ग्रं. सं. ठाणें
विषय चारित्र
संग्रहालय क्रमांक १५८ ४८५
लेखक माधवराव त्यं लेले
सन १८
पुस्तकाचें नांव अकबर बादशहा चरित्र ४८५

१५८
चरित्र

## अकबर बादशहा.



जन्म: मृत्यु:

ता. १५ आक्टोबर १५४२. ता. १५ आक्टोबर १६०५.

डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटीनें पसंत
करून २०० रुपये बक्षीस दिलेलें

# अकबर बादशाहाचें चरित्र.

हा ग्रंथ,

'रूलर्स ऑफ् इंडिया' नांवाच्या इंग्रजी ग्रंथमालेपैकीं
कर्नल् म्यालेसनकृत 'अकबर' या ग्रंथावरून


**माधवराव व्यंकटेश लेले, बी. ए., एल्. सी. ई.,**

पुष्पवन, सुमनविकास, भोपाळचा इतिहास,
आईन-अकबरी, व तारीख-फेरिस्ता यांतील
अकबराचें चरित्र, या पुस्तकांचे कर्ते


यांनीं,

मे० सर विल्यम हंटर साहेब, सदर मालेचे प्रकाशक,

यांच्या परवानगीनें मराठींत तयार केला.

---


त्याची ही पहिली आवृत्ति

**हरि कृष्ण दामले**

यांनीं

पुणें येथें 'इंदिरा' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केली.

---

शके १८२०.—सन १८९८.

---

किंमत १। रुपया.

या ग्रंथाची मालकी डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटीनें सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदविली असून याच्या पहिल्या आवृत्तीचा हक्क रा० हरि कृष्ण दामले यांस दिला आहे.

श्रीमंत महाराज

श्री शाहू छत्रपति सरकार करवीर,

जी. सी. एस्. आय्. साहेबांचे सेवेसि,

त्यांचें अद्वितीय सौजन्य, विद्या, बुद्धि, विनय, व

प्रजेची मनापासून कळकळ, इत्यादि अनेक

गुणांस अनुरूप असें हें—हिंदुस्थानांतच

काय पण सर्व भूमंडळांत अलौकिक

म्हणून यथार्थपणें नांवाजलेल्या

बादशहाच्या चरित्राचें—

भाषांतर,

कर्त्यानें परमादरानें व नम्रपणानें

परवानगीनें नजर केलें असे.

# प्रस्तावना.

सर्व मोंगल बादशहांमध्यें अकबराच्या तोडीचा एकही बादशहा या हिंदुस्थान देशांत झाला नाहीं. किंबहुना याच्यासारखा वैभवशाली, प्रबुद्ध, प्रजेच्या हिताविषयीं खरी कळकळ बाळगून ती कळकळ आपल्या सुमारें पन्नास वर्षांच्या मोठ्या कारकिर्दीत एकसारखी जागृत ठेवून तदनुरूप वर्तन करणारा, व आपल्या सर्व प्रजेला केवळ ईश्वरी अवतार अशा रीतीनें पूज्य व मान्य झालेला दुसरा कोणी बादशहा सर्व भूमंडळावरील कोणच्याही राष्ट्रांत, प्राचीन किंवा अर्वाचीन काळीं झालेला, क्वचित्‌च आढळून येईल.

अशा या थोर बादशहाचें एखादें स्वतंत्र किंवा भाषांतररूपानें चरित्र लिहिण्याचें फार दिवसांपासून माझ्या मनांत होतें. महंमद कासम् फेरिस्ता नांवाच्या प्रसिद्ध मुसलमान इतिहासकारानें आपल्या हिंदुस्थानाच्या प्रचंड इतिहासांत अकबराचें चरित्र दिलें आहे, तें वाचून हा माझा विचार विशेष दृढ झाला. त्या चरित्राचें फारशी भाषेंतून मराठींत भाषांतर करून तें 'भाषांतर' नांवाच्या मासिक पुस्तकांत प्रसिद्धही केलें आहे. तें भाषांतर तयार होतें आहे तोंच, 'रूलर्स ऑफ् इंडिया' नामक इंग्लिश ग्रंथमालेपैकीं कर्नल म्याले-सन् साहेबांनीं लिहिलेलें अकबर बादशहाचें चरित्र प्रसिद्ध झालें. त्यांत अकबराविषयींची माहिती विशेष संगतवार, थोडक्यांत व अलीकडील चरित्रलेखनाच्या मान्य झालेल्या नियमांस अनुसरून दिलेली असल्यामुळें, हा ग्रंथ लौकरच लोकमान्य झाला. अशा ग्रंथाचें भाषांतर स्वतंत्र चरित्रग्रंथापेक्षां अधिक पसंत होईल असें वाटून, त्याचें भाषांतर प्रसिद्ध करण्याविषयीं 'रूलर्स ऑफ् इंडिया' ग्रंथमालेचे एडिटर, सर विल्यम हंटर साहेब, यांच्याकडून परवानगी मागितली. ती त्यांनीं, आपल्या नेहमींच्या उदार व विद्यावृद्धीच्छु स्वभावास अनुसरून, मोठ्या संतोषानें दिली.

हें भाषांतर तयार होऊन प्रसिद्ध होण्यापूर्वींच डेक्कन व्हर्न्याक्युलर

ट्रान्स्लेशन सोसायटीकडून याच पुस्तकाचें भाषांतर तयार करण्याबद्दल २०० रुपयांचें बक्षीस देण्याविषयींची जाहिरात प्रसिद्ध झाली. तेव्हां हें भाषांतर सोसायटीकडे पाठविण्यांत आलें. तें सोसायटीनें पसंत करून हल्लीं छापवून प्रसिद्ध केलें आहे; तेव्हां याबद्दलचें सर्व श्रेय सोसायटीकडे आहे.

अकबर बादशहाच्या कारकीर्दीविषयीं कोणच्याही भाषेंत जितकें लिहावें तितकें थोडेंच आहे. हें पुस्तक त्याच्या चरित्राविषयीं केवळ दिग्दर्शक आहे, असेंच म्हटलें पाहिजे. त्याचें समग्र चरित्र वाचण्याची जिज्ञासा असेल त्यांनीं, त्याचा मुख्य सल्लागार सुप्रसिद्ध शेख अबुलफजल यानें त्याच्याच कारकीर्दींत लिहिलेल्या अकबरनामा व आईन-ए-अकबरी या ग्रंथांचें, किंवा अबुलफजल याचा प्रतिस्पर्धी शेख बदौनी याच्या ग्रंथाचें मूळ फारशींतून किंवा त्यांच्या प्रसिद्ध झालेल्या इंग्रजी भाषांतरांचें अध्ययन करावें, ह्मणजे त्यांना या यशस्वी व अत्यंत थोर बादशहाची खरी योग्यता कळून येईल.

हें भाषांतर तयार करण्यांत व ठिकठिकाणीं विशेष माहितीच्या टीपा देण्यांत ब्लाकमन व जारेट साहेबांनीं प्रसिद्ध केलेल्या आईन-ए-अकबरीच्या इंग्रजी भाषांतरांचा पुष्कळ उपयोग केला आहे.

हें पुस्तक प्रसिद्ध करून महाराष्ट्र भाषेवर व महाराष्ट्र लोकांवर उपकार केल्याबद्दल डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटीचे आभार मानून, व या लहानशा चरित्रावरून महाराष्ट्र वाचकांस अकबर बादशहाची बरीच ओळख होईल अशी आशा धरून, हें पुस्तक मर्मज्ञ वाचकांस सादर केलें आहे.

मुक्काम कोल्हापूर, ता० १९<br>माहे जुलई सन १८९८ इसवी.

माधवराव व्यंकटेश लेले.

# प्रकाशकाचे दोन शब्द.

हा ग्रंथ डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटीनेंच छापवून प्रसिद्ध करावयाचा. परंतु सोसायटीस तो छापण्यास सवड नाहीं, तर तुम्ही तो छापून प्रसिद्ध केल्यास व हक्काबद्दल सोसायटीस कांहीं रक्कम दिल्यास सोसायटीस मोठी मदत केल्यासारखें होणार आहे, असें सोसायटीचे माजी चिटणीस रा. ब. विष्णु बाळकृष्ण सोहनी यांनीं मला सांगितलें. तेव्हां सोसायटीनें आपणास हा मानच दिला असें समजून मीं हें काम करण्याचें मोठ्या संतोषानें कबूल केलें. हा ग्रंथ मूळचाच उत्तम असून भाषांतरकारही प्रसिद्ध मराठी ग्रंथकार आहेत; आणि सोसायटीनें या कामाकरितां नेमलेले विद्वान् परीक्षक प्रो. काथवटे व रा. सा. महाजनी यांनीं हा तपासला आहे, तेव्हां याच्या चांगुलपणाबद्दल निराळें लिहिण्याची गरजच नाहीं. तथापि इतकें सांगणें इष्ट आहे कीं, कै. रा. ब. सोहनी व खुद्द भाषांतरकर्ते रा. रा. लेले यांनीं, हा ग्रंथ छापण्याचें काम चाललें असतां, मराठी भाषेच्या संबंधानें अल्पस्वल्प फेरफार योग्य वाटतील ते करण्याची मला मोकळीक दिल्यामुळें हें काम करण्याचा मला विशेष आनंद वाटला. तथापि हेंही सांगणें जरूर आहे कीं, या ग्रंथाच्या एकंदर चांगुलपणाचें श्रेय भाषांतरकार व सोसायटीचे विद्वान् परीक्षक यांजकडेच जाण्यास योग्य आहे.

हा ग्रंथ गतवर्षींच छापून प्रसिद्ध व्हावयाचा; परंतु प्लेगच्या जबरदस्त धामधुमीमुळें छापण्याचें काम मध्यंतरीं तसेंच पडून राहिलें, याला कोणाचाच इलाज नाहीं. तसेंच या ग्रंथाची किंमतही याहून कमी ठेवण्याचा विचार होता, परंतु अजमासापेक्षां पानें जास्त वाढलीं, व खेरीज, अकबर बादशहाची तसबीर, व ग्रंथांतील स्थळें आणि अकबराच्या राज्याचे निरनिराळे सुभे दाखविणारा नकाशा जोडण्याचा मागाहून विचार झाला, यामुळें किंमत इतकी ठेवावीच लागली.

पुणें, ता० ८ आगस्ट १८९८. हरि कृष्ण दामले.

# अनुक्रमणिका.

—: ० :—


पृष्ठें.

भाग पहिला—उपोद्घात. .... .... .... .... १—६

भाग दुसरा—बाबर बादशहाचें कुळ व त्याचा पूर्वजयांतील वृत्तांत. .... .... .... .... .... ७—१०

भाग तिसरा—बाबर काबूलचें राज्य घेतो. .... .... ११—१८

भाग चौथा—बाबराच्या हिंदुस्थानावर स्वाऱ्या. .... १९—२५

भाग पांचवा—बाबराची हिंदुस्थानांतील स्थिति. .... २६—३८

भाग सहावा—हुमायुनाची कारकीर्द व अकबराचें बालपण. .... .... .... .... .... ३९—४७

भाग सातवा—हुमायुनाची हिंदुस्थानावर स्वारी व त्याचा मृत्यु. .... .... .... .... ४८—५३

भाग आठवा—अकबरानें राज्यप्राप्तीकरितां केलेल्या लढाया वगैरे. .... .... .... .... ५४—५९

भाग नववा—इ० स० च्या सोळाव्या शतकाच्या पूर्वार्धाच्या सुमारास असलेली हिंदुस्थान देशाची सामान्य स्थिति. .... .... .... .... ६०—६७

भाग दहावा—बैरामखानाच्या शिक्षेखालीं अकबराची कारकीर्द. .... .... .... .... .... ६८—७७

भाग अकरावा—अकबराच्या स्वतंत्र कारकीर्दीचा इतिहास. .... .... .... .... ....७८—१२९

भाग बारावा—अकबराची राज्यव्यवस्था व तिचीं तत्त्वें. .... .... .... .... १३०—१८४

# अकबर बादशाहाचें चरित्र.

## भाग पहिला.

### उपोद्घात.

हिंदुस्थान देशांत मोंगल घराण्याचें राज्य मजबूद पायावर स्थापन करणारा बादशाहा अकबर होय. या थोर पुरुषाचें हें लहानसें चरित्र मीं कशा तऱ्हेवर लिहिलें आहे, त्याचें थोडक्यांत दिग्दर्शन करणें अवश्य आहे. याबद्दल वाचकांनीं मला क्षमा केली पाहिजे.

हिंदुस्थानांत असें एखादें प्रचंड राज्य स्थापण्याची मूळ कल्पना केवळ अकबराचीच होती असें नाहीं. त्याचा आजा बाबर यानें हिंदुस्थानावर स्वारी करून त्या देशाचा बराचसा भाग जिंकून घेतला होता. परंतु या त्याच्या स्वारीच्या व त्याच्या मरणाच्या मध्यें अवघा पांचच वर्षांचा अवकाश राहिला; तथापि त्या थोड्याशा अवकाशांतही राज्यव्यवस्थेची धुरा खांद्यावर घेण्यास त्याला थोडेंच फावलें. त्यानें जिंकून टाकलेले प्रतिस्पर्धी व खुद्द हिंदुस्थानची प्रजा त्यास केवळ एक विजयी वीरपुरुष येवढेंच समजत होती. तो मूळचा अद्वितीय बुद्धिमान् होता. त्यानें आपलें सारें आयुष्य केवळ शिपाईगिरींतच घालविलें होतें, व तो दैवशाली व यशस्वी योद्धा होता. इतर समकालीन योद्ध्यांहून तो अधिक कुशाग्रबुद्धि होता, व त्याला कष्ट व संकटें यांच्या खडतर शाळेंतच जणों शिक्षण मिळालें होतें. त्यानें सुसंपन्न अशा हिंदुस्थान देशाची वाताहत झालेली स्थिति एखाद्या दूरदृष्टि गरुडाप्रमाणें काबूल येथील गिरिशिखरावरून पाहून, लहान पण अगदीं अजिंक्य अशा सैन्यानिशीं

एकदम त्याच्यावर स्वारी केली. बाबर हा महाधूर्त, व तत्कालीन लोकस्थितीच्या मानानें पुष्कळ पुढें सरसावलेला, उदार, प्रेमळ, व मोठा विचारी होता. तरी हिंदुस्थानाशीं त्याचा संबंध केवळ एखाद्या यशस्वी वीराचाच होता. पूर्वीच्या अफगाण राजांनीं हिंदुस्थानांत राज्यव्यवस्था जारी केली होती, तिच्यांत निरनिराळ्या प्रांतांच्या मध्यभागीं, महत्त्वाच्या जागीं, प्रचंड कंपू किंवा सेनानिवेश, निस्सीम स्वामिभक्त सेनापतींच्या स्वाधीन करून, त्या त्या प्रांताचा राज्यकारभार त्या त्या सेनापतीकडे सोंपविला जात असे. अशा राज्यव्यवस्थेशिवाय दुसरी कोणचीही राज्यव्यवस्था बाबराला जन्मापासून ठाऊक होती असें नाहीं; व तिच्याहून निराळी राज्यव्यवस्था सुरू करण्याविषयींचा विचार करण्यास त्याला फुरसदही मिळाली नाहीं. बाबराच्या सर्व राज्यव्यवस्थेचा झोंक हिंदुस्थानापेक्षां मध्य-एशियेंत मोठेंसें राज्य स्थापण्याकडेच विशेष होता किंवा कसें याविषयींही मनांत कांहींशी शंकाच वाटूं लागते.

वर सांगितलेल्या ह्या राज्यव्यवस्थेशीं या देशांतील प्रजेच्या हिताचा कांहींच संबंध किंवा मेळ नसे. कदाचित् बाबर, आणखी कांहीं काळ जगता, व त्याचें प्रचंड बुद्धिवैभव तसेंच कायम राहतें, तर, ही राज्यव्यवस्था केवळ निरुपयोगी आहे, राजपुरुष व प्रजाजन या दोघांच्या हितांची परस्पर सांगड घालणें या राज्यदृढीकरणाच्या महातत्त्वाचा अशा व्यवस्थेंत अभाव असतो, तिच्या योगानें प्रजेचें मन वश होत नाहीं किंवा प्रजेच्या समजुतींचा एकनेकींशीं कांहींच मेळ बसत नाहीं, ती केवळ निराधार असते, व दैववशात् येणाऱ्या प्रत्येक राजकीय वावटळीनें ती ढांसळण्याचा संभव असतो, इत्यादि गोष्टी, पुढें त्याचा नातू अकबर याच्या नजरेस जशा आल्या तशाच त्याच्याही नजरेस आल्यावांचून राहिल्या नसत्या. बाबरानें स्वतःचें चरित्र लिहिलें आहे, त्यावरून त्याच्याविषयीं चांगली माहिती मिळते. त्या स्वचरित्रांत त्यानें आपले अंतर्गत विचार व्यक्त केले आहेत, आपले दोष कबूल केले आहेत, व आपले सर्व महत्त्वाकांक्षेचे बेत स्पष्ट दाखविले आहेत. त्यावरून, त्याला अवकाश सांपडता तर त्यानें वरील सर्व गोष्टी केल्या असत्या असें वाटतें. परंतु त्याला तुर्श

संधीच सांपडली नाहीं. पाणिपतच्या[1] पहिल्या लढाईमुळें त्याला हिंदुस्थानच्या वायव्य प्रदेशाचें आधिपत्य मिळालें, तेव्हांपासून तों त्याच्या मरणापर्यंतचा थोडा काळ, त्या राज्याचें रक्षण करून त्याच्यांत भर घालणें याव्यतिरिक्त इतर गोष्टींचा विचार करण्यास त्याला फारच अपुरा होता. तो एक यशस्वी वीरपुरुष या नात्यानें हिंदुस्थानांत आला, व त्यानें आप्रयास पांच वर्षे राज्य केलें, तोंवर त्याची तीच स्थिति कायम राहिली.

बाबराला जें काम करण्याची हयगय करणें भाग पडलें, तें करण्याची, त्याचा पुत्र हुमायून याच्या अंगीं मुळीं योग्यताच नव्हती. क्रूड व अस्थिर स्वभाव, आणि चातुर्यहीन राजनीति, असे त्याचे उपजत गुण असत; या दोन्हींमुळें तो हें काम करण्याला योग्य नव्हता. त्यानें हिंदुस्थानांत सुमारें आठ वर्षे राज्य केलें. तेवढ्या अवसरांत बादशाहीरूपी इमारतीच्या पायाला शाश्वतपणा येई अशा तऱ्हेचा एकही दगड त्यानें लाविला नाहीं. पूर्वीच्या अफगाण राज्यांचीं मुळें या भरतभूमींत मुळींच खोल गेलेलीं नव्हतीं, यामुळें एकेका अपजयाबरोबरच तीं राज्यें सर्वस्वीं लयास जात असत. त्याचप्रमाणें एकाच तडाक्यांत हुमायुनाचीही स्थिति झाली, व सिंधुनदीच्या दक्षिण-भागीं बाबरानें मिळविलेलें त्याचें सर्व राज्य नाहींसें झालें, आणि हिंदुस्थान देश पुनः मोंगलांच्या हातीं येण्याचा संभव दिसेनासा झाला.

हुमायून हा आपल्याहून वरचढ अशा शीरशाहा नामक वीर पुरुषापुढें फिका पडला. शीरशाहानें एकदम त्याचें पद सर्वस्वीं बळकाविलें. मोंगलांच्या सुदैवानें किंवा विशेषतः हिंदुस्थानच्या प्रजेच्या भाग्यानें म्हणा, तो वीर पुरुष अतिशय मोठ्या योग्यतेचा निपजला. तथापि त्याचे राज्यस्थापनेविषयींचे विचार त्याच्या पूर्वी होऊन गेलेल्या अफगाण सरदारांच्या विचारांहून फारसे भिन्न नव्हते; व हिंदुस्थानांतल्या लक्षावधि लोकांचीं मनें वश करून घेण्याचा विचार त्याच्या मनांत मुळींच शिरला नाहीं. त्यानेंही जिंकून घेतलेल्या मुलखांत मोठमोठे कंपू स्थापूनच

१ ही पाणिपतची पहिली लढाई बाबर व शिकंदर लोदी यांच्यामध्यें इ० स० १५२६ त झाली. तिच्यांत बाबराचा जय झाला, व तेव्हांपासून हिंदुस्थानांत मोंगल बादशाहीची स्थापना झाली.

राज्यव्यवस्था चालविली. यामुळें त्याच्या पश्चात्, राज्यसूत्र हातीं घेण्याविषयीं उत्सुक व उद्युक्त असे दुसरे लोक उपस्थित झाले. पुढें लवकरच हा गोंधळ इतक्या थरास पोहोंचला कीं, कनोजच्या समरभूमीवरून पळून गेल्यानंतर चौदाच वर्षांनीं हुमायून पुनः सिंधुनदी उतरून परत आला, व त्यानें उत्तर-हिंदुस्थान पुनः काबीज केलें. अजूनही तो तरुणच होता, तरी पण कायमचें राज्य स्थापन करण्याच्या कामांत, तो आरंभीं गादीवर आला तेव्हांप्रमाणेंच अगदीं अजाण होता.

त्यानें मागें लिहून ठेवलेले लेख उपलब्ध आहेत त्यांवरून असें दिसतें कीं, तो आणखी कांहीं वर्षें वाचता तरी, त्याच्या पूर्वीच्या इतर राज्यसंस्थापकांच्या किंवा खुद्द त्याच्या हातीं जी व्यवस्था वरचेवर मोडकळीस आली, त्याच व्यवस्थेप्रमाणें त्यानें पुनः राज्य चालवून पाहिलें असतें; कांहीं एकादी नवी युक्ति काढली नसती. मरणाच्या किंचित् पूर्वी त्यानें हिंदुस्थानचें राज्य चालविण्याची एक पद्धत रचली होती. ती पद्धत, जागजागीं निरनिराळे स्वतंत्र पण खुद्द बादशाहाच्या देखरेखीखालीं असणारे कंपू स्थापून त्यांच्यायोगानें राज्य चालविण्याची जी जुनी तऱ्हा होती, तिच्याचप्रमाणें होती. निरनिराळे प्रदेश हातीं ठेवण्याला निःसंशय ती फार चांगली; परंतु निरनिराळ्या प्रदेशांतील भिन्न भिन्न लोकांचें एकीकरण करून त्याच्यायोगानें एकछत्री राज्य बनविण्याच्या तजविजीची तिच्यांतही उणीव होती.

पाणिपतच्या दुसऱ्या[१] लढाईमुळें बाबराचें सर्व राज्य अकबराच्या हातीं आलें. त्या वेळीं अकबर केवळ चौदा वर्षांचा होता. वरील लढाईच्या पूर्वी थोडेच दिवस हुमायून हा पुष्कळ वर्षें देशोधडीस लागून आपल्या दुर्दैवाशीं टकरा देत भटकत होता. त्या दुर्दैवाच्या अवसरांत तो कांहीं एक नवीन शिकला नव्हता. त्याच्यामागून त्याचा अल्पवयी पुत्र गादीवर आला. त्या मुलानें तेवढ्या

---

१ ही लढाई इ० स० १५५६ त अकबर व हेमू यांच्यामध्यें झाली. तिच्यांत अकबराचा जय झाला. इच्याबद्दल वर्णन पुढें येईल.

२ त्यापूर्वी थोडेच दिवस, ज्या अपघातामुळें हुमायून प्राणास मुकला, तो अपघात एका अंशीं हिंदुस्थानाला हिताचाच झाला म्हणावयाचा!

थोड्याच काळांत देखील, सामान्य मनुष्याला सात्या जन्मांतही क्वचित्‌च प्राप्त होणारे असे अनेक दुर्दैवाचे टोले सोसले होते. तो अगदींच लहान होता, व त्याला जगाचा अनुभव मुळींच नव्हता. त्या वेळचा फार नांवाजलेला व अत्युत्तम सेनापति बैरामखान हा त्या वेळीं अकबराजवळ गुरुस्थानीं होता हें खरें, पण बैरामखानाची राज्यपद्धति अकबराच्या पित्याच्या खडतर सहवासांत तयार झालेली होती. अकबराच्या अंगीं जणों बालपणापासूनच इतर मोठमोठ्या गुणांबरोबर राज्यघटनाचातुर्य उपजतच वसलेलें होतें. त्यानें त्या विख्यात सेनापतीला आपल्या नांवावर कांहीं वर्षें राज्य चालवूं दिलें. त्या अवसरांत, पूर्वींचीं सर्व राज्यें कशीं अस्थिर झालीं व त्यांचीं मुळें या भरतभूमींत कां रुजलीं नाहींत या गोष्टींच्या मूळ कारणांचा त्यानें पूर्ण विचार केला. सर्व बेत पक्के ठरविल्यानंतर त्यानें राज्य-सूत्रें आपल्या हातीं घेतलीं, व एक जगद्विख्यात् व प्रचंड राज-घराणें स्थापन केलें. तें राज्य, त्यानें घालून दिलेल्या राज्यव्यवस्थेचें अवलंबन होत होतें तोंपर्यंत चांगलें कायम राहिलें; आणि, प्रजेची मनधरणी करून तिच्या चालीरीती व समजुती यांना योग्य मान देणें या महातत्त्वाचा त्याग होण्याबरोबर त्याला उतरती कळा लागली.

बाबर हा मोंगल बादशाही घराण्याचा एका अर्थी मूळ संस्था-पक होता खरा, पण त्यानें आपल्या पुत्राच्या मनांत आपण केवळ राज्य जिंकणारे आहों एवढीच कल्पना भरविली होती, ही गोष्ट बऱ्याच अंशीं वरील गोष्टींत स्पष्ट झाली आहे, असें वाटतें. हुमायुनाच्या मनांत खरोखर हीच कल्पना बिंबलेली होती, व या कल्पनेच्या जोडीला त्यानें दुसरी कोणचीही चांगली राज्यव्यवस्थेची कल्पना मनांत न ठेविल्यानें, बापानें मिळविलेलें सर्व कांहीं त्यानें गमाविलें. पुढें त्यानें कांहीं भाग परत मिळविला हें खरें, पण तें तरी त्यानें विजयी पुरुष या नात्यानेंच केलें, राज्यकर्ता या नात्यानें नव्हे. वास्तविकपणें बाबराच्या नातवानेंच या देशांत मोंगल-राज्यरूपी वृक्षाचीं मुळें लाविलीं, व तींच पुढें चांगलीं खोल गेलीं. त्यांनींच पक्का आश्रय धरिला, व त्याचा मोठा वृक्ष झाला;

आणि त्या वृक्षाला एतद्देशीय प्रजेची स्वस्थता, संतोष, व सौख्यरूपी उत्तम व विपुल फळें कांहीं कालपर्यंत आलीं.

हाच मुद्दा लक्षांत ठेवून तो सिद्ध करून दाखविण्याचा या पुढील निबंधांत प्रयत्न केला आहे. या पुस्तकाचे साहजिकपणेंच तीन भाग होतात. ज्यानें हिंदुस्थानावर स्वारी करून तो देश जिंकून घेण्याची कल्पना मनांत आणली व आपला बेत सिद्धीस नेला त्या बाबर बादशाहाविषयीं पहिल्या भागांत वर्णन केलें आहे. बाबर हा एक अलौकिक पुरुष होता. तो कोणत्याही काळीं अलौकिकच झाला असता. तो आपल्या वयाच्या अठ्ठेचाळीसाव्या वर्षी, म्हणजे बहुतेक अल्पवयांतच, वारला. त्यानें जें स्वचरित्र लिहून ठेविलें आहे, तें या हल्लींच्या एकोणीसाव्या शतकांत देखील वाचल्यानें मनोरंजन व फायदा होण्याजोगा आहे. त्याच्या चरित्राचें थोडेंसें अधिक विस्तारानें वर्णन करणें योग्य आहे; कारण, त्यावरून अकबराच्या अंगीं त्याच्या आज्याच्या अंगचें धैर्य, चातुर्य व नैसर्गिक उदात्तपणा असल्याचें वाचकांस दिसून आल्यावांचून राहणार नाहीं. हुमायून कसा राज्यभ्रष्ट झाला हें नीटपणें व्यक्त करून दाखविण्यापुरतें, व प्रस्तुत चरित्रनायक अकबर बादशाहा हा हुमायून हिंदुस्थान सोडून पळून जात असतांना सिंध देशांत जन्मास आला त्याच्या बाल्यावस्थेचें वर्णन होण्याइतकें मात्र हुमायून बादशाहाविषयीं या ग्रंथांत वर्णन दिलें आहे.

बाकीच्या दोन तृतीयांश भागांत अकबराचेंच वर्णन केलें आहे. त्यांतही दोन पोटविभाग केले आहेत. पहिल्या पोटविभागांत अकबराच्या कारकीर्दींत घडलेल्या मुख्य मुख्य राजकीय गोष्टींचें वर्णन तत्कालीन मुसलमानी ग्रंथांच्या आधारानें केलें आहे, व दुसऱ्यांत अकबराच्या खऱ्या स्वरूपाचें वर्णन करण्याचा यत्न केला आहे. आइन-ए-अकबरी वगैरे ग्रंथांच्या आधारानें राज्यव्यवस्थापक, राज्यसूत्रचालक, व इंग्रजांनींही हल्लीं जिचें बरेंच अनुकरण केलें आहे अशी अप्रतिम राज्यव्यवस्था जारी करणारा, व पांचशें वर्षें सतत जागृत राहिलेल्या परस्पर विरोधांचा समेट करणारा, व अनादिकालापासून चालत आलेलें धर्मवेड व दुराग्रह यांचा नाश करणारा,

या नात्यानें तो कशा तऱ्हेचा पुरुष होता, इतक्या संबंधानें त्याजविषयीं वर्णन करण्याचा यत्न केला आहे. तसेंच, ज्या धर्मांत परधर्मीयांशीं वैर करण्याविषयीं सक्त आज्ञा आहेत अशा धर्मांत जन्मापासून वाढला असूनही ज्यानें आपल्या बुद्धीला अप्रतिहत संचार करूं दिला व आपल्या नैसर्गिक विचारांनुरूपच वर्तनक्रम चालू ठेवला, असा एक अद्वितीय पुरुष, व पिता व पति, या नात्यानें त्याचें वर्णन केलें आहे. या पुस्तकांत खरोखर हाच भाग अतिशय महत्त्वाचा आहे, म्हणून त्याच्यापूर्वीचे भाग लिहून वाचकांस त्रास दिल्याबद्दल त्यांनीं क्षमा करावी.

---

# भाग दुसरा.

## बाबर बादशाहाचें कुल व त्याचा पूर्ववयांतील वृत्तांत.

इ० स० १३३६ वर्षाच्या एप्रिल महिन्याच्या ९ व्या तारखेस समरकंद शहराच्या उत्तरेस सुमारें ३० मैलांवर, शेहरसब्ज नांवाच्या गांवांत मोंगल जातीच्या अति श्रेष्ठ कुलांपैकीं बीरलास कुलाच्या मुख्य नायकाच्या पोटीं एक पुत्र प्रथम जन्मास आला. त्याचें नांव तैमूर. चंगेजखानाच्या कुळांत त्याचें आजोळ होतें. बरोबरीच्या सर्व लोकांवर आपली छाप ठेवून त्यांना आपले आज्ञेंत वागविण्याचा गुण त्या मुलाच्या अंगीं नैसर्गिकच होता. या गुणाचा अत्युत्तम उपयोग करून घेण्याची संधी त्याला सुदैवानें सहज प्राप्त झाली. चंगेजखानाच्या पुत्रवंशांतील पुरुष हळू हळू दुर्बळ व आळशी होत जाऊन शेवटीं इ० स० १३७० त ह्या वंशाचा लोप झाला.

---

१ चंगेजखान ह्याला जंगिसखान किंवा अमीर चंगेज असेंही म्हणतात. हा इ० स० ११५० च्या सुमारास मध्य-एशियेंत उदयास आला. त्यानें मोंगल-तार्तरी लोकांस उदयास आणिलें, व चीन, चिनई-तार्तरी, मध्य-एशिया, इराण व रशियाचा पूर्वेकडील भाग हे देश काबीज केले; आणि एक प्रचंड बादशाही कायम केली. त्याला चार पुत्र होते. त्याच्या मरणानंतर त्या चारही पुत्रांनीं हें राज्य वांटून घेतलें. ही गोष्ट इ० स० १२२६ च्या सुमारास घडली.

त्या वेळीं तैमुराचें वय ३४ वर्षांचें होतें. त्यानें तें मोकळें पडलेलें राज्यपद हस्तगत केलें, व पुढें दैवाशीं पुष्कळशा टकरा मारून, अखेरीस तो सर्वांहून जबरदस्त झाला. जक्झार्टिस व आक्सस[1] या नद्यांमधील सर्व प्रदेश त्याच्या हातीं आला, व तो समरकंद येथें निर्वेध राज्य करूं लागला. पुढें आमरणांत त्यानें राज्यें काबीज करण्याचा सारखा सपाटा चालविला. मोंगलिस्तान, ह्मणजे तिबेट देशांतील पर्वत, दक्षिणेस सिंधुनद व मकराण, व उत्तरेस सैबीरिया-मधील सर्व प्रदेश, तसेंच किपूचाक प्रदेश, ह्मणजे, जक्झार्टिस नदीचा उत्तरकांठ, अरलचा समुद्र व कास्पियन समुद्र यांच्या उत्तरेकडील भाग व डोण आणि वोल्गा[2] या नद्यांच्या कांठचा सर्व सुपीक प्रदेश व युक्राईनवरील प्रदेशाचा बराच भाग इतक्या सर्व प्रदेशांवर त्यानें आपला अंमल बसविला[3]. त्यानें हिंदुस्थान काबीज केलें, व डार्डानेल्स[4] व दिल्ली यांच्यामधील सर्व लोकांवर आपलें साम्राज्य स्थापन केलें. तो इ० स० १४०५ च्या फेब्रुवारी महिन्याच्या १९ वे तारखेस मरण पावला. त्या वेळीं, आजवर या जगांत जीं अतिशय मोठमोठीं राज्यें होऊन गेलीं, त्यांपैकींच त्याचें राज्य झालेलें होतें.

त्याच्या मरणानंतर त्याचें राज्य लवकरच लयास चाललें. त्याचा पणतू अबूसईद यानें तें राज्य कांहींसें स्थिरस्थावर केलें. इ० स० १४६९ त अर्दबील शहराजवळच्या पहाडांत त्याच्यावर छापा पडून तो मारला गेला व त्याच्या फौजेची दाणादाण झाली. त्यानंतर त्याच्या मुलांनीं त्या राज्यांचे पुनः नवे विभाग केले. त्या वांटणींत त्याचा

१ जक्झार्टिस व आस्कस या दोन्ही नद्या मध्य-एशियेंत इराण व मोंगलिस्तान या देशांत आहेत. त्यांच्या आसमंतातचे बहुतेक प्रदेश हल्लीं रशियाच्या ताब्यांत आहेत.

२ या नद्या युरोपाच्या पूर्वभागांत रशिया देशांत आहेत.

३ हे सर्व प्रदेश व यांत असलेलीं पुढील वर्णनांत आलेलीं सर्व लहान मोठीं—डरात्युपे, मार्गिनान, अर्दबील वगैरे—शहरें हल्लीं रशियाच्या बादशाहाच्या अमलाखालीं आहेत.

४ डार्डानेल्सची सामुद्रधुनी युरोपांतील तुर्कस्थानाच्या हद्दींत, अर्कीफ व मार्मोरा या समुद्रांच्या मध्यें आहे. डार्डानेल्सपासून दिल्लीपर्यंत अंतर सुमारें ३६०० मैलांचें आहे.

तिसरा मुलगा उमरशेखमिरझा याच्याकडे फरगाणा प्रांत, ज्याला त्याच्या राजधानीवरून खोकंद असेंही म्हणतात, तो आला.

उमरशेख हाच बाबराचा बाप होय. तो फार महत्त्वाकांक्षी होता. हरतऱ्हेनें आपलें राज्य वाढविण्याविषयीं त्याचा पक्का निश्चय झाला होता. त्याच्या इतर भाऊबंदांचीही अशीच इच्छा होती. तो इ० स० १४९४ त कांहीं अपघातानें आपली राजधानी अक्सी येथें मरण पावला. त्या वेळीं त्या किल्ल्याला शत्रूचा वेढा पडला होता.

उमरशेखमिरझा मरण पावला तेव्हां त्याचा वडील मुलगा बाबर बारा वर्षांचा होता. तो अक्सीपासून ३६ मैलांवर अंदिजान नांवाच्या गांवीं होता. त्याचे शत्रु अंदिजानवर चढाई करून चालले होते. हें पाहून, बाप मरण पावल्याच्या दुसरे दिवशीं ( ता० ९ जून रोजीं ) बाबरानें मोठ्या शिताफीनें अक्सीचा किल्ला घेऊन शत्रूशीं तहाचें बोलणें लाविलें. त्या वेळीं शत्रूच्या सैन्यांतही आपसांत तंटे व मत्सरभाव फार वाढला होता, यामुळें त्याला विशेष फायदा झाला. या योगानेंच त्याला बाकीचा फरगाणा प्रदेश हातीं आणण्याला सवड सांपडली. परंतु खोजंद, मार्घिनान व उरात्यूपे, हीं मोठीं व मुख्य शहरें त्याच्या कबजांतून गेलीं.

शत्रु परत गेल्यानंतर दोन वर्षेंपर्यंत त्या बालराजानें स्वस्थपणें आपल्या राज्याचा बंदोबस्त केला. तो पुढें सरसावण्याला योग्य संधी पहात होता. पुढें समरकंद येथें कांहीं तंटेबखेडे चाललेले पाहून त्यानें त्यावर एकदम स्वारी केली. त्या वेळीं तें शहर सर्व मध्य-एशियेंत फारच महत्त्वाचें होतें. इ० स० १४९७ च्या नवंबर महिन्यांत त्या शहरांतील लोक निरुपाय होऊन त्याला शरण आले व त्यानें तें शहर काबीज केलें. परंतु त्यानें आपल्या शिपायांस त्या शहरांत लूट करूं दिली नाहीं, यामुळें त्याचे हजारों शिपाई त्याला सोडून गेले. तरी न डगमगतां, फरगाणा प्रदेशावर शत्रूनें स्वारी केल्याचें कळेपावेतों त्यानें तें शहर सोडिलें नाहीं. तो तेथून निघतांना फार आजारी होता. शेवटीं तो फरगाणा प्रदेशांत येऊन पोहोंचला. इतक्यांत आपली राजधानी शत्रूच्या स्वाधीन झाल्याचें वर्तमान त्यानें ऐकिलें, खरोखर या वेळीं तो केवळ नांवाचा मात्र

राजा होता. त्यानें लिहिलें आहे कीं, 'अंदिजान राखण्याकरितां मीं समरकंद सोडिलें, पण हल्लीं तें न राहतां, हातीं होतें तेंही गमावल्यासारखें झालें आहे.'

तरी त्यानें आपला प्रयत्न जारी ठेवून लवकरच बहुतेक फरगाणा प्रदेश परत मिळविला, व पुनः समरकंद शहराला वेढा घातला. परंतु उजबक लोकांनीं तो वेढा फिरून उठविला, व इतक्यांत इकडे त्याच्या शत्रूंनीं त्याचें राज्य पुनः घेतलें. यामुळें तो आपली जन्मभूमि जें कीप शहर, त्याजकडे परत गेला. पुढें कांहीं काळ अनेक विपत्ति भोगून व विपरीत दैवाशीं बऱ्याच टकरा मारून, त्यानें आपल्या जवळ राहिलेल्या थोड्याशाच लोकांनिशीं पुनः समरकंद शहरावर अकस्मात् छापा घालण्याचा बेत ठरविला. त्याच्याजवळ फार २४० लोक होते, यामुळें हा त्याचा बेत फारच धाडसाचा होता. त्यानें प्रथम यत्न केला तो सफल झाला नाहीं, पण दुसऱ्या खेपेला मात्र त्याला पूर्ण यश मिळालें. तें तरी ऐनवेळेवर; कारण त्या शहरांतील शिबंदीची शेवटची टोळी शरण आली तोंच, उजबक लोकांचा सरदार बिनीच्या स्वारांनिशीं दौडतच येऊन पोहोंचला. परंतु त्याचा हिरमोड होऊन त्याला परत जावें लागलें.

बाबराला हा जिंकून घेतलेला प्रदेश राखतां आला नाहीं. पुढील सालीं उजबक लोक अधिक तयारीनें व मोठ्या जमावानिशीं आले. त्यांना फसविण्याकरितां त्यानें शहराबाहेर बुखाऱ्याच्या[१] रस्त्यावर एका मजबूत जागीं तळ दिला. त्याच्या सैन्याच्या उजव्या बाजूस कोहिक नदी होती. तिचा त्या सैन्याला चांगला आश्रय होता. तो शत्रु येईपर्यंत तेथेंच स्वस्थ तयारीनें राहता तर बहुधा त्यानें शत्रूला खास हटविलें असतें. कारण ती जागा शत्रूला बहुतेक अभेद्य होती. परंतु आपल्या पोक्त विचाराच्या विरुद्ध, ज्योतिषी लोकांच्या सांगण्यावरून त्यानें ती मजबूत जागा सोडून उजबक लोकांवर हल्ला केला. त्या हल्ल्यांत प्रथम त्याचा बहुतेक जय झाला होता तरी, शेवटीं त्याला हार खाऊन शहराच्या तटाचा आश्रय धरावा लागला. त्यानें त्या शहरांत पांच

१ बुखारा, समरकंद, व बल्ख या मध्य-एशियेंत सुमारें इ० स० १००० पासून १५५० पर्यंत, प्राचीन मोंगल लोकांच्या नामांकित राजधान्या होत्या.

महिने काढिले. पण शेवटीं दुष्काळापुढें त्याचा नाइलाज झाला; व तो शत्रूच्या परवानगीनें आपल्या लोकांसह त्या शहरांतून निघाला. तो प्रथम उरात्यूपे गांवीं, व शेवटीं तेथीलच खानानें त्याला राहण्याकरितां नेमून दिलेल्या देहकात नांवाच्या गांवीं गेला. पुढील तीन वर्षे त्यानें एखाद्या साहसी दंगेखोराप्रमाणें काढिलीं. त्यांत तो केव्हां जंगलांत भटक्या मारीत फिरे, व कधीं आपल्या लोकांनिशीं विजयी होत्साता एखादा प्रदेश जिंकून घेत असे. त्याची वृत्ति सदोदित आनंदी असे व आपल्यास शेवटीं खास यश मिळणार अशी त्याला नेहमीं उमेद व हुरूप असे. तो हातीं घेतलेल्या कामाविषयीं नेहमीं धैर्यानें व नेटानें झटत असे. त्यानें फरगाणाचें राज्य परत मिळविण्याचा पुनः यत्न केला. पण तो सफल झाला नाहीं. तेव्हां त्यानें आपल्याजवळच्या दोन तीनशें लोकांच्या लहानशा बारभाई टोळीसह खुरासानवर स्वारी करण्याचा निश्चय केला. हा शुद्ध वेडेपणाच होता. तरी त्या वेडेपणांत कांहीं व्यवस्था व अर्थ होता. त्यानें कशी स्वारी केली, व तिचा काय परिणाम झाला हें पुढील भागावरून कळेल.

---

# भाग तिसरा.

## बाबर काबूलचें राज्य घेतो.

या वेळीं काबुलच्या राज्यांत फक्त काबूल व गझनी हे दोन प्रदेश, ज्याला हल्लीं अफगाणिस्थानाचा पूर्वभाग असें म्हणतां येईल, तेवढेच होते. हिरात शहर मध्य-एशियेंतील एका बलाढ्य व स्वतंत्र बादशाहीची राजधानी होतें. काबुलाजवळील सपाट प्रदेश व कांहीं कांहीं खोरीं यांतील लोक मात्र तेथील राजाचा अधिकार मानीत होते. परंतु खास पहाडांतील लोकांची स्थिति, त्यांच्या वंशजांची हल्लीं स्थिति आहे तीप्रमाणेंच आडदांडपणाची व स्वतंत्रतेची होती. काबुलांत या सुमारास बहुतेक झोटिंगबादशाही होती. मागील भागांत वर्णन केलेल्या अबूसईदाचा नातू अबदुलरजाक हा त्या वेळीं तेथें राज्य करीत होता. त्याला कंदाहारच्या

राजाचा पुत्र महंमद मोकीम यानें छापा घालून पळवून लाविलें होतें, व तो, सर्व जगांत चैन व स्वस्थता असून निदान आपल्याला तरी कांहीं धोका नाहीं असें जाणूनच जणों पुढील स्थितीविषयीं अगदीं विचार न करितां खुशाल राज्याचा उपभोग घेत होता.

नेहमीं भटकत फिरण्यास कंटाळून, खुरासानवर स्वारी करण्याचा बाबरानें निश्चय केला, व तो आक्सस नदी उतरला; तेव्हां, त्या प्रदेशाचा राजा सुलतान खुस्रू याचा मुलगा बाकू हा त्यास येऊन मिळाला. दोघांनींही अंजेर शहर काबीज केलें. तेथें थोडे दिवस राहून पुढें खुस्रूच्या पदरच्या मोंगल लोकांनीं बंड केल्याचें वर्तमान ऐकून, प्रसंग पडेल तसें वागण्यास ठीक पडावें म्हणून बाबर तालिकान शहराकडे गेला. वाटेंत त्याला ते मोंगल लोक येऊन मिळाले. सुलतान खुस्रू आपल्या सैन्यासह काबुलाकडे गेल्याचें वर्तमान त्याला समजलें. दोन्ही सैन्यें जवळ जवळ असल्यानें त्या दोघांची भेट होऊन खुस्रूनें बाबराची ताबेदारी कबूल केली. त्याच्या सैन्यांतील टोळ्यांच्या टोळ्या बाबरास येऊन मिळाल्या. अशा तऱ्हेनें प्रबल झाल्यावर बाबरानें काबुलावर चाल केली व त्याला वेढा घातला. इ० स० १५०४ च्या आक्टोबर महिन्यांत त्यानें तें शहर घेतलें. याप्रमाणें दैव अनुकूल झाल्यानें बाबराला, त्याच्या हातून गेलेल्या वडिलार्जित फरगाण्याच्या राज्याहून पुष्कळच मोठें विस्तीर्ण व बलाढ्य असें काबूल व गझनीचें राज्य अकस्मात् प्राप्त झालें.

या नवीन मिळालेल्या राज्यांत तो कोठें थोडासा आपलें बस्तान बसवीत होता, इतक्यांत त्याला हिंदुस्थानाच्या सरहद्दीवरील जेहलम नदीच्या दक्षिणभागी असलेल्या बेहरा नांवाच्या प्रदेशावर स्वारी करण्याविषयीं पाचारण आलें. तें अर्थातच त्याच्या मनास न रुचण्याजोगें नव्हतें, म्हणून तो जलालाबादेकडे जाण्यास निघाला. त्या वेळीं इ०स०१५०५ चा जानेवारी महिना होता. या वेळीं 'सुलतान बाबर' हें पद त्याला प्राप्त झालेलें होतें. त्यानें एशिया खंडांतल्या या अप्रतिम सुसंपन्न प्रदेशांत प्रथमच पाय ठेविला तेव्हां त्याच्या मनांत कसकसे तरंग आले, व त्याच्या मनावर कसा ठसा उमटला, याचें वर्णन त्यानें स्वचरित्रांत लिहून ठेविलें आहे. हे असेच विचार,

त्याच्या पूर्वी व मागून ज्यांनीं ज्यांनीं या देशावर स्वाऱ्या केल्या, त्या सर्व लोकांच्याही मनांत निःसंशय आले असावे, व यामुळेंच त्यांनीं आपले प्रयत्न नेटानें पुढें चालविले यांत शंका नाहीं. बाबर म्हणतो, 'मीं यापूर्वी कधीं कोणताही उष्ण प्रदेश, किंवा हिंदुस्थान देशही पाहिला नव्हता. तेथें जातांच जणों मला एक नवीनच सृष्टि दिसून आली. तेथील वृक्ष, वनस्पति, वनपशु वगैरे सर्वच कांहीं निराळ्या तऱ्हेचे होते. मला तेथें जातांच मोठें आश्चर्य वाटलें; व तें वाटण्यास कारणही होतें.' तो खैबर घाटानें पेशावर येथें गेला व तेथून सिंधु नदी न उतरतां कोहात, बंगष, बन्नू, व दश्तदामन यांवरून मुलतानास गेला. पुढें थोडे दिवस सिंधु-नदीच्या तीरानें जाऊन तो पश्चिमेकडे वळला, व चोटियाली व गझनीवरून काबुलास परत आला. या स्वारीला बाबराची हिंदु-स्थानावरील पहिली स्वारी असें म्हणतात. पण वास्तविक पहातां या वेळीं तो केवळ हिंदुस्थानाच्या सरहद्दीपर्यंतच काय तो येऊन गेला असल्यामुळें, ही खरी स्वारी न समजतां ती त्यानें टेहळणीच केली असें म्हटलें पाहिजे; तथापि या कशाबशा स्वारीनेंही पुढें त्याच्या मनांत लौकरच पुनः जास्त प्रदेश पाहण्याची उत्कंठा उत्पन्न झाली.

हिंदुस्थानावर स्वारी करण्याविषयीं उत्सुक झालेल्या पूर्वीच्या प्रत्येक वीरपुरुषाप्रमाणें बाबरालाही प्रथम कंदाहार शहर आपल्या हातीं पक्केपणीं आणणें अत्यंत अवश्यक व महत्त्वाचें वाटलें. राज्यां-तील अस्वस्थतेमुळें या स्वारीला कांहीं दिवस व्यत्यय आला. पुढें व्यवस्था लागल्यावर त्याला बाहेरील कामांत लक्ष घालावें लागलें. त्याचा जुना शत्रु शैबानी हा पुनः समरकंद येथें राज्य करीत होता, व तो लहानसहान परगणे काबीज करून या वेळीं बलख शहराला वेढा घालण्यास आला होता. हिरातचा अधिकारी सुलतान हुसेनमिरजा हा त्याचा प्रभाव पाहून घाबरून गेला, व त्याचा प्रतिकार करण्यास मदत मिळावी ह्मणून त्यानें ताबडतोब बाबराकडे एक जासूद पाठविला. या निमंत्रणास मान देऊन तो इ० स० १५०६ च्या जून महिन्यांत काबुलाहून निघून कहमर्द येथें पोहोंचला, व तेथें सामानसुमान जमा करण्याकरितां राहिला.

इतक्यांत सुलतान हुसेनमिरजा मरण पावल्याची बातमी घेऊन एक जासूद आला. तेव्हां तेथून ताबडतोब कूच करून तो आठशें मैलांवर मुर्घाब नदीच्या कांठीं त्या सुलतानाचे पुत्र सैन्यासह होते त्यांस जाऊन मिळाला.

त्या सुलतानाचे दोन पुत्र त्याच्या मागें जोडीनें राज्य करीत होते. ते सुजाण, सज्जन, विद्या व कला यांत पारंगत असून, बुद्धिमान्, परंतु नामर्द, व विलासी असे होते. शैबानी हा दांडगा व शूर असल्यामुळें त्याशीं टक्कर मारण्यास ते अगदीं असमर्थ आहेत असें बाबराला दिसून आलें. ते आपल्या छावणींत चैन करीत होते तों इकडे शैबानीनें बल्ख शहर घेतलें. त्या दोघांनीं आपसांत विचार ठरवून तात्पुरची आपल्या फौजेस रजा दिली, व पुन: वसंत ऋतूंत लढाईस सुरुवात करण्याचें ठरविलें. या सुमारास हिंवाळा सुरू झाला होता. बाबराच्या मनांत नसतांही त्या दोघां भावांनीं त्याला तशा वेळीं आग्रह करून हिरात येथें पाहुणचारासाठीं नेलें. त्यानें हिरात शहराचें वर्णन आपल्या चरित्रांत विस्तारपूर्वक केलें आहे. वीस दिवसपर्यंत तो रोज नवीं नवीं स्थळें पहात होता. शेवटीं दिसेंबरच्या २४ व्या तारखेपर्यंत तेथून परत निघण्याचा त्याचा निश्चय झाला नाहीं.

इ० स० १८७९-८१ मध्यें अफगाणिस्थानाशीं झालेल्या युद्धांत ज्या इंग्रज लोकांना तेथें जाण्याचा प्रसंग आला होता, त्यांना; त्या थंडीच्या दिवसांत बाबरानें केलेला हा प्रवास किती बिकट, त्रासदायक व बहुतेक कसा अशक्य होता, याची कल्पना होईल. हा पहाडांतील रस्ता उन्हाळ्यांत फारसा कठिण नसून त्या दिवसांत ती सुमारें २० दिवसांची मजल आहे. पण भरहिंवाळ्यांत तो अत्यंत त्रासदायक होतो. बाबरानें या अशा दिवसांत, सभोंवतीं बर्फाची वृष्टि होत असतांना, तो मार्ग क्रमण्यास आरंभ केला. तो स्वत: सर्वांच्या पुढें नेहमीं असे. त्यानें अतिशय परिश्रम करून, मोठ्या संकटानें, तें थकून गेलेलें व अगदीं बेपर्वा झालेलें सैन्य झिरीन[1] नांवाच्या घाटीच्या पायथ्याशीं आणिलें. या ठिकाणची त्याची स्थिति पूर्ण निराश होण्यासारखी व अत्यंत

[1] हा घाट हिरातपासून सुमारें १२० मैलांवर हिंदुकुश पहाडांत आहे.

संकटाची होती; कारण, तुफान फारच जोरानें चाललें होतें व बर्फ अतिशय पडलें होतें. घाटींत एकेकच मनुष्य पार जाण्यापुरता मार्ग होता. अशा स्थितींतही बाबर पुढें सरसावला व संध्याकाळच्या सुमारास एका गुहेजवळ जाऊन पोहोंचला. त्या गुहेंत थोड्याशाच लोकांना काय तो आश्रय मिळण्यासारखा होता. तथापि त्याच्या अंगची जी अलौकिक भूतदया नेहमीं प्रगट होत असे तिला अनुसरून त्यानें या वेळीं आपल्या शिपायांस त्या गुहेंत आश्रयाकरितां जाण्यास सांगितलें, व स्वतःकरितां तिच्या दाराशीं बर्फांत एक खड्डा तयार केला. इतक्यांत पुढें गेलेल्या लोकांनीं पाहिलें तों ती गुहा चांगली विस्तीर्ण असून तिच्यांत पन्नास साठ लोक राहतील इतकी जागा असल्याचें दिसून आलें. तेव्हां तो स्वतः गुहेंत गेला. तेथें त्यानें त्या शिपायांबरोबर जें थोडेंसें अन्न होतें त्यांतून चार घांस खाल्ले. दुसरे दिवशीं सकाळीं तुफान व वादळ बंद झालें व तें सैन्य पुढें चालू झालें. शेवटीं फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस तो काबुलाजवळ येऊन पोहोंचला; तों तेथें बंड झालें असून किल्ल्यांतील शिबंदी जरी त्याच्याशीं बेइमान होण्यासारखी नव्हती, तथापि एकंदरीनें प्रसंग आणीबाणीचा आहे असें त्याला कळून आलें. पण तो त्या प्रसंगाला पुरून उरण्यासारखा होता. शहरांत त्याच्या पक्षाचे लोक होते त्यांच्याशीं दळणवळण चालू करून, मोठ्या शिताफीनें छापा घालून त्यानें तें शहर पुनः हस्तगत करून घेतलें. बंडवाल्यांशीं त्यानें फारच दयाळूपणाचें वर्तन केलें.

पूर्वी बाबराला समरकंद येथून हांकून देणारा शैबानी उजबक यानें त्याच वर्षी बलख शहर घेतलें, व पुढें खुरासान प्रदेशावर स्वारी करून हिरात शहर घेतलें. कंदाहार शहर व प्रांत कांहीं अंशीं हिरातच्या राज्याचाच भाग होता; परंतु सुलतान हुसेनमिरजा याच्या वेळेपासून तेथें मीर जुल्नुन बेग नांवाचा अधिकारी होता, त्याच्या मुलांनींच तो प्रदेश बळकाविला होता. त्यांनीं शैबानीच्या विरुद्ध बाबरास मदतीस बोलाविलें होतें, म्हणून तो कंदाहारकडे जाण्यास निघाला. वाटेंत सुलतान हुसेन याच्या घरा-

ण्याच्या पक्षाचे पुष्कळ लोक पळून जात असलेले त्याला मिळाले. परंतु तो कंदाहारास पोहोंचण्यापूर्वींच शैबानी यानें जुल्नुन बेग याच्या मुलांना अगदीं जेरीस आणलें होतें, यामुळें त्यांनीं त्याचें स्वामित्व कबूल केलें होतें. ही गोष्ट त्यांनीं बहुतेक उघडपणेंच बाबराला कळविली. तेव्हां त्यानें आपल्या सैन्याच्या जोरावर आपला हक्क पुनः स्थापित करण्याची तयारी केली.

त्याचें सैन्य पुष्कळ होतें असें नाहीं, तथापि त्याचा त्या सैन्यावर व स्वतःच्या कर्तबगारीवर पूर्ण विश्वास होता. खिलात-ई-गिलझाई येथें त्याला कंदाहारांतील स्थितींत फरक पडल्याबद्दलचा प्रथम सुगावा लागला. तेथून निघून तो तरनक नदी उतरून पलीकडे गेला. तेथें त्याची कंदाहारच्या स्थितीविषयीं पक्की खात्री झाली. तेव्हां त्यानें पुढें सरसावून त्या नदीच्या तीरातीरानेंच त्या शहरच्या उत्तरेस पांच सहा मैलांवर बाबावली येथें येऊन कालीशद नांवाची टेंकडी हस्तगत करून घेतली. या ठिकाणीं विश्रांति घेण्याचा विचार ठरवून त्यानें रसद गोळा करण्याकरितां आपले लोक बाहेर पाठवून दिले. इतक्यांत शत्रूचे सुमारें ५००७ लोक शहरांतून आपल्यावरच येत असल्याचें त्यानें पाहिलें. त्याच्याजवळ फक्त १००० लोक होते- बाकीचे रसद जमा करण्यांत गुंतले होते. तथापि मागें पुढें पाहण्याची ही वेळ नव्हे असें समजून नीट बचावाच्या व्यवस्थेनें लोक उभे करून तो हल्ल्यांची वाट पहात राहिला. जुल्नुन बेग याच्या मुलांनीं मोठ्या शौर्यानें हल्ला केला, तो बाबरानें मागें परतविला, व त्यांना पळवून लाविलें; इतकेंच नाहीं, तर त्यांचा पाठलाग करून त्यांना शहरांत न जाऊं देतां, तें शहर, तेथील सर्व संपत्ति व सामानसुमान यांसह काबीज केलें. तेथें त्याला अतिशय लूट सांपडली. बाबर कंदाहार येथें फार दिवस राहिला नाहीं. आपला भाऊ नसीर मिरजा याला त्या शहराच्या संरक्षणाकरितां ठेवून, तो स्वतः इ० स० १५०७ च्या जुलई महिन्याच्या अखेरीस काबूल येथें येऊन पोहोंचला. या ठिकाणीं आपणास अत्युत्तम यश व अतिशय लूट मिळाली असें त्यानें स्वतः म्हटलें आहे.

तो काबुलास पोहोंचतो तोंच, शैबानीनें कंदहारास येऊन त्या-

च्या भावास त्या शहरांत कोंडल्याचें वर्तमान त्याला कळलें. तेव्हां आतां काय करावें याचा त्याला मोठा विचार पडला. कारण, शैबानीशीं उघडपणें युद्ध करण्यासारखी त्याची तयारी नव्हती. तथापि त्याचे अंगीं खरें युद्धचातुर्य उपजतच होतें, त्यामुळें या वेळीं आपण शत्रूवर दुसरीकडे हल्ला करणार आहों असें भासविणेंच त्याला योग्य दिसलें; व त्याकरितां, जेथून समरकंदावर हल्ला करितां येईल, अशा बदकशान प्रदेशावर किंवा हिंदुस्थानावर स्वारी करण्याचा घाट घालावा या संबंधानेंच काय तो त्याला निश्चय करावयाचा होता. शेवटीं त्यानें हिंदुस्थानाविषयींचाच विचार कायम केला. कोणच्याही गोष्टींचा निकाल करण्यांत जशी त्याची बुद्धि तीव्र असे, त्याचप्रमाणें, तीं गोष्ट अमलांत आणण्याविषयींही तो मोठा तत्पर असे. तो तावडतोब काबुल नदीच्या तीरानें सिंधु नदीकडे जाण्यास निघाला. तो थोडे दिवस जलालाबादेस राहिला. इतक्यांत कंदाहार शहर शैबानीच्या हस्तगत झाल्याचें त्याला कळलें. तेव्हां पुढें जाण्याचें कारण न राहिल्यामुळें तो काबुलास परत आला.

पुढील सात वर्षांत पुष्कळ महत्वाच्या गोष्टी घडून आल्या; तरी त्यांच्याविषयीं विशेष विस्तार करण्याची येथें अवश्यकता दिसत नाहीं. इ० स० १५०७ पासून १५१४ पर्यंत बाबरानें उत्तरेकडे कूच करून फरगाणा प्रांत घेऊन उजबक लोकांचा पराभव केला; आणि समरकंद व बुखारा हीं शहरें घेतलीं. परंतु उजबक लोकांनीं परत येऊन बाबराचा कुल्मलिक येथें पराभव केला व तीं दोन्ही शहरें त्याजपासून घेतलीं. तीं फिरून घेण्याचा प्रयत्न करितांना घजदीवान येथें त्याचा पुनः पराभव होऊन त्याला हिसार[1] येथें परत यावें लागलें. तेथें गेल्यावर कांहीं वेळानें जेव्हां त्याला असें दिसून आलें कीं आपल्याला सांप्रत दैवाची मुळींच अनुकूलता नाहीं, तेव्हां तो काबुलास परत आला. ही गोष्ट इ० स० १५१४च्या अखेरीस घडली.

---

१ हिसार नांवाचीं तीन शहरें प्रसिद्ध आहेत. एक हिंदुस्थानांत दिल्लीच्या उत्तरेस पन्नास कोसांवर आहे. दुसरे इराणांत अजरबिजान परगण्यांत तख्त-सुलेमान नांवाच्या पहाडापासून सोळा कोसांवर आहे; आणि हें वर सांगितलेलें तिसरें हिसार शहर आक्सस नदीच्या एका फांट्यावर बल्ख शहराच्या ईशान्येस सुमारें पांसष्ट कोसांवर आहे.

यानंतर आणखी त्याचीं जीं सुमारें आठ वर्षे गेलीं, त्यांविषयींही विशेष लिहिण्याची जरूर नाहीं. त्या अवधींत बाबरानें पहाडांतील अफगाण लोकांचें शासन करून स्वात प्रदेश घेतला, व इ० स० १५२२ त जो त्यांशीं तह केला, त्या तहामुळें हक्कानेंच कंदाहार शहर शेवटीं त्याच्या हातीं आलें. त्यानें तें शहर व त्याच्या आसपासचा प्रदेश व हेलमंद नदीच्या दक्षिणेकडील सपाट प्रदेशापैकीं बराच भाग ताब्यांत घेऊन आपल्या राज्यांत सामील केला.

याच अवकाशांत कंदाहारचा पूर्वीचा अधिकारी जुल्नुन बेग याचा वडील मुलगा शहाबेग यानें सिंध प्रांत जिंकून घेऊन बक्कर येथें आपली राजधानी केली होती. तो इ० स० १५२४ च्या जून महिन्यांत मरण पावला. ही गोष्ट नरसापूरचा सुभेदार शहाहासान याला कळतांच, तो सरदार तैमूर वंशाचा पुरा अभिमानी व पक्षपाती असल्यामुळें त्यानें त्या प्रांतांत बाबर बादशाहाच्या नांवानें द्वाही फिरविली व त्याचें नांव खुतब्यांत (राजाकरितां करावयाच्या सार्वजनिक प्रार्थनेंत) दाखल केलें. त्याला बराच अडथळा झाला. परंतु त्यानें तो सर्व प्रांत जिंकून बाबराचा अंकित या नात्यानें तेथें अधिकार चालविला. शेवटीं इ० स० १५२५ त त्याला मुलतानावर स्वारी करण्याकरितां पाचारण आलें. तेव्हां त्यानें त्या किल्ल्याला वेढा घातला. तें काम पुष्कळ दिवस चालून त्यानें तो इ० स० १५२६ च्या सप्तंबर महिन्यांत जोराचा हल्ला करून घेतला. याच सुमारास हिंदुस्थानांत पुष्कळ महत्वाच्या गोष्टी घडून आल्या, व याच वर्षाच्या एप्रिल महिन्याच्या २९ वे तारखेस झालेल्या पाणिपत येथील युद्धानें हिंदुस्थान देश बाबराच्या हातीं आला. परंतु या स्वारीचें वर्णन करण्यापूर्वी, हिंदुस्थानांतील तत्कालीन राज्यकर्त्यांची वास्तविक स्थिती कशी होती, त्याविषयींचें थोडक्यांत निरूपण करणें अवश्य आहे.

१ मुसलमान लोक आठवड्यांतून एक दिवस गांवांतील मोठ्या मशिदींत सामाजिक प्रार्थना करितात. त्या प्रार्थनेच्या शेवटीं, तत्कालीन **अमीरुल्‌ मोमिनीन** किंवा मुसलमानी धर्माचा मुख्य नायक व राज्याचा मुख्य अधिपति असेल त्याच्या नांवानेंही परमेश्वराची प्रार्थना करितात. त्या प्रार्थनेला खुतबा म्हणतात.

# भाग चौथा.

## बाबराच्या हिंदुस्थानावर स्वाऱ्या.

अगदीं प्राचीन काळापासून तों महंमद गजनवी यानें हिंदुस्थानावर इ० स० च्या अकराव्या शतकांत स्वाऱ्या केल्या त्या काळापर्यंतच्या इतिहाससंबंधानें लिहिण्याचा माझा विचार नाहीं. कारण वस्तुतः त्या काळासंबंधें तपशीलवार माहिती फारच थोडी उपलब्ध आहे. येवढें मात्र खरें कीं, त्या काळीं त्या देशांत निरनिराळया भाषा बोलणारे अनेक लोक रहात होते. त्यांचे मुख्य धर्म ब्राह्मणी, बौद्ध आणि जैन, हे होते. निरनिराळ्या प्रदेशांतील निरनिराळ्या राजांच्या धर्मसंबंधानें नेहमीं आपसांत लढाया होत असत. त्यामुळेंच या सारख्या चालत आलेल्या स्थितींत गडबड उडून गेली.

इ० स० १००१ सालीं महंमद गजनवी यानें हिंदुस्थानावर पहिली स्वारी केली. महंमद व त्याच्या नंतर झालेले दुसरे गजनवी बादशहा यांनीं दिल्ली, राजपुताना व गुजराथेंतील दूरदूरचे प्रदेश येथपर्यंत स्वाऱ्या करून आपला शिरकाव त्या प्रदेशांत केला होता, तरी वस्तुतः त्यांची सत्ता पंजावच्या पलीकडे कायमची अशी कधींही स्थापित झाली नाहीं. सतलज नदीच्या आग्नेयीकडील प्रदेश बहुतेक हिंदु राजांच्याच ताब्यांत होता. इ० स० ११८६ सालीं गजनवी राजांचें राज्य घोरी घराण्यांतील राजांनीं बुडवून आपली सत्ता स्थापित केली. घोर शहर पश्चिम-अफगाणिस्थानांत काबूलच्या रस्त्यावर हिरातपासून सुमारें साठ कोसांवर आहे. असो; पुढें इ०स०१२८८ त हें घोरी घराण्याचें राज्य खिलजी ( किंवा घिलजी ) घराण्यांतील लोकांनीं बुडविलें. या घराण्यांतील राजांनीं ३३ वर्षेपर्यंत हल्लींच्या वायव्य-प्रांताच्या बहुतेक भागावर व दिल्ली येथें मोठ्या थाटानें राज्य केले, व नर्मदेच्या पलीकडे दक्षिणेंतही स्वाऱ्या करून पुष्कळ राज्यें त्यांनीं जिंकून घेतलीं. इ० स० १३२१ त तुर्की गुलामांच्या वंशांतील तघलख नांवाच्या घराण्यांतल्या राजानें या घराण्याचा नाश केला. या

तघलखांच्या अंगीं राज्यकारभाराचें चातुर्य नव्हतें. त्यांनीं ९१ वर्षें राज्य केलें. त्या अवसरांत त्यांच्या ताब्यांतील बरेच प्रांत हळू हळू दिल्लीच्या राज्यापासून अलग झाले. तैमूरलंगानें जी स्वारी केली, त्या स्वारीनें (१३८८–८९) पूर्वीच ढांसळत चाललेल्या राज्यरूपी इमारतीला जणों शेवटचीच ठोकर लागली. पुढें सुमारें १२ वर्षेंपर्यंत राज्याधिकार नांवाला मात्र सुलतान महंमद तघलख याच्या हातीं राहिला. नंतर ती राजसत्ता कांहीं दिवस सैय्यद या नांवानें इतिहासांत प्रसिद्ध असलेल्या घराण्याकडे गेली. त्या सैय्यदांनीं राजा ही पदवी मात्र घेतली नाहीं. त्या घराण्यांतील पुरुषांनीं उत्तर-हिंदुस्थानांत ३३ वर्षें राज्य केले खरें, परंतु त्यांच्या राज्यसत्तेंत कांहींच जीव नव्हता पुढें लोदी घराण्यांतील एका बलिष्ठ अफगाणानें संधी साधून आपल्या हातीं सर्व सत्ता घेतली.

वास्तविक पाहतां त्या वेळीं हिंदुस्थानांत जागजागीं निरनिराळे संस्थानिक आपापल्या तऱ्हेवर राज्य करीत होते. त्यांचा अर्थाअर्थीं कोणा मुख्य राजाशीं कांहींएक संबंध नव्हता. अशी एकंदरीनें मुसलमानी राज्याची तऱ्हा होती. त्याअन्वयें इ० स० १४५० त दिल्ली व तिच्या आसपासचा थोडासा प्रदेश सैय्यद घराण्यांतील एका राजाच्या ताब्यांत होता. दिल्लीपासून केवळ सात कोसांच्या अंतरावर अहंमदखान नांवाचा सरदार स्वतंत्रपणें मेवात प्रांतावर राज्य करीत होता. सबल किंवा हल्लींचें रोहिलखंड, या प्रदेशावर थेट दिल्लीच्या दरवाजापर्यंत दर्याखान लोदी याचा अंमल होता. जलेसर म्हणजे हल्लींचा ईटा जिल्हा, ईसाखान तुर्क याच्या हातीं होता. हल्लींचा फरुखाबाद जिल्हा राजा प्रतापसिंग ह्याजकडे होता. बियाना प्रांत दाऊदखान लोदी याच्या अमलाखालीं होता. दक्षिणेस पाणिपतापर्यंतचा प्रदेश, व लाहोर, देपाळपूर[1] व सरहिंद, हे प्रदेश बेहलोल लोदी याच्या ताब्यांत होते; आणि मुलतान, माळवा, गुजराथ, बंगाला व जोनपूर या सर्व प्रांतांवर पृथक पृथक राजे होते.

१ देपाळपूर हें शहर पंजाबांत हल्लींच्या मांटगामरी नांवाच्या जिल्ह्यांत लाहोरच्या नैर्ऋत्येस वीस कोसांवर आहे. बाबराच्या कारकीर्दींत तर फार प्रसिद्ध व महत्त्वाचें शहर होतें.

सय्यद घराणें बुडाल्यावर, सुलतान बेहलोल लोदी यानें बहार प्रांताच्या सरहद्दीपर्यंतच्या बहुतेक मुलुखावर आपला अंमल बसविला होता. ( इ० स० १४५०–८८. ) त्याच्या मागून त्याचा पुत्र सुलतान शिकंदर लोदी गादीवर बसला. त्यानें बहार प्रांत काबीज केला, व बंगाल्यावर स्वारी केली. पण शेवटीं तो प्रदेश त्यानें तेथील बादशहा अल्लाउद्दीन यास परत देऊन पुनः त्याच्यावर स्वारी न करण्याचें कबूल केलें. तसेंच त्यानें मध्य-हिंदुस्थानांतही धामधूम केली. तो इ० स० १५१८ त मरण पावला. तोंपर्यंत त्यानें हल्लींचा पंजाब प्रांत, वायव्य प्रांत, जोनपूर, मध्य-हिंदुस्थानाचा बहुतेक भाग, व पश्चिम-बहार इतके प्रदेश स्वसत्तेखालीं आणिले होते. ही सत्ता तरी नांवाचीच होती. कारण त्यानें निरुपाय होऊन हे प्रदेश अफगाण सरदारांच्या स्वाधीन केले असून ते सरदार जरी कांहीं अंशीं त्या सुलतानाला मालकाप्रमाणें मानीत होते, तरी ते सर्व आपापल्या हद्दींत केवळ स्वतंत्रपणानें वागत असत, व फक्त आपलाच हुकूम तेथें चालविण्याविषयींची खबरदारी घेत असत.

या व्यवस्थेचा परिणाम असा झाला कीं, सुलतान शिकंदर लोदी मरण पावतांच बहुतेक मोठमोठ्या सरदारांना नुसते नांवाचे ताबेदार राहणें देखील आवडेनासें झालें. त्यांनीं शिकंदराचा मुलगा इब्राहीम याला फक्त दिल्लीचें राज्य देऊन, जोनपुराशिवाय बाकी सर्व प्रदेश आपसांत वांटून घेण्याचा ठराव केला. इब्राहिमाच्या धाकट्या भावाला दिल्लीच्या पोटांतच एक निराळें राज्य म्हणून जोनपूर प्रांत द्यावयाचे ठरलें होतें. हा बेत इब्राहिमाला प्रथम कळला तेव्हां निरुपाय होऊन त्यानें तो मान्य केला असें दिसतें, परंतु त्याचा नातलग खानजहान लोदी यानें याबद्दल त्याचा निषेध केला, तेव्हां त्याचें मन फिरलें; व त्यानें आपला भाऊ जोनपुराकडे जाण्यास निघाला होता त्याला परत बोलाविलें. पण तो परत आला नाहीं. तेव्हां त्यांची आपसांत लढाई सुरू झाली. तींत इब्राहिमाचा जय झाला. इ० स० १५१८ त इब्राहिमाचा भाऊ मरण पावल्यावर त्यानें आपल्या महत्त्वाकांक्षी सरदारांस कह्यांत आणण्याविषयीं प्रयत्न चालविला. तेव्हां त्यांनीं बंड केलें. तें बंड

त्यानें मोडलें. पण जय मिळाल्यावर त्यानें अतिशय क्रूरपणा केल्यामुळें शांतता न होतां जिकडे तिकडे नवीन बंडें उपस्थित झालीं. बहार, अयोध्या व जोनपूर येथील सरदार लढण्यास तयार झाले, व पंजाबांतील सरदारांनींही त्यांचें अनुकरण केलें. ही त्या उभयपक्षांतील लढाई मोठ्या निकरानें चालली असून कधीं एकाचा जय होत असे, व कधीं दुसऱ्याचा होत असे. ही गडबड अगदीं निकरास जाऊन पोंचली तेव्हां सुलतान इब्राहीम याचा चुलता अल्लाउद्दीन हा बाबराकडे पळून गेला. त्या वेळीं बाबर हा कंदाहार प्रांताची व्यवस्था करण्यांत गुंतला होता. अल्लाउद्दिनानें त्याला, आपणास दिल्लीच्या तक्तावर बसविण्याविषयीं विनंति केली. याच वेळीं बाबराकडे दुसरी एक जास्त फायद्याची कामगिरी आली. ती अशी कीं, लाहोरचा सुभेदार दौलतखान यास इब्राहिम लोदीच्या सेनापतीनें अतिशय जेर केलें होतें, त्याचा प्रतिकार करण्याकरितां त्यानें बाबराजवळ साहाय्य मागितलें, व त्याबद्दल त्याची ताबेदारी पतकरण्याचें कबूल केलें. ही गोष्ट मान्य करून बाबरानें ताबडतोब लाहोराकडे चाल केली.

महंमद गजनवीच्या स्वारीपासून सुमारें ५०० वर्षांपर्यंतचें हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेचें जें वर दिग्दर्शन केलें आहे, त्यावरून तेथवर होऊन गेलेल्या निरनिराळ्या घराण्यांतील राज्यांचीं पाळेंमुळें या देशांत कां नीटपणें रुजलीं नाहींत, याचा बराच खुलासा होईल, असें वाटतें. गजनवी किंवा घोरी, तघलक, सैय्यद किंवा लोदी यांपैकीं कोणचेंही घराणें असो, त्यांतील पुरुषांनीं युद्धें केलीं, तीं केवळ स्वत: व स्वत:च्याच फायद्याकरितां केलीं असून या संबंधांत त्यांच्या सरदारांनींही त्यांचेंच अनुकरण केलें होतें. हिंदुस्थानावर निरनिराळ्या राजांच्या मांडलिक सरदारांनीं स्वाऱ्या करून त्याचा बराच भाग आपल्या कबजांत घेतला होता. ते राजे स्वत: दुसऱ्याचे ताबेदार असत. ती ताबेदारी, ते मुख्य अधिकाऱ्याच्या योग्यतेप्रमाणें व बलाबलाप्रमाणें योग्य वाटेल तशी मानीत किंवा न मानीत. इंग्लंडांत पहिल्या विल्यम राजाच्या वेळीं राज्यक्रांति झाल्यावर, जिंकणारे व जिंकलेले लोक यांचा आपसांत मेळ होऊन ते हळूहळू

अगदीं एक झाले, तसा प्रकार येथें झाला नाहीं. मुसलमान लोक हिंदुस्थानांत एके प्रकारें अगदीं निराळ्या लोकांवर राज्य करीत होते, व ते लोक तरी त्यांचा प्रतिकार करण्यास समर्थ नव्हते ह्मणनच त्यांचा हुकूम मानीत असत. स्वामिभक्तीचा किंवा याह्-नहीं विशेष जिव्हाळ्याचा भाव हिंदुस्थानांतील लोकांच्या मनांत उत्पन्न करून त्याच्या द्वारानें राज्यकर्त्या लोकांशीं त्यांचा विशेष निकट संबंध जुळविण्याचा विचार मुसलमान राज्यकर्त्यांच्या मनांत कधींच आला नाहीं. ते राज्यकर्ते परकीय असेच आले व पर-कीय असेच कायम राहिले; व ह्मणनच त्यांची या देशावर केवळ वरवर मात्र सत्ता होती. तिचीं पाळेंमुळें प्रजेचे प्रेमरूपी भूमींत खोल गेलीं नव्हतीं. यामुळें केवळ तरवारीच्या जोरानें मात्र तिचें रक्षण होत होतें. पुढें मोंगल-बादशाही झाली, तिच्यांत अकबराची कारकीर्द ही त्या बादशाहींतील राज्यव्यवस्थेची अत्युत्तम द्योतक होय; व हाच काय तो मोठा फरक पहिल्या व या राज्यव्यवस्थेंत होता.

बाबरानें हिंदुस्थानावर वास्तविक पहिली स्वारी इ० स० १५१९ त केली. तिच्यापूर्वी मागें वर्णन केल्याप्रमाणें त्यानें एकदा या देशाची भूळभेट घेतली होती, पण तींत कांहीं विशेष म्हणण्यासारखें नव्हतें. त्याच वर्षी त्यानें पुनः एकवार इकडे स्वारी केली होती असें कांहीं इतिहासकार म्हणतात. परंतु त्या वेळीं यूसफजई[१] नामक लोकांवरच काय तो त्यानें हल्ला केला असून त्या प्रसंगीं तो फक्त पेशावरपावेतों आला होता, व सिंधु नदीच्या अलीकडे मुळीच आला नव्हता, असें जें फेरिस्ता[२] यानें लिहिलें आहे, तेंच खरें असावें; व हीच बाबराची दुसरी स्वारी लोकांनीं मानली असावी. इ० स० १५२० त त्यानें पुनः स्वारी केली यांत तर शंकाच नाहीं. त्या स्वारींत तो सिंधु नदी

१ यूसफजई हे अफगाणिस्थान व हिंदुस्थान यांच्यामधील पहाडांत राहणाऱ्या अफगाण लोकांपैकीं एका पोटभेदांतील लोक होत.

२ महंमदकासम फेरिस्ता हा प्रसिद्ध मुसलमान इतिहासकार इ० स० च्या १७ व्या शतकाच्या अखेरीस होऊन गेला. हा मूळचा दक्षिणेंतील राह-णारा होता. यानें हिंदुस्थानाचा, प्राचीनकाळापासून सुमारें १७ व्या शत-काच्या अखेरीपर्यंतचा, बहुतेक सर्व भागाचा इतिहास फारच शोधपूर्वक व उत्तम लिहिला आहे.

उतरून, हल्लीं ज्याला रावळपिंडी प्रांत ह्मणतात तेथें गेला, व तेथून जेहलम नदी उतरून सियालकोटास आला. त्या शहराला उपसर्ग न देतां त्यानें सैय्यदपूर शहर लुटलें. परंतु तेथूनच त्याला खुद्द काबुलावर येणाऱ्या परचक्राचें निवारण करण्याकरितां परत जावें लागलें.

कंदाहार येथें आपला बस पुरा बसविल्यावांचून हिंदुस्थानावर स्वारी केली तर ती कधींही चांगली सफळ होणार नाहीं, अशी या तिसऱ्या स्वारींत आलेल्या अनुभवावरून बाबराची पक्की खात्री झाली. म्हणून पुढें दोन तीन वर्षें त्यानें तो किल्ला आणि गझनी व खुरासान यांच्यामधील प्रदेश नीटपणें कबज्यांत घेण्याचा उपक्रम चालविला. तो या सर्व प्रदेशाचा नीटपणें बंदोबस्त करीत होता इतक्यांत मागें लिहिल्याप्रमाणें अल्लाउद्दीन लोदी व लाहोरचा सुभेदार दौलतखान यांच्याकडून त्याला निमंत्रणें आलीं. यांपैकीं दुसऱ्या निमंत्रणाअन्वयें हिंदुस्थानावर चौथी स्वारी करण्याचा निश्चय करून तो पुनः एकवार सिंधु, जेहलम, व चिनाब या नद्या उतरून लाहोरापासून दहा मैलांवर येऊन पोहोंचला. तेथें लोदी घराण्याच्या पक्षाच्या लोकांची व त्याची चकमक उडाली. तींत त्यानें त्यांचा अगदीं पराभव केला, व लाहोर शहर त्याच्या हातीं आलें. तेथें चारच दिवस राहून त्यानें देपाळपुरावर चाल केली, व तें शहर हल्ला करून घेतलें. या ठिकाणीं दौलतखान व त्याचे मुलगे त्याला येऊन मिळाले. त्यांना बाबरानें दिलेलें इनाम न आवडून ते नाराज झाले, व त्यांनीं बाबराविरुद्ध खटपटी चालविल्या. बाबर दिल्लीच्या वाटेवर सरहिंद येथें पोहोंचला असतां त्यास या खटपटींचा सुगावा लागला. यामुळें पुढें जाण्याचा बेत तूर्त रहित करून परत जाण्याचें त्यानें ठरविलें, व आपल्या खात्रीच्या सरदारांना पंजाब प्रांत वांटून देऊन तो चालता झाला.

तो सिंधु पार उतरला तोंच पंजाबांत पुनः तंटे व दंगे सुरू झाले. अल्लाउद्दीन लोदी याच्याकडे देपाळपूर आलें होतें. तो अगदीं निराश होऊन, बाबरानें स्वतः पुनः हिंदुस्थानावर स्वारी करावी या उमेदीनें काबुलास पळून गेला. त्या वेळीं उजबक लोकांनीं बल्ख शहराला वेढा घातला असल्यामुळें बाबराला इकडे

येतां आलें नाहीं. तरी त्यानें अल्लाउद्दिनाच्या मदतीला सैन्य देऊन पंजाबांतील सरदारांना त्याचें साहाय्य करण्याविषयीं हुकूम केला. नंतर अल्लाउद्दिनानें दिल्लीवर स्वारी केली. ती निष्फळ झाली, व तो दिल्लीहून पुनः पंजाबाकडे पळून गेला. याच संधीस बाबर हिंदुस्थानावर पांचवी किंवा शेवटची स्वारी करण्याच्या तजविजीस लागला होता.

त्या स्वारीचें येथें केवळ दिग्दर्शन केलें ह्मणजे बस आहे. बाबर आपला पुत्र हुमायून याच्यासह खैबरची घाटी उतरून पेशावरास आला, व तेथें दोन दिवस राहून ता० १६ दिसेंबर रोजीं सिंधु नदी उतरून सपाट्यानें सियालकोटास गेला. तो २९ व्या तारखेस तेथें पोहोंचला. तेव्हां अल्लाउदिनाचा पराभव होऊन तो पळून गेल्याचें वर्तमान त्याला कळलें. तथापि न गडबडतां दुसरे दिवशीं सकाळीं तो सियालकोट व रावी नदीच्या तीरावरील कलानूर यांच्या मध्यभागीं असलेल्या परसरोर नांवाच्या गांवीं गेला, व कलानुराजवळ रावी नदी उतरून तसाच पुढें जाऊन बियास नदी उतरला, आणि आपला पूर्वींचा ताबेदार दौलतखान मिलवत याच्या मजबूत किल्ल्यांत आश्रय धरून राहिला. तो किल्ला त्यानें लौकरच हस्तगत केला. नंतर बाबर जालंदर दुआबांतून सतलज नदीकडे वळला. या संबंधानें त्यानें लिहिलें आहे कीं, 'मीं आपला पाय दृढ निश्चयरूपी रिकिबींत ठेविला, व परमेश्वरावरील भरंवसा हाच लगाम हातीं धरून निघालों.' रूपारजवळ सतलज नदी उतरून तो अंबाल्यावरून सिरसाव्याच्या[2] समोर यमुनातीरावर येऊन दाखल झाला. तो तेथून दोन मजला यमुनेच्या तीरानेंच गेला. नंतर दोन दिवसांनीं तो दिल्लीच्या वायव्येस २७ कोसांवर पाणिपत तेथें ता० १२ एप्रिल सन १५२६ रोजीं येऊन पोहोंचला. तेथें त्यानें मुक्काम करून आपल्या तळासभोंवतीं मजबूत तटबंदी केली.

पुढें नऊ दिवसांनीं इब्राहीम लोदी यानें आपल्या फौजेनिशीं बाब-

१ बाबरानें या मोहिमेचें फार सुरेख व सविस्तर वर्णन आपल्या चरित्रांत केलें आहे.

२ सिरसावा हा गांव यमुनेच्या दक्षिणतीरावर साहरणपूरच्या वायव्येस सुमारें पांच कोसांवर आहे.

राच्या या मजबूत छावणीवर हल्ला केला. ही फौज सुमारें एक लक्ष होती, असा खुद्द बाबरानें अंदाज केलेला आहे. त्यानें असें लिहिलें आहे कीं, 'सूर्य भालाभर वर आला होता तेव्हां लढाईस आरंभ झाला, व दुपारपर्यंत रणकंदन चालून शत्रूंचा अगदीं मोड होऊन ते परागंदा झाले.' हा जय सर्व प्रकारें महत्त्वाचा होता. इब्राहीम लोदी मोठ्या शौर्यानें लढत असतां मारला गेला, व हिंदुस्थान देश त्या विजयी योद्धयाच्या(बाबराच्या) हातीं आला. त्याच दिवशीं बाबरानें दिल्ली व आग्रा कबज्यांत घेण्याकरितां सैन्य पुढें पाठविलें. या दोन्ही गोष्टी ता० २४ एप्रिल व ४ मे रोजीं अनुक्रमें घडल्या.[1]

---

# भाग पांचवा.

## बाबराची हिंदुस्थानांतील स्थिति.

वायव्य प्रदेशांतील राज्याधिकाराचीं दोन मुख्य ठिकाणें--दिल्ली व आग्रा—हीं हातीं आल्यावर, खऱ्या राजकारणी पुरुषास साजण्यासारख्या दूरदृष्टीनें बाबरानें, हिंदुस्थानांतील त्या वेळच्या राजकीय वस्तुस्थितीचें पर्यालोचन केलें; तेव्हां केवळ उत्तर-हिंदुस्थान मात्र आपल्या हातीं आलें असें त्याच्या ध्यानांत आलें. अयोध्या, जोनपूर व पश्चिम-बहार, या मुख्य मुख्य प्रदेशांतील अधिकाऱ्यांनीं सुलतान इब्राहीम लोदी याच्याविरुद्ध बंड केलें त्या वेळीं जरी त्यानें त्यांच्यावर फौजा पाठविल्या होत्या, तरी आतां त्या दोन्ही पक्षांचे लोक या नवीन आलेल्या शत्रूच्या विरुद्ध एकत्र होतील, ही गोष्ट अगदीं स्पष्ट दिसत होती. तसेंच बंगाल्यांत नसरतशहा[2], गुजराथेंत

---

१ हळूहळू प्रसिद्धीस येतां येतां आपण या प्रचंड व प्रसिद्ध अशा हिंदुस्थान देशास कसें जिंकून घेतलें याविषयींचें वर्णन करितांना बाबरानें स्वचरित्रांत लिहिलें आहे कीं, 'हा जय मला मिळाला तो माझ्या स्वतःच्या सामर्थ्यानें मिळाला असें मी समजत नाहीं, किंवा हें भाग्य माझ्या स्वतःच्या कर्तृत्वानें मला प्राप्त झालें असेंही मी मानीत नाहीं. तर परमेश्वराच्या कृपारूपी उगमापासून हा अमृताचा प्रवाह मजवर लोटला, असें मी खरोखर समजतों.'

२ शिकंदर व इब्राहीम लोदी, आणि बाबर व हुमायून यांच्या कारकिर्दीत बंगाला, गुजराथ व माळवा या प्रांतांत अनुक्रमें नसरतशहा,

शिकंदरशहा, व माळव्यांत सुलतान महमूद यांचीं प्रबळ व स्वतंत्र राज्यें होतीं. चंबळ व बानास या नद्यांच्या संगमाजवळील रणथं-भोरचा[1] किल्ला, काळीसिंध नदीवरील सारंगपूर, बटेवा नदीवरील भिलसा, व चंदेरीचा किल्ला यांच्या आसपासचा माळव्याचा भाग, तसेंच त्या वेळीं अतिशय प्रसिद्ध असलेला चितोडचा[2] किल्ला, हे प्रदेश महाप्रतापी व प्रख्यात असा महाराणा संग्रामसिंग[3] किंवा राणा संग यानें परत जिंकून घेतले होते. दक्षिणेंत त्या वेळीं ब्राह्मणी किंवा बहामनी घराण्यांतील बादशाहांनीं एक राज्य स्थापिलें होतें. विजयानगर[4] येथील राजाही स्वतंत्रपणें राज्य करीत होता. तसेंच त्या वेळेपर्यंत कधींच मुसलमानांच्या आहारीं न गेलेले असे बरेच लहान मोठे संस्थानिक व राजे आपआपले प्रांत संभाळून होते. या सर्व गोष्टी बाबराच्या ध्यानांत आल्या.

---

शिकंदरशहा व सुलतान महमूद नांवाचे बलाढ्य व बरेच वैभवशाली सुलतान राज्य करीत होते. गौड, अमदाबाद व मांडव येथें त्यांच्या राजधान्या होत्या. गुजराथ व माळवा येथील सुलतानांच्या नेहमीं लढाया होत असत. संग राण्यानें इ० स० १५२५ त शिकंदरशहाचा पराभव केला होता.

१ रणथंभोरचा सुप्रसिद्ध किल्ला हल्लीं जयपूरच्या राजाच्या ताब्यांत आहे.

२ चितोडगड हा रजपूत लोकांच्या इतिहासांत अतिशय प्रसिद्ध व प्रचंड किल्ला अद्यापि उदेपूरच्या महाराण्याच्या ताब्यांत आहे. तो अजमिरापासून दक्षिणेस राजपुताना-माळवा-रेल्वेच्या जवळ सुमार ५० कोसांवर आहे. या किल्ल्याविषयीं एक पद्य प्रसिद्ध आहे तें:—

ताल‍में ताल भोपाल और सब तलैया है।
गडमें गड चितोड और सब गडैय्या है॥

३ महाराणा संग्रामसिंग किंवा संग राणा हा मेवाडच्या सिसोसिदिया राजघराण्यांतील अत्यंत प्रसिद्ध व शूर राजा होय. सर्व रजपूत राजघराण्यांत हें घराणें फार प्राचीन व पूज्य आहे. संग राण्याच्या तोडीचे देशाभिमानी शूर वीर या देशांत अलीकडे क्वचितूच उत्पन्न झाले आहेत. बाबराची व त्याची इ० स० १५२७ त लढाई झाली, तींत त्याचा पराभव झाला.

४ विजयानगर हें इसवी सन १४–१६ या शतकांत फार मोठ्या बलाढ्य अशा हिंदु राजांचें राजधानीचें शहर तुंगभद्रा नदीच्या कांठीं होतें. तालीकोटच्या लढाईंत येथील राजाचा इ० स० १५६५ त पराभव झाल्यानंतर तें राज्य बुडालें, व विजयानगरचें पूर्वीचें वैभवही केवळ नामशेष झालें. हल्लीं याला हंपी असें ह्मणतात. हें बल्लारीपासून वायव्येस सुमारें ३० कोसांवर आहे.

या सर्व राजे लोकांच्या स्वातंत्र्याचाच म्हणजे आपल्याला मोठा अडथळा आहे असें नाहीं, हें तेव्हांच बाबराच्या ध्यानांत आलें. पूर्वीच्या मुसलमान बादशहांनीं हिंदुस्थानांतील प्रजेशीं सलोख्याचें वर्तन मुळींच ठेविलें नसल्यामुळें ती प्रजा प्रत्येक नवीन होणाऱ्या बादशहाशीं अर्थातूच वैरभावानें वागणार, हाच मुख्य अडथळा आपल्याला आहे, ही गोष्ट त्याच्या लक्ष्यांत आली. याविषयीं अर्स्किन्[1] नामक ग्रंथकारानें लिहिलें आहे कीं, ' त्या वेळीं उत्तर-हिंदुस्थानांत मूळची हिंदुराज्य-व्यवस्था व सामाजिक व्यवस्था अद्यापि अवशेष राहिली होती. त्या देशांतील गांव व प्रांत यांची राज्यव्यवस्था व त्यांतील निरनिराळे लहान लहान जमीदारी किंवा मांडलिकी तऱ्हेचे विभाग हेही कायम होते. राज्यक्रांतीच्या प्रसंगीं सर्व लोक, दूर असलेल्या राजधानींत राज्य करणाऱ्या सार्वभौम राजाविषयीं विचार न करितां फक्त आपल्या स्वतंत्र राज्य करणाऱ्या मांडलिका-विषयींच विशेषतः विचार करीत;—किंबहुना एका मुख्य राजधानी-पासून उत्तम तऱ्हेची ठेवितां येत असलेली राज्यव्यवस्था आजवर कधींच त्यांच्या नजरेस आली नव्हती, व त्यांना अशा व्यवस्थेचा अनुभवही नव्हता; म्हणून नवीन येणाऱ्या प्रत्येक परशत्रूला अडथळा केला तर कदाचित् आपला फायदाच होईल, असें ते समजत असत.

या अश्रुत व अपरिचित नवीन वीराच्या ( बाबराच्या ) आगमनानें लोकांच्या व प्रजेच्या मनांत उत्पन्न झालेली भीति पूर्वीच्या मुसलमान-राजघराण्याच्या पक्षाच्या लोकांच्या कारस्थानांमुळेंही अधिक वाढत गेली होती असें ह्मणण्यास हरकत नाहीं. मोंगलांचा जय होण्यांत आपला सर्वस्वी नाश होणार असें त्या लोकांस पक्कें वाटत होतें. यामुळें त्यांनीं, या नवीन आलेल्या मध्य-एशियेंतील दांडग्या व रानटी लोकांच्या हातून कोणचेंही देवालय किंवा कोणाच्याही बायका-मुली सुरक्षित राहावयाच्या नाहींत, अशी भीति सर्व हिंदु प्रजेच्या मनांत उत्पन्न करण्याच्या कामीं हरतऱ्हेनें प्रयत्न करण्यांत कसर केली नाहीं. तो दयाळू व उदार सुलतान ( बाबर ) आग्र्याकडे

१ अर्स्किन यानें बाबर व हुमायून या दोन मोंगल बादशहांच्या कार-कीर्दीचा फार चांगला सविस्तर इतिहास व बाबराच्या चरित्राचें इंग्रजी भाषांतर लिहून प्रसिद्ध केलें आहे.

येऊं लागला तेव्हां तेथील हिंदु लोक वरील भेवडावणीला भिऊन तेथून पळून गेले. आपणावर आतां खास जुलूम होणार हें स्पष्ट दिसत आहे, तर तो सोसण्यापेक्षां वनांत कष्ट सोसून राहणें फार बरें असें त्यांना वाटलें.

याच वेळीं फौजेंत बेदिली उत्पन्न झाल्यामुळें बाबरास फारच त्रास झाला. त्याच्या फौजेंतील बहुतेक लोक अफगाणिस्थानाच्या पूर्वेकडील पहाडी प्रदेशांत राहणारे होते. ते आपली लढाईची हौस पुरण्याचा संभव होता तोंपर्यंत आपल्या धन्याबरोबर अत्यानंदानें चालले होते. परंतु पाणिपतच्या लढाईमुळें उत्तर-हिंदुस्थान त्यांच्या हस्तगत झालें होतें; व दिल्लीहून आग्र्याचा मार्ग उजाड प्रदेशांतून असून त्या वेळीं उष्णकाळ होता; तशांत इ० स० १५२६ चा उन्हाळा तर इतर वर्षांच्या उन्हाळ्यांहून फारच कडक होता; यामुळें या पहाडी लोकांना आपापल्या पहाडांत परत जावेंसें वाटूं लागलें. ही बेदिली केवळ शिपाई लोकांतच होती असें नाहीं; हुद्देदार लोकही कुरकूर करूं लागले, व ही कुरकूर शेवटीं अतिशय वाढून ती बाबराच्या कानीं गेली.

बाबराला आपण जिंकून घेतलेल्या प्रदेशाविषयीं मोठा आनंद वाटत होता. तेथील कडक उन्हाळा व प्रजेची बेदिली या दोन्ही गोष्टींमुळेंही, आशिया खंडांतला हा एक अत्यंत सुपीक, सुंदर व मौल्यवान् भाग आपल्या हस्तगत झाला असल्याची कल्पना त्याच्या मनांतून नाहींशी झाली नाहीं. त्यानें लिहून ठेविलेल्या स्वतःच्या चरित्रांत या गोष्टीविषयींचें वर्णन करण्यांत सुमारें वीस पृष्ठें त्यानें खर्च केलीं आहेत. तो म्हणतो, 'हा फारच सुंदर व अतिशय चांगला देश आहे. आमच्या देशाच्या मानानें पाहतां ही जणों दुसरीच सृष्टि वाटते.' असो. सर्व हिंदुस्थान देश जिंकून घेऊन आपण हातीं धरलेलें काम नीटपणें शेवटास नेण्याची सर्व सिद्धता आपल्याजवळ आहे असें त्याला तावडतोब दिसून आलें. यापुढें काबुलचा सुलतान या त्याच्या लहानशा पदवीचा, हिंदुस्थानचा बादशहा या थोर पदवींत अंतर्भाव व्हावयाचा होता; कारण त्याला आतां मागें परतून जाण्याची इच्छा किंवा सवड नव्हती.

पुढें येणाऱ्या सर्व अडचणींचा त्यानें विचार करून त्यांचा प्रतिकार करण्याचे उपायही योजून ठेविले होते. तो पहिल्या प्रतीचा राज्यकारस्थानी होता. हातीं धरलेलें काम तो तावडतोब निकालास लावीत असे. वास्तविक पाहतां विशेष भयंकर व महत्त्वाची अडचण ह्मणजे फौजेंतील लोकांची नाखुशी ही होती, तिजकडे त्यानें प्रथम लक्ष्य दिलें. आपल्या सर्व सरदारांचा दरबार भरवून त्यानें सारी खरी स्थिति त्यांच्यापुढें मांडली; व त्यांनीं इतके दिवस दुःखें भोगिलीं, मोठमोठ्या मजला मारल्या, भयंकर लढाया केल्या, व अशा अनेक प्रकारच्या आयासांनीं अनेक संपन्न व विस्तीर्ण प्रदेश कसकसे जिंकून घेतले, या सर्व गोष्टी त्यांना त्यानें नीटपणें समजाविल्या. हें सर्व तसेंच सोडून काबुलास परत जाणें खरोखर फारच लाजिरवाणें आहे हें त्यानें पूर्णपणें त्यांच्या मनांत भरवून दिलें. तो त्यांस म्हणाला, ' जो माझा खरा मित्र असेल त्यानें पुनः अशा विचाराचें नांव काढूं नये; परंतु ज्यांना परत जाण्याचा विचार सोडवत नसेल किंवा ज्यांचें मन इकडे राहण्याविषयीं प्रवृत्त होत नसेल, त्यांनीं खुशाल परत जावें. ' या त्याच्या बोलण्याचा तेव्हांच त्याच्या मनाजोगा परिणाम घडला. त्याच्या बोलण्याप्रमाणें लागलीच त्याच्या हातून कृति घडून, पुढें ज्या लढाया झाल्या त्यांत त्याला जय मिळत गेले, व फौजेच्या मनांतील बेदिली नाहींशी होऊन तिच्या अंगीं उत्साह व स्फुरण येत चाललें.

या विजयी बादशहाच्या या दृढ निश्चयाचा दुसरा आणखी एक चांगला परिणाम झाला. इकडेच पूर्वीपासून राहिलेले मुसलमान लोक, तसेंच हिंदु जमीदार व व्यापारी लोक वगैरेंच्या मनांतील भीति, बाबर इकडेच कायम राहणार असें पाहतांच अगदीं कमी झाली. तसेंच त्याच्या उदार व थोर स्वभावाचीं द्योतक अशीं पुष्कळशीं कृत्यें लोकांच्या नजरेस येत गेल्यानें त्याच्याविषयीं त्यांच्या समजुतींत बराच फरक पडला; आणि खेड्यापाड्यांतील लोक व व्यापारी आपापल्या घरीं परत आल्यानें त्याच्या छावणींत सर्व प्रकारच्या सामुग्रीची टंचाई अगदीं नाहींशी झाली. पुढें लौकरच इब्राहीम लोदी यानें जोनपूर व अयोध्या येथील बंडें मोडण्याकरितां पाठविलेल्या फौजे-

नेंही बाबराला आपला धनी कबूल केले. या अवकाशांत आपली फौज नीटपणें उपयोगांत आणून त्यानें रोहिलखंडांचा बराच भाग व यमुनेवरील मोठें महत्त्वाचें जें रावेरीचें ठाणें तें जिंकून घेतलें, व इटावा आणि धोलपूर या शहरांना वेढा घातला. परंतु इकडे मध्य-हिंदुस्थानांत एका बाजूनें त्याला आडचणी येऊं लागल्या, त्यांचा प्रतिकार करण्याविषयीं हयगय करणें याला मुळींच उचित नव्हतें.

या अडचणी, चितोडचा राणा संग्रामसिंग याच्यामुळें उपस्थित होत होत्या.हा राजा सर्व तऱ्हेनें खरोखरच थोर होता. त्यानें, पूर्वीच्या मुसलमान राजांनीं जिंकून घेतलेल्या वाडवडिलार्जित राज्याचा बहुतेक भाग परत जिंकून घेतला होता, हें मागें लिहिलेंच आहे. याहूनही अधिक महत्त्वाच्या गोष्टी त्यानें केल्या होत्या. खुद्द इब्राहीम लोदी 'याच्याशीं बकरावल व चितावली या गांवांजवळ दोन घनघोर लढाया करून त्यानें जय मिळविला होता. तसेंच दुसऱ्या आणखी सोळा लढायांत इतर योद्ध्यांवर त्यानें जय मिळविला होता. बाबर हिंदुस्थानांत येण्यापूर्वी त्यानें, त्या वेळीं अजिंक्य ह्मणून नांवाजलेला रणथंभोरचा किल्ला घेतला होता. हा आपला यशस्वी क्रम असाच पुढें त्यानें चालविला असतां, रणथंभोरच्या पूर्वेस थोड्या कोसांवर असलेला कंदरचा प्रचंड गड त्यानें नुकताच घेतला हें वर्तमान बाबराला जेव्हां कळलें, तेव्हां त्याला फार वाईट वाटलें.

पर्जन्यकाळाच्या अखेरीस बाबरानें या व दुसऱ्या सर्व अडचणींच्या प्रतिकाराच्या उपायांचा विचार करण्याकरितां दरबार भरविला. या दरबारांत असें ठरलें कीं, बाबराचा वडील मुलगा हुमायून—हा त्या वेळीं अठरा वर्षांचा होता—यानें जाऊन दुआब,अयोध्या व जोनपूर हे पूर्वेकडील प्रदेश पूर्णपणीं पादाक्रांत करावे; व स्वतः बाबरानें सर्व कामकाजाची व्यवस्था नीट लावण्याकरितां आग्रा येथें रहावें, आणि आसपासच्या शत्रूंचा पाडाव झाल्यानंतर संग राण्यावर जावें.

हुमायुनाची मोहीम पूर्णपणें सफल झाली. त्यानें बहार प्रांताच्या सरहद्दीपर्यंतचा सर्व मुलूख काबीज केला. ता० ९ जानेवारी इ० स० १५२७ रोजीं तो परत आल्यावर बाबरानें बियाना व धोलपूर घेऊन

ग्वाल्हेरचा किल्लाही युक्तीनें हस्तगत केला. तसेंच मुलतान शहर काबीज झाल्याचें आनंदकारक वर्तमानही त्याला कळलें. सिंधु नदीपासून पश्चिम-बहार प्रांताच्या सरहद्दीपर्यंत व काल्पी व ग्वाल्हेरपासून हिमालयापर्यंत सर्व प्रदेश कबज्यांत आणल्यावर त्यानें चितोडचा अति विख्यात राणा संग याच्याकडे मोर्चा फिरविला. ता० ११ फेब्रुवारी रोजीं तो आपल्या फौजेनिशीं त्याच्या सैन्याशीं टक्कर देण्यास निघाला. लोदी पक्षाचे मुसलमान लोक राण्यास येऊन मिळाले होते. राणा आपल्या सैन्यासह पुढें चालून आला. तो बियाना शहरापासून सहा कोसांवर व आग्र्यापासून सुमारें तीस कोसांवर बिसावर येथें तळ देऊन राहिला होता. बाबर हा, शिक्री—ज्याला हल्लीं फत्तेपूर-शिक्री म्हणतात—त्या शहरीं जाऊन राहिला होता. पुढें कांहीं लहानसहान झटापटी झाल्या. त्यांत रजपूत लोकांचीच सरशी झाली, व बाबराचें सैन्य अगदीं निरुत्साह झालें. यामुळें त्यानें आपली छावणी खूब मजबूत केली, व मेवाड प्रदेश उध्वस्त करण्याकरितां कांहीं लोक पाठवून तो तात्पुरचा तसाच स्वस्थ राहिला.

बाबर अशा तऱ्हेनें छावणींत घेरून पडला असतां, तीं आपली उगीच माशा मारीत बसण्याची स्थिति पाहून तो फार खिन्न झाला. त्याला त्या स्थितीचा फारच त्रास आला, तेव्हां त्यानें आपल्या आयुष्यांत घडलेल्या सर्व गोष्टींचें सिंहावलोकन केलें. त्यानें पश्चात्तापपूर्वक व अत्यंत लीन होऊन सर्व गोष्टींचा विचार केला; तेव्हां कुराणांत मद्यपाननिषेधाविषयीं कडक नियम आहे त्याचें आजपर्यंत आपण उल्लंघन केलें हें आपण महत्पाप केलें, असें त्याच्या लक्षांत आलें. याचा प्रतिकार करण्याचा त्यानें निश्चय केला, व तत्काळ दारू पिण्याचे सर्व सोन्यारुप्याचे पेले, सुरया व लोटे आपल्यासमोर आणविले, व ते सर्व आपल्या समक्ष फोडवून विकून टाकले; आणि त्यांचा आलेला सारा पैसा गोरगरिबांस वांटून दिला; आणि छावणींत असलेली सर्व दारू नासून किंवा ओतून टाकविली. त्याच्या तीनशें सरदारांनींही त्याचें अनुकरण केलें.

आपण हल्लीं आहों या स्थितींत आपणाला फार दिवस काढतां येणार नाहींत असें बाबरानें पक्केपणीं जाणलें. शेवटीं ता० १२ मार्च

रोजीं तो सुमारें कोसभर पुढें सरसावला. तेथें मुक्काम करून दुसरे दिवशीं पुनः तो पुढें गेला व लढाई देण्यास चांगली सोईची जागा त्यानें पूर्वीच पाहून ठेविली होती, तेथें पोहोंचला. त्या ठिकाणीं त्यानें आपली फौज युद्धाच्या तयारीनें व्यवस्थेशीर उभी केली. सोळाव्या तारखेस रजपूत लोक व त्यांचे साह्य करणारे राजे वगैरे पुढें चालून आले. नंतर लढाई जुंपली. बाबरानें या लढाइचें फार सुंदर व निःसंशय खरें असें वर्णन केलें आहे. या लढाईत त्याला सर्व प्रकारें उत्तम जय मिळाला, व त्याच्या योगानें जणों तत्काल सर्व राजपुताना पादाक्रांत झाल्यासारखी स्थिति झाली[१]. तेथून बाबर तसाच बियाना शहरावर गेला, व पुढें मेवाडांत जाऊन त्यानें तो सर्व प्रदेश सर केला. हा जो त्यानें जय मिळविला त्याचा परिणाम, त्यानें प्रत्यक्ष केलेल्या स्वाऱ्यांपुरताच झाला असें नाहीं. दुआबांतील फितलेल्या शहरांपैकीं कांहींतील लोक तेव्हांच शरण आले, व कांहीं शहरें पाडाव झालीं. सर्व दुआब पुर्णपणें सर केल्यावर बाबरानें मध्य हिंदुस्थानांतील हिंदु राजांकडे आपला मोर्चा फिरविला. त्या सर्वांत त्या वेळीं चंदेरीचा राजा मुख्य होता. बाबर चंदेरीच्या किल्ल्याजवळ येऊन पोहोंचला, इतक्यांत त्याला, पूर्वेकडे पाठविलेल्या सरदारांचा मोड होऊन ते लखनौहून कनोज येथें माघारे आल्याचें वर्तमान कळलें. तथापि न घाबरतां त्यानें चंदेरीचा वेढा तसाच नेटानें चालविला, व थोडक्याच दिवसांत तो किल्ला एकदम हल्ला करून घेतला. त्या प्रदेशाचा बंदोबस्त केल्यानंतर तो सपाट्यानें पूर्वेकडे वळून कनोज शहराजवळ आपल्या पराभव पावलेल्या सरदारांना येऊन मिळाला, व तेथेंच गंगेला पूल बांधून त्यावरून पार उतरून शत्रूला—लोदी-पक्षापैकीं बाकी राहिलेल्या फौजेला—हांकून दिलें. त्यानें पुनः लखनौ शहर घेतलें, व गोमती व घोग्रा ह्या नद्या उतरून त्या निरुत्साह झालेल्या फौजेची दाणादाण केली. नंतर तो पूर्वीं हातीं घेतलेल्या राज्यव्यवस्थेच्या कामाचा निकाल लावण्याकरितां आग्र्यास परत आला.

---

१ या लढाईत राणा संग जखमी झाला, व त्याचे बहुतेक मोठमोठे सरदार पतन पावले. याच वर्षाच्या अखेरीस राण्याचा मेवाडच्या सरहद्दीवर बसवा येथें अंत झाला. या लढाईमुळें राजपुतान्याच्याच काय, पण सर्व हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्याला जबरदस्त धक्का बसला!

परंतु राज्यव्यवस्थेसारख्या कामास जी स्वस्थता पाहिजे ती मिळण्यास त्याला अवसर सांपडला नाहीं. जोनपूर येथील जुन्या मुसलमान लोकांच्या पक्षाचा पुरतेपणीं पाडाव झाला नव्हता; तसेंच त्यानजीकचें सुसंपन्न असें बहारचें राज्य अद्यापि जसेंचें तसेंच कायम होतें. या वेळीं या दोन्ही प्रदेशांतील मुसलमान सरदारांनीं एकत्र होऊन, तेथील राजसत्ता लोदी-घराण्यांतील एका पुरुषाच्या हातीं देण्याचा बेत केला होता. यानेंच संग राण्याला बाबराविरुद्ध साहाय्य केलें होतें. त्या सरदारांनीं वरील सर्व घाट इतक्या गुप्तरीतीनें घातला होता कीं, त्याची बातमी बाबराला इ०स० १५२९च्या फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या तारखेपर्यंत मुळींच कळली नव्हती. त्या वेळीं तो धोलपूर येथें होता. हें शहर बाबराला फार प्रिय झालें होतें. तो व त्याचे सरदार नवीन बागबगीचे व इमारती वगैरे तयार करून त्या शहराला शोभा आणण्याच्या खटपटींत गुंतले होते. त्याच दिवशीं तो आग्र्यास परत आला, व तेथें सांपडलें तितकें सैन्य बरोबर घेऊन तसेंच त्यानें कूच केलें. त्याचा मुलगा अस्करी हा फौजेनिशीं गंगेच्या दक्षिणतीरावर कडा[1] शहराजवळ दकदकी नांवाच्या खेड्यांत होता, त्याला तो ता० २७ रोजीं जाऊन मिळाला. अस्करीची फौज त्या वेळीं पैलतीरास गेली होती. त्याला बाबरानें आपल्या फौजेच्या अनुसंधानानें राहण्यास सांगितलें.

तेथें बाबराला एक अनिष्ट वर्तमान कळलें. तें हें कीं, शत्रूचें सुमारें एक लक्ष सैन्य महंमद लोदी याच्या पक्षास मिळालें असून शिवाय त्यानेंच मोठ्या योग्यतेस चढविलेला शीरखान[2] नांवाचा त्याचा सरदार शत्रूस मिळून त्यानें आपल्या फौजेसह बनारस येथें ठाणें दिलें होतें. तेथून तेरा कोसांवर असलेल्या चुनारगडाला[3] महंमद लोदीनें वेढा घातला होता.

१ कडा हें शहर आतां अगदीं उजाड झालें आहे. हल्लीं तें अलाहाबाद जिल्ह्यांत त्याच नांवाच्या तहशिलीखालीं आहे. बाबर व अकबर यांच्या वेळीं तें फार भरभराटींत होतें. फार प्राचीन काळीं यालाच कौशांबी असें नांव होतें.

२ शीरखान पठाण यानेंच पुढें कांहीं वर्षांनंतर हुमायुनाचा पराभव करून त्याला हिंदुस्थानांतून पळवून लाविलें व स्वतः बादशाही बळकाविली.

३ काशीच्या आसपासच्या प्रदेशांत हा एक फार मजबूत व प्रसिद्ध पहाडी किल्ला आहे. इंग्रजी अंमलदारींत तेथें राजकीय कैदी ठेवण्याचा परिपाठ आहे. तेथें एक इंग्रजी फौजेची छावणीही आहे.

बाबर ताबडतोब पुढें सरसावला. त्यानें महंमद लोदी याला चुनारगडाचा वेढा उठवावयास लाविलें, व शीरखानाला बनारसेहून गंगापारं घालविलें. नंतर तो कर्मनाशा नदी उतरून चौसा गांवाजवळ त्या नदीचा गंगेशीं संगम झाला आहे त्याच्या पलीकडे बक्सारच्या जवळ तळ देऊन राहिला. तेथून पुढें चाल करून त्यानें शत्रूला आरा गांवापर्यंत पिटाळलें. तेथें पोहोंचल्यावर त्यानें बहारचें राज्य घेतलें. तेथेंच, महंमद लोदी हा थोड्याशा लोकांसह बंगाल्याच्या राजाच्या आश्रयास गेल्याचें वर्तमान त्याला कळलें.

बंगाल्याचा राजा नसरतशहा हा महंमद लोदी याचा जांवई होता. एकमेकांच्या राज्यावर चढाई न करण्याविषयीं त्याचा व बाबराचा आपसांत ठराव झाला होता. त्याचे विरुद्ध सारण किंवा चपडा हा परगणा त्यानें आपल्या कबजांत घेतला होता. तो आपल्या फौजेनिशीं गंगा व घोग्रा या नद्यांच्या संगमाजवळ एका उत्तम व मजबूत जागीं तळ देऊन राहिला होता. तेथून त्या फौजेला हटविण्याचा बाबरानें निश्चय केला. असें करण्याला त्याच्यावर हल्ला केल्यावांचून दुसरें साधन नाहीं, असें त्याला लौकरच आढळून आलें. त्यानें आपल्या फौजेच्या सहा तुकड्या केल्या व त्यांतील चार अस्करी याच्या बरोबर दिल्या. तो गंगापारच होता. त्याला, घोग्रा नदी उतरून शत्रूवर चाल करून जाऊन त्याला तळ सोडण्यास लावावें व आपल्या अंगावर घेऊन घोग्रा नदीच्या तटाकानेंच जावें, असा हुकूम बाबरानें दिला; व स्वतः दोन तुकड्यांनिशीं गंगा उतरून घोग्रापार जाऊन शत्रूच्या तळावर छापा घालून त्याचा परत आपल्या कंपूंत येण्याचा आधार तोडून टाकण्याचा त्यानें निश्चय केला. हा बेत त्यानें मे महिन्याच्या सहाव्या तारखेस अमलांत आणिला, व तो उत्तम रीतीनें सिद्धीस गेला. बंगाली फौजेचा अगदीं पराभव झाला, व बाबराला अत्युत्तम जय प्राप्त झाला. नंतर उभयपक्षांचा तह झाला. त्यांत, हल्लीं ज्याला पश्चिम-बहार म्हणतात, तो सर्व प्रदेश बाबराला मिळावा, परस्परांनीं परस्परांच्या शत्रूला मदत करूं नये, व एकानें दुसऱ्याच्या राज्यास उपद्रव देऊं नये, अशा शर्ती ठरल्या.

या भाग्यशाली पुरुषानें जें आपलें चरित्र लिहिलें आहे त्याच्याच

आधारानें बहुतेक येथवरची हकीकत लिहिली आहे; यापुढें त्याजविषयींची हकीकत फारच थोडी सांगण्याची राहिली आहे. बहार प्रदेशांत जय मिळवून परत आल्यावर लौकरच त्याची प्रकृति बिघडत चालली. ही गोष्ट गुप्त न राहतां त्याचा वडील पुत्र हुमायून, त्या वेळीं बदक्शानचा अधिकारी होता, त्याला कळली. तेव्हां त्यानें तेथील अधिकार आपला भाऊ हिंदाल याच्या स्वाधीन केला, व तो तावडतोब आग्रा येथें आला. तो इ०स० १५३० च्या अवलीस तेथें पोहोंचला. तो फार चांगल्या वेळेवर आला व तेथें त्याचें उत्तम स्वागत झालें. त्याचें चटकदार व सुंदर भाषण, आणि मनमिळाऊ स्वभाव, यांच्या योगानें त्याला पुष्कळ स्नेही मिळाले. त्याला तेथें येऊन नुकते सहा महिने झाले नाहींत तोंच त्याला जिवावरचें दुखणें आलें; तें इतकें कीं, त्याच्या जिवाची आशा राहिली नाहीं. या वेळीं एक गोष्ट घडून आली तिजवरून बाबराच्या अंगीं असलेलें पुत्रप्रेम व स्वहिताविषयींची निरपेक्ष बुद्धि हीं अगदीं स्पष्ट व उत्तम तऱ्हेनें व्यक्त होतात. ही गोष्ट त्याच्या चरित्राच्या शेवटच्या परिशिष्टांत[1] दिलेली आहे. ती अशी:—

"औषधोपचारांपासून हुमायुनाच्या प्रकृतीस आराम पडण्याची बहुतेक निराशा झाली, त्या प्रसंगीं त्याच्या त्या अत्यावस्थ स्थितीबद्दल बादशहाच्या दरबारचे पुष्कळ चतुर व विद्वान् लोक त्याजपाशीं बोलत असतां त्यांच्यांत, धार्मिकपणा व भगवद्भक्ति यांविषयीं सर्वत्र परमपूज्य मानलेला असा अबदुल बाका या नांवाचा एक गृहस्थ होता त्यानें बाबराला म्हटलें कीं, 'अशा प्रसंगीं केव्हां केव्हां एखाद्याच्या प्राणाच्या ऐवजीं त्याच्या स्नेह्यानें आपली अत्यंत मौल्यवान् अशी वस्तु परमेश्वरास अर्पण केली असतां तो ती मान्य करितो असें आहे.' त्यावर बाबरनें म्हटलें, 'माझा प्राण हुमायुनाला सर्व वस्तुमात्राहून अत्यंत प्रिय आहे, व याचा प्राणही मला तसाच प्रिय आहे. याकरितां मी आपला प्राण मोठ्या खुषीनें त्याच्या प्राणाऐवजीं बळी देण्यास तयार आहें; व तो परम श्रेष्ठ

[1] हें परिशिष्ट भाषांतरकारांनीं मागाहून जोडिलें आहे. अर्स्किनकृत 'बाबर व हुमायून' या ग्रंथांतही याविषयीं असेंच वर्णन दिलें आहे.

अशा परमेश्वरानें मान्य करावा, अशी माझी मनोभावेंकरून त्याजपाशीं प्रार्थना आहे.' त्याच्या दरबारांतील लोकांनीं त्याचा याविषयीं पुष्कळ निषेध केला, पण तें सर्व व्यर्थ गेलें. त्यानें आपला कृतसंकल्प कायम ठेविला, व त्या मरणोन्मुख राजपुत्राला तीन प्रदक्षिणा घातल्या. मुसलमान लोकांत बळी देण्याच्या वेळीं अशा तऱ्हेनें प्रदक्षिणा घालण्याचा परिपाठ आहे. नंतर त्यानें मनोभावानें परमेश्वराची आराधना चालविली. कांहीं वेळानंतर तो आपल्याशींच म्हणाला, 'मीं हें अनिष्ट पार नाहींसें केलें.' मुसलमान ग्रंथकारांनीं असें लिहिलें आहे कीं, अगदीं त्याच घटकेपासून हुमायुनाची प्रकृति सुधरूं लागली, व बाबराची शक्ति क्षीण होत चालल्याचीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं. अशा स्थितींत तो इ० स० १५३० च्या अखेरीपर्यंत होता. शेवटीं दिसेंबरच्या २६ व्या तारखेस, त्यानें आपल्या वयाच्या ४९ व्या वर्षी, आपले प्राण आग्र्याजवळील चारबाक नांवाच्या महालांत, प्राणदात्या परमेश्वरास अर्पण केले. त्याचें शव त्याच्या अंतकालच्या आज्ञेप्रमाणें काबुलास नेऊन त्या शहरापासून एक मैलावर एका सुंदर जागीं पुरण्यांत आलें."

या जगांत आजपर्यंत होऊन गेलेल्या मोठमोठ्या यशस्वी वीरशिरोमणींत बाबराची नेहमीं गणना होईल ह्यांत शंका नाहीं. त्याच्या नैसर्गिक गुणांमुळेंच त्याचा उत्कर्ष झाला. वडिलोपार्जित असें मध्य-एशियेंत एक लहानसें राज्य नांवाला मात्र त्याला प्राप्त झालें होतें; पण तो मरण पावला त्या वेळीं, कर्मनाशा नदीपासून आक्सस नदीपर्यंत व नर्मदेपासून हिमालयापर्यंत विस्तीर्ण प्रदेश त्याच्या कबज्यांत आला होता. त्याचा स्वभाव नेहमीं मोठा आनंदी असे. तो उदार बुद्धीचा, दुसऱ्यावर विश्वास ठेवण्याविषयीं शंका न घेणारा, व नेहमींचा उल्हासवृत्ति असा असल्यामुळें, ज्या कोणाशीं त्याला प्रसंग पडे, त्याला तो वश करून घेई. सर्व तऱ्हेच्या सृष्टिसौंदर्याची त्याला स्वभावतः आवड असे. त्यानें त्या मानानें आपल्या अंगचे गुण अप्रतिम वाढविले होते. तो फार प्रेमळ मनाचा होता. त्याची कल्पनाशक्ति फार उज्वल व जागृत होती. त्याला संग्राम व वैभव यांची आवड असे, तरी त्यानें स्वस्थतेच्या काळांत उपयोगीं पड-

णाऱ्या कलांची अनास्था केली असें नाहीं. जिंकलेल्या लोकांच्या स्थितीची काळजीपूर्वक कळकळ बाळगून त्यांचीं दुःखें दूर करण्याची तो खटपट करीत असे. त्याला बागाईत, शेती, गायन, वादन इत्यादिकांची आवड असे. तो स्वतः उत्तम कवि होता. त्याच्या अंगच्या प्रशंसनीय गुणांचें वर्णन, त्याला उत्तम तऱ्हेनें जाणणाऱ्या हैदर मिरजा नांवाच्या गृहस्थानें आपल्या 'तारीखरशीदी' नांवाच्या ग्रंथांत केलें आहे. तो म्हणतो, 'त्याच्या सर्व गुणांत त्याचे औदार्य व भूतदया हे दोन गुण अग्रगण्य होते.' तो केवळ राज्य संपादन करण्यापुरताच वांचला, व त्याला जिंकून घेतलेल्या मुलखाची व्यवस्था लावण्यास फुरसत झाली नाहीं हें खरें, तथापि असलें हें राज्यसंपादनाचें कामही त्याच्याहून अधिक शुद्ध व थोर मनाच्या वीराच्या हातीं पडलें असतें किंवा नाहीं याची शंकाच आहे.

बाबराला चार पुत्र होते. महंमद हुमायून मिरजा, याचा जन्म ता० ६ एप्रिल इ० स० १५०८ रोजीं झाला व तो त्याच्या मागून गादीवर बसला. दुसरा पुत्र कामरान मिरजा, तिसरा हिंदाल मिरजा, आणि चवथा अस्करी मिरजा. मरणापूर्वी त्यानें आपल्या सरदारांना बुद्धया बोलावून हुमायुनाला त्यांच्या स्वाधीन केलें, व त्यानें आपल्यामागें गादीवर बसावें असें सांगून त्याला अखेरचा उपदेश केला. त्यात त्यानें पुढील मुख्यांच्या गोष्टी विशेष रीतीनें लक्ष्यांत ठेवण्याविषयीं त्यास सांगितलें. परमेश्वर व प्रजा यांच्या संबंधाचीं सर्व कर्तव्यकर्में मनापासून करावीं; न्यायमनसुबा योग्य रीतीनें व दक्षतेनें करावा; अपराधी लोकांस शासन करितांना त्यांत जे कोणी अजाण व पश्चात्ताप पावलेले असतील त्यांजविषयीं दया व प्रेम दाखवावें; आणि अनाथ व गरीब यांचें संरक्षण करावें. तसेंच त्यानें त्याला आपल्या सर्व भावांशीं प्रेमानें व ममतेनें वागण्याविषयींही कळकळीनें सांगितलें.

हिंदुस्थानांत मोंगलांचें राज्य स्थापन करणारा हा थोर व प्रख्यात पुरुष याप्रमाणें आपल्या भरज्वानींत मरण पावला. त्यानें वायव्यप्रदेशांतील बहुतेक भाग व मध्य-हिंदुस्थानांतील कांहीं भाग स्वतः जिंकून घेऊन मोंगल घराण्याचा हक्क त्यांच्यावर कायम केला.

त्याच्या अंगीं खऱ्या राज्यकर्त्यांलीं अवश्य असे पुष्कळ उत्कृष्ट गुण होते. परंतु त्यानें हिंदुस्थानांत जे प्रदेश जिंकून घेतले ते अगदीं विलग होते. ते सर्व प्रदेश एकजीव होतील अशा तऱ्हेची चांगली राज्यव्यवस्था त्या सर्व प्रदेशांत चालू करण्याला त्याला पाहिजे तितका वेळ किंवा फुरसत सांपडली नाहीं. तो इतका गुण-संपन्न होता तरी, त्याच्या अंगीं अकबराप्रमाणें खरें राज्यव्यवस्था-चातुर्य होतें किंवा नाहीं, याची शंकाच आहे. निदान तें कोठें निदर्शनास आलें नाहीं इतकें तरी खरें. काबूल व हिंदुस्थान या दोन्ही ठिकाणीं त्यानें बहुतेक पूर्वीच्या लढाऊ राज्यकर्त्यांच्याच रीतीचें अनुकरण केलें. बरोबरच्या सरदारांना जिंकलेला प्रदेश वांटून देऊन, त्यांनीं आपापल्या इच्छेस येईल तशा रीतीनें, परंतु स्वतः बाबराच्या सत्तेखालीं काम चालवावें, अशा प्रकारची ही राज्यव्यवस्था होती. यामुळें तो मरण पावला तेव्हां त्याच्या सत्तेखालीं असलेले हिंदुस्थानांतील सर्व प्रदेश केवळ या एका बंधनानें मात्र बांधले गेले होते. उदाहरणार्थ, आग्रा व लखनौ, किंवा दिल्ली व जोनपूर यांचें राज्यपद्धतीसंबंधानें कांहींच साम्य नव्हतें. निरनिराळ्या जातींच्या लोकांनीं वसलेल्या निरनिराळ्या प्रदेशांच्या सरहद्दी, त्रासदायक व भारी अशा जकातींच्या योगानें मात्र स्पष्ट दिसून येत होत्या. त्या प्रदेशांची सर्वसाधारण गोष्ट म्हटली तर ते सर्व बाबराच्या अंकित होते एवढीच काय ती होती. बाबरानें मरणसमयीं पुष्कळ मुलूख आपल्या पुत्राच्या स्वाधीन केला होता. पण त्यांतील निरनिराळ्या भागांचा आपसांत मेळ किंवा ऐक्य केवळ बाबराच्या हयातीपर्यंतच होतें. सारांश, पूर्वीच्या इतर राजघराण्यांप्रमाणेंच, बाबर मरण पावला ते वेळेस मोंगल घराण्याचीं पाळेंमुळें हिंदुस्थानच्या जमिनींत खोल गेलेलीं नव्हतीं.

---

# भाग सहावा.

## हुमायुनाची कारकीर्द व अकबराचें बालपण.

हुमायून बादशहा शूर, प्रेमळ, चतुर, स्नेहास उत्तम, विद्वान्, उदार व दयाळू असा होता. तरी तो चिरस्थायी राज्य स्थापण्याच्या कामाला

आपल्या बापापेक्षांही कमी योग्य होता. वर सांगितलेल्या त्याच्या सद्गुणांप्रमाणेंच त्याच्या अंगीं पुष्कळ दोषही होते. तो अविचारी, चंचल व अस्थिर मनाचा होता. त्याच्या अंगीं कोणचेंही एखादें काम हटकून करण्याविषयीं नैसर्गिक आस्था किंवा बुद्धि नव्हती. त्याच्या औदार्याचें व स्नेहाचें पर्यवसान उधळेपणावर व हलकटपणावर तेव्हांच होत असे. त्याला कोणत्याही कामाकडे नेटानें सतत मन लावतां येत नसे, व मोठ्या राष्ट्राचे कायदेकानू वगैरे करण्याची इच्छा किंवा बुद्धिकौशल्य त्याच्या अंगीं मुळींच नव्हतें. यामुळें बापापासून मिळालेलें राज्य मजबूत व एकजीव करण्याला तो अगदीं निरुपयोगी होता.

तो गादीवर बसल्यापासून आठ वर्षेंपर्यंतचा इतिहास विशेष तपशीलवार रीतीनें लिहिण्याचें कारण नाहीं. त्याची राज्यव्यवस्था अगदीं अलगरजीपणाची होती. निरनिराळ्या जातींच्या प्रजेचें मन आपल्याकडे ओढून घेण्याचा त्यानें अगदींच यत्न केला नाहीं, यामुळें इ० स० १५४० च्या एप्रिल महिन्यांत **शीरखान** नांवाच्या सरदारानें त्याचा **कनोज** येथें पराभव करतांच एकदम त्याचें सर्व राज्य ढांसळलें. ह्याच **शीरखान** सरदाराचा पूर्वी **बाबरानें** पराभव केला असून हा हल्लीं त्याच्या पुत्रांशीं लढण्यास तयार झाला होता, व हाच पुढें **शीरशहा** नांवानें प्रसिद्ध बादशहा झाला. असो. पुष्कळ कष्ट सोसल्यानंतर इ० स० १५४१ च्या जानेवारी महिन्यांत **हुमायुन** हा थोड्याशा चाकरांनिशीं **सिंध** प्रदेशांत **सिंधु** नदींतील **बक्कर** नांवाच्या बेटासमोर **रोहरी** येथें पळून जाऊन बापापासून मिळालेलें सर्व राज्य गमावून बसला.

**हुमायुनानें** **सिंध** प्रदेशांत आपला अधिकार स्थापन करण्याचा व्यर्थ प्रयत्न करण्यांत अडीच वर्षें घालविलीं. तो त्या प्रदेशांत असतांना घडलेली अत्यंत महत्त्वाची व ध्यानांत ठेवण्याजोगी गोष्ट ह्मटली ह्मणजे त्याचा पुत्र—ज्याचें नांव त्यानें **महंमद जलालुद्दीन अकबर** असें ठेविलें—त्याचा जन्म ही होय. ह्या त्याच्या पुत्राचा जन्म इ० स० १५४२ च्या आक्टोबर महिन्याच्या १५ वे तारखेस झाला. हिंदुस्थानाच्या इतिहासांत अतिशय महत्त्वाची अशी ही गोष्ट कशा प्रकारें घडून आली त्याचें कथन पुढें केलें आहे.

इ० स० १५४१ त हुमायुनाच्या सैन्यानें बक्कर शहराला वेढा घातला होता. तसेंच त्यानें हिंदाल याला सेहवान या संपन्न प्रदेशावर हल्ला करून तो घेण्यास सांगितलें होतें. त्याची त्याला खात्री न वाटल्यावरून त्यानें सिंधु नदीपासून दहा कोसांवर पाटर येथें त्याला भेटीस बोलाविलें. त्या ठिकाणीं हिंदाल आपल्या सरदारांसह हुमायुनाचें उत्तम तऱ्हेनें व मोठ्या थाटानें आगतस्वागत करण्यास तयार होता. पुढें मेजवान्या व उत्सव झाले. हिंदालची आई—ही हुमायुनाची सापत्न आई होती—हिनेंही एक टोलेजंग मेजवानी दिली, व त्या मेजवानीस तिनें दरबारांतील सर्व स्त्रियांना निमंत्रण केलें. त्या तरुण स्त्रियांच्या समाजांत हिंदाल याच्या गुरूची हमीदा नांवाची रूपवती कन्या हुमायुनाला विशेष चांगली वाटली. ती त्याच्या इतकी मनांत भरली कीं, तिचें कोणाला वाग्दान झालें आहे किंवा काय, ह्मणून त्यानें तेथेंच चौकशी केली. तेव्हां, याविषयीं बोलणेंचालणें झालें असलें तरी अद्याप पक्का संस्कार झाला नसल्याचें त्याला समजलें. तेव्हां तो म्हणाला, 'असें असलें तर मी तिच्याशीं लग्न करणार.' अशा या एकाएकीं झालेल्या निश्चयासंबधानें हिंदाल यानें आपली नाखुशी दर्शविली; व ही गोष्ट अशीच आग्रहानें अमलांत आणिली जाईल तर आपण हुमायुनाचा पक्ष सोडून निघून जाऊं असेंही त्यानें भय घातलें. तेव्हां दोवां भावांचें बहुतेक निकराचेंच भांडण सुरू झालें. परंतु ती लग्नाची गोष्ट हिंदालच्या आईच्या मनास आली असल्यामुळें तिनें मध्यस्थी करून हिंदाला यास अनुकूल करून घेतलें. दुसरे दिवशीं हमीदा हिचें हुमायुनाशीं लग्न लागलें. या वेळीं तिचें वय १४ वर्षांचें होतें. पुढें थोड्याच दिवसांनीं तें आनंदी दंपत्य बक्करच्या छावणींत दाखल झालें.

हुमायुनाचे बेत सफल होण्याला ती वेळ अनुकूल नव्हती, यामुळें अर्थात् ते सर्व फसले. इ० स० १५४२ च्या वसंत ऋतूंत त्याला आपल्या तरुण पत्नीसह प्राण वांचविण्याकरितां मारवाडच्या रुक्ष वाळवंटांत पळून जावें लागलें. तो आगस्ट महिन्यांत जसलमेर येथें पोहोंचला. तेथील राजानें त्याला आश्रय दिला नाहीं, यामुळें

त्याला तें रेतीचें विस्तीर्ण मैदान ओलांडून जावें लागलें. वाटेंत पाणी न मिळाल्यानें त्या उभयतांना अतिशय त्रास झाला; तरी तीं मोठ्या गंभीरपणानें सर्व दुःखें सोशीत ता० २ आगस्ट रोजीं त्या मैदानाच्या सरहद्दीवर अमरकोट येथें येऊन पोहोंचलीं. तेथील राण्यानें त्यांना मोठ्या आदरातिथ्यानें किल्ल्यांत ठेवून घेतलें. त्याच ठिकाणीं ता० १५ आक्टोबर रोजीं रविवारीं हमीदा बेगम इच्या पोटीं अकबराचा जन्म झाला. याच्या पूर्वींच चार दिवस हुमायून हा जुन नांवाच्या प्रांतावर स्वारी करण्याकरितां निघून गेला होता. त्याला हें वर्तमान कळविलें तेव्हांचें त्याचें भाषण लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे. त्याच्या एका नोकरानें लिहिलें आहे कीं, "बादशहानें परमेश्वराचे आभार मानिले. नंतर सर्व अमीर लोकांच्या भेटी घेतल्या. तेव्हां त्यांनीं त्याचें अभिनंदन केलें. बादशहानें, 'जोहर—ताझिकर-उल्-वाकियात' नांवाच्या ग्रंथाचा कर्ता—याला बोलावून, मीं तुज-जवळ काय काय दिलें आहे म्हणून त्यास विचारलें. तेव्हां, दानशें शहारुखी मोहोरा, एक चांदीचें कडें, व एक कस्तुरीची नाभी, इतक्या वस्तु दिलेल्या होत्या, त्यांपैकीं पहिल्या दोन ज्यांच्या त्यांस परत केल्या आहेत, असें जोहर यानें सांगितलें. तेव्हां हुमायूनानें मृगनाभी आणवून एका चिनी तबकांत ती फोडली, व तींतून निघालेली कस्तुरी, आपल्या सरदारांना बोलावून, पुत्रजन्मोत्सवाच्या इनामादाखल वाटून दिली." जोहर यानें लिहिलें आहे कीं, "या सुप्रसंगाचा सुगंध सर्व भूमंडलावर पसरून गेला."

या पुत्रजन्मापासून हुमायुनाला कांहीं एक तात्कालिक लाभ झाला नाहीं. इ० स० १५४३ च्या जुलै महिन्यांत त्याला सिंध देश सोडावा लागला, व तो आपली स्त्री, पुत्र, व थोडेसे बरोबरचे लोक यांसह कंदाहारास जाण्याकरितां निघाला. तो शाल येथें पोहोंचला, तेव्हां

१ जोहर हा हुमायुनाजवळ खानगींत जामदार होता. यानें हुमायुनाच्या कारकीर्दीचें—त्यांतही हुमायून हिंदुस्थानांतून पळून इराणांत गेला व तिकडून परत आल्यावर पुनः त्यानें राज्य मिळविलें याचें—सविस्तर वर्णन 'ताझिकर-उल्-वाकिआत' नांवाच्या ग्रंथांत केलें आहे. या ग्रंथाचें इंग्रजी भाषांतर सुमारें ४० वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालें आहे.

त्याला आपला भाऊ अस्करी हा बऱ्याचशा फौजेनिशीं येथून जवळच आहे असें समजल्यावरून, येथून तावडतोब पळ काढला पाहिजे असें त्यास वाटलें. तें करण्याला तो व त्याची बायको हीं तयार झालीं. परंतु अकबर त्या वेळीं केवळ एक वर्षाचा होता. तेव्हां अर्थातच तसल्या त्या कडक हवेंत जलदीनें घोड्यावरून प्रवास करण्याजोगी त्याची स्थिति नव्हती. तेव्हां त्याची काय व्यवस्था करावी याविषयीं त्यांना पंचाईत येऊन पडली. अस्करी बहुधा अशा या अर्भकाशीं दुर्वर्तन करणार नाहीं असें मानून, त्यानें त्याला, बहुतेक जड सामान व बरोबरच्या दाया यांच्यासह तेथेंच ठेवून जाण्याचा निश्चय केला; व तेथून निघून तो जलदीनें इराणच्या हद्दींत सुरक्षित जाऊन पोहोंचला. अस्करी मिरजा आपल्या मुलाशीं कोणत्याही प्रकारचें दुर्वर्तन करणार नाहीं असा जो त्यानें अजमास केला होता तो चुकीचा नव्हता. असो. तो निघून गेला तोंच अस्करी मिरजा तेथें येऊन दाखल झाला. आपला भाऊ सुटून गेल्याबद्दल त्याची बरीच निराशा झाली, पण गोड गोड शब्दांनीं तीवर त्यानें झांकण घालून त्या अर्भकाला प्रेमानें वागविलें, व त्याला कंदाहार येथ पाठविलें. तें ठिकाण त्याच्याच ताब्यांतलें होतें. तेथें त्यानें त्या मुलाला खुद्द आपल्या बायकोच्या स्वाधीन केलें, व त्याच्या दायाही तशाच त्याच्या संगोपनाच्या कामावर कायम ठेविल्या.

याप्रमाणें त्या राजपुत्राचा काळजीपूर्वक प्रतिपाळ होऊं लागला, व तशा स्थितींत तो इ० स० १५४४ अखेर राहिला. परंतु पुढें लौकरच त्याच्या स्थितींत अंतर पडलें. शहातमास्प याच्याकडून मदतीस मिळालेल्या सैन्यानिशीं हुमायुनानें पश्चिम-अफगाणिस्थानावर स्वारी केली, व तो अरण्यांतून थेट कंदाहारावर चालून गेला. हें पाहून, हुमायुन आपल्या मुलास कदाचित् हस्तगत करून घेईल अशी भीति वाटून कामरान यानें त्या मुलाला काबुलास पाठविण्याविषयीं सक्त व जरूरीचे हुकूम पाठविले. कामरानाचे विश्वासु सरदार हा निरोप घेऊन कंदाहारास पोहोंचले, तेव्हां अस्करी मिरजा याच्या कामगारांनीं, असें करणें उचित आहे किंवा नाहीं, याचा आपसांत विचार चालविला. कांहींकांना हुमायुनाचे ग्रह हल्लीं उच्चीचे आहेत असें

वाटून त्यांनीं, त्याच्या मुलाला त्याच्या योग्यतेनुरूप लवाजमा बरोबर देऊन त्याच्या बापाकडे पोहोंचविणें हेंच बरें, असें सांगितलें. इतरांना असें वाटलें कीं, मिरजा अस्करीनें हुमायुनाशीं इतका कृतघ्नपणा केला आहे कीं, आतां त्याला कसाही पश्चात्ताप झाला तरी तो उपयोगास येणार नाहीं, याकरितां कामरान याच्याशींच सलोखा राखणें उत्तम असें त्यांनीं सांगितलें, व तेंच शेवटीं मान्य झालें. त्या वेळीं कडक हिंवाळा होता, तरी त्यांनीं तो युवराज व त्याची बहीण बक्षीबानू बेगम यांना बरोबरच्या नोकरांनिशीं तशा थंडींत काबुलास रवाना केलें. वाटेंत कांहीं संकटें उद्भवलीं, त्यांवरून बरोबरच्या लोकांना अशी भीति पडली कीं, या मुलांना या गडबडींत आमच्या ताब्यांतून सोडवून नेण्याची कांहीं खटपट होईल कीं काय कोण जाणे. पण तसें कांहीं एक न होतां शेवटीं ती सर्व मंडळी काबुलास सुखरूप पोहोंचली. कामरान यानें आपल्या पुतण्याला, त्याची चुलत आजी ह्मणजे बाबर बादशहाची मानलेली आवडती बहीण खानजाद बेगम, इच्या स्वाधीन केलें. या थोर व उदार मनाच्या बाईनें अकबराबरोबरचे लहानपणापासून असलेले नोकर व दाया तशाच कायम ठेविल्या. तिच्याजवळ अकबर थोडेच दिवस राहिला. पण तितक्यांतही तिनें त्याची फार काळजीपूर्वक जोपासना केली. दुर्दैवानें तिच्याकडे हें काम थोडेच महिने राहिलें. कारण इ० स० १५४२ च्या सपटंबर महिन्यांत हुमायुनानें कंदहार शहर घेतलें, यामुळें कामरान अतिशय गोंधळांत पडला. तो उपजतच संशयी व मत्सरी होता. अकबर आपल्या स्वाधीन असणें ही एक मोठी महत्त्वाची, व हुमायुनाविरुद्ध हटकून उपयोग करितां येण्याजोगी जडीच जणूं काय आहे, असें समजून त्यानें अकबराला आपल्या चुलत आजीजवळून काढून कुचकिलान नांवाच्या आपल्या एका विश्वासू नोकराच्या स्वाधीन केलें. त्या वेळीं राजकारणें फारच जलद घडून येत असत. हुमायुनानें कंदाहार येथें आपलें ठाणें पक्कें बसविलें, व तो फौजेनिशीं काबुलावर जाण्यास निघून, नवंबर महिन्याच्या अखेरीसच तेथें दाखल झाला; आणि ता० १९ रोजीं त्यानें तें शहर काबीज केलें. त्या वेळीं कामरान गझनीस पळून गेला होता. असो. इकडे बहुत

दिवस वियोग झालेल्या आपल्या पुत्राचें पुनः दर्शन झाल्यानें हुमायुनास फार आल्हाद झाला. त्या मुलाची आई हमीदा बेगम ही पुढील वर्षाच्या वसंत ऋतूपर्यंत त्याच्याजवळ पोहोंचली नाहीं. त्या अवधींत त्या राजपुत्राच्या संगोपनाचें काम कुचकियान याजकडून काढून, [1]ज्याच्या ताब्यांत तो आरंभीं होता, त्याच अत्काखानाचे देखरेखीखालीं त्याला ठेविलें.

यामुळें थोडेंसें तात्कालिक वैभव व श्रीमंती त्या मुलाला प्राप्त झाली. परंतु हिंवाळयाचे दिवस हुमायुनानें बदक्शान प्रदेशांतील किल्ला जफर येथें घालविण्याचें ठरविलें, व तो तिकडे जाण्यास निघाला. यापूर्वींच त्यानें तो प्रदेश सर केला होता. परंतु वाटेंत त्याला जवर दुखणें आलें, व त्याच्या जिवाची अगदीं आशा उरली नाहीं. पुढें दोन महिने अगदीं अंथरुणावर पडून राहिल्यावर तो बरा झाला. पण तेवढया अवसरांत, तो खास मरणार असें मानून त्याचे पुष्कळ सरदार त्याच्या भावाकडे निघून गेले. कामरान यानें आपल्या सासऱ्याच्या सैन्याच्या साहाय्यानें काबूल शहर व त्याच्या बरोबरच राजपुत्र अकबर याला हस्तगत करून घेतलें होतें. त्यानें प्रथमतःच अत्काखानाला अकबराजवळून अलग केलें, व त्याच्या जागीं आपला एक विश्वासू नोकर नेमिला.

हुमायुनाच्या अंगांत शक्ति येतांच तो आपली राजधानी परत घेण्यास निघाला. त्यानें कामरान याच्या उत्तम फौजेच्या टोळीचा शहराबाहेर पराभव करून शहरावर मारा असलेल्या कोह-अकाबियान् नांवाच्या टेकडीवर तोफांचा भडिमार चालविला. कांहीं दिवसांनंतर हा मारा इतका जोरानें चालला, व त्यामुळें शहरांत असें नुकसान होऊं लागलें, कीं तो बंद करण्याकरितां कामरान यानें आपल्या भावाकडे निरोप पाठविला; तो असा कीं, 'मारा बंद न झाला तर तो जेथें अतिशय जोराने चालू असेल तेथें अकबराला उभा केला

---

१ याचें वास्तविक नांव शम्सुद्दीन महंमद गजनवी असें होतें. त्यानें, कनोज येथें इ० स० १५४० त शीरखानाशीं लढाई झाली तींत हुमायुनाचा प्राण वांचविला होता.

जाईल.' तेव्हां हुमायुनानें तोफा बंद केल्या. तरी त्यानें वेढा तसाच कायम ठेविला. ता० २८ एप्रिल इ० स० १५४७ रोजीं विजयी होत्साता तो त्या शहरांत प्रवेश करिता झाला. त्याच्या पूर्व रात्रींच कामरान बदक्शानकडे पळून गेला होता, तिकडे हुमायुनही त्याचा पाठलाग करीत गेला. पुढच्या हिंवाळ्यांत हुमायुनाचे कांहीं मोठमोठे सरदार फितूर होऊन कामरान यास जाऊन मिळाले. नंतर कांहीं दिवस पुढेंमागें येरझारा करून इ० स० १५४७ च्या उन्हाळ्यांत त्यानें आपल्या राज्याच्या उत्तर भागाची पक्की व्यवस्था एकदम करून टाकण्याचा निश्चय केला. तो जून महिन्यांत अकबर व त्याची आई यांस बरोबर घेऊन काबुलाहून निघाला. परंतु गुलबहन येथें पोहोंचल्यावर तेथून त्यानें त्यांना परत पाठविलें, व तलीकानवर चालून जाऊन तेथें कामरानाला शरण येण्यास लाविलें. याप्रमाणें आपल्या राज्याच्या उत्तर प्रदेशाची व्यवस्था करून हुमायून बादशाहा काबुलास परत आला.

इ० स० १५४९ च्या वसंत ऋतूच्या अखेरीस तो पुन: पश्चिमकुंदुज प्रदेशांतील बल्ख शहर घेण्याच्या इराद्यानें निघाला. परंतु उजबक् लोकांनीं त्याचा पराभव केल्यामुळें तो इ० स० १५५० च्या हिंवाळ्यांत काबुलास परत आला. नंतर एक चमत्कारिक प्रकार घडला. बल्ख शहरावर स्वारी करण्याचे प्रसंगीं कामरान वेळेवर येऊन न मिळाल्यामुळें हुमायुनाचा पराभव होऊन त्याला परत यावें लागलें, व पुढें कामरान यानें उघडपणें बंड केलें. हुमायुनाचा पराभव झाल्यावर कामरान यानें आक्ससकडे स्वारी केली. तींत त्याचा अगदीं पाडाव झाला. तेव्हां त्यानें पुन: हुमायुनास शरण जाण्यासंबंधानें त्याशीं बोलणें

१ अबुलफजल यानें अकबरनाम्यांत लिहिलें आहे का, अकबराला याप्रमाणें उभा केला होता; व मिरजा हैदर बदौनी, फरिश्ता, वगैरे इतिहासकारांनीं ही यावरून असेंच लिहिलें आहे. परंतु बायजीद हा त्या वेळीं हजर असून त्यानें सर्व कच्ची हकीकत, इतर क्रूरकर्मांचीही, दिली आहे; पण तींत ही गोष्ट लिहिली नाहीं. तसेंच जोहर यानेंही या गोष्टीचें वर्णन, वर लिहिलें आहे तसेंच दिलें आहे.

लाविलें. हुमायुनानें महंमद कासमखान बरलास[1] याला अकबराचा अतालिक (गुरु) नेमून काबूलचें राज्य त्याच्या स्वाधीन केलें. त्या वेळीं अकबर आठ वर्षांचा होता. नंतर हुमायून कामरानाला पकडण्याकरितां निघाला. परंतु त्याच्या स्वारीची व्यवस्था फारच अलगरजीपणाची होती. कामरान यानें हा सर्व बाट बुद्ध्या घातला होता. त्यानें क्विपचक नांवाच्या घाटींत हुमायुनावर एकाएकीं छापा घालून त्याला पळवून लाविलें. पळतांना हुमायुनाला जबर जखम लागली. तरी तो सिरतन नांवाच्या घाटीवर सुखरूप जाऊन पोहें-चला. तेथें त्याची काळजी बरीच नाहींशीं झाली. इकडे कामरान यानें काबुलावर स्वारी करून तें शहर घेतलें, व अकबर पुनः तिसऱ्यानें आपल्या चुलत्याच्या हातीं सांपडला. हें नुकसान सोसून हुमायून स्वस्थ, बसला नाहीं. आपले लोक पुनः एकत्र करून पहाड उतरून त्यानें फिरून काबुलावर चाल केली. तो शुतरगर्दन येथें आला तेव्हां कामरान फौजेनिशीं लढण्यास उभा असल्याचें त्याला दिसून आलें. आपसांत समजूत पडण्याविषयीं व्यर्थ बोलण्याचालण्यांत कांहीं दिवस गेल्यावर, हुमायुनानें हल्ला करण्याचा हुकूम दिला. त्यांत त्याला पूर्णपणें जय मिळाला, व कामरान पळून गेला. कामरान अकबराला बरोबर घेऊन गेला किंवा काय अशी थोडा वेळ हुमायुनाला चिंता पडली होती. परंतु शहरांत जाण्यापूर्वींच हासानआख्ता—ज्याच्या हातीं कामरान यानें अकबरास सोंपविलें होतें तो—अकबरासह छावणींत आला, हें पाहून त्याचा जीव स्वस्थ झाला. दुसरे दिवशीं त्यानें शहरांत प्रवेश केला.

हा जय त्याला मिळालेला अगदीं कायमचा होता. त्याबद्दल पुढें त्यानें जीं इनामें वांटलीं त्यांत अकबरालाही त्यानें एक इनाम दिलें; तें हें कीं, चर्ख परगण्याचा जहागीरदार त्याला करून हाजी महंमदखान सीस्तानी[2] यास त्याचा वजीर नेमिलें. त्यानें

---

१ महंमद कासमखान बरलास हा एक हुमायुनाचा विश्वासू व शूर सरदार होता. तो अकबराच्या कारकीर्दीच्या अवलासच वारला यामुळें त्याचें नांव आईन–ए–अकबरींत उपलब्ध नाहीं.

२ हाजी महंमदखान सीस्तानी हाही हुमायुनाच्या पदरचा एक विश्वासू नोकर होता. तो अकबर वयांत येण्यापूर्वींच मरण पावला होता.

त्याच्या विद्याभ्यासाचें कामही त्यालाच सांगितलें. पुढील वर्षीं हुमायुनाच्या विपत्तींचीं कारणें एकामागून एक नाहींशीं झालीं. कामरानानें पुनः बंड केलें, परंतु त्याचा फारच नेटानें पाठलाग झाल्यामुळें अखेरीस इ० स० १५५३ च्या आगष्ट महिन्यांत तो शरण आला. त्याला मक्केस हद्दपार केलें, व तेथेंच चार वर्षांनीं तो मरण पावला. दुसरा भाऊ अस्करी मिरजा—ज्याच्या हाडीं कृतघ्नपणा जणों उपजतच खिळलेला होता—त्याला पूर्वीच इ० स० १५५१ त मक्केस हद्दपार केलें होतें[1]. तो अद्यापि जिवंत होता, तरी त्याच्यापासून हुमायुनाला कांहीं भीति नव्हती. अशा तऱ्हेनें आपल्या भावांच्या त्रासांतून मुक्त झाल्यावर हुमायुनानें काश्मीर हस्तगत करण्याचा विचार केला. परंतु त्याचे नोकर व सरदार या गोष्टीला फारच प्रतिकूल असल्यामुळें त्याला निरुपाय होऊन तो बेत सोडावा लागला. तेव्हां तो फक्त सिंधूपार जाऊन परत आला. सिंधु व जेहलम या नद्यांच्या मधील प्रदेशांत तळ देऊन राहिला असतांना त्यानें पेशावरचा किल्ला दुरुस्त करण्याचा, किंबहुना बहुतेक नवीनच बांधण्याचा, हुकूम दिला. तेव्हां सुद्धां हिंदुस्थानावर स्वारी करण्याचें त्याच्या मनांत होतें; व पहाडापलीकडे आपलें सैन्य जमवितां येण्याजोगी एखादी मजबूत जागा आपल्या कबज्यांत असावी अशी त्याच्या मनांत विशेष आग्रही होती. त्यानें किल्ल्याचें काम खूब जोरानें चालवुन, इ० स० १५५४ च्या अखेरीस तें पुरें केलें. नंतर तो काबुलास परत आला. त्या हिंवाळ्यांत व पुढील वसंत ऋतूच्या आरंभीं हिंदुस्थानांत अशी एक मोठी गोष्ट घडून आली कीं, तिच्या योगानें त्याला आपले बेत अमलांत आणण्याची चांगलीच संधी मिळाली.

---

# भाग सातवा.

## हुमायुनाची हिंदुस्थानावर स्वारी व त्याचा मृत्यु.

शीरखान सूर यानें इ० स० १५४० त हुमायुनाचा कनोज येथें पराभव करून जय मिळविला. बाबरानें मिळविलेलें सर्व राज्य व त्याशिवायही कांहीं प्रदेश त्याच्या हातीं आला. हा राजा फार मोठ्या

---

१ तो येथें इ० स० १५५८ त वारला.

योग्यतेचा पुरुष होता. परंतु हुमायुनाप्रमाणेंच त्याच्या अंगींही राज्य दृढ व एकवट करण्याचें शहाणपण नव्हतें. त्यानेंही निरनिराळ्या जागीं निरनिराळे कंप ठेवून प्रत्येक प्रदेश बहुतेक स्वतंत्र अशा सरदाराच्या हातीं दिला, व याच रीतीनें राज्याचा बंदोबस्त केला. तो इ०स० १५४५ त कालिंजरच्या[1] किल्ल्यास वेढा घालून राहिला असतां, जखम लागल्यामुळें, तो किल्ला हातीं येण्याच्या सुमारासच मरण पावला.

त्याचा दुसरा पुत्र सलीमशहा सूर किंवा सुलतान इसलाम हा त्याच्या मागून गादीवर बसला. त्यानें सात आठ वर्षे राज्य केलें. वाडवडिलांपासून चालत आलेल्या राज्यपद्धतींतील दोष थोडेबहुत तरी त्याच्या लक्षांत आले असावे असें दिसतें. कारण त्याची बहुतेक कारकीर्द निरनिराळ्या प्रदेशांत नेमिलेल्या सरदारांचीं कारस्थानें मोडण्यांतच गेली. तो मरण पावल्यावर त्याचा एक लहान मुलगा गादीवर बसला. तेव्हां त्याच्या सरदारांनीं उठावणी केल्यामुळें तीन दिवसांनीं तो मुलगा मारला गेला. याचा परिणाम असा झाला कीं, त्याच्या मामानें तें राज्यपद बळकावलें, व सुलतान महंमद या नांवानें त्यानें आपल्या नांवाची द्वाही फिरविली. तो अगदींच अडाणी असून निर्दय, अविचारी, व अतिशय विषयलंपट असा होता. परंतु सुदैवानें त्याला हेमू नांवाच्या हिंदु बनियाचें साहाय्य मिळालें. हा गृहस्थ मूळ मेवाडांतील रेवाडी गांवांत दुकानदारी करीत असे. परंतु पुढें त्यानें अलौकिक गुण प्रकट करून सर्व राजसत्ता आपल्या हातीं आणली. तथापि या त्याच्या गुणांमुळें शीरशहाचें राज्य लयास जाऊन त्याचे निरनिराळे विभाग व्हावयाचे ते झालेच. इब्राहीमखान हा बियाना येथें बंड करून आग्रा व दिल्ली बळकावून बसला, आणि स्वतःस सुलतान म्हणवूं लागला. सतलज नदीच्या वायव्येकडील प्रदेशाचा सुभेदार अहंमदखान हा पंजाब दाबून बसला व शिकंदरशहा या नांवानें राज्य करूं लागला. सुजाखानानें मांळवा बळकावला, व पूर्वेकडील प्रदेशाकरितां दुसरे दोघे

१ कालिंजरचा किल्ला बुंदेलखंडाच्या पूर्व भागांतील डोंगराळ प्रदेशांत आहे. फार प्राचीन काळापासून तों मुसलमानी अमलाच्या अखेरीपर्यंत हा किल्ला फारच मजबूत व अभेद्य असल्याविषयीं प्रसिद्धि होती.

सरदार आपसांत भांडतच होते. पुढें लढाया सुरू झाल्या. त्यांत कांहीं वेळ शिकंदरशहाची सरशी झाली. त्यानें आग्र्यापासून दहा कोसांवर फरा येथें इब्राहीमखानाचा पराभव केला, व नंतर दिल्ली घेतली. जोनपूर व बहार हे प्रांत स्वारी करून परत घेण्याची तो तयारी करीत होता, इतक्यांत त्याला, काबुलाकडून आपणावर अरिष्ट येत आहे असें वर्तमान कळलें.

पुढें जो प्रकार घडला त्याचा परिणाम फारच महत्त्वाचा झाला. इ० स० १५५४ च्या नोव्हेंबर महिन्यांत हुमायून थोड्याशा सैन्यानिशीं काबुलाहून सिंधु नदीकडे जाण्यास निघाला. त्याचें सैन्य हळूहळू बळावत चाललें. अकबर त्याच्या बरोबरच होता. इ० स० १५५५ च्या जानेवारीच्या २ र्‍या तारखेस सिंधु नदी उतरून हुमायून रावळपिंडीस गेला, व तेथून रावी नदीच्या पार कलानूर येथें दाखल झाला. तेथें त्यानें आपल्या फौजेचे दोन भाग करून, त्यांतील एक, आपला उत्तम सेनापति बैरामखान याच्या हातीं देऊन त्याला

१ बैरामखान हा अकबराचा गुरु व प्रधान होता. हा मीरअली शुक्रबेग बहारलू याचा निपणतू असून बदकशान येथें जन्मला. त्याच्या बापाचें नांव सैफअलीबेग असें होतें. तो बाबर बादशहाबरोबर हिंदुस्थानांत आला. सोळाव्या वर्षी त्याला हुमायूनाच्या फौजेंत जागा मिळाली, व कनोजच्या लढाईंत (ता० १० मोहरम ९४७ हिजरी) तो हजर होता. तेथून तो लखनौ किंवा संबलच्या राजाकडे पळून गेला. शीरशहाची व त्याची माळव्यांत गांठ पडली. शीरशहानें त्याला आपल्या पक्षाकडे वळवून घेण्याची खटपट केली, परंतु ती सफळ झाली नाहीं. पुढें तो, अबुल कासम, ग्वाल्हेरचा किल्लेदार, याच्यासह गुजराथेंत पळून गेला. वाटेंत शीरशहाच्या वकिलाची व त्याची अकस्मात गांठ पडली. तेथें कासम यानें बुद्ध्या, आपण स्वत: बैरामखान असल्याचें सांगून, आपला प्राण देऊन बैरामखानाला वांचविलें. मग तो गुजराथेंत सुलतान महमुदाकडे गेला. सुरतेहून नावेंतून उतरून सिंध देशांत येऊन त्यानें हुमायुनाला गांठलें. तेव्हांपासून हुमायून इराणांत जाऊन परत येईपर्यंत त्याचा खरा दोस्त व साथीदार असा बैरामखानच होता. हुमायुनाला हिंदुस्थान फिरून प्राप्त झालें तें केवळ बैरामखानामुळेंच म्हटलें तरी चालेल. मच्छीवाड्याच्या लढाईंत त्यानें जय मिळविल्यावर त्याला संबल प्रांत जहागीर मिळाला. हि० स० ९६३ त त्याला अकबराचा गुरु नेमिलें, व पुढील वर्षी अकबर गादीवर बसला तेव्हां त्याला वकिलीचें काम व 'खान-

जालंदर प्रांतांत पाठविलें; व आपण स्वतः लाहोरास गेला. तेथून त्यानें आपल्या अत्यंत कृपेंतला गृहस्थ अबुल्मोआली[1] याला लाहोर व मुलतान यांच्यामधील प्रदेशावर चांगला मारा ठेवणारें देपाळपूर शहर घेण्यास पाठविलें.

राजकारणें त्या वेळीं फारच त्वरेनें घडून येत. बैरामखानानें शिकंदरशहाच्या सेनापतीचा सतलज नदीवर मच्छीवाडा येथें पराभव केला. तेथून तो सरहिंदवर गेला. तेथें त्याचा सहज नाश करितां येईल या उमेदीनें शिकंदरशहा मोठ्या थोरल्या सैन्यानिशीं त्या ठिकाणीं जाऊन दाखल झाला. बैरामखानानें आपल्या तळाभोंवतीं खंदक खोदवून बंदोबस्त केला, व हुमायुनाजवळ कुमक मागितली. हुमायून अकबरास पुढें पाठवून लौकरच स्वतःही तिकडे गेला. यापूर्वींच शिकंदरशहा तेथें दाखल झाला होता. परंतु त्यानें हल्ला करण्यांत हयगय केली. या हयगयीमुळेंच त्याचा नाश झाला. हुमायुनानें येतांच घोर युद्ध केलें. त्यांत त्याचा पूर्ण जय झाला. शिकंदरशहा शिवालिक पहाडांत पळून गेला. हुमायून आपल्या विजयी फौजेसह दिल्लीवर गेला. ता० २३ जुलई रोजीं त्यानें तें शहर घेतलें, आणि फौजेचा एक भाग आग्रा घेण्याकरितां व दुसरा रोहिलखंडांत स्वारी करण्याकरितां पाठविला. पंजाब घेण्याकरितां त्यानें अबुल्मोआली याला पूर्वींच पाठविलें होतें.

परंतु इतक्यानेंच त्याच्या मागचा त्रास सुटला असें नाहीं. महंमदशहा अदिल याचा मुख्य वजीर व सेनापति हेमू वनिया यानें, बंगाल्याच्या गादीवर हक्क सांगणाऱ्या, व वायव्य प्रदेशावर स्वारी करून आलेल्या एका तोतया राजाचा यमुनेवर काल्पी येथें नुकताच पराभव केला होता; व तो हुशार व शूर पुरुष दिल्लीवर

---

खानान' व 'खानबाबा' ह्या पदव्या मिळाल्या. अकबर वयांत येईपर्यंत बैरामखानाकडेच राज्याची कुलमुखत्यारी राहिली. हळूहळू जवळच्या लोकांनीं त्याच्या व अकबराच्या मनांत परस्परांविषयीं वैषम्य आणिलें, त्याबद्दलची हकीकत पुढें येईलच.

१ शहा अबुलमोआली हा हुमायुनाचे पदरचा एक मोठा सरदार होता. अकबराच्या कारकीर्दीच्या अवलीस त्याच्याकडे काबुलची सुभेदारी होती. हा पुढें राजद्रोहाच्या आरोपावरून तेथेंच मारला गेला.

स्वारी करण्याच्या तयारींत होता. शिकंदरशहाचा सरहिंद येथें पराभव झाला, तरी त्याचा पंजाबांत गडबड करण्याचा उपक्रम दिसूं लागला. अशा अडचणीच्या प्रसंगीं हुमायुनानें स्वतः दिल्लीस राहण्याचा निश्चय केला, व अकबराबरोबर बैरामखान यास अतालिक ( गुरु ) नेमून देऊन त्याला पंजाबची व्यवस्था करण्यास पाठविलें.

आतां आपण अकबराकडे वळूं. तो इ०स० १५५६च्या जानेवारीच्या अवलीस सरहिंद येथें पोहोंचला. तेथें अबुल्मोआली याच्या उद्धटपणानें विरस व खिन्न झालेले पुष्कळ सरदार त्याला येऊन मिळाले. नंतर तो फिलौर गांवाजवळ सतलज नदी उतरून कांगडा[1] प्रांतांतील सुलतानपूर येथें गेला, व तेथून शिकंदरशहाचा पाठलाग करीत हरियाना येथें गेला. तो तेथें पोहोंचला त्याच दिवशीं सकाळीं, हुमायुनाला कांहीं अपघात झाल्याचें वर्तमान आलें, तेव्हां तो पुढें जाण्याचा बेत रहित करून, पुढची हकीकत कळेपर्यंत कलानूर येथें जाऊन राहण्याच्या बेतानें निघाला. त्या शहराजवळ तो आला तेव्हां त्याच्या हातीं हुमायुनाचें एक स्वदस्तुरचें पत्र आलें, त्यांत आपणास लौकरच आराम पडण्याची त्यानें उमेद दर्शविली होती. परंतु पुढें लौकरच दुसरा एक जासूद बादशहा मरण पावल्याचें वर्तमान घेऊन आला, तेव्हां तावडतोब अकबराच्या नांवाची द्वाही फिरविण्यांत आली.

या वेळीं अकबर केवळ साडेतेरा वर्षांचा होता, व अशा लहान वयाच्या मुलाला हा प्रसंग खरोखर मोठा कठीण होता. पंजाब प्रांत त्याच्या हातीं होता, तसेंच सरहिंद, दिल्ली, व बहुशः आग्रा हीं शहरें त्याच्या सरदारांच्या हातीं होतीं हें खरें; परंतु हेमू बनियानें नुकताच दुसऱ्या एका तोतयाचा पराभव केला होता, तेव्हां असे दोन जय मिळविल्यानें तो गर्वानें फारच फुगला असून, महंमुद्शहा

---

१ कांगडा—कोटकांगडा—हा पश्चिम-हिमालयांतील एक अतिशय डोंगराळ पण सुपीक प्रदेश असून ज्वालामुखीचें प्रसिद्ध स्थान याच प्रदेशांत आहे. हल्लीं तिकडे पुष्कळ युरोपियन लोकांनीं चहाची लागवड अतिशय केली आहे. तेथील चहा चीनच्या उत्तम चहाची बरोबरी करितो.

अदिल याचें राज्य पुनः दिल्लीस कायम करण्याकरितां ५००० फौज व ५०० हत्ती बरोबर घेऊन तो चाल करून येऊं लागला, ही गोष्ट अकबराला कळली; तसेंच या संकटांत भर पाडण्याकरितांच जणूं काय तितक्यांत, त्याच्या बापानें नेमलेल्या काबुलच्या सुभेदारानेंही बंड केल्याचें वर्तमान आलें.

हुमायुनाच्या मरणाची हकीकत अशी आहे. तो दिल्ली येथील राजवाडयांतील पुस्तकालयाच्या गच्चीवर जाण्याच्या जिन्यावरून पडला व त्याला जबर दुखापत झाली. त्यानंतर सुमारें चार दिवस तो जिवंत होता; पण बहुतेक बेशुद्धच होता. तो ता० २४ जानेवारी सन १५५६ रोजीं, आपल्या वयाच्या ४८ व्या वर्षी, मरण पावला. त्या वेळीं तरदीबेगखानें[1] हा तेथील सरदारांत मुख्य अधिकारी होता. त्यानें सर्व कारभार तावडतोब आपल्या हातीं घेऊन, अकबरास राजपद प्राप्त होण्याची व्यवस्था पक्केपणीं लागेपर्यंत हुमायुनाच्या मरणाची बातमी गुप्त ठेवण्याचा प्रयत्न चालविला; व अकबराकडे टाकोटाक तपशीलवार पत्रें लिहून जासुदावर जासूद रवाना केले. त्यानें एक सुरेख युक्ति काढून बादशहाचें मरण सतरा दिवस गुप्त ठेविलें. ता० १० फेब्रुवारी रोजीं त्यानें सर्व सरदारांसह जुम्मा मशिदींत जाऊन, बादशहाकरितां नेहमीं जी प्रार्थना करावयाची ती अकबराच्या नांवानें करविली. राजमुकुट व दुसरीं सर्व राजचिन्हें, बादशाही जवाहीर,

---

१ तरदीबेगखान हा हुमायुनाच्या दरबारांतील एक मोठा सरदार होता. गुजराथ सर केल्यावर त्याला चांपानेरची सुभेदारी मिळाली. सुलतान बहादूर गुजराथी यानें मिरजा अस्करीचा पराभव केला तेव्हां तरदीबेग हा हुमायुनाकडे परत आला. हुमायून हिंदुस्थानांतून पळून गेला तेव्हां तरदीबेगानें आपल्या कृतघ्नपणाची कमाल केली. त्यानें एकदां बादशहा मालदेवाच्या राज्यांतून पळून जात असतां त्याला घोडा दिला नाहीं, व द्रव्यद्वाराही साहाय्य केलें नाहीं. पुढें तो मिरजा अस्करीकडे गेला. त्यानें त्याचा छळ करून त्याला लुबाडून घेतलें. पुढें हुमायून परत आल्यावर त्यानें त्याजपाशीं क्षमा मागितली. त्यानें त्याचे अपराध पोटांत घालून याला पुनः मोठमोठीं कामें सांगितलीं. हुमायुनाच्या मरणानंतर त्यानें अकबराच्या नांवानें खुतबा पढविला. बैरामखानाचें व त्याचें धर्मसंबंधानें वांकडें होतें. तरदीबेग सुनी पंथाचा होता, व बैरामखान शिया पंथाचा होता. बैरामखानानें तरदीबेग यास हि० स० ९६३ त मारविलें.

खासगी शागिर्दपेशाकडील नोकर, बादशाही गारद, ( बंदोबस्ताकरितां ठेविलेले लोक) व पुढें मागें गादीवर दावा सांगणारा कामरान याचा मुलगा, हे सर्व त्यानें पंजाबांत या नव्या बादशहाच्या स्वारींत पाठवून दिले. नंतर तो हेमूचा हल्ला हटवून राजधानीचें संरक्षण करण्याच्या तजविजीस लागला.

---

# भाग आठवा.

## अकबरानें राज्यप्राप्तीकरितां केलेल्या लढाया वगैरे.

अकबर फौजेनिशीं कलानूर शहरांत शिरला तोंच त्याला बापाच्या मरणाचें वर्तमान कळलें. तेव्हां काबुलांतील बंडाची वार्ताही आली नव्हती, व हेमू बनिया दिल्लीवर चालून येईल ही गोष्टही बैरामखानाला संभवनीय वाटली नव्हती. यामुळें आपल्याला काय तो एकच शत्रु, ह्मणजे ज्याचें पारिपत्य करण्याकरितां हुमायुनानें त्याला पंजाबांत पाठविलें होतें तो शिकंदरशहा तेवढा आहे, असें बैरामखानास प्रथम कांहीं दिवस वाटत होतें. शिकंदरशहा लढत लढत हळूहळू काश्मिराकडे पीछेहाट करीत होता. तेव्हां अकबर व त्याचा गुरु यांना असें वाटलें कीं, प्रथम पंजाब प्रांत पूर्णपणें हातीं आणणें हें आपलें पहिलें व मुख्य काम असून त्याकरितां शिकंदरशहाचा पाठलाग करणें भाग आहे. बादशाही फौज कलानूर येथून डेरे राहुट्या उठवून शिकंदरशहाच्या मागें लागली, तेव्हां तो निरुपाय होऊन शिवालिक पहाडाच्या अलीकडील टेंकड्यांमध्यें मानकोट नांवाचा एक फारच मजबूत पहाडी किल्ला आहे त्याच्या आश्रयास जाऊन राहिला. तों इकडे हिंदुस्थान व काबूल या दोन्ही ठिकाणीं गडबडी चालू झाल्याचें वर्तमान आल्यामुळें, त्या किल्ल्याच्या रोंखावर थोडीशी फौज ठेवून अकबर व बैरामखान हे जालंदरास परत आले.

ते अगदीं वेळेवर परत आले. काबुलास बंड झालें होतें इतकेंच नव्हे, तर इकडे हेमू बनिया—ज्याचें सैन्य पदोपदीं वाढत चाललें होतें—यानें युद्धाशिवायच आग्रा शहर हस्तगत केलें असून तो तेथील शिबंदीचा

दिल्लीकडे नेटानें पाठलाग करीत चालला होता. दुसरे दिवशीं त्यानें मोंगल फौजेचा पराभव करून दिल्ली घेतल्याचें वर्तमान आलें. तेव्हां बाकी राहिलेल्या हतवीर्य सैन्यासह तरदीबेग सरहिंदकडे वळला.

पुष्कळ सल्लागार असण्यापासून नेहमीं फायदाच असतो असें नाहीं. हेमूचा असा जय झाल्याचें वर्तमान ऐकून अकबरानें आपले सर्व शूर सरदार एकत्र जमविले, व त्यांना या बाबतींत मसलत विचारली. त्या सर्वांनीं, आतां काबुलाकडे जावें हें बरें, असें सांगितलें. तें शहर पुनः हस्तगत होईल अशी त्यांना खात्री होती, व पुनः हिंदुस्थानावर स्वारी करण्यास योग्य अशी संधी जमवून आणणाऱ्या गोष्टी घडून येत तोंपर्यंत त्याला तेथें स्वस्थपणें राहतां येईल असेंही त्यांना वाटत होतें. परंतु या त्यांच्या सूचनेविरुद्ध बैरामखानानें मात्र आपलें निक्षून मत दिलें. एकदम सपाट्यानें सतलज नदी उतरून सरहिंद येथें तरदीबेग याला जाऊन मिळावें व तेथून हेमूवर ताबडतोब चढाई करावी; दिल्ली दोन वेळां घेतलेली दोन वेळां गेली आहे ती हरप्रयत्नानें पुनः घेतली पाहिजे; मुख्य महत्त्वाचें ठिकाण दिल्ली आहे, काबूल नव्हे; दिल्ली हातीं आल्यावर काबूल सहज घेतां येईल; असें त्यानें मोठ्या जोरानें प्रतिपादन केलें. अकबराला हे आपल्या गुरूचे विचारच रुचले, व त्यानें आपल्या लोकांस एकदम सतलजपार उतरण्याचा हुकूम दिला.

काबुलांत लहानसें राज्य धरून राहणें, किंवा हिंदुस्थानची बादशाही परत मिळविणें, या दोहोंतून कोणती तरी एक गोष्ट साधेल, हें अकबर व बैरामखान यांच्या लक्षांत येऊन चुकलें होतें. दिल्ली घेतल्यावर पंजाब सर करण्याचा हेमूचा खास इरादा असल्याचें त्यांना कळलें होतें; तेव्हां त्यापूर्वींच आपण तयार होऊन युद्धास आरंभ करावा, असा त्यांनीं निश्चय केला. असें करणें इकडील लोकांच्या मतें मोठें महत्त्वाचें असून त्या वेळीं जय मिळविण्याला तें अगदीं अवश्य होतें. तो आक्टोबर महिन्यांत जालंदराहून निघाला, व सतलज नदी उतरून सरहिंद येथें पोहोंचला. हेमूनें दिल्लीजवळ पराजित केलेले तरदीबेग वगैरे सरदार तेथें त्याला येऊन मिळाले. ते आल्यावर ज्या गोष्टी घडल्या, त्यांमुळें अकबराच्या मनांत, त्याचा

गुरु बैरामखान फाजील अधिकार चालवूं लागला होता, त्याजविषयीं नाराजीचें बीजारोपण झालें. तरदीबेग हा तुर्की सरदार असून हुमायुनानें आपल्या भावांशीं ज्या लढाया केल्या त्यांत त्यानें पुष्कळदां पक्षांतर केलें होतें, तथापि शेवटीं तो हुमायुनाच्याच पक्षास धरून राहिला होता. हुमायून मरण पावला तेव्हां, कामरान याचा एक मुलगा दिल्लीस असूनही, गडबड किंवा रक्तपात अगदीं न होऊं देतां अकबरास गादीवर बसविण्याची व्यवस्था त्यानेंच आपल्या बुद्धिचातुर्यानें केली होती. हेमूकडून पराभूत झाल्यावर त्यानें दिल्ली सोडण्यांत अतिशय त्वरा केली, असें कांहीं सरदारांचें ह्मणणें होतें हें खरें; परंतु अशा मतभेदाच्या चुकीबद्दल तो एखाद्या मोठ्या अपराध्याप्रमाणें दंडास पात्र होता असें नाहीं; निदान त्या वेळीं तो सरहिंद येथें आल्यानें अकबराला मोठें साहाय्य झालें यांत तरी संशय नाहीं. बैरामखान व तरदीबेग यांच्यामध्यें पहिल्यापासूनच मत्सर व द्वेषभाव असे. तो द्वेषभाव धर्मसंबंधी मतांतरामुळें बैराखानाच्या मनांत विशेष वाढला होता. बैरामखान हा शिया पंथाचा असून तरदीबेग हा सुनी पंथाचा होता. तो सरहिंद येथें येतांच बैरामखानानें त्याला आपल्या डेऱ्यावर बोलावून एकएकीं ठार मारविलें.[१] या क्रूर कृत्यामुळें बैरामखानावर अकबर फारच नाराज झाला. बैरामखानाला असें करण्याचीं योग्य कारणें दाखवून अकबराची समजूत करितां आली नाहीं. सरदार लोक कह्यांत राहण्याला व फौजेची व्यवस्था चांगली राहण्याला असें करणें अगदीं अवश्य होतें, अशा तऱ्हेचीं कांहीं तरी कारणें त्यानें सांगितलीं असावीं असें वाटतें.

---

१ या क्रूर कृत्याला कांहीं अंशीं अकबरानेंच परवानगी दिली, असें एक बदौनी हा इतिहासकार मात्र म्हणतो. परंतु अबुलफजल व फेरिस्ता यांनीं हें त्यानें ह्मणणें सोडून काढलें आहे. ब्लाकमन यानें आईन-ए-अकबरीच्या भाषांतरांत, बदौनी यानें लिहिलेलेंच मत ग्राह्य धरलें आहे. परंतु त्या भाषांतरकारानें असेंही लिहिलें आहे कीं, यामुळें अकबर बैरामखानावर नाखुष झाला. या अविचाराच्या कृत्यामुळें चगताइ सरदारांच्या मनांत बैरामखानाविषयीं द्वेष व बेभरंवसा उत्पन्न झाला.

इकडे हेमू हा 'राजा' असा किताब धारण करून त्याच्या भरांत दिल्ली येथें चैन करीत व फौज जमवीत होता. अकबर सरहिंद येथें पोहोंचल्याचें वर्तमान कळतांच आपला सर्व तोफखाना दिल्लीच्या उत्तरेस पंचवीस कोसांवर रवाना करून तो स्वतः बाकीच्या फौजेसह चाल करणार होता. अकबरही त्याच शहराकडे जाण्यास निघाला होता. त्यानें, दिल्लीजवळ हेमू बनियाशीं झालेल्या लढाईंत तरदीबेगाबरोबर हजर असलेल्या, व तरदीबेगानें माघार घेतल्याबद्दल त्याला नांवें ठेवणाऱ्या अलीकुलीखान शैबानी नांवाच्या सरदाराला दहा हजार स्वारांनिशीं अघाडीस पाठविलें होतें. तो पाणिपत येथें पोहोंचला, तेव्हां हेमूचा तोफखाना आला असून त्याच्या मदतीला कोणी नाहीं असें पाहून त्यानें त्याच्यावर एकदम हल्ला केला, व त्याचा पाडाव करून टाकला या त्याच्या बहादरीबद्दल त्याला 'खानजमान' ही पदवी मिळाली, व तो इतिहासांत याच नांवानें प्रसिद्ध आहे. या दुर्धर हानीमुळें हेमूचा फार विरस झाला; कारण त्याच्या तोफा तुर्कस्थानांतून मागविलेल्या होत्या, व त्यांच्याविषयीं लोकांच्या मनांत विशेष पूज्यभाव होता. तरी विलंब न करितां तो तसाच पाणिपतावर जाऊन पोहोंचला.

ता० ५ नोव्हेंबर इ० स० १५५६ रोजीं अकबर व बैरामखान हे पाणिपतच्या मैदानाकडे येत असतांना हेमूची फौज आपल्याकडेच येत असलेली त्यांच्या दृष्टीस पडली. त्या वेळीं त्या तरुण बादशहाच्या मनांत पुढील विचार क्वचितच आले असतील: ते हे कीं, बरोबर तीस वर्षांपूर्वी, त्याच मैदानांत त्याचा आजा बाबर यानें लोदी घराण्याचा नाश करून हिंदुस्थानचें राज्य मिळविलें होतें; व हल्लीं, त्याच्या बापास घालवून देणाऱ्या सूर वंशांतील राजाशीं शरीरसंबंध झालेल्या अशा एका राज्य बळकावणाऱ्या सरदाराचें सैन्य त्यास आडवें आलेलें होतें. ही लढाई तत्कालीन अत्यंत महत्त्वाच्या लढायांपैकीं एक होऊन जाईल हें कदाचित् त्याच्या लक्षांत असेल; परंतु तो चांगला दूरदृष्टि व विचारी असला तरी, या लढाईपासून हिंदुस्थानांत सुमारें दोनशें वर्षेंपर्यंत टिकणाऱ्या अशा एका नवीन बादशाहीचें बीजारोपण होईल, व त्या बादशाहीचा ऱ्हास होण्याला उत्तरेकडूनच चढाई करून येणाऱ्या दुसऱ्या लोकांच्या हातून पाणिपतच्या

दुसऱ्या लढाईनंतर आरंभ होईल, आणि त्या बादशाहीचा समूळ उच्छेद अट्लांटिक महासागरांतील एका यःकश्चित् लहानशा बेटांत राहणारे अगदीं परकी लोक येऊन करतील, इत्यादि गोष्टी त्याच्या ध्यानांत खचीत आल्या नसतील !

हेमूनें आपल्या सैन्याचे तीन विभाग केले होते. सर्वांत पुढें बिनीला पांचशें हत्ती होते. प्रत्येक हत्तीवर एकेक मोठा सरदार बसलेला होता; व त्या सर्वांचें आधिपत्य स्वतः हेमूकडे होतें. हेमूनें प्रथमच पुढें चालून आलेल्या डाव्या बाजूकडील मोंगलांच्या मोठ्या टोळीवर जोरानें चाल करून तिची अगदीं वाताहत केली. पण त्याच्या हाताखालच्या सरदारांनीं पायदळासह त्याला कुमक करण्यांत कसूर केली, तेव्हां तो थोडा मागें सरून शत्रूच्या सैन्याच्या मध्यभागावर चालून गेला. त्या भागाचें आधिपत्य खुद्द बैरामखानाकडे होतें. असा एखादा हल्ला आपल्यावर होईल हें त्या चतुर व शूर वीरानें पूर्वीच जाणून, आपल्या तिरंदाज लोकांना, हत्तीवर बसणाऱ्या लोकांच्या मस्तकावर नेम धरण्याविषयीं प्रथमच सांगून ठेविलें होतें. यांपैकीं एक तीर हेमूच्या डोळ्यास लागला, व तो थोडा वेळ बेसावध होऊन हौद्यांत मागें पडला. याप्रमाणें त्या सैन्याचा अधिपति पडल्यामुळें त्याची गाळण झाली. हल्ल्याचा वेग एकदम ढिला पडून तो कांहीं वेळानें नाहींसा झाला. ती संधी साधून बैरामखानाच्या शिपायांनीं त्या लोकांची दाणादाण केली. हेमूच्या हत्तीचा महात[1] मारला गेल्यामुळें तो हत्ती आपल्या जातिस्वभावाप्रमाणें जंगलाकडे चालता झाला. बैरामखानाचा एक दूरचा संबंधी शहाकुली मेहरम बहारलू[2] नांवाचा सरदार होता, तो सहज त्याच्या मागें लागला, व जवळ जातांच त्याच्या मानेच्या दोरीस धरून तो

---

१ सर्व लोकांच्या मतें, महात मारला गेला होता, हेंच खरें आहे. पण अबुलफजल यानें, 'महातानें आपले प्राण वांचविण्याकरितां आपल्या धन्याशीं कृतघ्नपणा केला,' असें लिहिलें आहे.

२ शहाकुली मेहरम बहारलू हा वर सांगितल्याप्रमाणें बैरामखानाचा संबंधी असून तो बैरामाच्या पक्षास शेवटपर्यंत धरून राहिला. बैरामाच्या मरणानंतर अकबरानें त्याला क्षमा केली, व पुढें वेळोवेळीं त्याला मोठमोठ्या कामगिऱ्या सांगितल्या तो सुमारें ४० वर्षेंपर्यंत साडेतीन हजारी मनसबदार होता. पुढें पांच हजारी

वर चढला. हौद्यांत पाहतो तों घायाळ झालेला असा हेमू आपल्या हातीं आल्याचें त्याला समजलें. तेव्हां त्यानें त्याला बैरामखानाकडे नेलें. बैरामखानानें त्याला अकबराकडे नेलें. त्या तरुण राजानें स्वतः सर्व दिवसभर लढाईत मोठें धैर्य व चातुर्य दाखविलें होतें, पण लढाईची सर्व व्यवस्था आपल्या गुरूकडे सोंपविली होती. बैरामखानानें हेमू यास अकबराकडे आणल्यावर तेथें घडलेला वृत्तांत तत्कालीन ग्रंथकारांनीं लिहिला आहे, तो असा: बैरामखान, त्या घायाळ झालेल्या सेनापतीला अकबरापुढें आणून ह्मणाला, 'ही तुमची पहिली लढाई आहे. या प्रसंगीं तुम्ही आपली तरवार या काफरावर गाजवा. यांत तुम्हांला मोठें पुण्य लागेल.' अकबरानें उत्तर दिलें, 'आतां तो मेल्याहूनही मेलेला आहे. त्याला मी काय मारूं ? तो शुद्धीवर असून त्याच्यांत ताकद राहीली असती तर त्याला मीं आपल्या तरवारीची कर्तबगारी दाखविली असती.' याप्रमाणें अकबरानें त्याला मारण्याचें नाकारल्यावर स्वतः बैरामखानानें त्या हतभाग्याचे तुकडे केले !

बैरामखानानें शत्रूचा दिल्लीपर्यंत पाठलाग करून त्याला अगदीं फुरसत न सांपडूं देण्याकरितां आपले स्वार पाठविले, व दुसरे दिवशीं सारखी पंचवीस कोसांची मजल मारून मोंगल सैन्यानें दिल्लींत प्रवेश केला. यापुढें अकबराला सर्व हिंदुस्थानात कोणी मोठासा प्रतिस्पर्धी राहिला नाहीं. त्याच्या आज्यानें तीस वर्षांपूर्वीं मिळविलेलें पद त्यास शेवटीं प्राप्त झालें. त्याचा बाप व आजा या दोघांनाही ज्या स्थितीचा चांगला उपयोग करितां आला नाहीं, त्या स्थितीचा ह्या अल्पवयी राजास योग्य उपयोग करितां येतो किंवा नाहीं हें पाहण्याचा प्रसंग येऊन पोहोंचला. त्याला कोणचें काम करावयाचें होतें त्याचें साधारणपणें दिग्दर्शन होण्याकरितां, तो गादीवर बसला तेव्हां हिंदुस्थानाची सामान्य स्थिति कशी होती, याचें पुढील भागांत दिग्ददर्शन करण्याचा विचार आहे; व त्या चौदा वर्षांच्या मुलाला बैराखानाच्या शिक्षणाचा कितपत उपयोग होण्यासारखा होता, याचें दिग्दर्शन त्याच्या पुढील भागांत करण्याचें योजिलें आहे.

---

झाला. अकबराचा त्याच्यावर इतका विश्वास होता कीं, त्याला जनानखान्यांत जाण्यालाही मनाई नसे. तो हि० स० १०१० त नारनोल येथें मरण पावला. तेथें त्यानें पुष्कळ भव्य इमारती व तलाव बांधले होते.

# भाग नववा.

## इ० स० च्या सोळाव्या शतकाच्या पूर्वार्धाच्या सुमारास असलेली हिंदुथान देशाची सामान्य स्थिति.

मोंगल लोकांच्या पूर्वी अफगाण लोकांनीं सतलज नदीच्या दक्षिणेकडील हिंदुस्थानच्या कांहीं प्रदेशांचें राज्य जिंकून घेतलें होतें; पण त्याला वास्तविकपणें हिंदुस्थानची बादशाही असें म्हणतां येण्याजोगें नव्हतें. वस्तुतः तें दिल्लीचें राज्य होतें. इ० स० १८५७ च्या पूर्वीचा वायव्येकडील प्रांत व बंगाल इलाख्यापैकीं पश्चिम-बहार, आणि मध्य-प्रदेश व राजपुतान्यामधील कांहीं भाग, त्याचप्रमाणें पंजाब, इतके प्रदेश त्या राज्यांत सामील होते. कांहीं थोडा काळपर्यंत तघलख बादशहांच्या अमलाखालीं बंगाला व बहुतेक सर्व दक्षिण-हिंदुस्थान हेही भाग होते असें ह्मणतां येईल. परंतु पुढें उत्तरेकडील लोकांनीं दिल्लीवर पुनः स्वारी करतांच दक्षिणेंतील हिंदु राजांना, हे परराज्याचें जोखड झुगारून देण्याला चांगली संधी मिळाली. दिल्लीच्या बादशहाच्या हातून गेलेल्या ह्या मुलखावर त्यांचा अंमल फिरून अद्यापि बसला नव्हता. गंगेच्या मुखापासून गोदावरीच्या मुखापर्यंत पसरलेलें ओरिसा प्रांताचें राज्य अगदीं स्वतंत्र होतें. त्याचप्रमाणें पश्चिम-हिंदुस्थानांतही कांहीं काळपर्यंत परकीय राजांचा अंमल नाहींसा झाला असून त्यांच्यांतील पूर्वीच्या लहान लहान संस्थानांचीं निरनिराळीं स्वतंत्र राज्यें झालेलीं होतीं.

याप्रमाणें, अकबर गादीवर बसला त्या सुमारास हिंदुस्थानचा अगदीं पश्चिमेकडील भाग जो गुजराथ देश तेथें एक स्वतंत्र अफगाण राजा राज्य करीत होता. हुमायुनानें त्या राज्यावर स्वारी केली होती खरी. तथापि तो हिंदुस्थानांतून पळून गेल्यानंतर तें पुनः चांगलें सावरलें होतें, व त्याला पुढें कांहीं त्रास झाला नव्हता इतकेंच नाहीं, तर तेथील राजानें आपल्या अगदीं शेजारच्या माळव्याच्या राजाशीं युद्ध चालविलें असून त्यांत त्यास यशही येत होतें. तसेंच हल्लीं ज्याला मध्य-हिंदुस्थान म्हणतात, तेंही अकबर गादीवर बसला तेव्हां स्वतंत्रच होतें. तीच खानदेशाची स्थिति होती.

राजपुतान्यांतील संस्थानेंही तशींच अगदीं स्वतंत्र होतीं. या संस्थानां-विषयीं थोडें जास्त विस्तारानें लिहणें अवश्य आहे.

महाप्रतापी संग राणा याच्या पराक्रमांविषयीं पूर्वी थोडेंसें वर्णन आलेंच आहे. बाबरानें त्याचा पराभव केल्यामुळें मेवाडच्या वैभवाला बराच धक्का बसला होता. पुढें शीरशहानें हुमायुनाला हिंदुस्थानांतून हांकून लाविलें, तेव्हां मेवाडांतील संस्थानिकांना त्या विजयी पुरुषाचें वर्चस्व शेवटीं कबूल करावें लागलें होतें. परंतु शीरशहाच्या मरणा-नंतरच्या गडबडींत त्यांनीं आपलें स्वातंत्र्य पुनः मिळविलें असून अकबर गादीवर बसण्याच्या सुमारास राजपुतान्यांतील संस्थानिकांत त्यांनीं आपला मोठेपणा पूर्ववत् स्थापित केला होता. इतर संस्थानां-पैकीं जयपूरचा राजा बिहारीमल्ल[1] यानें मोंगलांचें वर्चस्व बाबराच्या

---

१ बिहारीमल्ल हा अजमीर सुभायतींतील अंबरचा—हल्लींच्या जय-पूरचा—राजा होता. तो राजावत कच्छवाह कुळांतील पृथुराजाचा मुलगा होता. अंबरचें राज्य मारवाडच्या राज्याहून विस्तारानें कमी पण उत्पन्नानें अधिक होतें. अकबराच्या दरबारीं पहिला रजपूत राजा ताबेदारींत हजर झाला असा बिहारीमल्लच होय. मजनूंखान काकशाल नांवाच्या हुमायुनाच्या एका सरदाराला नारनोल जाहगीर होतें, त्याच्यावर शीरशहाच्या पक्षाकडील हाजीखानानें हल्ला केला. परंतु बिहा-रीमल्लाच्या मध्यस्थीनें दोघांची समजूत झाली. पुढें हेमूचा पराभव झाल्या-नंतर लौकरच त्याला मजनूंखानानें बादशहाकडे आणिलें. तेथें त्याचा चांगला आदर झाला. भेटीच्या वेळीं अकबर एका मस्त हत्तीवर बसला होता. तो दांडगाईनें इकडे तिकडे धांवू लागला तेव्हां सर्व दरबारी लोकांची दाणादाण झाली; पण बिहारीमल्ल व त्याचे रजपूत शिपाई नुसते जाग्यावरून हालले देखील नाहींत. हे पाहून अकबराला फार आश्चर्य वाटलें. पुढें कांहीं दिवस बिहारीमल्ल व इतर रजपूत राजे यांचें आपसांत वितुष्ट पडलें होतें. पण अकबराच्या द्वारानें याचा चांगला निकाल झाला. तेव्हां बिहारीमल्ल पूर्णपणें मुलाबाळांसह अकबराच्या पक्षास मिळाला, व अकब-रानें त्याचा बहुमान केला. त्यानें आपली कन्या अकबराला दिली. पुढें तो व त्याचा पुत्र भगवानदास व नातू मानसिंग वगैरे आग्र्यास दरबारांत दाखल झाले. अकबरानें त्याला पांचहजारी मनसबदार केलें. नंतर लौकरच बिहारीमल्ल अंबर येथें परत गेला. तो आग्रा येथें मरण पावला. अंबरची स्थापना इ० स० ९६७ च्या सुमारास धोलाराय यानें केली, व त्याच्यापासून बिहारीमल्ल हा अठरावा पुरुष होता, असें ह्मणतात. याला पूरण-मल्ल, रूपसी, असकरण व जगमल्ल, असे चार बंधु होते; व त्याचे भगवानदास, जगन्नाथ व सल्हादी, असे तीन पुत्र बादशहाच्या नोकरीस राहिले होते.

वेळींच कबूल करून त्याला आपल्या फौजेनिशीं साहाय्य केलें होतें. शीरशहानें हुमायुनाचा पराभव करण्यापूर्वींच त्यानें तेथील राजाला 'अंबरचा राजा' अशी एक मोठी बादशाही पदवी दिली होती. अकबराचा पाणिपत येथें जय झाला तेव्हां बिहारीमल्लाचा मुलगा भगवानदास[1] हा जयपुरच्या गादीवर असून त्या वेळीं जयपुरापेक्षां जोधपुरच्या राज्याची योग्यता पुष्कळच मोठी मानीत असत. तेथील राजा मालदेव यानें इतर सर्व राजापेक्षां शीरशहाला रणांगणांत अधिक त्रास दिला होता. तरी हुमायून पळून जात असतां त्यानें त्याला आश्रय दिला नाहीं. सारांश, अकबर गादीवर बसला तेव्हां मालदेव हा हयात होता व तो राजपुतान्यांतील सर्व राजांत श्रेष्ठ असून अगदीं स्वतंत्र राजा होता. जसलमेर, बिकानेर, व वाळवंटाच्या मैदानाच्या लगत्याचीं इतर सर्व संस्थानेंही स्वतंत्र होतीं. तसेंच राजपुतान्यांतील इतर लहान लहान संस्थानें, सिंधचें राज्य, मुलतानचें राज्य, हीं सारीं स्वतंत्रच होतीं. मेवात व भागेलखंड यांच्यावरही परकीयांचा अंमल नव्हता. परंतु ग्वाल्हेर, ओरच्छा, चंदेरी, नरवार, व पन्ना हीं संस्थानें आग्र्याच्या लगत्यास असल्यामुळें त्यांना बराच त्रास पोंचत असे, व मुख्य बादशाही अधिकाऱ्यास त्यांच्यावर अंमल बजावण्यास ज्या वेतानें कमजास्त फुरसत सांपडे, तेवढ्या प्रमाणानें तीं थोडींबहुत मांडलिक स्थितीस पोहोंचलेलीं होतीं.

मुसलमान बादशहांच्या खास अमलाखालीं असणाऱ्या प्रदेशां-

---

१ भगवानदास हा आपल्या पित्याबरोबरच अकबराच्या दरबारांत नोकरीस राहिला. हि० स० ९८० त सरनाल येथें अकबर व इब्राहीमहुसेन मिरज़ा यांची लढाई झाली, तींत त्यानें अकबराचा प्राण वांचविला. पुढें कांहीं वर्षांनीं त्याची पंजाबांत बदली झाली. याच सुमारास त्याच्या मुलीचें शहाजादा सलीम याशीं लग्न झालें. तिच्या पोटींच शहाजादा खुसरू किंवा शहाजहान जन्मला. इ० स० १५८६ च्या सुमारास त्याला पांचहजारी मनसबदार करण्यांत येऊन त्याची जाबुलिस्तानावर नेमणूक झाली; कारण मानसिंगाला यूनफजई लोकांवर पाठविलें होतें. पुढें त्यानें स्वतःस जबर जखम करून घेतली; पण त्यांतून तो बरा झाला. इ० स० १५८८ त त्याची बहार प्रांतांत नेमणूक झाली. तो हि० स० ९९८ त मरण पावला. त्याच्या पूर्वीं थोडा वेळ राजा तोडरमल्ल मरण पावला होता. त्याला 'अमीरउलउमरा' ही पदवी होती. लाहोर येथील जुम्मा मशीद त्यानेंच बांधविलेली आहे.

तही ह्मणण्याजोगा एकत्रटपणा नव्हता. तेथील मुख्य राज्यकर्ता बादशहा याला कोणी 'राजा' कोणी 'सुलतान' व कोणी 'बादशहा' म्हणत; परंतु वास्तविक पहातां, ज्यांना निरनिराळे प्रदेश वांटून दिले होते अशा पुष्कळशा सरदारांचा तो नायक असे, याहून जास्त कांहीं म्हणतां येणार नाहीं. तो आपल्या दरबारांत अगदीं स्वतंत्र असे, व लढाईत फौजेचें आधिपत्य त्याच्याकडे असे; परंतु निरनिराळ्या प्रांतांच्या अंतस्थ व्यवस्थेंत तो बिलकूल हात घालीत नसे. यांपैकीं प्रत्येक प्रदेश, नांवानें मात्र नव्हे, पण वास्तविकपणें, निरनिराळ्या अधिकाऱ्याच्या हाताखालीं अगदीं स्वतंत्र राज्याप्रमाणें असे.

त्या वेळची स्थिति समजण्यास जीं कांहीं साधनें आहेत त्यांवरून पाहतां, त्या काळीं मुसलमानी अमलाखालच्या प्रदेशांत एकंदर जी लोकसंख्या होती तीपैकीं सात अष्टमांश हिंदु लोक असून ते सर्व साधारणपणें असलेल्या स्थितींत संतुष्ट होते, व त्यांना आपल्या धर्माप्रमाणें वागण्याची पूर्ण मोकळीक होती. मुसलमान राजांनीं आपल्या परधर्मी प्रजेवर बसविलेली 'जिजिया' किंवा डोईपट्टी त्यांना द्यावी लागत असे हें खरें; परंतु राज्यव्यवस्थेच्या सर्व खात्यांत हिंदु लोकांचा भरणा पुष्कळ असे. बहुतेक प्रदेशांत वरिष्ठ प्रतीच्या हिंदु लोकांकडे मुख्य अधिकाऱ्याच्या खालोखाल अधिकार असून तो वंशपरंपरा त्यांच्याकडे चालत असे, व युद्धप्रसंगीं ते आपल्या हिश्शाचें सैन्य लढाईकरितां पुरवीत असत.

याप्रमाणें प्रत्येक प्रांतांत शिबंदीची निराळी फौज असून, ती मुख्य अधिकाऱ्याला जरूर पडेल तेव्हां ताबडतोब लढाईस पाठवितां येण्याजोगी असे. परंतु या फौजेशिवाय व तिच्याशीं अगदीं संबंध नसलेली अशी कांहीं बादशाही फौज बहुधा नेहमीं प्रत्येक प्रांतांत राहत असे. त्या फौजेचा खर्च बादशहाकडून मिळत असून तिजवर त्यानें नेमलेल्या एका स्वतंत्र अधिकाऱ्याचा अंमल असे. हा सेनापति त्या प्रांताच्या मुख्य अधिकाऱ्यापासून बहुतेक स्वतंत्र असून खुद्द बादशहाशीं मात्र त्याचा संबंध असे.

न्यायमनसुबा करण्याचे जे नियम ठरविलेले होते त्याप्रमाणें पाहूं गेलें असतां त्या वेळची न्यायाची पद्धत फार उत्तम तऱ्हेची

होती असें म्हटलें पाहिजे. कारण लोकांना न्याय मिळावयाचा तो, ‘ राज्याची सर्व मजबुती कायदेकानूंवर अवलंबून असते, ’ या मुसलमानी धर्मशास्त्राच्या तत्त्वास अनुसरून मिळत असे. ते कायदेकानू काजी लोक अमलांत आणीत असत, व ते कुराणास अनुसरून वेळोवेळीं झालेल्या निकालांस धरूनच बनलेले असत. त्यांत देशाचारासंबधानें मात्र थोडाबहुत फेरफार झालला असे. ज्यांचा राज्याच्या सुरक्षितपणाशीं फारसा संबंध नसे, अशा सर्व प्रकरणांचा काजीच निकाल करीत असे. फौजदारी प्रकरणांचा निकाल करण्याचें काम कांहीं विवक्षित मंडळींकडे सोंपविलेलें असे. त्यांच्या काम करण्याच्या पद्धतींत कोणत्याही प्रकारचा नियमितपणा नसे. ते बादशहाकडून नेमले जात असत, व त्यांना बादशहाचें पाठबळ असे; यामुळें ते केव्हां केव्हां काजीच्या अधिकारांतही ढवळाढवळ करीत असत. तरी लोक खुष असत, यावरून न्यायइनसाफाचें काम एकंदरीनें पहातां बऱ्या प्रकारें होत असे, असें अनुमान करण्यास कांहीं हरकत नाहीं. या देशांत पूर्वीं आलेले मुसलमान लोक व येथले मूळचे रहिवाशी हिंदु लोक यांच्या हिताहिताचें ऐक्य कालगतीमुळें बहुतेक झालेलें होतें, व वरील कायदेकानूंस अनुसरूनच त्या कालानुरूप मिळणारे न्यायइनसाफ प्राप्त होण्याची उमेद उभयपक्षांसही सारखीच असे. त्या वेळीं लढाया वारंवार होत असत; तथापि, तेव्हांचे कागदपत्र खात्रीलायक मानले तर त्या वेळीं रयतेची स्थिति एकंदरींत चांगली भरभराटीची होती, असें दिसतें.

आतां जो राज्यव्यवस्थेविषयीं विचार करावयाचा आहे, तो करितांना, बाबर किंवा हुमायून यांतून एकानेंही, आपल्या पूर्वीच्या अफगाण राजघराण्यांनीं चालू केलेली राज्यव्यवस्था विशेष रीतीनें बदलली नव्हती, ही गोष्ट लक्ष्यांत ठेविली पाहिजे. वास्तविक पाहतां, बाबराला याहूनही स्वतंत्र रीतीच्या राज्यव्यवस्थेचा अनुभव होता. फरगाणा, समरकंद, किंवा काबूल यांपैकीं कोणत्याही प्रांतांत तो असला तरी आपल्या राजधानींत तो मुख्य मालक असे एवढेंच नव्हे, तर त्यानें स्वत नेमलेल्या निरनिराळ्या प्रांतांच्या सर्व अधिकाऱ्यांचाही तो मुखत्यार असे. ते अधिकारी, संस्थानिक, किंवा

जहागीरदार, आपापल्या प्रांतांत बहुतेक स्वतंत्र अधिकार चालवीत हें खरें, परंतु त्यांच्या धन्याच्या मनास वाटेल तेव्हां त्यांना त्यांस काढून टाकतां येत असे. यामुळें त्यांना सामान्यतः लोकांस योग्य न्याय मिळेल अशा रीतीनेंच राज्यकारभार करावा लागे, अथवा राजदरबारांत आपल्या हिताहिताकडे लक्ष ठेवणारा असा एखादा वकील ठेवावा लागे. त्याचप्रमाणें फौजेंत बहुतेक खुद्द बादशहाचे नोकर, व मुख्य मुख्य सरदार, संस्थानिक इत्यादिकांचे नोकर व आश्रित लोक यांची भरती झालेली असून, बादशहाच्या अमलांतील निरनिराळ्या प्रांतांतल्या लोकांचीही तिच्यांत आणखी भर होत असे.

बाबराप्रमाणेंच त्याच्या पुत्राच्या वेळींही राजसत्ता केवळ एकव्यक्तिनिष्ठच होती. स्वतंत्र संस्था केवळ अश्रुत होत्या एका राजानें केलेले कायदे त्याच्या मागून येणाऱ्या राजानें रद्द करण्यास कोणत्याही प्रकारचा प्रत्यवाय नव्हता. सारांश, प्रत्येक गोष्टींत जिकडे तिकडे विशेष व्यक्तीचें सामर्थ्य दृष्टोत्पत्तीस येत असे. राजाच्या स्वैर वर्तनावर फक्त एक काय तो बंडाचाच दाब असे. त्यांतूनही बंडवाल्यांचा जय झाला तरच अर्थात् हा दाब बसण्याचा संभव असे. परंतु राजा खंबीर असला तर, अशा प्रकारचें बंड होणें बहुतेक मुष्किलीचेंच असें; आणि तो खंबीर असून न्यायीही असला तर, बंड न होण्याचा खरा उपाय ह्मणजे उत्तम न्यायइनसाफ करणें हाच होय, असें त्याच्या तेव्हांच लक्षांत येत असे.

बाबर हिंदुस्थानांत आला तेव्हां त्यानें इकडील निरनिराळ्या प्रांतांत चालू असलेली जी राज्यव्यवस्था पाहिली, ती त्याला पूर्वी ठाऊक असलेल्या मध्य-एशियांतील राज्यव्यवस्थेहून यत्किंचित् देखील भिन्न नसल्याचें दिसून आलें. तिच्यांत कांहीं फरक करण्याचें त्याच्या मनांत आलें असतें तरी त्याला तसें करण्यास फुरसत नव्हती. त्याच्या पुत्राला तर तशी इच्छाही झाली नाहीं, व फुरसतही मिळाली नाहीं. मरणापूर्वी थोडे दिवस हुमायुनानें जी राज्यव्यवस्था प्रचारांत आणण्याचा विचार केला होता, ती त्या वेळीं हिंदुस्थानांत चालू असलेल्या राज्यव्यवस्थेपेक्षां विशेष चांगल्या प्रकारची होती असें मुळींच नाहीं. त्याचा असा विचार होता कीं, एकंदर राज्याचे मोठे मोठे सहा भाग

करून दिल्ली, आग्रा, कनोज, जोनपूर, मांडव, व लाहोर हीं शहरें त्या त्या भागांचीं मुख्य ठाणीं अथवा राजधान्या कराव्या; या प्रत्येक ठिकाणीं एकेक मोठी लष्करी छावणी ठेवून तेथें एकेक भरंवशाचा व हुशार सेनापति नेमावा; त्याच्या हाताखालीं बाहेरून कुमक मागविण्याची सहसा जरूर पडूं नये इतकी फौज असावी; या सर्वांचें एकीकरण करण्याकरितां बादशहानें पाळीपाळीनें १२००० स्वारांनिशीं एकेका विभागांत जाऊन तेथील फौजेची व्यवस्था पहावी; व सर्व प्रांताची हालहवाल कशी काय आहे हें स्वतः पहावें. ह्या एकंदर व्यवस्थेंत दोष भरलेले होते. हाताखालच्या सेनापतींपेक्षां खुद्द बादशहा अधिक हुशार असला तरी देखील अशा प्रकारच्या व्यवस्थेपासून कांहीं चांगलें निघण्यासारखें नव्हतें; व तो कमी हुशार असल्यावर तर ती वर्षभर तरी टिकली असती किंवा नाहीं याचा वानवाच होता!

हुमायुनाच्या आकस्मिक मरणानें या व्यवस्थेंत अडथळा आला, व ती पुढें अमलांत आली नाहीं. नंतर ज्या अनेक लष्करी व राजकीय घडामोडी झाल्या, त्यांचा पाणिपत येथील लढाईंत मिळालेल्या जयामुळें कळस झाला. त्या लढाईच्या योगानें, बरोबर तीस वर्षांपूर्वी अकबराचा आजा बाबर ज्या स्थितीस पोहोंचला होता, तीच स्थिति अकबराला प्राप्त झाली. बाबराला वायव्य प्रदेश, बहार व मध्य-हिंदुस्थानाचा कांहीं भाग, इतके जिंकून घेण्याची जी संधी मिळाली तिचा त्यानें उपयोग केला; त्याप्रमाणेंच पाणिपतच्या दुसऱ्या लढाईंत अकबरालाही अशीच संधी मिळून त्यानेंही आपला फायदा करून घेतला. या वेळेस त्याच्याशीं नेट धरून लढण्यासारखा असा एकच शत्रु शिल्लक राहिला होता त्याला त्यानें जिंकून टाकलें, यामुळें मुलूख काबीज करण्यापुरतेंच पाहूं गेलें तर, त्याचें काम सोपें होतें असें ह्मटलें पाहिजे. परंतु जिंकलेलीं राज्यें एकजीव करून तीं चिरस्थायी करणें, निरनिराळे प्रांत व नानाजातींचे व वर्णांचे लोक यांचा मिलाफ करणें, तसेंच राज्याच्या प्रत्येक प्रांतांतील शहरांत व खेड्यापाड्यांत बादशहाचें वजन दृष्टीस पडेल अशी एखादी सार्वत्रिक राज्यव्यवस्था शोधून काढून ती अमलांत

आणणें, व अशी राज्यव्यवस्था असूनही तिच्या योगानें स्थानिक संस्था, स्थानिक रीतीभाती, व स्थानिक आचारविचार, यांची सरणी नष्ट न होऊं देणें, हीं कामें खरोखर फार कठिण होतीं. हें काम त्याच्या आज्यानें मुळींच हातीं घेतलें नव्हतें; व तें त्याच्या बापाच्या मनांत कदाचित् आलें असतें किंवा त्याला कोणीं सुचविलें असतें तरी त्यालाही तें असाध्य वाटलें असतें. तथापि त्यांच्या राज्यव्यवस्थेच्या विचारांत अशा तऱ्हेच्या व्यवस्थेची उणीव असल्यानें, इ० स० १५२६ च्या अखेरीस पाणिपतच्या लढाईनंतर जिंकून घेतलेलें हिंदुस्थानचें राज्य, निराधार व जमिनीत खोल न गेलेल्या वृक्षाप्रमाणें निराश्रित, व एकसारखे जय मिळत गेले तरच कायम राहणारें, आणि एखाद्या प्रचंड वावटळाच्या पहिल्याच सपाट्यासरसें ढांसळणारें, असें झालेलें होतें;—फार काय, पण त्याच्या पूर्वींच्या गजनवी, घोरी, खिलजी, तघलख, सैय्यद, किंवा लोदी ह्या घराण्यांपैकीं कोणत्याही घराण्याच्या बादशाहीहून तें यत्किंचित्ही जास्त टिकणारें नव्हतें. बाबराच्या पुढच्याच कारकीर्दींत शीरशहानें केलेल्या हल्ल्यापुढें बाबरानें स्थापलेली बादशाही टिकली नाहीं, यावरूनच त्या राज्याची ही स्थिति उघडपणें सिद्ध होते. बाबर या वेळेपर्यंत जिवंत असता तर कदाचित् त्यानें शीरशहाचा मोड केला असता हें खरें, परंतु यावरून तरी वरील गोष्टच सिद्ध होते; कशी ती पहा. बाबर फारच हुशार सेनानायक असून त्याची कर्तृत्वशक्ति फार मोठी होती. शीरशहाही तसाच होता. हुमायुन हा लहरी, चंचल मनाचा व व्यवहारशून्य असून, सेनापति या नात्यानें तो कुचकामाचा होता. शीरशहाला हुमायुनावर जय मिळवितां आला, परंतु बाबराच्या हातून तो कदाचित् पराभव पावता; तथापि यावरूनही हेंच सिद्ध होतें कीं, बाबरानें जी व्यवस्था चालू केली तिचाच त्याला पहिल्यापासून अभ्यास होता, तिच्यामुळेंच फरगाणा व समरकंद हे प्रदेश त्याला मिळाले व पुनः त्याच्या हातचे गेले. काबूल व नंतर कांहीं वर्षांनीं हिंदुस्थान त्याला प्राप्त झालें, तेंही त्या व्यवस्थेमुळेंच होय. ती व्यवस्था, 'बळी तो कान पिळी,' याच तऱ्हेची होती. फरगाणा किंवा समरकंद, काबूल किंवा पंजाब, अथवा हिंदुस्थान, यांत कोठेंही तिचीं मुळें खोल

गेली नाहींत. तसें होणें संभाव्यही नव्हतें, कारण त्या व्यवस्थेंत मुळीं अंगचा जोमच नव्हता.

इ० स० १५५६ च्या अखेरीस, पूर्वी एकवार जिंकून हातचें गेलेलें व पुनः पादाक्रांत झालेलें असें हें प्रचंड राज्य, चवदा वर्षे एक महिना वयाच्या तरुण मुलाच्या हातीं आलें होतें[1]. कष्ट व संकटें यांतच तो लहानाचा मोठा झाला होता, व पाणिपतच्या लढाईमुळें त्याला हिंदुस्थान मिळालें होतें. इतक्या लहान वयांतही त्यानें पुष्कळ राजकारस्थानें पाहिलेलीं होतीं. त्याचा बाप वरचेवर त्याची सल्लामसलत घेत असे. त्या वेळचा पहिल्या प्रतीचा सेनापति बैरामखान याच्या हाताखालीं त्याला युद्धकर्माचें शिक्षण मिळालें होतें. त्यानें सहा महिन्यांवर पंजाबचें राज्य जातीनें केलें होतें. परंतु राज्यें काबीज करणारा व राज्यव्यवस्थापक या दोन्ही नात्यांनीं आतां त्याची परीक्षा व्हावयाची होती. त्याच्या पित्याचें उदाहरण किंवा बैरामखानाचें शिक्षण, या दोहोंतून एकाचाही त्याला या संबंधांत फारसा उपयोग होण्याजोगा नव्हता. आजवर त्यानें संकटें निवारण करण्यांत कुशलता व नैसर्गिक दयालुत्व यांचे अंकुर प्रकट केले होते, व याला अनुसरूनच त्यानें हेमूचा प्राण स्वतः घेतला नाहीं. परंतु आतां पुढच्या कामाला याहून निराळे गुण पाहिजे होते पुढें वड-लेल्या गोष्टींवरून या कामाला योग्य असे कोणचे गुण त्याच्या अंगीं होते, याचा आतां आपण विचार करूं.

---

# भाग दहावा.

## बैरामखानाच्या शिक्षेखालीं अकबराची कारकीर्द.

अकबराच्या बाह्य स्वरूपाविषयीं प्रथमतः दोन शब्द लिहितों. याविषयींचें वर्णन त्याचा पुत्र जहांगीर यानें लिहून ठेविलें आहे. त्यांत तो म्हणतो, 'अकबराचा बांधा मध्यम प्रमाणाचा, किंबहुना कांहींसा उंचच होता. त्याचा वर्ण गव्हाळ किंवा किंचित् काळसर-

---

१ अकबराचा जन्म ता० १५ आक्टोबर इ० स० १५४२ रोजीं झाला, व पाणिपतची दुसरी लढाई ता० ५ नोव्हेंबर इ० स० १५५६ रोजीं झाली.

पणाकडेच विशेष झुकता असा होता. त्याचे नेत्र व भुवया काळ्याभोर होत्या. शरीर स्थूळ, कपाळ व वक्षस्थळ भव्य, व हात आणि पंजे लांब होते. त्याच्या नाकाच्या डाव्या बाजूस एक चण्याएवढा चामखीळ होता. तो फारच सुरेख दिसत असे. सामुद्रिक जाणणारे लोक, हा चामखीळ शुभ, पुष्कळ संपत्ति व वैभव यांच्या प्राप्तीचें शुभचिन्ह होय, असें म्हणत. त्याचा आवाज फार मोठा व बोलणें फार खुबीदार व मोहक असे. त्याचें वर्तन व स्वभाव इतर सर्व लोकांच्याहून भिन्न असत. त्याच्या चेहऱ्यावर एक प्रकारचें ईश्वरी तेज झळकत असे.' यांतील बहुतेक गोष्टी खऱ्या असल्याचें दुसऱ्या इतिहासांवरूनही कळतें. एल्फिन्स्टन् हा ग्रंथकार त्याच्याविषयीं असें लिहितोः 'तो सदृढ बांध्याचा व सुंदर पुरुष होता. त्याचा चेहरा सुरेख असून त्याचें वर्तन मोठें मोहक असे.' तो मोठा बलवान् असून पुष्कळ परिश्रम सोसण्याचें त्याच्या अंगीं सामर्थ्य होतें. शरीरसामर्थ्य व चातुर्य हीं ज्यांना अवश्य लागतात अशा गोष्टी, ह्मणजे घोड्यावर बसणें, रपेट करणें, शिकार करणें, निशाण मारणें, इत्यादिकांची त्याला अतिशय आवड होती. तो मोठा धैर्यवान् होता, व त्याचें तें धैर्य शांत व विचारीपणाचें असून केव्हांही आवांक्याबाहेर न जाणारें असें होतें; तसेंच अतिशय धोक्याच्या व संकटाच्या प्रसंगीं तें विशेष जोरानें व तीव्रपणानें प्रकट होत असे. राज्याच्या हिताकरितां किंवा सार्वजनिक उपयोगाकरितां युद्ध करणें जरूर पडल्यास तो तें करण्यास तयार असे, पण त्यांत तो आनंद मानीत असे असें मात्र नाहीं. लढाई हें एक अनिवार्य संकट आहे असें त्याला वाटे, व राज्यव्यवस्थेचे नियम चांगले करून ते सदोदित अमलांत येतील अशा प्रकारें चिरस्थायी करणें हाच आपल्या सत्तेचा भक्कम पाया होय असें समजून त्या गोष्टीस लढाईपेक्षां तो फारच महत्त्वाची समजत असे. त्यानें आपल्या सर्व कारकीर्दींत, आपल्या राजव्यवस्थेची पूर्तता किंवा संरक्षण होण्याला अगदीं अवश्य नव्हती अशी लढाई कधींही केल्याचें दिसून येत नाहीं. त्याचा स्वभाव प्रेमळ असून तो मित्रांशीं खऱ्या भावानें वागणारा होता, आणि दुसऱ्याच्या मनांत तावडतोब आपल्याविषयीं प्रेमभाव उत्पन्न होईल अशा तऱ्हेची त्याची चालचलणूक असे. त्याला रक्तपात

अगदीं आवडत नसे. तो न्याय करितांनाही दया पोटांत ठेवणारा असा असून सूड उगविण्यापेक्षां क्षमा करणें त्याला विशेष पसंत वाटे. तरी प्रसंगविशेषीं कठोर मन करण्याची जरूरी पडली तर दयेचे अंकुर तेव्हांच दाबून टाकून तो निष्ठुर व कठोरही होत असे. इतर उदार बुद्धीच्या लोकांप्रमाणेंच त्याला परहित करण्यास झटावें असें वाटत असे. त्याच्या अंगीं औदार्य नैसर्गिकच होतें. आपण ज्यावर कृपा केली तो मनुष्य तीस अपात्र असल्याचें त्याला आढळून आलें तर, आपण केलेल्या कृपेविषयीं पश्चात्ताप करण्यापेक्षां, त्या मनुष्याला ताळ्यावर आणण्याची त्याला विशेष उत्कंठा असे. स्वतः राज्यव्यवस्था पाहण्याची त्याला उपजतच आवड होती. एखाद्या मोठ्या मोहिमेची योजना करण्यापेक्षां, आपण रचीत असलेल्या राज्यव्यवस्थारूपी व्यूहापासून सर्व प्रजेला आपल्या इच्छेनुरूप फळ प्राप्त होण्याजोगी एखादी नवीन गोष्ट करण्याचें काम त्याला विशेष आवडत असे. सर्व युगांत मानवी जातीवर ज्याचा पुष्कळ परिणाम झाला आहे व होत आहे असा विषय, म्हणजे धर्म, प्रजेस न्याय देणें, नीतिव्यवहार, इत्यादि संबंधांत त्याचें मन अत्यत निर्मळ व उदार असे. या संबंधानें त्याच्या मनांत दुराग्रह बिलकूल नव्हता. उलट आपलें मन सुधारून घेण्याचा त्याला उत्साह असे. तो जन्मतः व शिक्षणानें पक्का मुसलमान होता; तथापि बौद्ध, ब्राह्मणी, पारशी व ख्रिस्ती अशा धर्मांच्या लोकांशीं तो मोकळ्या मनानें व बरोबरीच्या नात्यानें मिळून मिसळून वागत असे. पुढें पुढें त्याला विद्वान् लोकांचा कंटाळा येऊं लागला, व त्यांना त्यानें दरबारांतून हांकून लाविलें असा त्याजवर आक्षेप आहे. पण असें ह्मणण्यापेक्षां, त्या विद्वान् लोकांचा दुराग्रह, धर्मवेड, व अंगीं जन्मापासून खिळलेल्या धर्मसमजुतींविषयीं अत्यंत आग्रहपूर्वक पक्षपात, या गोष्टींचा त्याला अत्यंत त्रास आला होता, असें म्हटलें तर जास्त शोभेल. विद्वानांचें स्वभावदुर्बलत्व किंवा त्यांच्या अंगीं एखादी गोम असली तरी त्याला ती आवडत नसे; यांतूनही हे दोष अगदीं शिखरास पोहोंचलेले असले तर तो त्या लोकांस दरबारांत येऊं देत नसे. इतर संबंधांत तो कशा प्रकारचा मनुष्य होता, हें या ग्रंथाच्या शेवटच्या भागावरून

वाचकांच्या लक्षांत येईलच. तथापि ज्या चौदा वर्षांच्या वयाच्या तरुण राजानें बैरामखानाच्या शिक्षेंत असतां पाणिपतची लढाई मारून मध्यें कोठेंही न थांबतां थेट दिल्लीवर चाल केली, त्याच्या अंगीं पुढें व्यक्त होणारे कोणकोणच्या सद्गुणाचे अंकुर होते, याची बरीच कल्पना होण्यासारखें वर वर्णन झालें आहे, असें वाटतें. त्या वेळीं अकबराच्या भोंवतीं जे लोक होते त्यांपैकीं एकालाही त्याच्या अंगची खरी योग्यता अथवा त्याचें बुद्धिवैभव यांचें अनुमान करतां आलें असेल कीं नाहीं याची शंकाच आहे. फार काय, पण त्याचा गुरु बैरामखान यालाही या गोष्टीचें खरें ज्ञान झालें नव्हतें असें वाटतें; नाहीं तर, त्यानें सरहिंद येथें आपल्या डेऱ्यांत तरदीबेग याला मारविलें नसतें, तसेंच त्या तरुण राजपुत्राला हतभागी हेमू बनियाचा वध करण्यास सांगितलें नसतें. असो. पुढें हुमायुनाचा हा पुत्र ह्मणजे, वाटेल तसा वळवितां येण्यासारखा अल्लड पोर नसून, उलटा आपणासच आपल्या कह्यांत वागविणारा आहे ही गोष्ट बैरामखान व दरबारचे इतर सरदार आणि सैन्यांतील अधिकारी यांच्या प्रत्ययास येण्यास फारसा उशीर लागला नाहीं!

अकबर एक महिनाभर दिल्लीस राहिला. तेथून हेमूच्या पराभव पावलेल्या सैन्याचा पाठलाग करून त्याजबरोबर असलेली अगणित संपत्ति लुटून आणण्याकरितां त्यानें मेवातकडे कांहीं फौज पाठविली. या लहानशा मोहिमेंत त्याचा सेनापति, पीरमहंमदखान शेरवानी[1],

---

१ पीरमहंमदखान शेरवानी हा एक मुल्ला होता. तो कंदाहार येथें बैरामखानाच्या पदरीं राहिला. त्याच्याच कृपेनें, अकबर गादीवर बसला तेव्हां त्याला अमीरी मिळाली. हेमूबरोबरच्या लढाईंत त्यानें चांगलें शौर्य गाजविलें व त्याला 'नासिरुल्मुल्क' ही पदवी मिळाली. पण त्याच्या गर्विष्ट स्वभावामुळें सर्व चगताई सरदार त्याच्याशीं नाखुष होते; व एकदां त्यानें आजारीपणांत बैरामखानाची भेट घेतली नाहीं ह्मणून बैरामखानही त्याच्यावर फार नाखुष झाला. पुढें बैरामखानानें त्याला जबरदस्तीनें यात्रेस पाठविलें. तो गुजराथेकडे [illegible]च्या मार्गानें जात असतांना बैरामखानाच्या माणसांनीं त्याला फार त्रास दिला. ही गोष्ट अकबराला आवडली नाहीं. पीरमहंमद गुजराथेंत पोहोंचतो तोंच त्याला बैरामखानाच्या र्‍हासाची अधमखानाच्या मार्फत बातमी कळली. तेव्हां तो तसाच थेट अकबराकडे गेला. अकबरानें त्याला

याला चांगलें यश आलें. हा बैरामखानाचा आश्रित होता; परंतु पुढें बैरामखानानें त्याचा फार छळ केला. असो. नंतर अकबरानें आग्र्यावर चाल करून तें शहर घेतलें.

पंजाबची पक्की व्यवस्था लागल्यावांचून अकबराचें सतलजच्या अलीकडचें राज्य कायम होण्याजोगें नव्हतें. त्याचा शत्रु शिकंदरशहा हा मानकोट येथें असून, त्याचा अद्याप समूळ उच्छेद झाला नव्हता. शिकंदरशहा तैमूरवंशाचा पक्का द्वेषी होता. इ० स० १५५७ च्या मार्च महिन्यांत, अकबरानें पंजाबांत जें सैन्य ठेविलेलें होतें त्याच्या विनीचा शिकंदरशहानें लाहोरापासून वीस कोसांवर पराभव केल्याचें वर्तमान अकबरास कळलें. त्या वेळीं तिकडून आलेल्या सरदारांनीं तेथील स्थिति फारच कठिण असल्याचें त्याला सांगितलें. ते म्हणाले कीं, 'शिकंदरशहानें मुख्य ठाणें मानकोट येथें मजबूत करून, पराभव झाला तरी पुनः पुनः बादशाही फौजेस त्रास देण्याचें उत्तम साधन करून ठेविलें आहे; व सांप्रत त्याचा जय झाल्यानें त्याच्या पक्षाच्या लोकांस स्फुरण आलें आहे.' या सर्व गोष्टींचें खरें व पूर्ण स्वरूप अकबरानें चांगलें लक्षांत आणलें, व हातीं घेतलेलें काम पुरतेपणीं पार पाडल्यावांचून रहावयाचें नाहीं हा जो पुढें आपल्या साऱ्या कारकीर्दींत पाळलेला कडक नियम तो त्यानें या वेळीं अमलांत आणिला. तो थेट लाहोरावर चाल करून गेला. तेथें स्वस्थता असल्याचें पाहून तेथून तो जालंदर येथें गेला. त्या ठिकाणीं त्याचा शत्रु ठाणें देऊन राहिला होता. अकबर जवळ येतांच शिकंदरशहा शिवालिक पहाडांत शिरून मानकोटच्या आश्रयास जाऊन राहिला. तेव्हां अकबरानें त्या किल्ल्याला वेढा घातला.

हा वेढा सहा महिने राहिला. पुढें दाणापाण्याची ददात पडली,

---

'खान' ही पदवी दिली, व पुढें अधमखानाबरोबर माळव्याच्या मोहिमेवर पाठविलें; आणि तेथील सुभेदारी त्यालाच दिली. त्यानें हि० स० ९६९ त बाजबहादुर, माळव्याचा राजा, याचा पराभव केला. पुढें त्यानें खानदेशावर स्वारी करून बऱ्हाणपूर लुटिलें, व तेथील लोकांची क्रूरपणें कत्तल केली. तो अगणित लूट घेऊन परत येत होता, इतक्यांत बाजबहादुरानें त्याच्यावर हल्ला करून त्याचा पराभव केला. तेव्हां तो रात्रीच्या वेळीं नर्मदेवर आला, व तसाच हट्टानें नदीपार उतरत असतांना बुडून मरण पावला.

व बरेच लोक शिकंदरास सोडून गेले. तेव्हां त्यानें तहाचें बोलणें लावण्याकरितां आपले कांहीं सरदार अकबराकडे पाठविले. अकबरानें त्याची विनंति मान्य करून त्याला बंगाल्याकडे जाण्याची मोकळीक दिली; परंतु त्यानें पुनः आपल्याविरुद्ध शस्त्र न उचलावें म्हणून त्याचा मुलगा तेवढा ओलीस ठेवून घेतला. नंतर तो किल्ला त्याच्या हस्तगत झाला. पुढें अकबर लाहोरास परत आला. तेथें त्यानें त्या प्रांताची व्यवस्था करण्यांत सुमारें अडीच महिने घालविले. नंतर तो दिल्लीवर चाल करून आला. वाटेंत जालंदर येथें त्याचा मुक्काम पडला असतां त्याच्या चुलत आतेचें बैरामखानाशीं लग्न झालें. हें लग्न हुमायून बादशहानें पूर्वींच ठरविलेलें असून, अशा कामीं अकबराला पित्याची इच्छा किंवा आज्ञा परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणेंच होती. ता० १९ मार्च सन १५५८ रोजीं अकबरानें दिल्लींत प्रवेश केला. सर्व राज्यकारभाराची व्यवस्था अद्यापपर्यंत बैरामखानाकडेच होती, व हीच व्यवस्था पुढें आणखी दोन वर्षें कायम राहिली. शिक्षणाकरितां एखाद्या मोठ्या थोर व शूर सेनापतीच्या स्वाधीन असलेल्या तरुण मुलास त्याचा दाब एकदम झुगारून देणें सोपें नाहीं; व या न्यायानें पाहिलें असतां, आपल्या गुरूनें आपल्या नांवावर केलेल्या कांहीं कांहीं गोष्टी कदाचित् अकबराला आवडल्या नसल्या तरी, त्याचा अधिकार एकदम काढून टाकण्याइतकें सामर्थ्य आपल्या अंगीं अद्यापि आलें नाहीं असें त्यास त्या वेळीं वाटलें असावेंसें दिसतें. परंतु बैरामखानानें विनाकारण अकबराच्या प्रीतींतल्या लोकांवर इतराजी करून त्यांना दांडगाईनें काढून टाकलें, यामुळें हळूहळू अकबराचें मन त्या स्वैरवर्तनी प्रधानाच्या संबंधानें विटत चाललें. हा त्यांचा एकदां सुरू झालेला आपसांतील बेबनाव लौकरच वाढत चालला. आपल्या धन्याच्या अंगच्या गुणांचा जोम प्रत्यहीं दृढतर होत चालला आहे ही गोष्ट बैरामखानाच्या ध्यानांत आली नाहीं; तसेंच त्याच्या नैसर्गिक उत्तम गुणांत प्रतिदिवशीं अनुभव व राज्यकार्यकौशल यांची भर पडत चालली असल्याचेंही त्याच्या लक्षांत आलें नाहीं. ज्याला आपण लहानपणापासून शिक्षण देत आलों, ज्याच्या सैन्याकरवीं आपण अनेक मोहिमांत यश मिळविलें, व ज्याचें राज्य आपण अद्याप

चालवीत आहों तोच हा कालचा पोर आहे, असें त्यास वाटत होतें. स्वतंत्रपणें अधिकार चालविण्याची त्याला संवय पडून गेल्यामुळें तसाच अधिकार नेहमीं चालविणें त्याला अगदीं अवश्य होऊन गेलें होतें; व तो अधिकार एखाद्या विलक्षण अभिमानी व आग्रही पुरुषाप्रमाणें तो सारखा चालवीत होता.

वास्तविकपणें राजानें चालविण्याचा अधिकार दुसरा कोणी चालवीत असला तर ती गोष्ट राजाला व आपल्याला अत्यंत अपमानास्पद आहे असें समजणारे कित्येक लोक प्रत्येक तरुण राजाजवळ असावयाचेच. अशा लोकांचे मनांतील हेतु काय असतात हें सांगावयास नकोच. ते बहुधा आपमतलबी असून निरपेक्ष बुद्धि व अंतःकरणाची निर्मळता यांची त्यांच्या ठायीं उणीव असते; व कोणत्याही कारणानें म्हणा, त्यांना असें वाटत असतें कीं, राज्याचा वास्तविक जो मालक त्याच्याच हातीं सर्व प्रकारची सत्ता असावी. बैरामखानानें ज्यांना दुःख दिलें होतें, जे त्याचा द्वेष करीत असत, आणि ज्यांचीं कामें त्याच्या हातून कधींही होण्याचा संभव नसून तीं ह्या तरुण राजाकडून होण्याची ज्यांना आशा होती, असे बरेच लोक अकबराजवळ होते हें खास आहे. तसेंच जनानखान्यांतील स्त्रीवर्गाकडूनही त्याच्या मनावर कांहीं परिणाम होण्याची तजवीज सुरू होती. लहानपणापासून गादीवर बसेपर्यंत त्याचें लालनपालन करणारी, व त्या वेळीं त्याच्या जनानखान्यांत मुख्य असलेली त्याची एक दाई होती, तिनें, आतां राज्यकारभार हातीं घेण्याची वेळ येऊन ठेपली, तेव्हां तो आपण हातीं घ्यावा, म्हणून अकबरास आग्रह चालविला. अकबरही या गोष्टीस राजी नव्हता असें नाहीं. त्या वेळीं त्याला आठरावें वर्ष होतें, व पाणिपतच्या लढाईनंतरच्या चार वर्षांत त्याच्या बापाच्या राज्याचा बराच भाग त्याच्या कबज्यांत परत आला होता. तीं चार वर्षें त्यानें आपले नैसर्गिक गुण वृद्धिंगत व दृढतर होतील अशा तऱ्हेनें घालविलीं होतीं. त्याचा मुख्य वजीर बैरामखान याचें क्रूर व मनसोक्त वर्तन वरचेवर त्याच्या दृष्टीस पडे, तें त्याला अगदीं आवडत नसे. पण थोर मनाच्या मनुष्याच्या मनांत, लहानपणापासून आपणास शिक्षण देणाऱ्या गुरूविषयींची पूज्यबुद्धि साहाजिकच

जागृत असते, व तशी पूज्यबुद्धि अर्थात् अकबराच्या मनांत बैरामखानाविषयीं होती; तसेंच बैरामखानाच्या स्वभावाचा त्याला जो आजवर अनुभव आला होता, त्यावरून बैरामखानासारख्याशीं एकदां बिघडावयाचें तें कायमचेंच बिघडल्यावांचून गत्यंतर नाहीं ही गोष्ट त्याच्या ध्यानांत येऊन चुकली होती; त्याचप्रमाणें पुनः त्याला बिलकूल अधिकार चालवितां येऊं नये अशा तऱ्हेनें त्याचा संबंध तोडणें अवश्य आहे हेंही तो जाणून होता. पण बैरामखान तर सर्व अधिकार आपल्या हातीं ठेवूं पहात होता; तेव्हां त्याच्या हातीं एवढासा देखील अधिकार रहाणें सुरक्षित नाहीं हेंही अकबर समजून होता.

इ० स० १५६० च्या आरंभीं अनेक घडामोडी झाल्या, त्यांच्या योगानें सर्व राज्यकारभार खुद्द आपल्या हातीं घेण्याचा अकबराला निश्चय करावा लागला. हा निश्चय आपल्या वजीरास कळविण्याकरितां तो आग्र्याहून दिल्लीस गेला. आपला प्रतिस्पर्धी किंवा आपल्याला न आवडणारा सरदार याची कशी वाट लावावी याचें उदाहरण बैरामखानानें अनेक वेळां स्वतःच्या कृतीनेंच घालून दिलें होतें. ही गोष्ट घडवून आणण्याचें त्याचें साधन म्हटलें ह्मणजे तरवार किंवा खंजीर; परंतु त्या तरुण बादशहाच्या कोमळ व पापभीरु अंतःकरणास असले उपाय निंद्य वाटत असत इतकेंच नव्हे, तर तत्कालीन इतिहासावरून असें दिसून येतें कीं, असले उपाय त्यास सुचविण्याचेंही कोणास धैर्य झालें नसावें. राज्याचीं सूत्रें स्वतः हातीं घेण्याची गोष्ट काढतांच बैरामखानानें ती अगदीं सक्तीच्या हुकुमाप्रमाणें समजून मुकाट्यानें आपला आब राखून मक्केचा रस्ता धरावा अशा रीतीनें हा घाट जमवून आणला पाहिजे, असें त्याची आई व दाई या दोघींनीं त्याला सुचविलें होतें. बैरामखानानेंही, राज्यकारभाराचा बोजा इतर लोकांच्या हातीं देण्याची योग्य संधी येतांच ती साधून आपण पारमार्थिक सुखप्राप्तीसाठीं मक्केची यात्रा करण्यास जाण्याच्या विचारांत आहों, असें अनेक वेळां प्रसिद्धपणें बोलून दाखविलें होतें. तेव्हां दिल्लीस जातांच लढाईचा व दांडगाईचा प्रसंग येऊं नये म्हणून अकबरानें एक जाहिरनामा प्रसिद्ध केला, व त्यांत, आपण स्वतः राज्यकारभार पाहूं लागलों असल्यामुळें इतः-

पर आपल्याखेरीज दुसऱ्या कोणाचीही आज्ञा लोकांनीं मानूं नये, असा सक्त हुकूम फर्माविला. त्यानें बैरामखानाकडे याच अर्थाचा निरोप पाठविला, व त्यांतच, 'आपण मक्केच्या यात्रेस जावें हें बरें,' असेंही त्याला सुचविलें. अकबराकडून निरोप येण्यापूर्वींच बैरामखानाला हा त्याचा निश्चय कळला होता, व तो आग्र्याहून निघून पश्चिम समुद्रकिनाऱ्याच्या मार्गास लागला होता. त्यास अर्थातच फार राग आला होता, व त्याच्या मनांत कांहीं धामधूम करण्याचा विचार होता, हें उघड आहे. कारण बियाना येथें पोहोंचतांच त्यानें तेथील किल्ल्यांत कैदेंत असलेले कांहीं बंडखोर सरदार लोक सोडून दिले. तेथेंच त्याला अकबराचा निरोप[1] कळला, तेव्हां तेथून आपले आप्तविश्वासी सरदार व त्यांच्या लवाजम्याचे लोक येवढे फक्त बरोबर घेऊन तो राजपुतान्यांत नागोराकडे गेला. नागोराहून बादशाही हुकूम मान्य केल्याच्या निशाणीदाखल त्यानें एका सरदाराबरोबर आपला डंका, निशाण व सर्व सरदारी लवाजमा परत पाठविला. बैरामखान हटकून बंड करून पंजाब प्रांतांत दंगे उपस्थित करील असें लोकांनीं अकबराच्या मनांत पूर्वींच भरवून दिलें होतें; ह्मणून अकबर बरीच फौज घेऊन तिकडे चालला होता. वरील सरदारी लवाजमा अकबराकडे येऊन पोहोंचला त्या वेळीं तो रोहटक जिल्ह्यांत झज्झर येथें होता. तो लवाजमा त्यानें बैरामखानाच्याच एका जुन्या आश्रित सरदारास दिला. या सरदारावर अलीकडे बैरामखानाची गैरमर्जी झाली होती. असो, याच सरदाराला अकबरानें बैरामखानाच्या मागें राहून त्याला मक्केस रवाना करून येण्यास सांगितलें. यामुळें तर बैरामखानास फारच त्वेष आला.

१ या निरोपाचा मतलब पुढें दिल्याप्रमाणें होता: 'आपला इमान व सचोटी यांविषयीं माझी पूर्ण खात्री असल्यानें सर्व महत्वाचीं राज्यकार्यें मी आजवर आपल्यावर सोंपवून केवळ स्वतःच्या सुखाविषयीं मात्र विचार करीत असें, आतां सर्व राज्यकारभार मीं स्वतः हातीं घेण्याचा निश्चय केला आहे. यास्तव आजपर्यंत आपण जो बेत करीत आलां आहां त्याप्रमाणें मक्केच्या यात्रेस आपण जावें अशी माझी इच्छा आहे. हिंदुस्थानांतील कांहीं परगणे आपल्यास जहागीर करून देण्यांत येतील, व त्यांचा वसूल आपल्याकडे आपले मुखत्यार पाठवून देतील.' इलियट, व्हा. ५, पृ० २६४.

तो बिकानेरकडे. एकदम वळला, व आपलें खटलें आपल्या दत्तक मुलाच्या जिंमेस देऊन त्यानें उघडपणें बंड केलें. परंतु मोंगल बादशहाच्या पूर्ण विश्वासांतला त्याचा मुख्य वजीर ही पूर्वीची आपली स्थिति, व त्याच बादशहाविरुद्ध बंड करणारा ही आपली सांप्रतची स्थिति, या दोहोंत केवढें महदंतर आहे हें बैरामखानाला अद्याप कळून आलें नव्हतें! बैरामखान देपाळपुरास जाऊन पोहोंचतो तोंच आपला दत्तक मुलगा आपणावर फिरल्याचें त्याला कळलें. तरी जालंदर दुआबांत दंगे उपस्थित करण्याचा निश्चय करून तो त्या प्रसिद्ध प्रदेशाकडे सपाट्यानें चालला. पण सरहद्दीवरच पंजाबचा सुभेदार आटगाखान[1] हा फौजेनिशीं तयार होता त्याची व याची लढाई होऊन तींत याचा पराभव झाला. मग बैरामखान लुधिआनाशहराच्या पश्चिमेस पंधरा कोसांवर सतलज नदीच्या कांठीं तिलवाडा नांवाचा गांव आहे तिकडे पळून गेला. अकबर या सुमारास त्याच्या पाळतीवरच होता. त्यानें त्याचा पाठलाग करून त्याला फारच

---

१ याचें वास्तविक नांव शमसुद्दीन असें होतें. हा हुमायुनाच्या पदरीं साधारण शिपाई असून एका शेतकऱ्याचा मुलगा होता. त्याला विसाव्या वर्षी, आपण चंद्र आपल्या बगलेंत धरला आहे, असें स्वप्न पडलें. पुढें जो त्याचा अपरिमित भाग्योदय झाला त्यावरून हें स्वप्न बरेंच खरें झालें, असें म्हटलें पाहिजे. तो कनोजच्या लढाईंत हुमायुनाबरोबर होता. पराभव होऊन बादशहा पोहून गंगानदी उतरतांना पैलतीरास पोहोंचतो तों अगदीं थकून गेला होता. त्याला एका सामान्य शिपायानें हात देऊन किनाऱ्यावर ओढून घेऊन वांचविलें. हाच शिपाई शमसुद्दीन होय. हुमायुनानें त्याला आपल्या तैनातींत ठेविलें, व पुढें त्याच्या बायकोला अकबराची दाई नेमिलें. तेव्हां तो अकबराजवळच राहिला. हुमायून परत आल्यावर त्यानें त्याला आटगाखान किंवा 'मानलेला बाप' अशी पदवी दिली. हुमायुनानें आपलीं मुलेंमाणसें काबुलाहून आणण्याला यालाच पाठविलें होतें. बैरामखानाचा व याचा द्वेष होता. बैरामाचा पाडाव झाल्यावर त्याचें डंकानिशाण व लवाजमा यालाच मिळाला, व पंजाबची सुभेदारीही मिळाली. अकबर येऊन पोहोंचण्यापूर्वीच त्यानें बैरामखानाचा जालंदराजवळ पराभव केला. याबद्दल अकबरानें त्याला 'खानआजम' ही पदवी दिली. अकबराच्या कारकीर्दीच्या सहाव्या वर्षी त्यानें आपल्या अखत्यारीनेंच मुनीमखानाकडील वकिलीचें काम बळकावलें. पण अकबरानें तिकडे कानाडोळा केला. यामुळें मुनीमखान व शिहाबखान यांनीं अधमखानाला चिथावून त्याच्याकडून आटगाखानाला मारविलें. ता० १२ रमजान हि० स० ९६९.

जेरीस आणिलें. तेव्हां तो त्यास शरण आला. अकबरानें त्याची पूर्वीची मोठी कामगिरी ध्यानांत आणून त्याला क्षमा केली, व पुष्कळ द्रव्य देऊन त्याला मक्केस रवाना केलें. बैरामखान सुखरूप गुजराथेंत पोहोंचला, तेव्हां तेथील सुभेदारानें त्याचें चांगलें स्वागत केलें. तो हिंदुस्थान सोडण्याच्या तयारींत होता, इतक्यांत एका लोहानी अफगाणानें त्याचा खून केला. या अफगाणाचा बाप मच्छीवाडा येथील लढाईंत बैरामखानाच्या हातून मारला गेला होता. असो. इकडे अकबर दिल्लीस परत आला व तेथें थोडे दिवस राहून तो आग्र्यास गेला. ह्या ठिकाणीं, नवीन मुलूख जिंकणें, त्यांचें एकीकरण करणें, व एकंदर राज्यास आळा घालून त्याला भक्कमपणा आणणें, याविषयींचे विचार करून, याच वेळेस ते सिद्धीस नेण्याच्या खटपटीस तो लागला. त्याची खरी कारकीर्द याच वेळेस सुरू झाली असें म्हटलें पाहिजे; कारण त्याचा डोईजड व स्वतंत्रपणें वागणारा वजीर, ज्यानें सर्व सत्ता आपल्या हातांत घेतली होती, तो या वेळीं नष्ट झाला असून सर्व राज्याच्या भावी बऱ्यावाइटाची जोखीम आतां त्याच्या एकट्याच्या अंगावर येऊन पडली होती.

---

# भाग अकरावा.

## अकबराच्या स्वतंत्र कारकीर्दीचा इतिहास.

पाणिपतच्या दुसऱ्या लढाईनंतर सहाव्या म्हणजे अकबराच्या स्वतंत्र कारकीर्दीच्या पहिल्या वर्षी हिंदुस्थानाची स्थिति थोडक्यांत पुढें लिहिल्याप्रमाणें होती. त्या वेळीं हल्लींचा पंजाब व वायव्यप्रांत, पश्चिमेस ग्वाल्हेर व अजमीर सुद्धां, व पूर्वेस लखनौ व अलाहाबादेसुद्धां जोनपुरापर्यंत सर्व अयोध्याप्रांत, इतका मुलूख त्याच्या हातीं होता. बनारस, चुनार, बंगाल, व बहार हे प्रांत अद्यापि सूर वंशाच्या राजांच्या किंवा इतर अफगाण घराण्यांच्या वंशजांच्या

१ या मारेकऱ्यानें हें काम केवळ सूड उगविण्याकरितां केलें असें म्हणतात. त्यानें बैरामाच्या पाठींत जंबिया खुपसला. तो छातींतून पार निघाला त्याचबरोबर 'अल्लाहो अकबर' असें म्हणत त्यानें प्राण सोडला. त्याच्या मुलाचा अकबरानें त्याच्या योग्यतेप्रमाणें बंदोबस्त केला.

ताब्यांत होते. तसेंच सर्व दक्षिण देश व पश्चिम-हिंदुस्थानापैकीं बहुतेक भाग हेही अद्यापि अकबराच्या राज्याच्या हद्दीबाहेरच होते.

बैरामखानाच्या तालमींत अकबरानें पांच वर्षें घालविलीं. त्या अवसरांत, हिंदुस्थानच्या प्रजेस, आपल्यावर आपल्यापैकींच कोणी उत्तम सार्वभौम राजा राज्य करीत आहे असें वाटून, राजा व प्रजा एकदिलानें चालतील अशा रीतीनें राज्य कसें चालवितां येईल, या गोष्टीविषयीं त्यानें पूर्णपणें विचार केला होता, यांत संशय नाहीं. यांत अनेक अडचणी होत्या. यापूर्वी चारशें वर्षें मुसलमान राजांनीं हिंदुस्थानावर राज्य केलें होतें. त्यांत त्यांनीं या प्रचंड देशांत राहणाऱ्या अनेक जातींच्या लोकांची एकजूट करण्याविषयीं कधींच प्रयत्न केला नव्हता. प्रत्येक राजा आपण आहों तोंपर्यंत आपलें वर्चस्व राखण्याच्या विचारानें राज्य करी, व त्याच्याहून कोणी वरचढ व बलिष्ठ असा शत्रु त्याला उत्पन्न होतांच त्याचा नाश होत असे. यामुळें, आजवर होऊन गेलेल्या सर्व राजघराण्यांच्या संबंधानें, हीं काय आज आहेत आणि उद्यां नाहींत, अशीं असल्याविषयीं लोकांची खात्री होऊन गेलेली होती. शिवाय बंगाल्यापासून गुजराथेपर्यंत, जागजागीं मागील राजघराण्यांपैकीं कोणी ना कोणी वंशज, तोतये राजे होऊन फिरत होते. ते या मोंगल बादशहाला त्या वेळेपुरता राज्याधिकार चालविणारा मुख्य पुरुष एवढेंच काय तें मानीत असत, व दैववशात् लौकरच त्याच्या जागीं आपल्यापैकींच एकादा किंवा नवीनच कोणी राजा होईल, असें समजत असत. मुख्य राज्याधिकाऱ्याविषयींच्या ह्या त्यांच्या क्षणिकपणाच्या कल्पनेला हुमायुनाच्या पदच्युतीमुळें जास्तच बळकटी आली होती. कारण कनोज येथें त्याचा पराजय होतांच तो हिंदुस्थान सोडून गेला, व तेरा वर्षें जें त्यानें मोंगल घराण्याचा बादशहा म्हणून येथें राज्य केलें होतें, त्याचा त्याच्यामागें मागमूस देखील राहिला नाहीं. त्या राज्यरूपी वृक्षाचें मूळही या भरतभूमींत शिलक राहिलें नाहीं!

या सर्व गोष्टी पुरतेपणीं अकबराच्या लक्षांत येऊन चुकल्या होत्या. संस्थानिक व प्रजा यांच्या मनांतून वरच्यासारख्या कल्पना घालविणें; तसेंच नवीन मुलूख काबीज करून त्यांचें एकीकरण

करणें; तसें करीत असतां रावापासून रंकापर्यंत सर्व लोकांना मान्य होणारीं तत्त्वें अमलांत आणणें; तसेंच सर्व लोक आपल्याला केवळ पित्याप्रमाणें मानूं लागून, आपलीं संकटें दूर करणारा दुसरा कोणी नाहीं असें समजतील अशा तऱ्हेची राज्यव्यवस्थेची पद्धत चालू करणें, हें तो आपलें मुख्य कर्तव्य समजत असे; त्याचप्रमाणें प्रजेचे पुरातन हक्क व रीतिरिवाज कायम राखून, त्यांचा तिला अव्याहत उपभोग घेऊं देणारा, जात, धर्म, किंवा देश यांचा विचार मनांत न आणितां प्रत्येक योग्य मनुष्याचे हक्क लक्षांत आणून त्यांस योग्य मान देणारा, आपला स्वतंत्र हुकूम सर्वांकडून पाळविणारा, सर्वांस सारखे कायदेकानू लागू करून समतेनें न्याय देणारा हा राजा आहे अशी प्रजेची खात्री करून देणें, ह्या सर्व गोष्टी आपल्या कर्तव्यांपैकींच तो मानीत असे. अकबर प्रौढ होत गेला तसतशीं हीं सर्व तत्त्वें त्याच्या मनांत विशेष रीतीनें बिंबत गेलीं. तो जिवंत असतांना व नंतरही, धर्मवेड्या मुसलमान ग्रंथकर्त्यांनीं, अकबर हा आपल्या अंगीं ईश्वराचे गुण आहेत असा गर्व करीत असल्याचा, त्याजवर आक्षेप आणिला होता. आतां वास्तविक पहातां त्या काळीं, 'बळी तो कानपिळी' या म्हणीचा या देशांत सर्वत्र प्रत्यय येत होता; व अशा स्थितींत या हतभाग्य देशांतील प्रजेंत ऐक्यभाव, क्षमा, दया, न्यायइनसाफ, सर्वांचे हक्क सारखे समजणें, वगैरे महातत्त्वांचा प्रसार करण्याकरितां परमेश्वरानें आपणास पाठविलें आहे असें तो समजत असे; व एवढ्यापुरता मात्र हा आक्षेप खरा आहे असें ह्मणतां येईल.

सर्व हिंदुस्थान देशांत एकछत्री राज्य करण्याचा त्याचा मुख्य हेतु होता; व होईल तेथवर, ज्या वेगळाल्या जाती आपण आपल्या अमलांत आणणार त्या जातींना हा हेतु चांगला आहे असें समजावून देऊन त्यांच्याच मदतीनें तो सिद्धीस न्यावा असा त्याचा उद्देश होता. या संबंधाची नीट समजूत पडण्याकरितां या विषयाचे लौकिक व तात्त्विक असे दोन भाग केले आहेत. या ग्रंथाच्या चालू भागांत, त्यानें हिंदुस्थानांतील निरनिराळीं राज्यें एकछत्री अमलाखालीं व एकाच कायद्याखालीं आणण्याविषयीं एकामागून एक जे यत्न केले, त्यांचें वर्णन

केलें आहे. पुढच्या भागांत या संबंधाचा तात्त्विक दृष्टीनें विचार केला आहे.

अकबरानें हिंदुस्थानांतील जीं निरनिराळीं राज्यें जिंकून घेतलीं, त्याविषयींचें तपशीलवार वर्णन देण्यापासून वाचकांस कंटाळा येईल; म्हणून त्यांपैकीं मुख्य मुख्य गोष्टींचा मात्र येथें उल्लेख केला आहे. त्यानें स्वतः राज्यसूत्रें हातीं घेतलीं त्याच वर्षीं, म्हणजे त्याच्या कारकीर्दीच्या सहाव्या वर्षी, त्यानें माळवा प्रांत पुनः जिंकून घेतला; व पुढें, चुनारगड व कर्मनाशा नदी यांच्या पूर्वेकडील प्रदेशांतील अफगाण राजानें जोनपुरावर हल्ला करण्याचा यत्न केला तो त्याच्या सरदारांनीं हाणून पाडला. अकबर स्वतः काल्पीजवळ यमुना उतरून गंगेच्या पूर्व किनाऱ्यावर अलाहाबादेजवळच्या कडा नांवाच्या गांवास गेला, तेथें जोनपूर येथें असलेले त्याचे सरदार त्याला येऊन मिळाले. नंतर तो आग्रयास परत आला. त्याच वर्षाच्या अखेरीस मेरटा नांवाच्या बऱ्याच मोठ्या व महत्त्वाच्या शहराला बादशाही फौजेनें वेढा घातला. हा गांव अजमिरापलीकडे जोधपुरापासून अडतीस कोस ईशान्येस त्याच संस्थानाच्या हद्दींत आहे. या स्वारीची सर्व व्यवस्था अकबरानें अजमिरास राहून चालविली होती, पण ती अमलांत आणण्याचें काम त्यानें आपल्या सरदारांकडे सोंपविलें होतें. रजपूत शिबंदीनें त्या शहराचें मोठ्या निकरानें संरक्षण केलें; तथापि पुढें लौकरच, ह्मणजे पुढील सालाचे वसंत ऋतूंत तेथील शिबंदीनें आपलीं हत्यारें व घोडीं घेऊन शहराबाहेर निघून जावें, पण सर्व मालमत्ता तेथेंच राहूं द्यावी, या शर्तीवर तें शहर बादशहाच्या हस्तगत झालें.

मेरटा हस्तगत झालें त्याच वर्षी म्हणजे १५६२ त अकबराच्या माळव्यांतील सरदारांनीं पश्चिमेकडे चाल करून तापी-किनाऱ्यावरील बिजागड व बऱ्हाणपूर हीं शहरें जिंकून घेतलीं. पण यापासून पुढें बराच त्रास झाला कारण, त्या शहरांचे पूर्वींचे अधिकारी, माळ-

१ बिजागड हा गांव हल्लीं होळकर सरकारच्या ताब्यांत आहे. मोंगलांच्या अमलदारींत तो गांव बराच नामांकित व भरभराटींत होता. बिजागड महेश्वरापासून सुमारें ३० कोसांवर आहे.

त्याच्या हांकून दिलेल्या अफगाण सुभेदारास सामील झाले, व तिकडील जमीनदारांस त्यांच्याच अमलाचा फार दिवस सहवास असल्यानें तेही त्याच्या मदतीस गेले; आणि सर्वांनीं मिळून बादशाही फौजेवर निकरानें हल्ला केला. ही फौज बऱ्हाणपूर येथील लुटीनें भारावलेली असल्यामुळें तिचा पार फडशा पडला, व थोडा वेळ पर्यंत माळवा प्रांत बादशहाच्या हातून गेला. परंतु तें वर्ष संपण्यापूर्वींच मोंगल सरदारांना चांगली कुमक मिळून त्यांनीं तो प्रदेश पुनः जिंकून घेतला. माळव्याचा थोडे दिवस अधिकार भोगिलेला अफगाण सरदार बरेच दिवस भटकत राहून शेवटीं अकबरास शरण आला, व त्यानें 'दुर्दैवाच्या वक्र दृष्टीपासून आपला बचाव करून घेतला.'[1] अकबरानें त्याला प्रथम एक हजाराची व पुढें लौकरच दोन हजारांची मनसब दिली. तो पुढें या नव्या मालकाच्या चाकरींतच मरण पावला. आपल्या शत्रूंना अगदींच निराश न करितां त्यांना थोडा बहुत मानमरातब, उत्पन्न व योग्यता वगैरे देऊन आपल्या पक्षास आणून मिळविण्याचें तत्त्व अकबरानें कसें एकसारखें अमलांत आणिलें होतें, हें वाचकांच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. सर्वांचें एकीकरण करण्याचा त्याचा विचार होता, म्हणून हतवीर्य झालेल्या लोकांशीं तो नेहमीं उदारपणानें वागे. शत्रूचें अवशिष्ट राहिलेलें सामर्थ्य आपल्या प्रतिस्पर्ध्याकडे न जाऊं देतां तें आपल्यालाच उपयोगीं पडावें अशी तो तजवीज करीत असे. त्याच्या हातून पराजित झाल्यानें किंवा त्याला शरण गेल्यानें आपली योग्यता कमी होण्याचा संभव नसून शेवटीं ती वृद्धिंगतच होईल, ही गोष्ट आपल्या प्रतिस्पर्ध्यांच्या ध्यानांत येईल अशा प्रकारचें तो अपलें वर्तन सदोदित ठेवीत असे. त्यानें रजपूत राजेरजवाड्यांशीं जें वर्तन केलें त्याचें वर्णन पुढें येणार आहे, त्यावरून त्याच्या या सामदामपद्धतीचें स्वरूप चांगलें लक्षांत येईल.

अकबराच्या कारकीर्दीच्या आठव्या वर्षीं एक फार दुःखकारक गोष्ट घडून आली, तिच्यामुळें अकबराला बराच खेद झाला. लहानपणापासून त्याचें पाळणपोषण करणाऱ्या व पुढें त्याच्या हितावे-

१ अवतरणचिन्हांतील शब्द हे एका बखरीच्या आधारानें घातले आहेत.

षयीं फार जपणाऱ्या त्याच्या जुन्या व वृद्ध दाईविषयीं वर उल्लेख आलाच आहे. बैरामखानाशीं त्यानें जें वर्तन केलें तें बहुतेक तिच्याच सल्लयाप्रमाणें केलें. त्या दाईला खासगींतून भरपूर नेमणूक होती, व अकबरानें तिच्या मुलांचीही उत्तम तजवीज केली होती. परंतु तिचा वडील मुलगा[1], ज्या लोकांना आपल्याहून कमी योग्यतेचे किंवा फार तर आपल्या बरोबरीचे मानीत असे, अशांना अकबरानें मोठ्या योग्यतेस चढविलेलें पाहून त्यांचा अतिशय हेवा करूं लागला; व त्याच्यासारख्याच स्वभावाच्या इतर लोकांच्या चिथावणीवरून त्यानें, अकबराच्या मुख्य वजिराला, तो कचेरींत काम करीत असतांना ठार मारिलें; आणि अकबरानें त्याच्या घराण्यावर व त्याजवर जी कृपादृष्टि ठेविली होती तिच्या भरंवशावर तो जनानखान्याच्या दाराशीं जाऊन उभा राहिला. पण अशा नराधमावर अशा नीच कृत्यासंबंधानें अकबर दया करणारा नव्हता. त्यानें स्वतः या मारेकऱ्याला छाटून टाकलें व त्याचें प्रेत तटावरून खालीं खंदकांत लोटून दिलें. या कामांत आपलें अंग आहे हें उघडकीस येईल या धास्तीनें त्या मुलाचे साथीदार यमुनापार पळून गेले. परंतु त्यांस पकडून परत आग्र्यास आणिलें. अखेर अकबरानें त्यांना क्षमा केली. यांतील मुख्य अपराध्याची आई, म्हणजे अकबराची दाई, पुढें पुत्राच्या दुर्वर्तनाच्या शोकानें चाळीसावे दिवशीं मरण पावली.

---

१ याचें नांव आधमखान होतें. त्याच्या बापाचें नांव माहीत नाहीं. अकबराची दाई माहम् आनगा इचा तो मुलगा होता. ही फार कारस्थानी व हुशार बाई होती. तिचें अकबराजवळ मोठें वजन असे. आधमखानास पांचहजारी मनसबदार केलें होतें. त्यानें मानकोटच्या वेढ्यांत चांगलें काम बजावलें. बैरामखानानें त्याला भदोरिया लोकांच्या बंदोबस्ताकरितां हतकांठ परगणा जाहगीर देऊन पाठविलें होतें. त्यानें त्या लोकांचा चांगला बंदोबस्त केला. हि० स० ९६० त त्याची पीरमहंमदखानाबरोबर माळव्याच्या मोहिमेवर नेमणूक झाली. त्यानें बाजबहादराचा सारंगपुरास पराभव करून त्याचा सर्व खजिना व स्त्रिया कबज्यांत घेतल्या, यामुळें त्याचें मस्तक फिरलें व त्यानें अकबराशीं उर्मटपणा चालविला. तेव्हां अकबरानें त्याला परत बोलाविलें. दरबारांत आल्यावर त्याच्या मनांत आटगाखान वजिराविषयीं हेवा उत्पन्न झाला, व त्यानें त्याला भरकचेरींत ठार मारलें. पुढची याची हकीकत वर आलीच आहे.

यापूर्वीं थोडे दिवस पंजाब प्रांताच्या कांहीं भागासंबंधानें अकबरास थोडीशी काळजी उत्पन्न झाली होती. तेथें गाखर नांवाचे दांडगे व त्रासदायक लोक रहात असत. त्यांनीं मोंगलांचा अंमल मनापासून मुळींच कबूल केला नव्हता, व त्या प्रांताची व्यवस्था लावण्यांसंबंधानें अकबरानें पाठविलेले हुकूम त्यांनीं गुंडाळून ठेवून त्याच्या सुभेदारास धाब्यावर बसविलें. त्या वेळीं गाखर लोक हल्लींप्रमाणेंच रावळपिंडी जिल्ह्याच्या ईशान्येकडील प्रदेशांत रहात असत. आपल्या हुकुमाची बजावणी होण्याकरितां अकबरानें तिकडे कांहीं फौज पाठविली. तिनें जातांच तेथील व्यवस्था लावून स्वस्थता केली.

गाखर लोकांचा सरदार कैद होऊन प्रतिबंधांत असतांच मरण पावला. याचप्रमाणें काबुलांत उपस्थित झालेले दंगेही अकबरानें मिटविले. तसेंच हुमायुनाच्या प्रीतींतील सरदार अबुल्मोआली यानें कांहीं कारस्थान उपस्थित केलें होतें तेंही तेव्हांच त्यानें मोडलें. अबुलमोआली यानें पूर्वीं अनेक वेळां अशीच उठावणी केली होती, पण अकबरानें त्याला वर तोंड काढूंच दिलें नाहीं. या वेळीं तो नुकताच मक्केच्या यात्रेहून परत आला होता, व त्यानें गर्वानें फुगून जाऊन दुसऱ्या एका बेदिल सरदाराशीं संगनमत केलें व बादशाही फौजेच्या एका टोळीवर नारनूळ येथें हल्ला करून तिचा नाश केला. अकबरानें त्याच्या पाठीवर फौज पाठविली, तेव्हां तो घाबरून काबुलास पळून गेला. तेथून त्यानें माफी मिळण्याकरितां दातीं तृण धरून अकबरास विनंतिपत्रें पाठविलीं. शेवटीं पुढील वर्षाच्या आरंभींच अबुलमोआली यास बदक्शान येथें कैद करून फांशीं दिलें.

अलाहाबादेच्या पूर्वेकडील प्रदेशांत आपला अमंल बसविण्याचा बेत सन १५६४ च्या अवलीपर्यंत अकबरानें अमलांत आणिला नव्हता. त्या वेळीं चुनारगड हा किल्ला त्या सर्व प्रदेशाचें नाकें समजत असत. हा किल्ला अदिल घराण्यांतील एका गुलामाच्या ताब्यांत होता. अकबराच्या एका सरदारानें त्यावर हल्ला करण्याचा घाट घालतांच, किल्ला आपण सोडण्यास तयार आहों असें त्यानें अकबरास पत्र लिहिलें. तेव्हां अकबरानें आपले दोन सरदार तिकडे पाठविले. त्यांनीं तो किल्ला आपल्या ताब्यांत घेतला.

चुनारचा किल्ला हातीं आल्यानें जवळच्या नरसिंगपूर प्रांतावर स्वारी करण्यास बादशहास सवड झाली. तेथें त्या वेळीं दुर्गावती[1] नामक राणी राज्य करीत असून तिची राजधानी चौरागड येथें होती. मोंगल सरदारांनीं तिच्यावर स्वारी केली, तेव्हां निकराची लढाई होऊन राणीचा पराभव झाला; आणि नरसिंगपूर व हल्लींच्या हुशंगाबाद जिल्ह्याचा बराच भाग बादशाही मुलखांत सामील झाला. त्याच वर्षाच्या उन्हाळ्यांत अकबर शिकारीच्या निमित्तानें मध्यप्रदेशाकडे जाण्यास निघाला; पण तितक्यांत एकदम जोराचा पावसाळा सुरू झाला; तेव्हां मोठ्या संकटानें तो पूर आलेल्या अनेक नद्या उतरून नरवरें[2] येथें पोहोंचला. त्या वेळीं तें शहर फार मोठें व भरभराटींत असून त्याचा परीघ दहा कोसांचा होता. त्याच्या आसपास बरेच दिवस हत्तींची शिकार खेळून अकबर माळव्याकडे गेला व राउ आणि सारंगपूर या गांवांवरून महूच्या नैर्ऋत्येस तेरा कोसांवर असलेल्या मांडव[3] नामक प्रसिद्ध शहराकडे चालता

१ दुर्गावती ही मध्य-हिंदुस्थानांत एक सुप्रसिद्ध शूर राणी होऊन गेली. गोंडवनांत तिचा कुलअधिकार होता, व तिच्या कारकीर्दीपर्यंत गोंडवन फारच संपन्न व भरभराटींत होतें. तिचा पति मरण पावला, व पुत्र बीरस हा लहान असतांना अकबराच्या सरदारांनीं गोंडवनावर स्वारी केली. राणी मोठ्या शौर्यानें व निकरानें लढली. अखेरीस ती व तिचा पुत्र मारला गेला, व तिचे १००० हत्ती व अगणित संपत्ति बादशहाच्या सरदारांनीं लुटून नेली. तेव्हांपासून गोंड राजांचें स्वतंत्र राज्य नष्ट झालें.

२ नरवर–नलपूर–हे शहर हल्लीं शिंदे सरकारच्या अमलांत आहे. तेथें एक मजबूत किल्ला आहे. ग्वाल्हेरपासून दक्षिणेकडे सुमारें २० कोसांवर हें शहर आहे. येथें प्राचीन काळापासून कच्छवाह रजपूत राजांचें राज्य होतें. ते राजे जयपूरच्या राजघराण्यापैकीं वडील शाखेंतील होते. नेथें पुराणप्रसिद्ध नळराजाची गादी आहे. कच्छवाहांचें राज्य प्रथम लोदी घराण्यांतील बादशहांच्या वेळीं बहुतेक बुडालें होतें. मोंगल बादशहांच्या अमलांतही तें लुप्तप्रायच झालें होतें. पुढील गडबडींत या कुळांतील राजांनीं पुनः नरवरावर आपला अंमल बसविला. पण अखेरीस शिंद्याच्या अंमलदारींत त्यांचा पाय नरवराहून अगदीं उठला. हल्लीं या राजांचा वंशज, राजा मानसिंगाचा पुत्र राजा गजेंद्रसिंग, हा ग्वाल्हेर इलाख्यांतील पाडोण या टप्प्याचा छोटासा राजा किंवा जहागीरदार आहे.

३ मांडू किंवा मांडव हें प्राचीन पण हल्लीं नामशेष झालेलें शहर धारेपासून सुमारें ६ कोसांवर विंध्याद्रीच्या कडेवर आहे. ही पूर्वीं माळव्याच्या

झाला. तेथील सुभ्यावर त्यानें एक उजबक जातीचा सुभेदार नेमला होता. आपल्यावर बादशहा नाखुष असून त्या गोष्टीस पुष्कळ सबळ कारणें आहेत हें त्या सरदाराला माहीत असल्यामुळें, बादशहाकडून जरी त्यास उमेद वाटण्यासारखा निरोप आला होता, तरी त्यावर भरंवसा न ठेवतां, अकबर जवळ येतांच तो शहरांतून बाहेर पडून आपल्या फौजेनिशीं युद्धास सिद्ध झाला. अकबरानें त्याचा गुजराथेपर्यंत पाठलाग केला, व त्याचे हत्ती, घोडे, व जनानखाना धरून आणिला.

मांडव येथें अकबराचें उत्तम प्रकारें स्वागत झालें, व त्यापासून त्याला फार समाधान वाटलें. आसपासच्या प्रदेशांतील सर्व जमीनदार त्याला मुजरा करण्याकरितां हजर झाले. तेथून दूर असलेल्या खानदेशच्या अधिकाऱ्यानें देखील त्याचे अभिनंदनार्थ त्याजकडे वकील पाठविला. अकबरानें त्या वकिलाची बहुमानपूर्वक भेट घेतली व त्याला निरोप देतांना त्याच्या यजमानाच्या नांवानें एक फरमान लिहून त्याच्या स्वाधीन केली. त्यांत बादशाही जनानखान्यांत पाठविण्यास योग्य अशा आपल्या एखाद्या कन्येस मांडव येथें पाठवावें असें लिहिलें होतें. ही त्या वेळची चमत्कारिक चाल लक्षांत ठेवण्यासारखी आहे. या संबंधानें एक तत्कालीन इतिहासकार असें लिहितो कीं, खानदेशचा अधिकारी मुबारिकशहा यास ही बहुमानाची फरमान आल्यानें मोठा आनंद वाटला, व त्यानें नोकरचाकर व योग्य लवाजमा बरोबर देऊन मोठ्या थाटानें आपल्या मुलीस बादशहाकडे पाठविलें; व ह्या गोष्टीचें त्याला मोठें भूषण वाटलें. मांडव येथें थोडे दिवस राहून अकबर हा उज्जनी, सारंगपूर, सिप्री, नरवर व ग्वाल्हेर, या मार्गानें आग्र्यास परत आला. पुढील हिंवाळ्यांत त्यानें ग्वाल्हेर प्रांतांत शिकार करण्यांत बरेच दिवस घालविले.

हिंदुस्थानांत येणाऱ्या युरोपियन प्रवाशांपैकीं ज्यांनीं म्हणून आग्र्याचा लाल दगडांचा सुंदर किल्ला पाहिला असेल, त्यांना त्याचें आश्चर्य

---

मुसलमान राजांची राजधानी होती. येथील किल्ल्यांत त्या वेळच्या बऱ्याच भव्य व सुरेख पण मोडकळीस आलेल्या अनेक इमारती आहेत. हल्लीं मांडव हें धार संस्थानचे ताब्यांत आहे.

वाटल्यावांचून खचित राहिलें नसेल. अकबर गादीवर बसला त्या वेळीं या जागीं एक लहानशी तुटकीफुटकी व विटांनीं बांधलेली ओबडधोबड गढी होती. त्या जागीं बादशाहीस योग्य असा भव्य व मजबूत किल्ला बांधण्याचा अकबरानें निश्चय केला. त्याप्रमाणें इ० स० १५६८ च्या सुमारास वसंत ऋतूच्या अखेरीस त्यानें त्याचा नकाशा खास करून त्या बाबतींत जरूर ते हुकूम सोडले. तें काम कासीमखान नांवाच्या एका प्रसिद्ध व हुशार सरदाराच्या देखरेखीखालीं चाललें होतें. अकबरानें त्याला नुकतीच तीनहजारी मनसब दिली होती. किल्ल्याचें काम पुरें होण्यास आठ वर्षें लागलीं, व ३५ लक्ष रुपये खर्च आला. त्याचा पाया पाणी लागेपर्यंत खोल खणला होता. हा किल्ला लाल दगडांचा बांधला आहे, हें वर सांगितलेंच आहे. याची जुडाई फार चांगली आहे, व प्रत्येक जोडांत लोखंडी कड्या किंवा पाऊ लावले आहेत.

एकाएकीं कसाही कठीण प्रसंग आला तरी आपला दृढ निश्चय व दक्षता हीं ढळूं द्यावयाचीं नाहींत हा जो अकबराचा अंगस्वभाव होता, तो प्रकट होण्याची संधी ह्या वर्षाच्या अखेरीच्या आंतच आली. तो मांडव येथें गेला त्या वेळीं तेथील किल्लेदारानें बंड केल्यावरून अकबरानें त्याच्यामागें फौज लावून त्याचें पारिपत्य केल्याचें वर लिहिलेंच आहे. त्या बंडखोराशीं त्याचें हें वर्तन मोठें कडकपणाचें होतें असें नाहीं; तरी, त्यामुळें इतर सर्व उजबक सरदारांच्या मनांत, आपल्यावर बादशहाची इतराजी झाली आहे असें आलें; व त्यांतील तिघांचौघांनीं एकत्र होऊन त्याला चांगला हात दाखविण्याचा निश्चय केला. पावसाळ्यांत जोनपूर येथें या बंडाचा प्रथम प्रादुर्भाव झाला. तेथील उजबक अंमलदार या बंडवाल्यांस सामील होता. अकबर नरवरच्या जंगलांत शिकार करीत असतांना त्याला हें वर्तमान कळलें.

वरील वर्तमान कळल्य बरोबर अकबरानें आपल्या एका मोठ्या शूर व खालीच्या सरदारास, त्या वेळीं मिळाली तितकी फौज बरोबर देऊन तावडतोब त्या प्रदेशांतल्या आपल्या सरदारांच्या मदतीस पाठविलें; व दुसरी फौज जमा करून मागून स्वतः तेथें जाण्याची तयारी

त्यानें चालविली. पुढें दहा दिवसांनीं तो कनोज येथें पोहोंचला. तेथें बंडखोरांपैकीं एक सरदार त्यास शरण आला. मग नदीचा पूर उतरण्याची वाट पहात तो दहा दिवस तेथें राहिला. बंडखोरांचा मुख्य सरदार लखनौकडे गेल्याची खबर लागल्यावरून, त्यानें थोडयाशा निवडक लोकांनिशीं त्याचा पाठलाग केला; व सारखी अहोरात्र दौड करून तो पहाटेस त्या शहराजवळ पोहोंचला. त्याला पहातांच बंडवाल्यांची धांदल होऊन ते पळून गेले. अकबराच्या बरोबरचे स्वार व घोडे थकले असल्यामुळें त्यांना त्यांचा फारसा पाठलाग करवला नाहीं. बंडवाल्यांचा मुख्य सरदार जलदीनें परत जोनपूर येथें आपल्या इतर साथीदारांस जाऊन मिळाला; व ते सर्व नरहनच्या उतारानें घोग्रा नदीपार होऊन तेथून वीस कोसांवर चपडा येथें तळ देऊन राहिले. तेथून त्यांनीं बंगाल्याच्या राजाकडे मदत मागितली.

इकडे रक्तस्राव न होतां या बंडाचा मोड करूं इच्छिणाऱ्या अकबराच्या एका सरदाराची फौज बंडवाल्यांच्या तोंडावर पोहोंचली होती, व दुसरी एका तडफदार व करारी सरदाराची फौज राजपुतान्याकडून येत होती. पहिल्या सरदारानें सामदामाचें बोलणें चालविलें होतें, तें बहुतेक संपत आलें होतें. इतक्यांत तो दुसरा सरदार तेथें येऊन दाखल झाला. त्यानें, ही केवळ लबाडी आहे असें स्पष्ट बोलून दाखविलें, व लढाईचा निश्चय केला. पुढें लढाई झाली, तींत बादशाही फौजेचा पराभव झाला. ती फौज दुसरे दिवशीं पुनः शेरगड येथें एकत्र झाली.

ही लढाई होण्यापूर्वींच अकबरानें बंडवाल्यांशीं पूर्वीं चालू असलेलें तहाचें बोलणें मंजूर केलें होतें. त्यांना वर सांगितलेला जय मिळाला तरी अकबर आपल्या निश्चयापासून ढळला नाहीं. त्यांना मीं क्षमा केली आहे, असें म्हणून त्यानें आपले सरदार परत बोलाविले. नंतर चुनारगडाची दागदुजी करून मजबुती करणें; मिरजापूरच्या जंगलांत हत्तींची शिकार करणें; व आपण ज्या बंडखोर सरदारांस क्षमा केली, पण जे अद्याप हत्यारबंद आहेत ते आपलें वर्तन पुढें कसें काय ठेवितात हें पहाणें, इतके हेतु मनांत धरून

तो चुनारगडागडे चालता झाला. पण हें ठीक झालें नाहीं. कारण बंडवाले आपला जय झाल्यामुळें चढून गेले होते; सबब त्यांनीं पुनः धुमाकूळ चालविला. अकबरानें आपल्या फौजेची व्यवस्थित रीतीनें वांटणी करून अखेरीस त्यांचा पाडाव करून त्यांस शरण यावयास लाविलें, व पुनः त्यांच्यावर कृपादृष्टि केली. याच वर्षी बादशाही फौजेनें बहार प्रांतांतील रोहटास किल्ला घेतला; व ओरिसाच्या राजाकडे वकील पाठविलेले होते ते तिकडून पुष्कळ मौल्यवान् नजराणे घेऊन परत आले.

इ० स० १५६६ च्या आरंभींच बादशहा आग्र्यास परत आला. स्वस्थतेच्या वेळीं तो रोज संध्याकाळीं चौगान किंवा गेंद ब्रोथाटी खेळत असे, असें एतद्देशीय ग्रंथकार लिहितात. चौगान व पोलो हे खेळ एकच. पोलो खेळ हिंदुस्थानांतूनच युरोपांत गेला. हा खेळ तिनीसांजा खेळण्याचा हल्लीं सर्वत्र परिपाठ आहे, तसाच अकबरही खेळत असे. पण शिवाय, इकडे तिनीसांजा एकदम अंधार पडतो, तशा वेळीं व रात्रीच्या वेळींही हा खेळ खेळण्याची त्यानें एक युक्ति काढली होती. ती अशी कीं, पळसाच्या लांकडाचे गोळे तयार करून ते पेटवून त्यांनीं खेळावयाचें. हे गोळे फार वेळ जळतात व चांगले टिकतात. अकबर या खेळांत फारच पटाईत होता, अशी ख्याति आहे.

परंतु इकडे लाहोर व काबूल येथें बंडें होऊन बंडवाले लोकांना जय मिळाल्याचें वर्तमान बादशहास समजलें, तेव्हां त्याला हे आरामाचे खेळ सोडून देऊन बाहेर पडावें लागलें. त्या वर्षाच्या अखेरीस तो ताबडतोब सतलजकडे जाण्यास निघाला, व दहा दिवसांत दिल्लीस दाखल झाला. पुढें तो सरहिंद व लाहोर येथें मोठ्या मजेनें गेला. तेथून त्यानें आपले सरदार बंडवाल्यांच्या मागें लावून त्यांस सिंधु नदीच्या पार हांकून दिलें. याच सुमारास काबुलांतीलही गडबड मोडली होती. परंतु इकडे बादशहा दूर गेलेला पाहून जोनपुरास लोकांनीं पुनः बंड केलें. या सर्व गोष्टींवरून, हिंदुस्थानांत चिरस्थायी राज्य कसें स्थापन करावें या महत्त्वाच्या प्रश्नाचा अद्यापि ( इ० स० १५६६ अखेरपर्यंत ) अकबराला निकाल

करितां आला नव्हता हें खास आहे. पाणिपतच्या लढाईपासून आजपर्यंत पाहिलें तर त्याला गादीवर बसून अकरावें वर्ष संपत आलें होतें. या अवसरांत त्याच्या राज्यरूपी वृक्षाच्या मुळ्या ह्या भरतभूमींत इतक्या थोड्या खोल गेल्या होत्या कीं, कदाचित् त्याच वेळीं त्याचें कांहीं कमजास्त झालें असतें तर मागें गादीकरितां खास मारामाऱ्याच झाल्या असत्या! इ० स० १५६७ च्या आरंभापर्यंत तो लाहोरासच शिकार व चैन करीत बसला होता. पण आपण क्षमा केलेल्या उजबक सरदारांनीं, आपण दूर आहों असें पाहून पुनः बंड केल्याचें वर्तमान ऐकल्याबरोबर तो शुद्धीवर आला, व ता० २२ मार्च रोजीं आग्रयास येण्यास निघाला. वाटेनें सरहिंद प्रांतांत ठाणेश्वर[1] येथें त्याचा मुक्काम पडला असतां तेथें जमलेल्या यात्रेकरूंनीं तेथील देवास अर्पण करण्याकरितां आणलेले मौल्यवान् अलंकार व वस्त्राभरणें यांच्या मालकीविषयीं जोगी व संन्यासी यांचा जो झगडा लागलेला होता तो पाहून त्याला मोठा चमत्कार व कौतुक वाटलें. त्याच्या राज्याच्या अस्थिरत्वाची द्योतक अशी दुसरी एक गोष्ट दिल्ली येथें त्याच्या नजरेस आली. ती ही कीं, तेथें असलेला एक राजकीय कैदी किल्लेदाराचा डोळा चुकवून पळून गेला; तेव्हां बादशहाची आपल्यावर इतराजी होईल या भीतीनें तेथील किल्लेदारानें तें शहर सोडून जाऊन बंड केलें होतें !

तो आग्रयास पोहोंचला तेव्हां तेथें तरी त्याला समाधानकारक वर्तमान कळलें असें नाहीं. कनोजच्या आसपास बंडावा माजला असून त्याच्या कित्येक सरदारांच्या इमानीपणाविषयीं त्याला वेभरंवसा वाटूं लागला. तो भोजपूर व रायबरेली येथें गेला असतां तेथें बंडवाले

१ ठाणेश्वर हें एक प्राचीन व पुराणप्रसिद्ध क्षेत्र आहे. तें दिल्लीच्या वायव्येस सुमारें ८० कोसांवर आहे. सर्व हिंदु लोक प्राचीन काळापासून तेथें यात्रेकरितां जात असून आपापल्या शक्तीप्रमाणें देवास द्रव्य अर्पण करणें हें आपलें कर्तव्यकर्म समजत असल्यानें त्या देवालयांत अगणित संपत्ति जमा झाली होती. हिंदुस्थानावर ज्या ज्या मुसलमानांनीं स्वाऱ्या केल्या, त्यांनीं होईल तथवर या प्रसिद्ध देवालयावर हल्ला करून तेथें लूट व नासधूस करण्यास कमी केलें नाहीं. महंमद गजनवी यानें एका स्वारीन हें प्रसिद्ध क्षेत्र लुटून धुळीस मिळविलें. हल्लींही तेथें दरसाल पुष्कळ यात्रा जमत असते.

लोक गंगा उतरून काल्पीवर जात असल्याचें वर्तमान त्याला कळलें. त्या वेळीं अतिशय पाऊस पडून सर्व प्रदेश जलमय झाला होता, तरी लढाईविषयीं उत्सुक होऊन तावडतोब अकबरानें आपली बहुतेक फौज कडा येथें पाठविली; व तो स्वतः कांहीं निवडक फौजेनिशीं प्रतापगड व अलाहाबाद यांच्या दरम्यान माणिकपुराकडे गेला. तेथें तो हत्तीवरून गंगापार उतरला, व झपाट्यानें दौड करून त्यानें बंडवाल्यांस गांठलें, आणि त्यांचा पूर्ण पराजय केला. बंडांतील मुख्य मुख्य सरदार लढाईंत किंवा लढाईनंतर मारले गेले. असो. तेथून अकबर अलाहाबादेस गेला, व पुढें बनारस व जोनपूर येथें गेला; आणि त्या प्रदेशाची व्यवस्था लावून तो आग्र्यास परत आला.

पूर्वेकडील प्रदेशांत स्वस्थता आहे असें पाहून अकबरानें राजपुतान्याकडे आपला मोर्चा फिरविला. त्या विस्तृत व प्रसिद्ध अशा पश्चिम-हिंदुस्थानांतील राज्यांत मेवाडचें संस्थान अत्यंत प्राचीन व श्रेष्ठ होतें. तेथील राणा उदेसिंग हा मोठा दुराग्रही असून क्षणिक बुद्धीचा होता. त्याची मुख्य राजधानी व बंदोबस्ताचें ठाणें चितोडचा किल्ला हें होतें. तो किल्ला पूर्वी एक वेळ (इ० स० १३०३ त) अल्लाउद्दीन खिलजी यानें घेतला होता. तरी तो अभेद्य आहे अशी त्याची पुनः ख्याति होऊन गेलेली होती. तो किल्ला बनास नदीच्या किनाऱ्यावर उंच व लांबट अशा एका पहाडावर असून त्याचा बाहेरील कोट त्या पहाडाच्या कडेकडेवर बांधलेला आहे. त्याच्या संरक्षणाकरितां सुमारें सात हजार शूर रजपूत शिपाई असून त्यांच्यावरचा किल्लेदार फारच शूर व इमानी होता. त्या किल्ल्यांत धान्यादिकांची सामुग्री भरपूर असून पाणीही विपुल होतें, व वेढा पडला असतां पुष्कळ दिवसपर्यंत तो टिकाव धरण्यासारखा होता.

अकबर स्वतः त्या किल्ल्याला वेढा घालून बसला, व त्यानें आपले सरदार फौज देऊन आसपासचा प्रदेश काबीज करण्याकरितां पाठविले. राणा उदेसिंग जयप्राप्तीविषयीं निराश होऊन आधींच जंगलांत पळून गेला होता. इकडे किल्ल्याच्या वेढ्याचें काम जसजसें नेटानें चाललें, तसतसें आंतील लोक अधिकाधिक निकरानें व धैर्यानें

लढूं लागले. अशा तऱ्हेच्या दांडग्या व शूर योद्ध्यांशीं अकबराची पू कधींच गांठ पडली नव्हती. त्यांचा निश्चय व त्याबरोबरच अकबराचा अभिमान व ईर्षा हीं अधिकाधिक वाढत चाललीं. शेवटीं किल्ल्याच्या तटास खिंडार पडल्याचें कळलें, तेव्हां मार्च महिन्यांत एके दिवशीं रात्रीं अकबरानें नेटानें हल्ला करण्यास हुकूम दिला. त्याला बसण्याकरितां एक उंच जागा तयार केली होती, तेथें हातांत बंदूक घेऊन तो हल्ल्याची व्यवस्था पहात व कमजास्ती हुकूम देत बसला होता. इतक्यांत आंतील शूर रजपूत शिपाई आपल्यावरील पराक्रमी किल्लेदाराच्या देखरेखीखालीं हल्ला करणाऱ्या लोकांचा चांगला समाचार घेण्यास तयार होऊन त्या खिंडाराशीं जमत होते, ते अकबरानें पाहिले. तें खिंडार तो बसला होता त्या ठिकाणाच्या समोरच असून फारसें दूर नव्हतें. दोहोंच्यामध्यें फक्त नदी होती.

मशालीच्या उजेडानें अकबरानें रजपूत किल्लेदारास तेव्हांच ओळखिलें, व तो गोळीच्या टप्प्यांत आहे असें पाहून त्यानें बंदूक झाडली. त्याबरोबर तो ठार झाला. दोन्ही पक्षांचे लोक ईर्षेनें जवळ जवळ येत चालले होते. तोंच अकबराच्या[1] सुदैवानें, त्याच्या बंदुकीच्या गोळीचा जो परिणाम झाला याच्या योगानें रजपूत लोकांचा हिंम्या खचला, व त्या ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं त्यांना टिकाव धरवेना. त्यांनीं थोडेंसें शौर्य दाखविलें, परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. त्यांनीं आपल्याकडून पुष्कळ शिकस्त केली, तरी एकदां बिघडलेली गोष्ट पुनः सुधारली नाहीं. सूर्योदयाबरोबरच चितोडगड अकबराच्या कबज्यांत आला. जय मिळाला तर आपण ख्वाजामोइनुद्दीन चीस्ती सिजिस्तानी याच्या दरग्याची पायीं यात्रा करूं, असा अकबरानें हा वेढा घालण्यापूर्वीं नवस केला होता. तो नवस जय मिळतांच त्यानें फेडला. हा दरगा अजमिराशेजारच्या टेंकडीवर आहे. वरील गोष्टीवरून अकबराच्या मनावर लहानपणच्या शिक्षणाचे जे परिणाम झाले

---

१ हा एक प्रसिद्ध फकीर व अवलिया होऊन गेला. याचा दरगा अजमीर येथ असून दरसाल हजारों हिंदु व मुसलमान लोक तेथें दर्शनास जातात. अकबर त्याला फार मानीत असे.

होते ते अद्यापि नाहींसे झाले नव्हते हें उघड आहे. असो. अजमिरास दहा दिवस राहून तेथून मेवाडच्या रस्त्यानें अकबर आग्र्यास परत आला.

उन्हाळा व पावसाळाभर अकबर आग्र्यास राहिला. पुढें त्यानें जयपूरच्या राज्यांतील रणथंभोरचा किल्ला घेण्याचा बेत चालविला. पण या कामाकरितां त्यानें पाठविलेली फौज मार्गांतच होती, इतक्यांत गुजराथेकडे गडबड झाल्याचें व तिकडील राजांनीं मध्य-हिंदुस्थानावर स्वारी केल्याचें वर्तमान त्याला समजलें. तेव्हां त्यानें तीच फौज तिकडे पाठविली, व दुसरी एक फौज तयार करून त्यानें स्वतः रणथंभोरवर जाण्याचा निश्चय केला. त्याप्रमाणें तो पुढील वर्षी ह्मणजे १५६९ त तिकडे गेला. तो किल्ला हातीं येतांच तो आग्र्यास परत आला. वाटेंत तो पुनः अजमिरास आठ दिवस राहिला, व तेथें त्यानें फिरून वर सांगितलेल्या दर्ग्याची यात्रा केली.

याच वर्षी त्यानें फतेपूर-शिक्री या शहराची स्थापना केली. हल्लीं या ठिकाणीं बहुतेक पडलेल्या व बऱ्याच कायम अशा ज्या भव्य व सुंदर इमारती आहेत, त्या पाहून कोणासही आश्चर्य वाटल्या-वांचून रहाणार नाहीं. याविषयींची हकीकत 'तबकाते'च्या कर्त्यानें[1] दिली आहे. ती अशी : अकबराला दोन जुळे मुलगे झाले होते. ते दोन्ही मरण पावले. तेव्हां आग्र्याच्या नैर्ऋत्येस अकरा कोसांवर शिक्री येथें शेखसलीम चीस्ती नांवाचा फकीर रहात होता त्यानें, पुनः मुलगा होईल तो चिरायु होईल, असा अकबराला अशीर्वाद दिला होता. हा अशीर्वाद सफल व्हावा या आशेनें रणथंभोरच्या स्वारीतून परत आल्यावर अकबर पुष्कळ वेळां त्या महात्म्याच्या दर्शनास गेला. त्याच्याजवळ तो दहा दहा वीस वीस दिवस सेवेला रहात असे. पुढें त्यानें तेथील जवळच्या टेंकडीवर स्वतःकरितां एक नवीन राजमहाल बांधला, व शेखसलीमानें आपल्याकरितां एक नवा मद्रसा व सुंदर तकिया बांधण्यास सुरुवात केली. हें पाहून दरबारी लोकांनींही चढाओढीनें तेथें वाडे बांधण्यास आरंभ केला. वर सांगितलेल्या राज-

१ 'तबकातइअकबरी' या नांवाचा एक मुसलमानी इतिहास आहे. त्यांत मोंगल बादशहांच्या कारकीर्दीचें चांगलें वर्णन केलेलें आहे.

महालाचें काम चाललें असतां अकबराची एक राणी, गरोदर राहिली. तिला त्यानें त्या फकीराच्या घरीं नेऊन ठेविलें. पुढें थोड्या दिवसांनीं त्यानें गुजराथचें राज्य जिंकून घेतलें,व त्यावरून आपल्या या आवडत्या गांवास त्यानें फत्तेपूर (जयाचें शहर) असें टोपण नांव दिलें. तेव्हांपासून तें ठिकाण फतेपूर शिक्री या नांवानें प्रसिद्ध आहे. त्याच वर्षाच्या अखेरीस त्याची राणी त्या फकीराच्या घरीं प्रसूत होऊन तिला मुलगा झाला. त्याचें नांव त्या फकीरावरून सलीम असें ठेविलें. हाच पुढें इतिहासांत जहांगीर बादशहा म्हणून प्रसिद्ध झाला. त्याची आई जोधपूरची रजपूत राजकन्या होती. या गोष्टीचें स्मारक म्हणून, अकबरानें फतेपूर-शिक्री हें आपलें एक राजधानीचें ठिकाण केलें. त्याच्या आसपास त्यानें तटबंदी केली, व तेथें कित्येक सुंदर व भव्य इमारती बांधल्या. पुढें अजमीरच्या पहाडावरील दरग्याची फिरून एकवार पायीं यात्रा करून तो दिल्लीस निघून गेला.

पुढील वर्षाच्या आरंभीं अकबर राजपुतान्यांत जाण्यास निघाला. तो जोधपूरच्या राज्यांतील नागोर गांवीं उतरला असतां तेथें जोधपूरच्या राजाचा पुत्र व बिकानेरचा राजा व त्याचा पुत्र हे त्याच्या भेटीस आले, व त्यांनीं त्याची ताबेदारी कबूल केली. त्या वेळीं जोधपूरचें राज्य हें राजपुतान्यांत अतिशय बलिष्ठ व प्रतिष्ठित ह्मणून गणलें जात असे. असो. बिकानेरच्या राजाच्या स्वामिभक्तीनें आपण संतुष्ट झालों हें दाखविण्याकरितां बादशहानें त्याच्या एका कन्येशीं लग्न केलें. नंतर कांहीं काळपर्यंत तो नागोर येथें स्वस्थपणें रानगाढवांची शिकार करीत राहिला. ती त्या वेळीं तिकडे पुष्कळच सांपडत असे. अकबर तेथून पंजाबांत देपाळपुराकडे गेला. तेथें एक मोठा थोरला दरबार भरवून तो दुसऱ्या वर्षाच्या आरंभीं लाहोरास चालता झाला. पंजाबांतील सर्व व्यवस्था लावून पुढील सालीं गुजराथ देश काबीज करण्याच्या इराद्यानें तो फत्तेपूर-शिक्री येथें परत आला.

अकबराच्या वेळीं गुजराथ देशांत सुरत, भडोच, खेडा, अमदाबाद, हल्लींचें बहुतेक बडोद्याचें राज्य, महीकांठा व रेवाकांठा-एजन्सीच्या हद्दींतील सर्व प्रदेश, पंचमहाल, पालनपूर, राधनपूर, बालिसना, खबायत, खानदेश व काठेवाडचें विस्तीर्ण द्वीपकल्प

या सर्वांचा समावेश होत असे. या सर्व प्रदेशावर अलीकडे बराच काळपर्यंत कोणी एक धनी ह्मणून नव्हता. त्याचे निरनिराळे विभाग, तेथील लोकांना केवळ परकी असे निरनिराळे मुसलमान अंमलदार बळकावून बसले होते. तेथें नेहमीं आपसांत लढाया व दंगे चालत असत. जो तो अंमलदार आपलें वर्चस्व स्थापण्याचें साधन प्राप्त होण्याकरितां गरीब शेतकऱ्यांना पिळून काढीत असे. केव्हां केव्हां जवळच्या एखाद्या प्रदेशाची विपन्न स्थिति पाहून आसपासच्या राजेरजवाड्यांस चेव येई, व ते एकत्र होऊन त्यावर हल्ले करीत. या सर्व कारणांमुळें गुजराथ देश त्या वेळीं अंदाधुंदीचें केवळ माहेरघर बनलें होतें. लोक जुलूमजबरदस्तीमुळें त्रस्त झाले होते, व छोटे छोटे जुलमी राजेरजवाडे दुसऱ्याचा नाश करून स्वार्थ साधण्यास झटत होते. या सर्व अव्यवस्थेचा परिणाम अकबराला फार दिवसांपासून पक्का समजून आला होता. ह्मणून आतां त्यानें याचा पुरा बंदोबत करण्याचा निश्चय केला.

अकबराच्या सर्व कारकीर्दींत त्याच्या गुजराथेवरील स्वारीच्या पराक्रमाचा फार लौकिक आहे. या स्वारीच्या व्यवस्थेंत किंवा ती कडेस लावण्यांत अगदीं गफलत म्हणून होऊं द्यावयाची नाहीं असा अकबरानें निश्चय केला होता. ही स्वारी चालू असेपर्यंत आपल्या पदरचे सरदार व मांडलिक राजे आपल्याशीं इमानेंइतबारें वागतील असा भरंवसा, हिंदुस्थानाच्या बऱ्याच भागाचा अंमल अकबराच्या हातीं आल्यापासून आतांच काय तो त्याला आला होता. इ०स० १५७२ च्या सप्टेंबर महिन्यांत तो आपली फौज घेऊन फत्तेपूर-शिक्रीहून निघाला, व जयपूरच्या दक्षिणेस दहा कोसांवर संगनेर गांव आहे त्या मार्गानें आक्टोबर महिन्याच्या १९ व्या तारखेच्या सुमारास अजमिरास पोहोंचला. तेथें पूर्वीं सांगितलेल्या दरग्याच्या यात्रेकरितां तो दोन दिवस राहिला. नंतर त्यानें दहा हजार लोक टेहळणीकरितां पुढें पाठवून बाकीच्या फौजेसुद्धां तो नागोरास गेला. नागोर हें जोधपुरापासून ईशान्येस सुमारें अडतीस कोसांवर आहे. तेथें त्याला दुसरा एक पुत्र—जो पुढें दानियल या नांवानें प्रसिद्ध झाला—तो जन्मल्याचें आनंदाचें वर्तमान कळलें. तेथें चौदा दिवस मुक्काम करून त्यानें फौजेच्या

रसदेचा व सामानसुमानाचा बंदोबस्त केला. नंतर नोव्हेंबर महिन्यांत तो **सरस्वती** नदीच्या तीरावर **पाटण** ह्मणून गांव आहे तेथें पोहोंचला, व पुढील महिन्याच्या आरंभास **अमदाबाद** येथे दाखल झाला. मध्यंतरीं **गुजराथे**चा बहुतेक नामशेष झालेला राजा—जो आपणास सर्व **गुजराथ**चा मालक म्हणवीत असे—तो त्याला शरण आला. **अमदाबाद** हें शहर या वेळीं सर्व **गुजराथें**त पहिल्या प्रतीचें गणलें जात असे. तेथें **अकबर** पोहोंचल्यावर ता सर्व **पश्चिम-हिंदुस्था**नचा बादशहा झाल्याची द्वाही फिरविण्यांत आली.

**गुजराथें**तील कित्येक लहान लहान राजेरजवाड्यांना आपला अधिकार दुसऱ्याच्या हातीं जाऊं देणें आवडलें नाहीं. या सर्वांचा समाचार घेण्याचें काम अद्यापि शिल्लक राहिलें होतें. त्यांत **सुरत**, **बडोदें**, व **भडोच** येथील राजे मुख्य होते. **अमदाबादे**स राहून जें काय मुलखाच्या बंदोबस्ताचें काम करावयाचें होतें तें **अकबरा**नें संपविल्यानंतर तो **खंबायते**स जाण्यास निघाला. तेथें तो पांच दिवसांत पोहोंचला. त्यास जन्मापासून समुद्रदर्शन प्रथम या वेळीं घडलें, असें इतिहासकारांचें म्हणणें आहे. सुमारें आठवडाभर तेथें राहून तो दोन दिवसांत **बडोद्या**स गेला. त्या ठिकाणीं त्यानें त्या प्रांताच्या बंदोबस्ताची सर्व व्यवस्था लाविली, व **अमदाबाद** शहर **गुजराथ**ची राजधानी ठरवून, आपल्याबरोबरच्या **आग्र्याहून** आलेल्या सरदारांपैकीं एकास तेथील सुभेदार नेमिलें. तेथूनच **सुरत** व **भडोच** घेण्याकरितां त्यानें फौजा पाठविल्या. **भडोच**चा नबाब, त्या शहरांतील **मोंगलां**च्या तर्फेच्या मुख्य सरदाराला ठार मारून, बरोबरच्या लोकांनिशीं **बडोद्या**पासून आठ कोसांच्या टप्प्यांतून घांटावर निघून गेल्याचें वर्तमान बादशाहास कळलें. तेव्हां जवळच्या थोड्याशा लोकांसह त्यानें त्याचा पाठलाग केला. दुसरे दिवशीं रात्रीं तो, शत्रूची छावणी **सारस** येथें एका लहानशा नदीच्या पार होती तेथें पोहोंचला.

त्या वेळीं त्याच्याजवळ फक्त चाळीस स्वार होते. नदीला उतारच होता. मागें राहिलेले साठ स्वार मदतीला येततोंपर्यंत तो छपून राहिला. ते रात्रीं येऊन पोहोंचले. या केवळ शंभर स्वारांनिशीं, दसपटीनें अधिक अशा शत्रूच्या सैन्यावर हल्ला करण्याकरितां उजाडतांच **अकबर**

नदी उतरून पलीकडे गेला. बंडवाला सरदार गांवांतच हल्ल्याची वाट पहात न राहतां, आपले लोक पुष्कळ आहेत त्यांस लढण्याला चांगली संधी मिळावी ह्मणून उघड मैदानांत आला. अकबर पहिल्याच तडाक्यास गांव घेऊन तसाच शत्रूचा पाठलाग करीत पुढें चालला. गांवाबाहेर चोहींकडे गल्ल्या होत्या, व त्यांच्या बाजूंस निवडुंगाचीं कुंपणें होतीं. यामुळें अकबराच्या स्वारांस मागें हटावें लागून ते एका गल्लींत कोंडले गेले. ती गल्ली फक्त तिघांस मात्र एका ओळींत उभें राहून लढतां येण्याइतकी रुंद होती. शत्रूचे लोक कुंपणाच्या दोन्ही बाजूंस होते. बादशहा आपल्या स्वारांच्या अघाडीस होता. त्याच्या एका बाजूस जयपूरचा शूर राजा भगवानदास—ज्याच्या बहिणीशीं अकबरानें लग्न केलें होतें—तो होता; व दुसऱ्या बाजूस त्या राजाचा पुतण्या—जो पुढें त्याच्या मागून गादीवर बसला—तो होता. हा त्या राजाचा पुतण्या म्हणजे तत्कालीन अत्यंत शूर योद्ध्यांत ज्याची गणना होत असे असा राजा मानसिंग हा होय. हे तिघेही त्या वेळीं अत्यंत संकटांत पडले. त्यांच्यावर तुटून पडण्याविषयीं शत्रूनें अतिशय प्रयत्न चालविला होता; पण ज्या निवडुंगाच्या कुंपणांमुळें अकबराच्या स्वारांस चांगली ओळ बांधतां येत नव्हती, त्याच कुंपणांनीं या वेळीं त्यांचा बचाव झाला; कारण शत्रूंना त्यांतून त्यांजवर चाल करितां येईना. इकडे भगवानदासानें आपल्यासमोरच्या प्रतिपक्षाच्या मुख्य योद्ध्यास भाल्यानें भोंसकलें. तोंच अकबर व मानसिंग ह्यांनीं आणखी दोघांस ठार केलें; यामुळें शत्रूंचा जो क्षणभर घोंटाळा झाला ती संधी साधून त्यांजवर या तिघांनीं जोरानें चाल केली, आणि बादशहावर आलेलें संकट पाहून विलक्षण पराक्रम करण्याचा आवेश आलेल्या त्याच्या शूर व जिवापाड मेहनत करणाऱ्या स्वारांच्या पद्धतीतें त्यांनीं शत्रूंस पळवून लाविलें. तेव्हां शत्रूंनीं आपला पडता पक्ष आहे हें जाणूनच जणों, अकबराच्या लोकांप्रमाणें शौर्य व धैर्य प्रकट केलें नाहीं. ते सवड सांपडली तसतसे आपल्या मुख्य सरदाराला सोडून पळून गेले. शेवटीं तो बलहीन होऊन अमदाबाद व डीसा यांवरून कसा तरी राजपुतान्यांत सिरोही येथें जाऊन पोहोंचला.

इकडे **भ**डोच शहर काबीज झालें असून फक्त **सु**रत मात्र तशीच राहिली होती. वरील मोहिमेहून परत येतांच **अ**कबर स्वतः या शहरावर चालून गेला. हें शहर पुढें **अ**कबराचा पुत्र व नातू यांच्या कारकीर्दींत इंग्रज व्यापाऱ्यांस चांगलें माहीत झालें. त्या वेळीं किल्ले सर करण्याचीं जीं साधनें होतीं त्यांच्या मानानें **सु**रतेचा किल्ला अभेद्य होता. परंतु बादशहानें वेढ्याचें काम मोठ्या नेटानें चालविलें, तेव्हां सत्तेचाळीस दिवसांनीं आंतील लोक उपासमार झाल्यामुळें शरण आले. **गु**जराथचा पुरता बंदोबस्त होईपर्यंत **अ**कबर **सु**रतेस राहिला. तो सुमारें नऊ महिन्यांनंतर म्हणजे ता० ४ जून सन १५७३ रोजीं **आ**ग्र्यास परत आला.

**अ**कबरानें **सु**रतेस वेढा घातला असतां इकडे, पूर्वीं **सा**रस येथें पराभव पावून **सि**रोहीस पळून गेलेल्या बंडखोर सरदारानें बरीच गडबड चालविली होती. दुसऱ्या एका मोठ्या बंडवाल्यास मिळून त्यानें **पा**टण शहरावर चाल केली. तेथें त्याची व बादशाही फौजेची लढाई झाली.. तींत त्याला प्रथम बहुतेक जय मिळाला होता, व त्याची फौज लुटालूट करण्यांत गुंतली होती; इतक्यांत बादशाही फौज पुनः एकत्र झाली, व तिनें त्याच्या फौजेच्या मध्यभागावर नेटानें हल्ला करून त्या लोकांची फळी फोडली, व आपला जो पराजय झाला होता त्याचा वचपा काढला. हें वर्तमान **अ**कबराला **सु**रतेच्या वेढ्यांतच कळलें. पुढें त्या बंडखोर सरदारानें होईल तितकी खडबड करण्याच्या इराद्यानें **रा**जपुतान्यांतून **पं**जाबचा रस्ता धरिला. वाटेंत दोनतीनदां त्याचा पराभव झाला, तरी त्याला स्वतःला कांहीं अपाय झाला नाहीं. जातां जातां त्यानें **पा**णिपत, **सो**नपत व **क**रनाळ हीं गांवें लुटलीं. **पं**जाबांत बादशाही फौजेची व त्याची गांठ पडली, तेव्हां त्याचा पराभव झाला. नंतर तो देशोधडीं फिरत असतां **मु**लतानाजवळ कांहीं कोळ्यांनीं त्याला जखमी करून कैद केलें. पुढें लौकरच त्याची ती जखम असाध्य होऊन तो मरण पावला. तो मेला हें **अ**कबराला इष्टच झालें. कारण तो मोठा खटपटी व हुशार मनुष्य होता. याच सालीं **मों**गल फौजेनें **जा**लंदर दुआबांतील **कां**गडा हा मजबूत किल्ला घेण्याचा यत्न केला. पण तो सफल

झाला नाहीं. कारण वेढा घालणाऱ्या फौजेनें आंतील लोकांस अगदीं जेरीस आणिलें होतें, इतक्यांत मुलतान येथें जो बंडवाला मरण पावला म्हणून वर सांगितलें, त्यानें केलेल्या स्वारीचा मोड करण्याकरितां त्या फौजेस वेढा उठवून पंजाबाकडे जावें लागलें. कांगडा किल्ला अकबराच्या पुत्राच्या कारकीर्दीपर्यंत मोंगलांच्या हातीं आला नाहीं.

आपण गुजराथ देश पूर्णपणें जिंकून घेतला असून आपल्या राज्यव्यवस्थेनें आपण तेथील प्रजेचें प्रेम व विश्वास आपल्यावर बसवून घेतला आहे, असें मनांत आणून अकबर तेथून निघाला. परंतु अधिकाराचा एकवार उपभोग घेतलेल्या लोकांच्या मनांत पुनः त्याच्या प्राप्तीविषयीं असणारी स्वाभाविक आवड व तिचे परिणाम कसे असतात हें त्याच्या पूर्तेपणीं लक्षांत आलें नव्हतें. त्याला आग्र्यास पोहोंचून फार दिवस झाले नाहींत तोंच गुजराथेंतील पदच्युत झालेले पूर्वीचे अधिकारी पुनः फौज जमवून देशांत धुमाकूळ घालूं लागले. तो त्रास फारसा वाढला नाहीं तोंच तो नाहींसा करण्याचा निश्चय करून अकबरानें दुसरी स्वारी करण्याची तयारी केली, व आपली फौज पुढें पाठविली. सपटंबर महिन्यांतील एका रविवारीं एका चलाख सांडणीवर स्वार होऊन तो सपाट्यानें सारखा सदतीस कोस गेला, व जयपूर व अजमीर यांच्या मधोमध तोडा म्हणून गांव आहे तेथें पोहोंचला; आणि तिसरे दिवशीं सकाळीं अजमीर येथें दाखल झाला. नेहमींप्रमाणें तेथील दरग्याचें दर्शन घेऊन तो पुनः संध्याकाळीं घोड्यावर स्वार झाला, व डीसाच्या रस्त्यावर पाली येथें आपल्या फौजेस येऊन मिळाला. त्याचे कांहीं सरदार फौज जमा करून त्याची वाट पहात होते, ते पाटण शहराजवळ त्याला येऊन मिळाले.

बंडवाल्यांनीं जमविलेल्या फौजेहून अकबराची फौज कमी होती. पण तिच्यांतील लोक त्याच्या सर्व सैन्यापैकीं अगदीं निवडक होते. त्यानें अगदीं तडकाफडकी चाल केली. ती त्याच्या फारच पथ्यावर पडली. बंडवाल्यांना तो आग्र्याहून निघाल्याची खबर देखील नव्हती, तोंच त्यानें त्यांना गांठलें. ते अमदाबादेस आपल्या

डेऱ्यांत खुशाल झोंपा काढीत होते, तों एकाएकीं अकबर नऊ दिवसांत आग्र्याहून येऊन त्यांच्या पुढें दत्त ह्मणून उभा राहिला !

त्या काळीं लोकांत संभावितपणा, खरें शौर्य आणि धर्मयुद्धाची वांछा होती, ही गोष्ट 'तबकात-ई-अकबरी' च्या कर्त्याच्या पुढील लेखावरून स्पष्ट दिसते. 'शत्रूवर अकस्मात् छापा घालणें हें मर्दुमकीचें काम नव्हे, याकरितां त्याला इशारा होईपर्यंत वाट पाहणें योग्य आहे, असे विचार बादशाही फौजेच्या लोकांच्या मनांत चालले होते.' यामुळें शिंगाड्यांना शिंगें वाजविण्याविषयीं हुकूम झाला. बंडवाल्यांतील मुख्य सरदाराच्या हेरांनीं त्याला चौदा दिवसांपूर्वीं बादशहा दिल्लीस असल्याचें सांगितलें होतें. यावरून त्यानें, आपल्यावर आलेल्या स्वारांबरोबर हत्ती दिसत नाहींत तेव्हां हे खास बादशाही स्वार नव्हत, असें बोलून दाखविलें, व लढाईची तयारी केली. बादशहानेंही उदार व थोर बुद्धीनें, तो अगदीं तयार होईपर्यंत वाट पाहिली. नंतर तो सपाट्यानें नदींत घोडे घालून पार गेला, व फळी तयार करून त्यानें शत्रूवर एखाद्या चवताळलेल्या वाघाप्रमाणें हल्ला केला. तोंच मोंगल स्वारांच्या दुसऱ्या एका टोळीनें शत्रूच्या एका बाजूवर चाल केली. या एकंदर हल्ल्यापुढें तग धरून राहणें बंडवाल्यांना अगदीं अशक्य होतें. तेव्हां त्यांचा पूर्ण पराजय झाला, व त्यांचा मुख्य सरदार जखमी होऊन धरला गेला.

नंतर एका तासानें शत्रूची दुसरी एक सुमारें ५००० स्वारांची टोळी सामना करण्यास गेली, तिचाही पराभव झाला; आणि तिचा मुख्य सरदार मारला गेला. लढाईंत व नंतरच्या पाठलागांत सुमारें २००० बंडवाले पडले. पुढें अकबर अमदाबादेस गेला. तेथें तो पांच दिवस राहिला. तेवढ्या वेळांत त्यानें त्या प्रदेशाची नीट व्यवस्था करण्याची तजवीज चालविली. ज्या लोकांनीं हुशारी दाखविली होती, त्यांना इनामें वगैरे त्यानें दिलीं. नंतर तो खेडा जिल्ह्यांतील मेहमदाबाद शहरावरून सिरोहीस व पुढें थेट अजमिरास गेला. तेथील प्रसिद्ध दर्ग्याचें दर्शन घेऊन तो तेथून रात्रीचा दिवस करून दौड करीत करीत जयपुरापासून सात कोसांवर एका गांवीं गेला. तेथें त्याच्या उत्तम

कामगारांपैकी राजा तोडरमल्ल[1] हा त्याला भेटला. त्याच्याशीं गुज-

---

1 राजा तोडरमल्ल हा जातीचा खत्री होता. याचा जन्म अयोध्या प्रांतांत लहारपूर नांवाच्या गांवीं झाला. त्याच्याविषयींची माहिती, 'माअसरअल्-उमरा' नांवाच्या ग्रंथांत दिली आहे, व ती अकबराच्या कारकीर्दीच्या १८ व्या वर्षानंतरची आहे. तरी राजा तोडरमल्ल हा अकबराच्या दरबारीं यापूर्वीच पुष्कळ दिवस नोकर असल्याचें दिसतें. हिजरी सन ९७१ या वर्षी त्यानें मुजफरखानाच्या हाताखालीं व पुढील वर्षी खुद्द अकबराच्या हाताखालीं खानजमान याच्याविरुद्ध लढाईत काम केलें होतें. गुजराथ सर केल्यावर तेथील वसूलवासलातीचा बंदोबस्त करण्याचें महत्त्वाचें काम अकबरानें तोडरमल्ल याजकडे आपल्या कारकीर्दीच्या १८ व्या वर्षी सांगितलें. तेव्हांपासून त्याच्या भाग्योदयाला खरा आरंभ झाला. दुसऱ्या वर्षी पाटणा शहर सर झाल्यावर त्याला आलम व नगारा किंवा डंका-निशाण मिळालें; व मुनीमखानाबरोबर त्याची बंगाल्याच्या मोहिमेवर नेमणूक झाली. त्या सर्व मोहिमेंत तोडरमल्लच विशेष प्रमुख होता. दाऊदखान करानी याशीं लढाई झाली तींत खानआलम मारला गेला व मुनीमखानाचा घोडा स्वारू घेऊन उधळला, तेव्हां तोडरमल्ल मोठ्या शौर्यानें व मर्दुमकीनें रणांगणांत सैन्याला दम देत उभा राहिला. यामुळें बादशाही फौजेचा पराभव झाला नाहीं इतकेंच नव्हे, तर उलट पुर्तेपणीं तिचा जय झाला. तोडरमल्ल म्हणाला, 'खानआलम पडला ह्मणून काय झालें? खानखानान पळाला ह्मणून भय कशाचें? ही बादशाही आमची आहे.' असो. बंगाल व ओरिसा प्रांतांतील वसूलवासलातीचा पक्का बंदोबस्त केल्यानंतर तोडरमल्ल दरबारांत परत आला. तेथें त्याच्याकडे मुलकी काम सोंपविण्यांत आलें. खानजहान याची बंगाल्याच्या कामगिरीवर नेमणूक झाली तेव्हां तोडरमल्लासही त्याजबरोबर जाण्याचा हुकूम झाला. तेथें त्यानें पूर्वीप्रमाणेंच शौर्य गाजविलें, व दाऊदखानाला पकडलें. बंगाल्यांतील लूट व तसेच तीनचारशें हत्ती घेऊन तो बादशहाकडे दरबारांत दुसरे वर्षी परत आला. पुढील सालीं त्याची गुजराथेंत वजीरखानाच्या जागीं नेमणूक झाली. वजीरखानाबरोबर अमदाबादेस कामाचा बंदोबस्त करीत असतां मिहिरअली गुलाबी याच्या सल्ल्यानें मुजफ्फर हुसेन यानें बंड केलें. तेव्हां वजीरखानानें, 'आपण किल्ल्याच्या आश्रयास जावें हे बरें,' असें तोडरमल्लास सुचविलें. परंतु तोडरमल्लानें हा नामर्दपणाचा विचार मान्य न करितां मुजफ्फराशीं सामना करण्यास सिद्ध होऊन त्याचा धोलका गांवाजवळ पराभव केला. या लढाईंत तोडरमल्ल साह्यास न जाता तर वजीरखान मारला गेला असता. या पराभवानंतर मुजफ्फर जुनागडास पळून गेला.

याच सालीं तोडरमल्ल यास अकबरानें वजीर नेमिलें. अकबर अजमिराहून पंजाबाकडे जाण्यास निघाला तेव्हां राजा तोडरमल्ल त्याच्या बरोबर होता. वाटेत त्याचे पुजेचे देव हरवले. देवांची पूजा केल्यावांचून अन्नग्रहण किंवा कामकाज

रायेच्या जमाबंदीविषयीं सल्लामसलत करून त्यानें त्या संबंधाचा निकाल

करावयाचें नाहीं असा तोडरमल्लाचा नेम होता. यामुळें तो बरेच दिवस उपोषित राहिला. अखेरीस अकबरानें मोठ्या खटपटीनें त्याची समजूत घातली. तो शेवटपर्यंत पक्का हिंदुधर्माभिमानी राहिला.

मुजफ्फर मरण पावल्यानंतर बंगाल व बहार हे प्रांत बंडवाल्यांनीं हस्तगत केल्याचें वर्तमान आलें. तेव्हां अकबरानें तोडरमल्ल, सादिकखान, व तरसोनखान वगैरेंना फत्तेपूर-शिक्रीहून बहार प्रांतांत पाठविलें. रोहटासचा अधिकारी मुहिब्बअल्ली व महंमद मआसमखान फरनखुदी यांना त्यांच्या मदतीस जाण्याविषयीं हुकूम झाला होता. फरनखुदी हा सुमारें ३००० जेय्यत स्वारांसह तोडरमल्लास येऊन भेटला. पण त्याच्या मनांतून बंड करण्याचें होतें. बंगाल्यांतील बंडखोर सरदार हे, मआसम काबुली, काकशाल, व मिरजा शरफुद्दीनहुसेन यांच्यासह सुमारें ३०००० स्वार, ५०० हत्ती, व पुष्कळशा तोफा व नावा यांनिशीं मोंगीर शहराजवळ एकत्र झाले होते. आपले साथीदार दगा करतील असा राजा तोडरमल्ल याला धाक होता, यामुळें लढाई करणें ठीक नव्हे असें समजून मोंगीर शहराचा पक्का बंदोबस्त करून तो तेथेंच राहिला. तेव्हां बंडवाल्यांनीं त्याला वेढा घातला. हा वेढा पडला असतांना हुमायून फरमिली, व तरखान दीवाना हे दोन सरदार बंडवाल्यांना जाऊन मिळाले, व घासदाणा व इतर सामग्री याचा फार तोटा पडला तरी, त्या गोष्टींस न जुमानतां तोडरमल्लानें उत्तम तऱ्हेनें टिकाव धरला. त्याला वेळोवेळीं मदतही पोहोंचत गेली. वेढा पडून बरेच दिवस झाले, इतक्या अवसरांत बाबाखान काकशाल मरण पावला, व मजनूखान काकशाल याचा पुत्र जबारी हा निघून जाण्यास तयार झाला. यामुळें बंडवाल्यांची फौज निघून गेली. मआसम काबुली दक्षिण-बहारकडे गेला, व अरबबहादर यानें पाटणा शहर व बादशाही खजिना छापा घालून घेण्याचा बेत केला. हा खजिना पहाडखानानें तेथील किल्ल्यांत नेऊन ठेविला होता. तोडरमल्लानें मआसम फरनखुदी याला पाटण्यास पहाडखानाच्या मदतीस पाठविलें, व स्वतः सादिकखानासह मआसम काबुलीचा पाठलाग करीत बहार प्रांतांत गेला. सादिकखानावर रात्रीं छापा घालण्याचा मआसम काबुलीनें यत्न केला, तो सफल झाला नाहीं. तेव्हां तो ओडिसा प्रांतांत ईसाखानाकडे पळून गेला. याप्रमाणें दक्षिण-बहार प्रदेश गढीच्या हद्दीपर्यंत पुनः पूर्णपणें कबज्यांत आल्याबद्दल तोडरमल्लानें अकबराकडे लिहून पाठविलें.

हि० स० ९९० त तोडरमल्ल यास दिवाण किंवा वकील नेमण्यांत आलें. याच सालीं त्यानें नवीन जमाबंदी सुरू केली या जमाबंदीवरूनच त्याची अद्यापि सर्व देशांत प्रसिद्धि आहे. याविषयींची माहिती आईन-ए-अकबरीच्या तिसऱ्या भागांत दिलेली आहे. त्यानें नाण्यासंबंधेंही बराच फेरफार केला.

आजपर्यंत मुलकी खात्याचा सर्व जमाखर्च हिंदी भाषेंत, नागरी लिपींत, हिंदु मोहरिर म्हणजे कारकून हे लिहीत असत. परंतु तोडरमल्लानें हे सर्व

केला. राजा तोडरमल्ल पुढें त्याचा दिवाण झाला. वरील गांवाहून अकबर थेट फत्तेपूर-शिक्री येथें विजयी होत्साता ४३ दिवसांत परत आला.

---

हिशेब फारशी भाषेत व लिपींत लिहावे असा हुकूम केला. यामुळें हिंदु लोकांना दरबारी भाषा शिकणें भाग पडलें, व असें केल्यावांचून उदरनिर्वाहाला साधन त्यांना नाहींसें झालें. यांच्या योगानें हिंदु लोकांस मोठमोठ्या जागा देण्याचा उत्तम परिपाठ अकबरानें घातला. या दोन्ही गोष्टींमुळें पुढें लौकरच हिंदु लोक फारशी भाषेंत निष्णात झाले, व उर्दू भाषा नवीन उत्पन्न झाली. हिंदु लोकांना दरबारांत देखील मुसलमान लोकांची सर्वतोपरी बरोबरी करण्याला साधनें व सवड मिळाली.

इ० स० १५८५ त अकबरानें त्याच्या घरीं जाऊन त्याची भेट घेतली, हा त्याचा फारच बहुमान झाला. इ० स० १५८८ त एका खत्र्यानें खासगी द्वेषामुळें त्याच्यावर रात्रीं रस्त्यांत वार केला. तो खत्री तेव्हांच मारला गेला.

पुढें अकबराचा बिरबल मारला गेल्यावर मानसिंगाबरोबर तोडरमल्लाचीही नेमणूक झाली. इ० स० १५९० त अकबर काश्मिरास गेला तेव्हां तोडरमल्लाकडे लाहोरचें काम सोंपविण्यांत आलें. नंतर लौकरच, ' आपला वृद्धापकाळ झाल्यामुळें गंगातीरीं जाऊन देह ठेवावा अशी इच्छा आहे, याकरितां रजा मिळावी, ' म्हणून तोडरमल्लानें बादशहास विनंति केली. ती त्यानें मान्य केली. तेव्हां तो चालता झाला, पण अकबरानें त्याला हरिद्वारांहून परत बोलाविलें, व ' केवळ गंगातीरावर स्वस्थ राहण्यापेक्षां आपलें कर्तव्यकर्म करणें यांतच अधिक पुण्य आहे ' असें सांगितलें. त्यावरून तोडरमल्ल निरुपाय होऊन परत आला. परंतु पुढें लौकरच म्हणजे ता० २१ मोहरम हि० स० ९९८ रोजीं तो मरण पावला.

तत्कालीन इतिहासकारांनीं तोडरमल्लाला, हटवादीपणा, दुराग्रह व अतिशय धर्मवेडेपणा यांबद्दल नांवें ठेविलीं आहेत; तरी, शूर योद्धा व उत्तम मुलकी कामगार या नात्यानें त्याची प्रसिद्धि अकबराच्या इतर बहुतेक सरदारांहून अधिक असून जास्त चिरकालिक आहे. हिंदुस्थानांत आजमितीला त्या सर्व लोकांपैकीं तोडरमल्ल, अबुलफजल व मानसिंग, या तिघांइतकें दुसऱ्या कोणाचेंही नांव प्रसिद्ध नाहीं.

तोडरमल्लाचा पुत्र धारू हा सातशेंचा मनसबदार होता. तो सिंध देशावरील मोहिमेंत कामास आला. खानखानान याच्या हाताखालीं असतां तो आपल्या घोड्याला सोन्याचे नाल बांधवीत असे, असें म्हणतात.

तोडरमल्ल हा मूळचा फार गरीब होता. त्याचा बाप तो लहान असतांच मरण पावला. या कारणानें त्याच्या आईला गरिबीमुळें फार हाल सोसावे लागले. तोडरमल्लाची बुद्धिमत्ता, हुशारी व व्यवहारचातुर्य हीं लहानपणींच दिसून येऊं लागलीं. तो प्रथम लहानसा कारकून होता. वाढतां वाढतां तो बादशाही दरबारांत अधिकाराच्या व वैभवाच्या शिखरास केवळ आपल्या कर्तबगारीनें व अकबरासारख्या थोर व न्यायी बादशहाच्या कृपेनें पोहोंचला.

सर्व हिंदुस्थान आपल्या एकछत्री राज्याखालीं आणण्याचा जो अकबराचा बेत होता, तो त्याच्या कारकीर्दीच्या अठराव्या वर्षी बराच सिद्धीस गेला होता. त्या वेळीं मध्य-हिंदुस्थान, वायव्येकडील प्रांत, पंजाब, काबूल व पश्चिम-हिंदुस्थान, या सर्व प्रदेशांवर त्याचा अंमल होता. पूर्वेस कर्मनाशा नदीपर्यंत त्याच्या राज्याची हद्द होती. त्या नदीच्या पलीकडे बहार व बंगाला येथील स्वतंत्र राज्यें होतीं. त्यांच्यापासून प्रसंगविशेषीं धोकाच होता; म्हणून पुढील सालीं, होईल तोंवर, बंगाला व त्यांच्या खालचीं सर्व संस्थानें जिंकून घेण्याचा त्यानें निश्चय केला. या स्वारीला निघण्यापूर्वी तो पुनः एकदां अजमीर येथील दरग्याच्या दर्शनास जाऊन आला.

येथपर्यंत अकबरानें केलेल्या मोहिमी व त्याच्या फौजेस मिळालेले जय यांविषयीं बरेंच लिहिलें; परंतु ह्या सर्व गोष्टी कोणच्या तत्त्वावर होत असत त्या तत्त्वांचें दिग्दर्शन केलें नाहीं. लढाईचा खर्च लढाईवरच भागविणारे असे महान् महान् योद्धे आपल्या आठवणींत सुद्धां झाले आहेत. पुढें मोंगल बादशाही डळमळूं लागून लयास जाण्याच्या पंथास लागली असतां, अफगाणिस्थान व खुरासान येथील दांडग्या व जंगली लोकांनीं हिंदुस्थानावर ज्या स्वाऱ्या केल्या, त्या याच तत्त्वावर केल्या. पण या तत्त्वावर अकबर वागत नसे. जी बादशाहीरूपी इमारत तो रचीत होता, ती पुरी व मजबूत होण्याला अगदीं अवश्य, ह्मणजे ज्या केल्यावांचून ही इमारत खचित डळमळूं लागून पहिल्याच वादळाच्या सपाट्यानें पडण्याचा संभव होता, तेवढ्याच लढाया तो नाइलाजामुळें करीत असे. बाकी एकंदरींत लढाईचा त्याला कंटाळा व त्रास असे; व लढाई करण्याचा प्रसंग आला तर त्यांतही होईल तेथवर, आपल्या व आपल्या फौजेच्या स्वाऱ्यांमुळें जमीनदार व शेतकरी लोकांचें नुकसान न होऊं देण्याकडे त्याचें पूर्ण लक्ष्य असे. फौजेच्या किंवा आपल्या स्वारीच्या तळाकरितां एखादी जागा पसंत होतांच, तिच्या आसपासच्या पिकांस नुकसान पोहोंचूं नये म्हणून तो सभोंवार चपराशी नेमीत असे. शिवाय तळ उठल्यावर, त्यामुळें झालेल्या नुकसानीचा अंदाज करून सरकारी जमेच्या आंकड्यांत तिचा आंकडा किती मजुरा

द्यावयाचा तें ठरविण्याकरितां तो पंच नेमीत असे, असें 'तबकात ई-अकबरी'च्या कर्त्यानें लिहिलें आहे. त्याच्या वेळच्या सर्व स्वाऱ्यांत ही वहिवाट अगदीं कायमची होऊन गेली होती. केव्हां केव्हां तर या पंचांजवळ, तत्काळ नुकसानीचा अंदाज करून ती तेथेंच भरून देण्याकरितां रोख रुपयांच्या थैल्या देत असत; व येणेंकरून, वसूल जमा करणाऱ्या कामगाराच्या कामांत घोंटाळा होण्याचें कारण रहात नसे. ही व्यवस्था मोंगलांच्या मागून सार्वभौमपद पावलेल्या पाश्चात्यांनीं चालू केलेल्या चालीप्रमाणेंच बहुतेक आहे. तिच्या योगानें, ज्या लोकांच्या जमिनींतून स्वाऱ्या व लढाया होत, त्या लोकांना लढाईची इतकी पिडा होत नसे.

मागें सांगितल्याप्रमाणें अकबर हा अजमीर येथील दरग्याच्या दर्शनास जाऊन तेथें बारा दिवसपर्यंत राहिला असतां, इकडे बहार व बंगाल या प्रांतांची कशी काय स्थिति झालेली होती ती पाहूं.

मोंगलांनीं वायव्यप्रांत परत कबज्यांत घेतला त्या वेळीं बंगाला व बहार या दोन्ही देशांच्या गादीवर असणाऱ्या अफगाण राजानें कांहीं काळानंतर अकबराचें सार्वभौमत्व कागदोपत्रीं कबूल केलें होतें. परंतु ही कबुली खरोखर कागदावरच होती. त्यानें कधीं खंडणी दिली नव्हती, किंवा तो कधीं मुजरा करण्यासही हजर झाला नव्हता. अकबरानें दुसऱ्या वेळीं गुजराथेवर स्वारी केली त्या सुमारास हा राजा मरण पावला होता. त्याच्या मागून त्याचा मुलगा गादीवर बसला, त्याला त्याच्या सरदारांनीं लागलीच ठार मारून त्याचा धाकटा भाऊ दाऊदशहा यास गादीवर बसविलें होतें. दरबारांत या सरदारांची संख्या फारशी नव्हती, तरी ते प्रबल होते. दाऊद हा केवळ ऐषआरामांत गुंग असून राज्यकारभाराकडे त्याचें बिलकूल लक्ष नसे. तो गादीवर बसतांच लोदी घराण्यांतील एका मोठ्या व प्रबळ सरदारानें बंडाचा झेंडा फडकाविला, व शहाबाद जिल्ह्यांतील रोहटासगड येथें तो स्वतंत्र अंमल करूं लागला. त्या दोघांमध्यें कसाबसा पुनः तह झाला. त्यानंतर दाऊदशहानें त्या लोदी सरदाराशीं विश्वासघात करून, त्याला धरून ठार मारविलें. ही बातमी जोन-

पूर येथील अकबराच्या सुभेदारास कळतांच तो एकदम कर्मनाशा नदी उतरून पाटणा ह्या तटबंदी शहरावर चालून गेला. अकबरानें त्याला बहार प्रदेशांतील राज्यस्थितीवर नीट लक्ष ठेवून प्रसंग पडेल तसें वागण्याबद्दल पूर्वींच हुकूम दिलेला होता. मोंगलांबरोबर मैदानांत लढाई करण्याचें आपणांत सामर्थ्य नाहीं असें जाणून दाऊदशहा पाटणा शहरांत आश्रयास येऊन राहिला होता. अकबर गुजराथेंतून परत आल्यावर थोड्याच दिवसांत बहार प्रांताची अशा प्रकारची स्थिति झालेली होती. या स्वारीची व्यवस्था स्वतः करण्याच्या इराद्यानें, आपण येऊन पोहोंचेपर्यंत लढाईचें काम तहकूब ठेवण्याविषयीं अकबरानें आपल्या सरदारास निरोप पाठविला, व तो जलदीनें मागें सांगितलेल्या अजमीर येथील दर्ग्याचे दर्शनास जाऊन आला. नंतर कांहीं फौज बरोबर घेऊन तो जलदी करून जलमार्गानें अलाहाबादेस आला. तेथें न थांबतां तसाच पुढें त्याच मार्गानें तो बनारसेस गेला, व तेथें तीन दिवस राहून पुनः नावेंतून गंगा-गोमतीसंगमावर दाखल झाला. आपल्या सरदाराकडून वर्तमान येईपर्यंत वाट पाहण्याचें ठरवून तो गोमतींतून वर जोनपुरास गेला. वाटेंतच त्याला त्याच्या सरदाराकडून तावडतोब येण्याविषयीं निरोप पोहोंचला. तेव्हां बरोबरच्या बायकामुलांस जोनपुरास नेऊन पोहोंचविण्याविषयीं हुकूम देऊन तो एकदम परतला, व आपल्या फौजेस येऊन मिळाला. फौजेस नावांच्या टप्याटप्यानें नदीकिनाऱ्यानेंच जाण्यास सांगून तोही नावेंतूनच चौसा येथें पोहोंचला. याच ठिकाणीं पूर्वीं त्याच्या बापाचा शीरशहानें पराभव केल्याचें मागें लिहिलेंच आहे. तेथें त्याला, पाटणा शहरास आपल्या सैन्यानें वेढा घातला असतां आंतील लोकांनीं वेढा घालणाऱ्यांवर एकदम हल्ला केल्यामुळें आपल्या पक्षाचें बरेंच नुकसान झाल्याचें वर्तमान समजलें. ह्मणून तो तसाच जलमार्गानें पुढें जाऊन सातवे दिवशीं वेढा घालणाऱ्या फौजेस जाऊन मिळाला.

दुसरे दिवशीं त्यानें लढाईविषयीं विचार करण्याकरितां सरदार मंडळीचा दरबार भरविला. खास पाटणा किल्ल्यावर हल्ला करण्या-

पूर्वी पाटणा शहराच्या समोर गंगा-गंडकीसंगमावर असलेला हाजीपूर नांवाचा गांव कबज्यांत घ्यावा हें बरें, असा त्यानें त्या दरबारांत आपला अभिप्राय दिला. हीच गोष्ट अमलांत येऊन दुसरे दिवशीं हाजीपूर त्याच्या हस्तगत झालें. यामुळें, व वेढा घालणाऱ्या प्रचंड सैन्याचें बल पाहून, दाऊद घाबरून गेला; आणि त्याच रात्रीं तो पाटणा सोडून फतावा येथें गंगा व पुनपुना यांचा संगम आहे त्याच्यापार पळून गेला. दुसरे दिवशीं सकाळीं अकबर विजयी होत्साता पाटणा शहरांत शिरला. पण दाउदाला धरण्याची त्याला फार उत्कंठा असल्यानें, तो तेथें चार तासच राहिला. त्यानें आपल्या एका सरदाराला फौजेचें आधिपत्य दिलें, व बरोबर एक चांगलें निवडक स्वारांचें पथक घेऊन स्वतः दाउदाचा पाठलाग केला. तो घोड्यावरूनच पुनपुना नदींतून पोहत पार गेला, व त्यानें तेव्हांच दाउदाच्या लोकांना गांठलें. त्यानें दाउदाचे हत्ती एका मागून एक भराभर धरले; ते इतके कीं, दर्यापुरास पोहोंचेपर्यंत २६५ हत्ती त्याच्या हातीं आले. नंतर दर्यापुरास मुक्काम करून त्यानें आपले दोन विश्वासू सरदार शत्रूचा पाठलाग करण्यास पुढें पाठविले. त्यांनीं आणखी सात कोस दाउदाचा पाठलाग केला, पण तो आपल्या हातून निसटला असें पाहून ते परत आले.

पाटणा शहर हस्तगत झाल्यामुळें बहार प्रांत अकबराच्या हातीं आला. त्यानें दर्यापुरास सहा दिवस मुक्काम करून त्या प्रांताच्या राज्यकारभाराचा बंदोबस्त केला. या मोहिमेच्या मूळ उत्पादक सरदारालाच अकबरानें तेथील सुभेदारी दिली, व त्याला ती मोहीम पुढें नीटपणें शेवटास नेण्यास ठेवून तो जोनपुरास परत गेला. त्या शहरांत तो तेहतीस दिवस राहिला, व त्या अवकाशांत त्या प्रदेशाच्या बंदोबस्ताची पक्की व्यवस्था त्यानें लावली. या व्यवस्[illegible] [illegible]र, बनारस, चुनार व त्यांच्या आसपासचे इतर महाल [illegible] बादशाही अमलाखालीं घेतले, व कर्मनाशा नदीपलीकडील एक नवीन सुभेदारी कायम केली.

वरील कामें उरकल्यावर अकबर आग्र्यास जावयास वाटेंत त्याचा चार दिवस कानपूर येथें मुक्काम पडला. त्य

शांत, मोंगीर, भागलपूर, गढी व बंगाल्याची प्राचीन व प्रसिद्ध हिंदु राजधानी जें गौड शहर त्याच्या समोर गंगापार असलेलें तांडा शहर हीं आपल्या बंगाल्यांतील सरदारानें एका मागून एक भराभर घेतलीं असून पुढें सर्व बंगाल प्रदेश घेण्याच्या तयारींत तो असल्याचें वर्तमान त्याला कळलें. आणि खरोखरच त्या सरदारानें हें काम मोठ्या नेटानें सिद्धीस नेलें. त्यानें ढिलाई न करितां दाउदाचा पाठलाग केला, व त्याचा बाजूरा येथें पराभव करून शेवटीं कटक येथें त्याला शरण येण्यास लाविलें. दाऊद शरण आल्यावर बंगाल प्रांत पूर्णपणें बादशहाच्या कबज्यांत आला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

हें आनंदाचें वर्तमान ऐकून अकबर फार खुष झाला, व बंगाल्याची मोहीम आतां आटपली असें पाहून तो कानपुराहून दिल्लीस गेला. तेथें कांहीं दिवस शिकार करीत राहून पुनः तो अजमिरास शिकार करीतच गेला. नारनूल येथें त्याचा मुक्काम असतां पंजाब व गुजराथ येथील सुभेदार येऊन त्यास भेटले. तेव्हां आपलें सर्व राज्य चिरस्थायी होत चाललें असून आपल्या अमलाविषयीं प्रजेचा संतोष आहे असें त्या सुभेदारांच्या तोंडून ऐकून त्याला मोठें समाधान वाटलें. या सुभेदारांबरोबर बोलणेंचालणें झाल्यावर तो अजमिरास गेला, व तेथें त्यानें दरग्याची यात्रा केली. तसेंच जोधपूरच्या जंगलांतील एका छोटेखानी जमीनदारानें बंड केलें होतें त्याचाही त्यानें बंदोबस्त केला. नंतर तो आपली आवडती राजधानी फत्तेपूर-शिक्री येथें येऊन राहिला.

स्वारीशिकारींत फिरत असतां, पुष्कळ जमीन लागवडीवांचून पडलेली अकबरानें पाहिली होती. या शोचनीय गोष्टीचें कारण जमिनीचा हिनकसपणा किंवा शेतकऱ्यांचा आळशी स्वभाव या दोहोंतून एकही संभव नव्हतें. कारण जमीन चांगली सुपीक होती हें उघड दिसत होतें. या गोष्टीचा पूर्णपणें विचार करितां अकबराला असें दिसून आलें कीं, याचा सर्व दोष राज्यव्यवस्थेकडे आहे. अंमलदारांनीं जमिनीचा महसूल रयतेच्यानें न झेंपे इतका ठेविला होता, व त्यामुळें गरीब रयतेला शेतकी करण्याची सोयच नव्हती.

तेव्हां प्रथम वर्षीचा शेतकीपासून होणारा फायदा रयत व सरकार यांनीं निमेनिम वांटून घेण्याची व्यवस्था केल्यास ही अडचण कदाचित् वरीच दूर होईल, असें बादशहास वाटलें. मग या सर्व विषयाचा पुर्तेपणीं विचार करून त्यानें असें ठरविलें कीं, सर्व परगणे एकवार नीट तपासावे, व लागवड केल्यावर एकेक कोट टांके उत्पन्न होईल इतक्या जमिनीचे निरनिराळे भाग करून ते एकेका हुशार व इमानी अंमलदाराच्या स्वाधीन करावे, व या अंमलदारास 'करोडी' असें नांव द्यावें. खजिन्याकडील कारकून व जमाखर्च लिहिणारे यांनीं आपसांत या करोडीशीं वसुलाबद्दलची व्यवस्था करून, त्यांना त्यांच्या परगण्यांत पाठवावें. तेथें त्यांनीं नीट हुशारीनें व दक्षतेनें काम करून पडित जमीन लागवडीस आणावी, व आपला परगणा तीन वर्षांनीं कमाल जमेवर आणून वसूल सरकारांत भरणा करावा. ही व्यवस्था चांगल्या तऱ्हेनें अमलांत आली, व तिच्यापासून बादशहास वाटले होते तितके सर्व फायदे झाले.

याप्रमाणें अकबराच्या कारकीर्दीचें एकोणिसावें वर्ष एकंदरींत फारच चांगलें गेलें. पश्चिम, मध्य व वायव्य हिंदुस्थानांत बंगाल व बहार हे प्रांत सामील झाले. वस्तुतः विंध्याद्रीच्या उत्तरेकडील सर्व प्रदेश अकबराच्या सत्तेखालीं आला असें म्हटल्यास हरकत नाहीं. फक्त या वेळीं पश्चिम-हिंदुस्थानांत अतिशय भयंकर दुष्काळ पडून खेरीज रोगाची सांथ उद्भवली, येवढीच काय ती वाईट गोष्ट झाली. हिचे परिणाम फार भयंकर झाले. ते असे कीं, धान्य महाग झालें, व गाई, घोडे वगैरे जनावरांना झाडांच्या साली खाव्या लागल्या. हा दुष्काळ व ही रोगाची सांथ सुमारें सहा महिने राहिली होती.

पुढील सालाच्या (इ० स० १५७५ च्या) अवलीस दाऊदशहाचा पाठलाग करण्यांत येऊन ओरिसा प्रांत बादशहाच्या हातीं आला. या अफगाण राजाचा बाझूरा येथें पराभव झाल्यानंतर त्याचा पाठलाग करण्यांत येऊन तो कटक येथें आश्रयास

१ आईन-ए-अकबरींत एक रुपया म्हणजे ४० दाम व एक दाम म्हणजे पांच टांक असें लिहिलें आहे. यावरून एक परगणा सुमारें ५० हजार रुपये उत्पन्नाचा होता असें स्पष्ट होतें.

राहिला असतां धरला गेल्याचें मागें लिहिलेंच आहे. त्याच्याशीं तह झाला, त्यांत त्यानें अकबराच्या वतीनें व त्याच्या नांवानें ओरिसा प्रांतांत अंमल करावा असें ठरलें होतें. पण दाऊदशहा या ठरावाप्रमाणें वागला नाहीं. संधी सांपडतांच त्यानें बंड केलें, व पुढें दोन वर्षांनीं एका मोठ्या लढाईत मोंगल सरदारांनीं त्याचा पराभव केला; आणि त्याला कैद केल्यावर त्याच्या विश्वासघाताबद्दल रणांगणींच त्याचा शिरच्छेद करण्यांत आला. पुढें बरेच दिवसपर्यंत बंगाल व ओरिसा या प्रांतांचा बंदोबस्त नीट राहण्याकरितां मोंगल सुभेदारांना मोठी खबरदारी घेऊन आपापल्या कामांत अतिशय दक्षता ठेवावी लागली.

याच सालीं बादशहानें फतेपूर-शिक्री येथें एक 'इबादतखाना' म्हणजे 'विद्यामंदिर' बांधिलें. तेथें विद्वान्, चतुर, व खऱ्या गुणी लोकांना एकत्र जमविण्याची सोय केली होती. त्या मंदिराचे चार भाग केले होते. पश्चिमेकडील भागांत सय्यद किंवा पैगंबराच्या वंशांतील लोक, दक्षिण भागांत विद्वान् व ज्ञानी लोक, व उत्तर भागांत ज्ञानवैराग्यसंपन्न साधु लोक, याप्रमाणें राहण्याची तजवीज केली होती; आणि पूर्वेकडील भाग, दरबारी लोक व सरदार यांतून ज्यांना अशा गोष्टींचा नाद असे त्यांना राहण्याकरितां मोकळा ठेविला होता. हें मंदिर तयार झाल्यावर अकबरानें दर शुक्रवारीं रात्रीं व पर्वणीच्या रात्रीं तेथें जाऊन सर्व रात्रभर तेथील लोकांशीं मोकळेपणानें वादविवाद करण्यांत काळ घालविण्याचा परिपाठ ठेविला. बहुधा अशा वेळीं, वरील निरनिराळ्या भागांतील लोक, आपल्यापैकीं विशेष योग्य व बादशहाच्या कृपेस पात्र अशा एकाद्या विद्वान् गृहस्थाची व बादशहाची मुलाखत करून देत असत. बादशहा तेथें जाई तेव्हां प्रत्यहीं तेथील लोकांस कांहीं ना कांहीं निमित्तानें देणग्या देत असे, व याप्रमाणें त्यांच्यांतील कोणाही गृहस्थाची कांहीं तरी संभावना झाल्यावांचून राहत नसे. या मंदिराचें काम इ० स० १५७५ अखेर पुरें झालें.

पुढील वर्षीं कांहीं महत्त्वाची गोष्ट घडली नाहीं. पण इ० स० १५७७ त मागें सांगितलेलें ओरिसा प्रांतांतील दाऊदशहाचें बंड

झालें. या बंडासंबंधाची मोहीम बरीच सपाटयाची व धूमधडाक्याची झाली. पण दाऊद व त्याचा चुलता मारला गेल्यावर तें बंड अगदीं मोडलें.

याच सालीं राजपुतान्यांतही गडबड झाली. त्या प्रदेशांतील सर्व राजेरजवाड्यांत फक्त मेवाडच्या राण्यानें मात्र अकबराच्या म्हणण्याप्रमाणें त्याच्याशीं बेटीव्यवहार करण्याचें कबूल केलें नव्हतें. त्याची अशी समजूत होती कीं, आपण प्रत्यक्ष देवांच्या वंशांतले आहों, यास्तव असला संबंध आपल्याला नीचपणा आणणारा आहे. त्याच्या स्वतःच्या प्राणावर व राज्यावर येऊन बेतली होती तरी त्यानें तो संबंध पतकरिला नाहीं. त्याचा अत्यंत हाडवैरी जोधपूरचा राजा अशा संबंधामुळें अधिकाधिक मानमान्यतेस व वैभवास चढत गेला होता, व त्याला त्याबद्दल मोठ्या उत्पंनाचे चार प्रांत मिळाले होते. हें पाहूनही वरील प्रकारचा संबंध मेवाडच्या राण्यानें पतकरिला नाहीं, व आपला हा हट्ट कायम ठेवण्यांत अकबराच्या प्रचंड शक्तीचीही त्यानें पर्वा केली नाहीं. महाराणा उदेसिंग याची राजधानी इ० स० १५६८ त त्याच्या शत्रूच्या हातीं पडली, तेव्हां तो राजपिंपळयाच्या जंगलांत पळून गेला, व तिकडेच इ० स० १५७२ त मरण पावला. उदेसिंग याचा पुत्र प्रतापसिंग[१] याच्या अंगीं बापाचा हट्ट व मानी स्वभाव, व आजा महाप्रतापी संग्रामसिंग किंवा संगराणा याच्या अंगचे अनेक उत्तमोत्तम गुण पूर्णपणें वसत होते. या वेळीं त्याला राजधानी नव्हती, किंवा कोणच्याही प्रकारचें साधन नव्हतें, आणि त्याचे आप्तइष्ट व जातभाई त्याच्या घराण्याच्या पडत्या काळामुळें निरुत्साह झालेले होते. पण त्याचा जो मुसलमानाशीं शरीरसंबंध न करण्याविषयींचा हट्ट व पण होता, त्या संबंधानें ते त्याला पूर्णपणें अनुकूळ होते. अशा लोकांनिशीं राणा प्रतापसिंग अरवली पहाडांत कुंमळमेर येथें राहून पुनः युद्धाच्या तयारीकरितां मुलखांतील

---

१ महाराणा प्रतापसिंग व त्याचा विख्यात आजा महाराणा संग यांच्या कारकीर्दीचें मनोवेधक व प्रोत्साहक सविस्तर वर्णन कर्नल् टॉड यानें राजस्थानच्या इतिहासामध्यें 'मेवाडचा इतिहास' या भागांत फारच सुरेख लिहिलें आहे. तें प्रत्येक सहृदय व स्वदेशाभिमानी सुज्ञ वाचकानें वाचण्याजोगें आहे.

लोकांची उठावणी करीत होता. याविषयींची बातमी इ० स० १५७६–७७ सालीं अकबर अजमिरास दरग्याच्या दर्शनास गेला, असतां त्याला कळली असावी असें दिसतें. कारण त्यानें, गुजराथच्या मोहिमेंत आपणाबरोबर असलेला जयपूरचा राजा मानसिंग यास ५००० स्वारांनिशीं त्याच्यावर लागलीच पाठवून दिलें. त्या दोघांच्या फौजेची इ० स० १५७६ च्या दिसेंबर महिन्यांत हळदीघाट[1] किंवा गोगंडा या बारींत गांठ पडून लढाई झाली. तींत राण्याचा अगदीं पराभव झाला, व तो अरवली पहाडांत पळून गेला. त्याचा सर्व तऱ्हेनें उपाय हरविण्याच्या उद्देशानें अकबरानें एक टोळी त्याच्यामागें पाठविली, व तिला वाटेंतील प्रदेश उध्वस्त करून टाकण्यास हुकूम दिला. अकबर स्वतः मेवाडांत गेला, व त्यानें तेथील राज्याची शिस्त बसवून दिली तेथून तो माळव्यांत जाऊन त्या प्रांताच्या पश्चिम सरहद्दीवर छावणी देऊन राहिला. तेथून बऱ्हाणपुराखालील प्रदेशाची त्यानें व्यवस्था लाविली, व गुजराथच्या व्यवस्थेची सुधारणा केली. या कामास त्याला इ० स० १५७७–७८ हीं दोन वर्षें लागलीं. नंतर तो पंजाबाकडे जाण्यास निघाला.

हल्लीं हिंदुस्थानांत सार्वभौमपद पावलेल्या (इंग्रज) लोकांस चमत्कारिक व उत्साहकारक वाटणारी एक गोष्ट, अकबर पंजाबांत जात असतांना घडून आली. तो दिल्लीच्या पुढें एका मुक्कामावर पोहोंचला असतां, युरोपांत फिरून आलेला एक हाजी म्हणजे मक्केची यात्रा करून आलेला मुसलमान यानें, बादशहास दाखविण्याकरितां तिकडील उत्तमोत्तम जिन्नस व कपडे आणिले होते. हे जिन्नस युरोपांतल्या कोणच्या देशांतून आले होते आणि बादशहास त्यांविषयीं काय वाटलें याचा निर्णय होत नाहीं.

अकबर पंजाबांत थोडेच दिवस राहून दिल्लीस परत आला, नेहमींप्रमाणें अजमिरास दरग्याच्या दर्शनास जाऊन तेथें तो एक रात्र राहिला, व तेथून फक्त नऊ माणसांनिशींच दररोज ५० कोस

---

१ हळदी-घाटाच्या बारींची किंवा गोगंडयाची लढाई ता० २१ रबिलावल हि० स० ९८४ रोजीं झाली.

याप्रमाणें मजला करीत घोड्यावरून फत्तेपूर-शिक्री येथें तिसरे दिवशीं संध्याकाळीं पोहोंचला.

इ० स० १५८० सालीं, त्या काळाच्या मानानें मोंगल बादशाही वैभवाच्या केवळ शिखरास पोहोंचली होती. बंगाल्यांत स्वस्थता होती इतकेंच नाहीं, तर तेथून बादशाही खजिन्यांत पैसा जमा होऊं लागला होता. मेवाडच्या राण्याचा बादशाही फौजेनें अद्यापि पाठलाग चालविला हाता, पण याशिवाय हिंदुस्थानांत कोठेंही युद्धाचा ध्वनि ऐकूं येत नव्हता.

हिंदुस्थानांत फिरत असतां, जागजागीं रहदारी चौक्यांवर व्यापाराच्या सर्व मालावर कर घेतला जात असे, त्यामुळें होणारे अडथळे व नुकसान अकबराच्या लक्षांत येऊन चुकले होते. निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळीं स्वतंत्र व परस्परविरोधी संस्थानें होतीं, तोंवर अशी व्यवस्था असणें साहजिक होतें. पण एकछत्री राज्य झाल्यानंतर, यापासून आपसांतील द्वैतभाव मात्र कायम रहात होता, अशी स्थिति होती. याकरितां इ० स० १५८१ च्या आरंभास त्यानें आपल्या सर्व राज्यांत 'तिमगा' किंवा 'रहादारी कर' माफ केला; तसेंच त्याच फरमानानें किंवा हुकुमानें, मुसलमानांशिवाय इतर सर्व धर्मांच्या रयतेवर अफगाण बादशहांनीं बसविलेली 'जाजिया' किंवा धर्मसंबंधी डोईपट्टी हीही बंद केली. प्रत्येक मनुष्याला विचारस्वातंत्र्य असावें, व प्रत्येकाला आपापल्या बुद्धीप्रमाणें व विचाराप्रमाणें परमेश्वराची आराधना करण्याची मोकळीक असावी, अशा प्रकारचे थोर व प्रौढ विचार त्याच्या मनांत असून त्यांचा त्यानें आमरणांत अंमल केला. या वर्षीं बंगाल्यांतील कांहीं बेदिल सरदारांनीं एक लहानसें बंड केलें. पण त्यांच्यांत विशेष एकजूट नसल्यानें त्यांचा तेव्हांच पराभव होऊन ते देशोधडीस लागले.

पुढच्या ह्मणजे १५८२ ह्या वर्षीं त्याचा भाऊ महंमदहकीम मिरजा यानें काबुलाहून पंजाबावर स्वारी केली. तिचा प्रतिकार करण्याकरितां अकबर फौज घेऊन पंजाबांत गेला. अकबर पाणिपतास पोहोंचेपर्यंत तो त्याचा बंडखोर भाऊ लाहोराजवळ आला होता. परंतु अकबर स्वतः फौज घेऊन येत आहे असें समजतांच,

आपल्याला यश येत नाहीं अशी त्याची खात्री झाली व तो लाहोराहून परतून काबुलाकडे माघारा गेला. अकबर हा सरहिंद, कालानूर, व रोतास यांच्या मार्गानें त्याच्या मागून गेला, व हल्लीं अटक गांव आहे त्या ठिकाणीं सिंधु नदी उतरून पुढें गेला. या जागीं त्यानें एक किल्ला बांधण्याविषयीं हुकूम केला.

तो पेशावरास गेला व तेथून त्यानें शहाजादा मुराद याला आपल्या फौजेचें एक पथक देऊन काबूल घेण्यास पाठविलें. मुराद हा त्या वेळीं तरुण असून उंच, सडपातळ, व आरक्त वर्णाचा होता. त्याला दारू पिण्याचें व्यसन फार होतें, व याच व्यसनापासून पुढें तो व त्याचा भाऊ शहाजादा दानियल हे शेवटीं मरण पावले. आपल्या चुलत्याचा जलदीनें पाठलाग करून मुरादानें खुद्द काबूल येथें त्यास गांठिलें, व त्याचा अगदीं पराभव केला. अकबर मागाहून मदतीच्या फौजेसह येतच होता. तो त्याचे मागून तिसरे दिवशीं काबुलास दाखल झाला. तेथें तीन आठवडे राहून त्यानें आपल्या भावास क्षमा केली, व पुनः काबुलचें राज्य त्याच्या हवालीं केलें. नंतर अकबर खैबर-घाटानें लाहोरास परत आला. तेथें पंजाब प्रांताची व्यवस्था लावून, दिल्लीवरून फत्तेपूर-शिक्रीस तो परत आला. त्यानंतर कांहीं काळपर्यंत न्यायइनसाफ, दानधर्म, व दरबारचें काम हीं करीत तो राहिला. असें दिसतें कीं, पुढच्या सालभर त्याचा मुक्काम तेथेंच होता.

बंगाल्यांत थोडाबहुत बंडावा होता; पण त्याचे कामगार फार दक्ष व हुशार होते, व ते वरचेवर त्याला त्याच्या बंदोबस्ताविषयींची हकीकत लिहून पाठवीत, व तोही त्याचप्रमाणें त्यांना हुकूम पाठवीत असे. त्या बंडाव्यांत फारसा जीव नव्हता; पण त्यापासून त्रास होत असे, आणि वसूलवासलातीच्या कामास फार हरकत होत असे.

सन १५८४ च्या आरंभीं अकबर फत्तेपूर शिक्रीसच होता. या सालीं बंगाल्यांतील बंडावा मोडून स्वस्थता झाली; गुजराथेंत एक बंड उपस्थित झालें होतें, तें मोडलें; अशीरगड व बऱ्हाणपूर येथील सुभेदारानें बंड केलें होतें; दक्षिणेंत गडबड चालली होती; व अकबराचा भाऊ काबुलास सुभेदार होता तो मरण पावला. या

सर्व गोष्टींचा बंदोबस्त करण्यांत येऊन काबुलच्या सुभेदारीवर दुसऱ्या एका इसमाची नेमणूक झाली. या वर्षाच्या अखेरीस राज्यांत चोहोंकडे आबादानी होऊन गेलेली होती.

बादशहाच्या आश्रयाखाली असणाऱ्या मांडलिक संस्थानिकांत जे त्याचे अत्यंत दृढ स्नेही होते त्यांपैकीं जयपूरचा राजा भगवानदास हा होता. त्यानें स्वतः बादशहाच्या फौजेबरोबर अतिशय उत्तम कामगिरी बजाविली होती इतकेंच नाहीं, तर त्याचा पुतण्या मानसिंग हा बादशाही फौजेंतील एक मोठा मनसबदार होता. या सुमारास हा रजपूत राजपुत्र पंजाबचा सुभेदार होता. त्याच्या घराण्यांतील एक मुलगी अकबरानें आपला पुत्र सलीम—जो पुढें जहांगीर बादशहा ह्मणून प्रसिद्ध झाला—त्याच्याकरितां वधु पसंत केली. हें लग्न फत्तेपूर-शिक्री येथें मोठ्या थाटानें व समारंभानें झालें. या कारकीर्दीपर्यंत, रजपूत राजांनीं मुसलमानी राजघराण्याशीं शरीरसंबंध करण्याविषयींच्या विचाराचा अत्यंत तिरस्कारपूर्वक निषेध केला होता. पण अकबराच्या मनांत सर्वांची एकी करावयाची होती, व जात किंवा धर्म यांच्या भेदामुळें मनुष्याच्या अंगच्या गुणांत कांहीं फरक होतो असें नाहीं, हें मुख्य तत्त्व पूर्णपणें अमलांत आणून दाखवावयाचें होतें. या संबंधांत त्याला अनेक अडचणी आल्या व अनेक लोकांच्या मनांतील किंतु काढून टाकावे लागले. त्यांत रजपूत राजाच्या मनांतील किंतु काढण्यास त्याला फारच प्रयास करावे लागले. तरी मेवाडच्या राण्याच्या मनांतील हट्ट व अभिमान त्याला शेवटपर्यंत नाहींसा करितां आला नाहीं.

इतर लोक अधिक मनमिळाऊ असून, आजवर हिंदुस्थानांत अश्रुतपूर्व अशा कित्येक मतांचा अकबर हा संस्थापक आहे ही गोष्ट त्यांनीं मान्य केली. त्याच्या दृष्टीनें, गुण तो गुणच असून तो हिंदु राजाच्या आंगचा असो किंवा उजबक मुसलमानाच्या आंगचा असो, त्या जविषयीं त्याच्या मनांत दुजा भाव नसे. खऱ्या गुणी व योग्य लोकांस मोठमोठ्या हुद्यांच्या जागा व इतर प्रकारचे मानमरातब प्राप्त होण्याला त्यांच्या जातीमुळें किंवा धर्मामुळें हरकत होत नसे. या कारणानेंच भगवानदास, मानसिंग, व तोडरमल्ल यांच्या

सारख्यांना, या मुसलमान बादशहाच्या अमलाखालीं, ते स्वतंत्र असतांना जितका त्यांचा मानमरातब व योग्यता राहण्याचा संभव होता, त्याहूनही पुष्कळ अधिक योग्यता व मानमरातब आपल्याला प्राप्त झाल्याचें दिसून आलें. ते बादशाही प्रांतांचे सुभेदार होते, व त्यांच्या हुकुमांत बादशाही फौजा असत. त्यांच्यावर बादशहाचा पूर्ण विश्वास असे, व तो आपल्या अत्यंत गुप्त सल्लामसलतींत देखील त्यांना घेत असे. एकंदरींत, पूर्वींचे सर्व वैरभाव व वाद मिटवून टाकून, ठिकठिकाणीं स्वतंत्र असलेल्या राजे लोकांपैकीं जे आपल्यास अनुसरून वागतील त्यांचें त्यांच्या त्यांच्या राज्यांतलें महत्त्व व अधिकार कमी न होऊं देतां, व कोणाचाही मानमरातब किंवा स्वाभिमान कमी न होऊं देतां, आजवर एकमेकांविरुद्ध व निरनिराळे असलेले सर्व प्रांत एकाच मुख्य वरिष्ठ सरकारच्या ताब्यांत आणण्याचें अकबराच्या मनांत होतें.

आपण व आपल्या कुटुंबांतील माणसांनीं एतद्देशीय राजे लोकांच्या मुलींशीं लग्नें करणें हें एक साधन वरील हेतु सिद्ध करण्याकरितां अकबरानें योजिलें. लग्नासारखें एकी करण्याचें दुसरें कोणचेंही साधन नाहीं, हें तो जाणत होता. प्रत्यक्ष गादीच्या मालकाशीं किंवा युवराजाशीं शरीरसंबंध झाल्यानें आपण तितके अधिक कायम व बिनघोर झालों असें रजपूत राजांच्या मनांत अर्थातच बिंबून गेलें. पूर्वीं हिंदुस्थानाची स्थिति कशी होती, पांचशें वर्षांच्या मुसलमानी धामधुमीमुळें सर्वत्र कसे तंटेबखेडे, वैरभाव व अव्यवस्था माजून गेलेली होती, आणि या बादशहानें पोरवयांत व अनुभवशून्य स्थितींत गादीवर बसूनही जिंकून घेतलेल्या सर्व प्रदेशांत कशी स्वस्थता, न्यायइनसाफ, व सर्वांशीं समान वर्तन ठेविलें, व या गोष्टी अमलांत आणण्याकरितांच केवळ नवीन प्रदेश कसे जिंकून घेतले, जात व धर्म या सबबीवर तो कोणाही मनुष्याविषयीं पक्षपात किंवा भेदबुद्धि दाखवीत नाहीं, इत्यादि अनेक गोष्टींचा त्या लोकांनीं विचार केल्यावर, अकबराच्या वर्तनांत, सर्व जगास सौख्य देणारे व केवळ ईश्वरासच शोभणारे असे सामान्य मनुष्याच्या गुणांहून कांहीं

विशेष गुण आहेत असें त्यांना वाटलें असेल यांत संशय नाहीं. कारण ईश्वर अवतार घेतो या गोष्टीवर त्यांची श्रद्धा असे.

त्याचें सर्वांशीं समतेचें वर्तन इतकें प्रांजल असे, त्यानें एकदां कोणास अभय दिलें कीं तें इतकें पक्कें असे, व त्याच्या वर्तनाचीं तत्त्वें इतकीं प्रौढ व उदार असत कीं, जरी त्या रजपूत राजांचीं मनें त्यांच्या कुळशीळामुळें, धर्मामुळें व नेहमीं त्यांच्या सभोंवतीं असणाऱ्या लोकांच्या संगतीमुळें अर्थातच वेगळ्या प्रकारचीं झालीं होतीं, तरी अकबराच्या या मोहक गुणास ते वश झाले. या नव्या व्यवस्थेचें मुख्य व आधारभूत महातत्त्व ह्मटलें ह्मणजे सर्वत्र समदृष्टि ठेवणें हें होतें. हिंदुव्यतिरिक्त इतर सर्व लोक मलिन व अपवित्र होत असें सर्व रजपूत हिंदु मानीत असत; व हा किंतु फार दिवसांपासून त्यांच्या मनांत बाणून गेलेला होता. तो या वरील महातत्त्वास प्रत्यहीं आड येत असे. हा किंतु तुम्ही मनांतला काढून टाका असें जेव्हां अकबरानें त्यांना सांगितलें, तेव्हां एक मोठा हिंदु राजा शिवाय करून बाकी सर्वांनीं त्याचें हें तत्त्व मान्य केलें. असल्या तत्त्वाचा संकोच न करणें, व आपल्या अकुंचित धर्म-समजुतींपैकीं, दुसऱ्या जातीच्या लोकांशीं शरीरसंबंध न करणें ही एक समजूत व्यवहारांत सोडून देणें, यांच्या योगानें, ज्या राज्यव्यवस्थेमुळें आपल्या देशास स्वस्थता व आबादी प्राप्त होऊन आपणास मान व प्रतिष्ठा मिळत आहे, तिचें दृढीकरण झाल्यावांचून राहणार नाहीं हें त्यांच्या तेव्हांच लक्षांत आलें.

अकबराच्या कारकीर्दीच्या एकतिसाव्या वर्षाच्या आरंभीं त्याचा भाऊ काबूल येथें मरण पावल्याचें वर्तमान त्याला समजलें. तसेंच सरहद्दीवरील बदक्शान प्रांतावर उजबक लोकांनीं स्वारी केली असून ते काबुलावर येण्याच्या बेतांत असल्याचेंही वर्तमान त्याच्या कानीं आलें. ही स्थिति बरीच भयंकर होती. तेव्हां आपण स्वत: तिकडे गेल्यावांचून चालणार नाहीं, असें अकबरास दिसून आलें. म्हणून नोव्हेंबर महिन्यांत तो फौज घेऊन पंजाबाकडे निघाला. पुढील महिन्याच्या अखेरीस तो सतलजवर पोहोंचला. तेथून तो थेट रावळपिंडीस गेला. तेथें, काबुलाकडील व्यवस्था आपल्यास सोईवार अशीच

लागेल, असें त्याला कळल्यावरून तो पुढें न जातां अटकच्या किल्ल्यास गेला. तेथून त्यानें भगवानदासाबरोबर एक फौज काश्मीर घेण्याकरितां, दुसरी बलूची लोकांचें पारपत्य करण्याकरितां, व तिसरी स्वातवर स्वारी करण्याकरितां, अशा तीन फौजा रवाना केल्या. यांपैकीं तिसऱ्या फौजेचा पराजय झाला. यूसफजई लोकांनीं मोंगल फौजेचा पहिला हल्ला परतविला इतकेंच नाहीं, तर बादशहानें आपल्या अत्यंत कृपेंतला राजा बिरबल याच्याबरोबर पाठविलेली कुमक हल्ला करणाऱ्या फौजेस येऊन मिळाली असून त्या दोहोंचाही मोड झाला, व एकंदर सैन्यास मागें परतावें लागलें. या स्वारींत बादशहाचे आठ हजार लोक पडले, त्यांत राजा बिरबलही[1] पडला.

---

१ राजा बिरबल जातीचा ब्राम्हण होता. तो चांगला कवि असून गायनवादनांत फार निष्णात होता. त्याची औदार्याबद्दल व खुषमिजाजीबद्दल फार प्रसिद्धि होती. त्याचीं कवनें, म्हणी व हास्यपर चुटके अद्यापि हिंदुस्थानांतील लोकांच्या तोंडीं आहेत. त्याचें मूळचें नांव महेशदास असें होतें. तो भाटाचा धंदा करीत असे. तो फार गरीब पण अतिशय बुद्धिवान् असून त्याची स्मरणशक्ति फारच उत्तम होती. अकबर गादीवर बसल्यानंतर लौकरच तो काल्पीहून बादशहाच्या दरबारांत आला, व त्याच्या रंगेलपणामुळें त्याची दरबारांत तेव्हांच चढती झाली. तो हिंदी भाषेंत कविता फार उत्तम करीत असे. यावरून अकबरानें त्याला ' कविराज ' अशी पदवी दिली होती.

अकबराच्या कारकीर्दीच्या १८ व्या वर्षी नगरकोटचा राजा जयचंद याच्यावर बादशहाची इतराजी झाली. तेव्हां त्यानें त्याला कैदेंत टाकिलें, व नगरकोट बिरबलाला जहागीर देऊन त्याला 'राजा' ही पदवी दिली. परंतु जयचंदाचा पुत्र बुधचंद यानें नगरकोटाचे दरवाजे बंद करून लढाईची तयारी केली. तेव्हां हुसेनकुलीखानाला बादशहानें नगरकोट सर करण्यास हुकूम केला. त्याप्रमाणें त्यानें जाऊन त्या किल्ल्याला वेढा घातला. इतक्यांत त्याला इब्राहीम मिर्जाच्या पारपत्यास जावें लागलें. यामुळें नगरकोट पाडाव झाला नाहीं यावरून तो प्रदेश बिरबलाच्या कबज्यांत आल्याचें दिसत नाहीं. अकबर टाकोटाक पाटण व अमदाबाद येथें हि० स० ९८१ मध्यें गेला, ते वेळीं बिरबल त्याच्या बरोबर होता.

बिरबलाकडे दरबारी वकिलीचीं कामेंही कधीं कधीं असत असें दिसतें. तो राय लोणकरण याच्याबरोबर डोंगरपूर येथें गेला होता. कारण तेथील राजा अकबराला मुलगी देण्यास तयार झाला होता. तसेंच इ० स० १५८४ त त्यानें व झैनखानकोका यानें राजा रामचंद्र वाघेला याला दरबारांत आणिलें.

बिरबल बहुधा दरबारांत बादशहाजवळच रहात असे. इ० स० १५९० त झैन-

मोंगल फौजेचा आजवर असा नाश व पराभव कधीं झाला नव्हता. याचा वचपा काढण्याकरितां बादशहानें आपला उत्तम सेनापति राजा तोडरमल्ल यास पाठविलें, व जयपुरचा राजा मानसिंग यास त्याच्या मदतीस धाडलें. या दोघांनींही मोठ्या चातुर्यानें व सावधगिरीनें फौजा चालविल्या, व जागजागीं मोर्चे बांधीत बांधीत ते पुढें सरसावले, आणि अखेरीस खैबर-घाटांत त्यांनीं शत्रूचा पुरा पराभव केला.

इकडे काश्मिरास पाठविलेल्या फौजेला याहून थोडें जास्ती यश आलें होतें. ती फौज शुलियास नांवाच्या घाटीशीं गेली, तों काश्मीरच्या मुसलमान अंमलदारानें ती घाटी रोखून टाकली असल्याचें

---

खानकोका यानें बिजोर व स्वात या प्रदेशांतील यूसफजई लोकांवर स्वारी केली. त्याच्या साहाय्याला दरबारांतून सैन्य पाठवावें लागलें. त्या सैन्याबरोबर हकीम अबुलफत्ते यासह बिरबल याचीही रवानगी झाली. या मोहिमेवर अबुलफजल किंवा बिरबल यांतून कोणाला पाठवावें याचा निर्णय अकबरानें दैवी रीतीनें केला. त्यांत बिरबलाचेंच नांव निघालें. पण तें अकबराला रुचलें नाहीं असें ह्मणतात. (हें एका तन्हेनें बरेंच झालें. नाहीं तर आईन-ए-अकबरीसारखा अद्वितीय ग्रंथ जगापुढें आला नसता.) या मोहिमेचा शेवट वर दिलाच आहे.

बिरबलाच्या मरणानें अकबराला फारच खेद झाला. तितका खेद, या मोहिमेंत एकंदर जितके मोठमोठे सरदार व शिपाई पडले त्यांच्या मरणानें देखील त्याला झाला नाहीं. अकबर ह्मणाला, 'या अल्ला! त्या घाटींतून त्याचें प्रेत देखील दहन करण्यासाठीं धुडून आणिलें नाहीं ना!' पण पुढें त्यानें ह्मटलें, 'बिरबल आतां पार्थिवअशापासून व नश्वर जड देहरूपी शृंखलेपासून मुक्त झाला आहे. त्याच्या देहाच्या शुद्धतेला सूर्यकिरणच पुष्कळ झाले. आतां त्याला अग्निसंस्काराची कांहीं अवश्यकता नाहीं.'

तथापि बिरबल या मोहिमेंत मेल्याविषयीं अकबराची पक्की खात्री झाली नव्हती. दोन वेळां बिरबल पराभव पावल्यामुळें लज्जित होऊन तो वैराग्याच्या वेषानें फिरत असल्याचें बादशहाच्या कानीं आल्यावरून त्यानें फार बारकाईनें तपास केला. पण बिरबलाचा पत्ता लागला नाहीं. यावरून अकबराचें त्याच्या ठायीं असलेलें प्रेम व्यक्त होतें. पुष्कळ तत्कालीन दरबारी मुसलमान लोक बिरबलाचा फार द्वेष करीत असत. त्यांत बदौनी व शहाबाजखान हे मुख्य होत. त्यांनीं त्याच्याविरुद्ध पुष्कळ गोष्टी लिहून ठेविल्या आहेत.

त्याचो वडील पुत्र लाला हा दोनशेंचा मनसबदार होता. तो अतिशय उधळ्या होता. त्याचा बढती झाली नाहीं. त्यानें आपली जिंदगी सर्व उधळली, व दरबारच्या कामाचा तिरस्कार करून मनसोक्त वागण्याकरितां इ० स० १६०१ च्या सुमारास तो वैरागी होऊन निघून गेला.

आढळून आलें. तेव्हां सामानसुमान येईपर्यंत ती फौज थोडे दिवस तेथेंच राहिली. इतक्यांत पाऊस व बर्फ पडूं लागलें. तेथून ती फौज पुढें जाण्यापूर्वींच यूसफजई लोकांनीं केलेल्या पराभवाचें वर्तमान आलें. यामुळें त्या फौजेच्या लोकांच्या अंगांत राहिलेलें अवसान नाहींसें झालें; व त्या सेनापतींनीं, काश्मीरच्या अधिकाऱ्याशीं, त्यानें बादशहाचा नांवाचा मांडलिक ताबेदार व्हावें या शर्तीवर तह केला; आणि ते बादशहाकडे परत आले. त्यांच्या या नामर्दपणाबद्दल बादशहानें त्यांना दरबार बंद केला, व त्यांची नीटशी भेटही घेतली नाहीं. परंतु कोणावरही फार वेळ रोष धरण्याचा मुळीं बादशहाचा स्वभावच नव्हता. त्यास्तव लौकरच त्यानें त्यांना क्षमा केली.

तिन्हीपैकीं बलूची लोकांवरील स्वारींत मात्र बादशाही फौजेस तावडतोब जय मिळाला. हे दांडगे व लढवय्ये लोक तेव्हांच बादशहाच्या ताब्यांत आले. तोडरमल्ल व राजा भगवानदास याचा पुतण्या ह्मणजे जयपूरचा युवराज राजा मानसिंग, यांच्या खटपटीनें व शौर्यानें खैबर-घाट मोकळा होतांच, बादशहानें राजा मानसिंगाला काबूलचा सुभेदार नेमून बरोबर बरीचशी फौज देऊन तेथें पाठविलें, व यूसफजई मुलुखांत त्याच्या ऐवजीं दुसरी फौज पाठविली; आणि पेशावर येथील ठाणें चांगलें भक्कम केलें. अकबर स्वतः लाहोरास परत आला होता, तेथून त्यानें काश्मिरावर दुसरी स्वारी करण्यास फौज पाठविली ही फौज घाटीजवळ जाऊन पोहोंचते तोंच इ० स० १५८७ च्या उन्हाळ्यांत श्रीनगर येथील अधिकाऱ्याविरुद्ध तेथील लोकांनीं बंड केलें. यामुळें मोंगल फौजेला तो देश जिंकून घेण्याला मुळींच अडचण पडली नाहीं. तेव्हांपासून तो प्रदेश मोंगल बादशहाच्या राज्यांत सामील झाला, व अकबरानंतरचे बादशहा तेथें उष्णकाळांत जाऊन राहूं लागले. खैबर-घाटाच्या तोंडाशीं जमरूड गांव आहे, तेथें पोहोंचेपर्यंत मानसिंगाला पहाडी लोकांशीं पुनः एक वेळ लढाई करावी लागली. त्यानें काबुलास जाऊन तेथें आपला अंमल चांगला बसविला, व कायमची सर्व व्यवस्था केली. परंतु काबुली लोकांनीं व तिकडील निरनिराळ्या जातींच्या नायकांनीं, आपल्यावर रजपूत राजा अंमलदार असणें इष्ट नाहीं

असा गिल्ला केल्यावरून, अकबरानें त्याला तेथून काढून बंगाल्याच्या सुभेदारीवर पाठविलें; कारण त्या वेळीं बंगाल्यांतही एखाद्या चांगल्या हुशार व करड्या अंमलदाराची फार जरूर होती. काबुलास कोणी एक मुसलमान सुभेदार पाठविण्यांत आला, व तिकडे एक वेळ स्वतःहीं जाऊन येण्याचा इरादा बादशहानें जाहीर केला.

इ० स० १५८८ त प्रथम बादशहानें सिंध प्रांत कबज्यांत आणिला, व पुढच्या वर्षाच्या अवलीस तो काश्मिरास जाण्यास निघाला. भीमबर नांवाच्या घाटाशीं पोहोंचल्यावर त्यानें आपला जनानखाना शहाजादा मुराद याच्यापाशीं तेथेंच ठेविला, व तो स्वतः टाकोटाक श्रीनगरास गेला. जवळचा मुलूख पहात पर्जन्यकाळ सुरू होईपर्यंत तो तेथेंच राहिला. नंतर त्यानें जनानखाना रोहटासकडे रवाना केला. पुढें काबुलास जाण्यास निघाल्यावर अटक येथें त्याची व जनानखान्याची गांठ पडली. तिकडील सर्व घाट खुले होते, व पहाडी लोकांकडून त्रास होण्याचेंही बंद झालें होतें. सबब अकबर अटक येथें सिंधूपार उतरून स्वस्थपणें काबुलास पोहोंचला. तो आसपासचीं वर्णनीय स्थळें व उपवनें पहात तेथें दोन महिने राहिला. तेथील लहानथोर सर्व लोकांस त्याच्या राहण्यानें फायदा झाला. तेथेंच ता० १० नोव्हेंबर सन १५८९ रोजीं राजा तोडरमल्ल मरण पावल्याचें वर्तमान त्याला कळलें. त्याच दिवशीं त्याचा दुसरा एक विश्वासू हिंदु स्नेही राजा भगवानदास मरण पावला. तेव्हां अकबरानें काबूल, गुजराथ, व जोनपूर येथें दुसरे अंमलदार नेमून पाठविले, व तो हिंदुस्थानाकडे येण्यास निघाला.

बंगाल्याची व्यवस्था बादशहानें पूर्वींच लाविली होती. तो इ० स० १५९० च्या आरंभीं परत लाहोरास पोहोंचला. तेथें असतांना त्याच्या प्रिय दाईचा मुलगा, गुजराथचा सुभेदार, यानें काठेवाड व कच्छ येथील राजांशीं लढाई सुरू केल्याचें वर्तमान आलें. या लढायांमुळें अखेरीस ते दोन्ही प्रांत बादशहाच्या हातीं आले, व या सर्व झगड्याला कारणीभूत अशा तेथल्या अफगाण राजानें प्राण दिला. लाहोरास असतां बादशहानें सिंध प्रांताचा पक्का बंदोबस्त करण्याची व्यवस्था केली; कारण तेथें अलीकडे बरीच अव्यवस्था

झालेली होती. हा प्रांत पुर्तेपणीं कबज्यांत आणण्याचें काम प्रथम वाटलें होतें त्याहून कठिण गेलें. तिकडे पुष्कळसें सैन्य पाठवावें लागलें, व वेळोवेळीं मोठें धैर्य धरून अतिशय सावधगिरी ठेवावी लागली. ही मोहीम पुरी होण्याला दोन वर्षें लागलीं. तों वर कासिमरांत बंड झालें होतें.

या दोन वर्षांत बादशहाचें ठाणें लाहोरासच होतें. सिंध प्रांतांत पूर्णपणें जय प्राप्त झाल्याचा थोडासा सुगावा लागतांच अकबरानें बहुतेक फौज भीमबरकडे पाठविली, व तो स्वतः चिनाब नदीच्या किनाऱ्यावर शिकार करीत होता तो तसाच तिकडे गेला. त्याच्या फौजेच्या बिनीच्या लोकांनीं मोठ्या शौर्यानें व शर्थीनें एक घाटी घेतल्याचें त्याला वाटेंतच कळलें. यामुळें या लढाईचा निकालच लागला. बंडवाल्या सरदाराच्या फौजेनें आपल्या धन्यावर उलटून त्याच्यावर रात्रींच हल्ला केला, व त्याचें शिर कापून अकबराकडे पाठविलें. हा सरदार मेल्यावर सर्व वादच मिटला. अकबर श्रीनगरास आठ दिवस राहिला, व तेथील व्यवस्था लावून बारामुला नावाच्या घाटीनें रोहटासवरून लाहोरास आला. तेथें बंगाल्याचा सुभेदार, राजा मानसिंग, यानें ओरिसा प्रांत काबीज केल्याचें त्याला कळलें. मानसिंगानें त्या प्रांतांतून १२० हत्ती बादशहाकडे लाहोरास नजर पाठविले होते.

दक्षिणेकडील प्रांत जिंकून घेण्याच्या कामास पुढील वर्षी सुरुवात झाली. नंतर पुढें आठ वर्षेंपर्यंत तो क्रम चालू राहून अखेरीस बहुतेक सफल झाला. दौलताबाद, खेरला-खरडा, नाशिक, अशीरगड व अहमदनगर वगैरे मजबूत शहरें व किल्ले बादशहाच्या कबज्यांत आले. अहमदनगरच्या खालचा प्रदेश इ० स० १६३७ पर्यंत पुर्तेपणीं बादशाही अमलांत आला नाहीं, तरी अकबराचा या प्रांतावर जो दाब बसला तो पुढें सुमारें शंभर वर्षेंपर्यंत तरी निदान मोंगलांच्या चांगला उपयोगीं पडला.

दक्षिणेकडील मोहिमेंत तीन गोष्टी लक्षांत ठेवण्यासारख्या झाल्या एक, या मोहिमेंत स्वतंत्रपणें कामें करण्याकरितां निरनिराळ्या प्रांतांतून पाठविलेल्या निरनिराळ्या सरदारांच्या आपसांतील चुरशी व

भांडणें. या भांडणांमुळें अकबराला प्रथम आपला विश्वासू मित्र अबुलफजल याला तिकडे पाठवावें लागलें, व पुढें स्वतः तिकडे जावें लागलें. दुसरी गोष्ट, अकबराचा पुत्र शहाजादा मुराद याचा जालना येथें अत्यंत मद्यपान केल्यानें झालेला मृत्यु; व तिसरी गोष्ट, युवराज सलीम याच्या चिथावणीनें अबुलफजल याचा आग्र्यास परत येत असतां झालेला खून.

अकबर चौदा वर्षें लाहोरासच ठाणें देऊन राहिला होता. त्याला वरील गोष्टींमुळें इ० स० १५९८ त दक्षिणेंत जावें लागलें. त्यानें अहमदनगर व अशीरगड घेऊन, शहाजादा दानियल याला खानदेश व वऱ्हाड येथील सुभेदार नेमिलें; व अबुलफजल याच्याकडे अहमदनगराखालील प्रदेश जिंकून घेण्याचें काम सोंपविलें. तो इ० स० १६०१ च्या वसंत ऋतूंत आग्र्याकडे गेला. त्याला आग्र्याकडे जाण्याला जीं कारणें झालीं तीं फारच चमत्कारिक व खेदकारक होतीं. शहाजादा सलीम याच्याविषयीं लहानपणापासून अकबराला अतिशय काळजी होती. तो मोठा होत चालला तशी ती काळजी कमी न होतां उलटी वाढतच गेली. सलीम—जो पुढें जहांगीर बादशहा म्हणून प्रसिद्ध झाला—तो जात्याच फार क्रूर व दुष्ट होता. त्याला आत्मसंयमनाचें वारें देखील लागलेलें नव्हतें. बादशहाजवळ अबुलफजल याचें फार वजन असे, येवढ्याकरितांच वास्तविक पहातां सलीम हा त्याचा अत्यंत तिरस्कार करीत असे. परंतु बाह्यात्कारीं, अकबराला खऱ्या जुन्या मुसलमानी धर्मापासून दुसरीकडे वळविण्याला मुख्य कारण काय तो हाच असून यामुळें तो आपणास आवडत नाहीं, असें तो दाखवीत असे. तेव्हां अबुलफजल याला दक्षिणेंत पाठविल्यानें हा प्रकार कांहीं तरी मिटेल असें अकबराला वाटलें होतें. पुढें स्वतः दक्षिणेंत जाण्यास निघण्यापूर्वी त्यानें सलीमास युवराज नेमून, अजमीरच्या सुभेदारीचें व मेवाडच्या राण्याबरोबर पुनः उपस्थित झालेल्या लढाईचा निकाल लावण्याचें काम त्यास सांगितलें होतें. तसेंच त्याला बरें वाटण्याकरितां त्यानें त्याचा मामा मानसिंग यासही त्याच्याबरोबर मदतीस दिलें होतें.

ते दोघे मेवाडाकडे जाण्यास निघाले, इतक्यांत बंगाल्यांत बंडावा

उपस्थित झाल्याची बातमी आली. यामुळें मानसिंग तावडतोब त्याच्या बंदोबस्ताकरितां गेला. सलीमाजवळ बरीच फौज असून त्याच्याजवळ कोणी चांगला सल्लागार नव्हता. तेव्हां बादशहा दक्षिणेंत आहे अशी संधी पाहून त्यानें एकदम गादी बळकावण्याचा दुष्ट हेतु मनांत आणिला, व तो मेवाडाकडे न जातां तावडतोब आग्रयास परत आला. तेथील इमानी किल्लेदारानें किल्ल्याचे दरवाजे उघडून त्याला आंत घेतलें नाहीं; तेव्हां त्यानें अलाहाबादचा किल्ला हस्तगत करून घेतला, आणि अयोध्या व बहार हे प्रांत कबज्यांत घेऊन तो स्वतंत्र राजा बनला.

वरील वर्तमान अकबरास कळल्यावरून त्याला दक्षिणेंतून परत जावें लागलें. सलीमाच्या हातून जें वर्तन घडलें तें त्याच्या अंगच्या अत्यंत तापट व स्वेच्छाचारी स्वभावामुळेंच घडलें आहे असा विचार करून, त्याच्यावर सक्ती न करितां त्याला सामोपचारानेंच मार्गावर आणण्याचा अकबरानें निश्चय केला. त्यानें त्याला एक पत्र पाठविलें; त्यांत, तत्काल आग्रयास परत आल्यास माझें प्रेम तुजवर पूर्ववत् कायम राहील, पण दांडगाईचें वर्तन चालविल्यास मात्र परिणाम नीट होणार नाहीं, असें त्यानें लिहिलें. हें पत्र सलीमास पोहोंचलें तेव्हां अकबर थोडयाशाच पण सर्व राज्यांतील अगदीं निवडक अशा योद्ध्यांच्या सैन्यानिशीं आग्रयाकडे येत होता. आपलें वर्तन अगदीं वेडगळपणाचें असून आपण तेंच कायम ठेविलें तर आपण खास गादीला मुकूं, असें पाहून सलीमानें नम्रपणानें बादशहास उत्तर लिहिलें. पण त्याचें वर्तन त्या उत्तराला अनुरूप नव्हतें. कारण बहुतेक बादशाही फौज दक्षिणेंतच राहिली आहे असें पुढें जेव्हां त्याला समजलें, तेव्हां तो खूब मोठी फौज घेऊन मोठ्या थाटानें बादशहापुढें जाण्याच्या इराद्यानें वाटेंत नवीन लोकांची भरती करीत इटाव्यास[१] गेला. पण अकबर मुळींच त्याच्या फांसांत आला नाहीं. त्यानें त्याला लागलीच, एकतर थोड्याशा लोकांनिशीं आग्रयास यावें, किंवा परत अलाहाबादेस जावें, ह्मणून सक्त हुकूम पाठविला.

[१] इटावा हें बरेंच मोठें शहर आग्रयाच्या दक्षिणेस सुमारें ३६ कोसांवर आहे. हल्लीं तेथें रेलवेचें स्टेशन आहे.

तेव्हां सलीम परत गेला. त्याला या वेळीं बंगाला व ओरिसा या प्रांतांची जहागीर मिळण्याविषयींचें वचन बादशहानें दिलें होतें असें वाटतें. कसेंही असो, हे प्रांत त्याला जहागीर मिळाले खरे. या कामांत हा वरील मार्ग जो अकबरानें स्वीकारला त्यास कारण, त्याला आपली स्वतःची स्थिति कांहीं अंशीं निर्बल वाटली असावी, किंवा आपल्याच पुत्राबरोबर आपण युद्ध करणें योग्य नाहीं असें वाटलें असावें, अथवा पुत्राविषयींच्या नैसर्गिक प्रेमाचा त्याच्या मनावर पगडा बसला असावा, यांपैकीं कोणती गोष्ट झाली असावी हें कांहींच सांगतां येत नाहीं. कसेंही असो, त्यानें आपल्या बंडखोर मुलास या कामीं ज्या सवलती दिल्या, त्यांचा कांहींच चांगला परिणाम झाला नाहीं हें त्याचें त्यालाच पुढें कळून आलें. कारण सलीम स्मरणाचा मोठा धड असून कोणाविषयीं त्याच्या मनांत एकवार द्वेष बाणला म्हणजे तो कदापि निघत नसे. अबुलफजल[1] दक्षिणेंतून थोड्याशाच लोकांनिशीं परत येत असल्याचें ऐकून त्यानें ओर्च्छाच्या[2] राजाकडून अंत्री येथें त्याला लुटवून त्याचा खून करविला[3].

अकबराच्या या प्रिय मित्राच्या मरणामुळें त्याच्या मनास मोठाच धक्का बसला. सुदैवानें आपल्या पुत्राचें या अघोर कृत्यांत अंग आहे असें अकबरास कळलें नाहीं. यांत मुख्य गुन्हेगार काय तो ओर्च्छाचा राजाच आहे, असें समजून त्यानें त्याच्यावर फौज पाठविली. तेव्हां तो नीच व दुष्ट मारेकरी जंगलांत पळून गेला. तो अकबर मरेपर्यंत बाहेर पडला नाहीं. पुढें अर्थात् त्याला तसें लपून बसण्याचें प्रयोजन राहिलें नाहीं. असो. नंतर पितापुत्रांचा समेट झाला, व बादशहानें सलीमाला मेवाडचा दंगा मोडण्याकरितां पाठविलें. मेवाडचा राणा प्रतापसिंग यानें अखेरपर्यंत मोंगलांची ताबेदारी

१ अबुलफजल याजबद्दल सविस्तर वर्णन पुढें मूळ ग्रंथांतच आलें आहे.

२ ओर्च्छा हें लहानसें संस्थान बुंदेलखंडांत झांशीपासून पांच कोसांवर आहे. हल्लीं याचें उत्पन्न सुमारें आठ दहा लक्षांचें आहे.

३ अकबराचें मन खऱ्या धर्मापासून चलित करण्यास अबुलफजल मूळ कारण झाला होता, सबब तो मारला गेला हें योग्य झालें, असें सलीमानें आपल्या चरित्रांत लिहिलें आहे. त्यानें अखेरपर्यंत ओर्च्छाच्या राजावर मोठी मेहेरबानी ठेविली होती.

पतकरण्याचें नाकबूल केल्यामुळें हा दंगा उद्भवला होता. इ० स० १५७६ त हळदी-घाटच्या लढाईंत पराभव पावल्यानंतर प्रतापसिंग जंगलांत भटकत होता. बादशाही फौजा अगदीं त्याच्या पाठीस लागल्या होत्या. बरेच दिवस त्याला दुर्दैवानें अतिशय घेरलें होतें. अनेक वेळ पराभव पावल्यावर, त्यानें आपलीं बायकामुलें व विश्वासू स्नेही यांसह मेवाड सोडून जाऊन सिंधु नदीवर नवीन राज्य स्थापन करण्याचा निश्चय केला होता, व तो तिकडे जाण्यास निघालाही होता. इतक्यांत त्याच्या अद्वितीय स्वामिभक्तिनिष्ठ दिवाणानें त्याला युद्धाचें साधन मिळवून दिलें, तेव्हां पुनः एकवार मोहीम करून पाहण्याचा त्यानें निश्चय केला. नेहमीं विजयी झाल्यानें त्याचे शत्रु बेपर्वा झाले होते. त्यांच्यावर एकदम हल्ला करून त्यानें इ० स० १५८६ मध्यें चितोड व मंडलगड खेरीज करून बहुतेक मेवाड प्रदेश परत घेतला. चितोड त्याच्या हातून गेल्यावर त्यानें उदेपूर ही आपली राजधानी केली होती. यावरूनच पुढें या राज्यास उदेपूरचें राज्य असें नांव पडलें. प्रतापसिंग इ० स० १५९७ त मरण पावला. तो शेवटपर्यंत कोणासही हार गेला नाहीं. त्याच्या मागून त्याचा पुत्र राणा अमरा हा गादीवर बसला. त्यानें या वेळीं बादशाही फौजेची मेवाडांत बिलकूल दाद लागूं दिली नाहीं.

शहाजादा सलीम यास या वेळीं फार उत्तम संधी मिळाली होती. त्याच्या हाताखालीं बरीच मोठी फौज असून तिचा योग्य उपयोग झाला असता तर मेवाड देश जिंकण्यास ती पुरेशी होती. परंतु त्यानें या कामीं फारच अनास्था दाखविली, यामुळें अकबरानें त्याला परत बोलावून अलाहाबादच्या कांहीं अंशीं स्वतंत्र अशा सुभेदारीच्या हुद्यावर पाठविलें. तेथें तो ऐषआराम, दुराचार व इतर प्रकारचें स्वैरवर्तन यांत अगदीं गुंग होऊन राहिला. आपलें कर्तव्यकर्म व आपली इभ्रत यांविषयीं त्याला तिळमात्रही पर्वा राहिली नाहीं. फार काय, पण आपल्या अत्यंत विश्वासू सेवकांच्या जिवाविषयींही तो अगदीं बेफिकीर होऊन राहिला ! असें होतां होतां शेवटीं हें प्रकरण इतक्या थरास येऊन पोहोंचलें कीं, अकबर स्वतः अलाहाबादेस जावयास निघाला. त्याला वाटलें कीं, या योगानें तरी पुत्राचे हृदयांत प्रकाश पडेल तर पहावें. पण तो दोन मजला गेला नाहीं इतक्यांत त्याच्या आईची प्रकृति

फार बिघडल्याचें त्याला कळल्यावरून तो मागें परतला. तथापि अशा अशा उद्देशानें तो आपल्याकडे येण्यास निघाल्याचें ऐकूनच सलीमाच्या वर्तनांत व विचारांत एकदम पालट झाला, व बापाला येतां येत नाहीं असें पाहून तो स्वतःच थोड्याशा लोकांनिशीं दरबारांत येऊन हजर झाला. तेथें त्यानें बादशहाची पायधरणी केली. तरी त्याचें वर्तन सुधारलें असें नाहीं. त्याचा वडील पुत्र शहाजादा खुसरू याच्यांशीं त्याचीं नेहमीं भांडणें होत, व या गोष्टीची दरबारांत फार वाच्यता होत असे.

अकबर बादशहाला खरें पुत्रसुख कसें तें मिळालेंच नाहीं. त्याला प्रथम दोन जुळीं मुलें झालीं होतीं, तीं लहानपणींच गेलीं. तिसरा, किंवा ज्याला चुकीनें पहिला मुलगा ह्मणतात, तो शहाजादा सलीम होय. चौथा मुराद, याचें वर्णन पूर्वीं आलेंच आहे. पांचवा मुलगा दानियल हा उंच, धिप्पाड, धष्टपुष्ट, व सुंदर होता. त्याला घोडे व हत्ती यांचा भारी शौक असे. हिंदुस्थानी कविता करण्यांत तो कुशल असे. त्यालाही त्याचा भाऊ मुराद याच्याप्रमाणेंच मद्यपानाचें दुर्व्यसन होतें. तो याच सुमारास त्या व्यसनाच्या पायीं मरण पावला. त्याच्या मरणानें अकबराच्या मनाला फारच धक्का बसला. त्यानें आपलें हें व्यसन सोडावें ह्मणून अकबरानें पराकाष्ठा केली होती, व तें सोडून देण्याविषयीं त्याचें वचनही घेतलें होतें. बादशहाचे दरबारीं त्याचे नातूही बरेच होते. त्या सर्वांत शहाजादा खुर्रम—जो जहांगिरामागून शहाजहान या नांवानें बादशहा झाला—त्याजवर अकबराचें अत्यंत प्रेम होतें.

शहाजादा दानियल याच्या मरणाची वार्ता व त्याचें कारण हीं ऐकून बादशहास पराकाष्ठेचें दुःख झालें. त्या वेळीं तो आजारीच होता, व हा आजार अखेरचाच होणार, असें उघड दिसूं लागलें होतें. तेव्हां त्याच्यामागून गादीवर कोण बसणार, इकडे सर्वांचें लक्ष्य लागलें. त्याच्या पुत्रांपैकीं शहाजादा सलीम हाच काय तो जिवंत होता. परंतु अलाहाबाद, आग्रा, वगैरे ठिकाणच्या त्याच्या वर्तनावरून बहुतेक दरबारी लोकांचीं मनें त्याच्याविरुद्ध झालीं होतीं, व त्याचा पुत्र शहाजादा खुसरू हा सर्व तऱ्हेनें उत्तम व योग्य आहे,

असें प्रत्येकाचें मत झालें होतें. खुषरू हा जोधपूरच्या राजकन्येच्या पोटीं झालेला असल्यामुळें राजा मानसिंग याशीं त्यांचा निकट संबंध होता, व या वेळीं मानसिंग म्हणजे दरबारांत एक मोठेंच प्रस्थ होतें. शिवाय खुषरूचें लग्न, बादशाही सैन्याचा मुख्य अधिपति एक मुसलमान सरदार होता त्याच्या कन्येशीं झालेलें होतें. हा सरदार अकबराच्या प्रिय दाईचा पुत्र असल्यामुळें त्याचा राजघराण्याशीं संबंध होता. हे दोघेही मोठे सरदार, सलीमाच्या ऐवजीं खुषरूच गादीवर बसावा म्हणून खटपट करूं लागले.

हा यत्न सिद्ध होण्याकरितां, अकबर त्या वेळीं आग्र्याच्या किल्ल्यांत आजारी होता त्या किल्ल्यावर बंदोबस्ताकरितां त्यांनीं आपली फौज ठेविली. याच वेळीं अकबर मरण पावला असता तर तावडतोब यादवी सुरू झाली असती; कारण सलीम आपल्या हक्काकरितां लढल्यावांचून राहताना. परंतु या खटपटीची थोडीशी वार्ता कानीं येतांच सलीम हा आग्र्याहून थोड्या अंतरावर जाऊन राहिला. या आपल्या शेवटच्या दुखण्यांत सलीम जवळ नाहीं असें पाहून अकबराला वाईट वाटलें. अकबराला सर्व गोष्टी अगदीं कायदेशीर होणेंच आवडत असल्यामुळें त्यानें सर्व सरदार जवळ बोलाविले, व ‘ आपल्यामागें शहाजादा सलीमानेंच गादीवर बसावें, व शहाजादा खुषरू याला बंगालची सुभेदारी मिळावी ’ अशी आपली इच्छा उघडपणें त्यांजपाशीं प्रदर्शित केली.

अकबराचें पदरच्या लोकांवर असलेलें खरें खरें वजन या वेळच्याप्रमाणें पूर्वी कधींच स्पष्ट दिसलें नव्हतें. त्यानें या वेळीं, आपल्या कृतघ्न व कर्तव्यपराङ्मुख पुत्रानें गादीवर न बसण्याविषयीं यत्किंचितूही उद्गार काढला असता तर पुरे होतें. परंतु त्यानें त्याच्या वर्तीनें जे उद्गार काढले, त्याबरोबर सर्व मोठमोठ्या सरदारांनीं त्याची इच्छा पुरी करण्याचा, व साधारण मागें पुढें पाहणाऱ्यांनींही याच पक्षास सामील होण्याचा निश्चय केला. प्रत्यक्ष खुषरूचा सासरा फौजेचा मुख्य सेनापति, जो खुषरूच्या पक्षास पाठबळ मिळण्यासाठीं राजा मानसिंगास मिळाला होता, त्यालाही या वेळीं अकबराच्या शब्दास मिळालेला मान कमी करतां आला

नाहीं. त्यानें शहाजादा सलीमाकडे, तुम्हांस आह्मी साहाय्य करण्यास तयार आहों म्हणून गुप्तपणें निरोप पाठविला. या ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं मानसिंगाचें वजन फारच वाढलें होतें. त्यानेंही, आपल्या पक्षास कोणी नाहीं असें पाहून, सलीमानें त्याच्याकडे बोलणें लाविलें होतें तें मान्य केलें, व त्याला मदत करण्याचें कबूल केलें. गादी मिळण्याविषयीं पक्की खात्री झाल्यावर सलीम वाड्यांत अकबराकडे गेला. त्या वेळीं तो आसन्नमरण झालेला होता. अकबरानें त्याची मोठ्या प्रेमानें भेट घेतली. या भेटीची हकीकत सलीमानें लिहून ठेविली आहे ती पुढीलप्रमाणें आहे.

प्रथम प्रेमपूर्वक भेटणें झाल्यावर अकबरानें सर्व सरदारांना आपल्याजवळ बोलावून आणण्यास सांगितलें. तो सलीमास म्हणाला, 'आज बहुत वर्षें मजबरोबर ज्यांनीं जिवापाड श्रम केले असून जे माझ्या यशाचे वांटेकरी झाले आहेत, अशा लोकांत व तुझ्यांत कोणच्याही तऱ्हेचा बेबनाव असल्याचें मला पाहवत नाहीं.' सर्व सरदारांनीं आंत येऊन मुजरे केल्यावर तो त्यांस उद्देशून चार शब्द बोलला, व नंतर एकेकाकडे निरनिराळें पाहून त्यानें त्या प्रत्येकास म्हटलें, 'मजकडून आजपर्यंत तुमचा जर कांहीं अपराध झाला असेल तर त्याबद्दल तुम्हीं मला क्षमा करावी.' सलीम रडत रडत त्याच्या पायां पडला. अकबरानें त्याला आपली शिक्केकटार बांधवून दरबारी पोषाक घालण्याविषयीं आपल्या नोकरांस सुचविलें; आणि जनानखान्यांतील स्त्रियांची काळजी घेण्याविषयीं व आपले जुने मित्र व सोबती यांच्यावर प्रेम व दया करण्याविषयीं त्याला सांगून त्यानें खालीं मान केली व प्राण सोडिला.[१]

याप्रमाणें मोंगल बादशाहीचा खरा संस्थापक अकबर बादशहा याचा शांतपणें व स्वस्थ चित्तानें अंत झाला. तो आपल्या बापाहून व आज्याहून अधिक दैववान्, अधिक दूरदर्शी, अधिक चतुर व अधिक कल्पक होता. आणखी हेंही सांगणें इष्ट आहे कीं, त्याला प्रत्येक वेळीं संधीही तशीच चांगली सांपडत गेली; शिवाय, तो दीर्घा-

---

१ अकबर ता० १५ आक्टोबर इ०स० १६०५ रोजीं आपल्या वयाच्या ६४ व्या वर्षाच्या पहिल्या दिवशीं मरण पावला.

युक्तीही झाला; या एकंदर कारणांमुळें, हिंदुस्थानांतील निरनिराळ्या जातींच्या लोकांना स्वास्थ्य, वास्तविक स्वातंत्र्य, परंपरागत धर्म व चाली-रीतींचा उपभोग या सर्व दुर्मिळ व महत्त्वाच्या गोष्टी प्राप्त होण्याला, त्यांनीं मुख्य सार्वभौम सत्ता मनोभावानें कबूल करणें हाच एक मार्ग आहे अशी त्याला त्यांची खात्री करून देतां आली. सर्व प्रजेच्या संबंधानें त्याचें मन अगदीं निर्मळ असून सर्वांविषयीं त्याची वृत्ति केवळ समतेची असे. उजबक किंवा अफगाण, हिंदु, पारशी, किंवा ख्रिस्ती, या सर्वांना तो सारखेपणानें वागवीत असे. ते विश्वासू, हुशार व त्याच्याशीं खरेपणानें वर्तन करणारे असले तर तो त्यांच्याकडे सारखीं महत्त्वाचीं कामें देत असे. त्याच्या एकुणपन्नास वर्षांच्या कारकीर्दींत हिंदुस्थानावर परशत्रु एकही आला नाहीं; तसेंच त्यानें देशांतील सर्व शत्रु, कांहीं शस्त्राच्या जोरावर व कांहीं याहून दुसऱ्या सौम्य उपायांनीं पादाक्रांत केले. त्याला हे दुसरे उपायच विशेष आवडत असत. या सर्व गोष्टी सर्व जातींच्या लोकांच्या लक्षांत येऊन चुकल्या होत्या. त्याच्या मरणानंतर महंमद अमीर यानें लिहलें आहे कीं, ‘सर्व राज्यांत चोहोंकडे सारखा प्रबल पण न्यायी अंमल चाल-लेला होता; सर्व जातींचे व तऱ्हेचे लोक त्याच्या दरबारांत येत; सर्वत्र अव्याहत शांतता असे; व त्याच्या छायेखालीं सर्व पंथांचे लोक मोठ्या सुखांत रहात असत.’ राज्यकर्ता या नात्यानें अकबर अशा तऱ्हेचा पुरुष होता. खासगी वर्तनांत तो कशा प्रकारचा होता, याचें वर्णन पुढील भागांत दिलें आहे.

---

# भाग बारावा.

## अकबराची राज्यव्यवस्था व तिचीं तत्त्वें.

आईन-ए-अकबरी या ग्रंथाच्या कर्त्यानें म्हटलें आहे कीं, ‘राज्यकारभाराच्या तिन्ही शाखांमध्यें यश मिळविणें व आपल्या प्रजेपैकीं लहानापासून थोरापर्यंत सर्वांच्या इच्छा परिपूर्ण करणें, या गोष्टी राजा आपला वेळ ज्या रीतीनें घालवील त्यावर अवलंबून आहेत.’

या कसोटीला लावून पाहिलें असतां अकबरास राजा व सामान्य पुरुष या दोन्ही नात्यांनीं जें यश मिळालें, त्याचीं कारणें सयुक्तिक

रीतीनें दाखवितां येतील. तो स्वतः शिस्तवार मनुष्य होता इतकेंच नव्हे, तर वस्तुतः जें शुद्ध असेल, आणि आपल्याला जन्मभर झटून जी एखादी गोष्ट साधावयाची आहे ती जेणेंकरून घडून येईल तेंच आपल्या विचारांत आणि आचारांत ठेवावयाचें, हीहि उलट इच्छा त्याच्या शिस्तींत नेहमीं असे. ही जन्मभर झटून साधण्याची गोष्ट त्याच्या मनांत कोणती होती म्हणाल तर, राज्यरूपी इमारत अशी उठवून द्यावयाची कीं, तिचा पाया प्रजेच्या अंतःकरणरूप भूमींत इतका खोल जावा कीं, राज्यकर्ता जातीनें बरा वाईट असला तरी तिला डळमळण्याची भीति बिलकुल नसावी. हा इष्ट हेतु साध्य होण्याकरितां त्यानें जीं जीं साधनें उपयोगांत आणलीं त्यांचें सविस्तर विवेचन करण्यापूर्वी, या सर्व विषयास आधारभूत अशा एका गोष्टीविषयीं चार शब्द लिहिणें इष्ट आहे. ती गोष्ट म्हणजे, त्याच्या मनाची खरी स्थिति, व मनुष्यजातीच्या धर्मविषयक विचारांमुळें त्यास लागलेलें वळण, व तें लागण्याचीं कारणें, ही होय. यापेक्षां अधिक महत्त्वाचा विचार दुसरा कोणताही असेल असें मुळींच म्हणतां येणार नाहीं. कारण सर्व दुराग्रही मुसलमान लोकांचें मत असें होतें कीं, ज्या हिंदुस्थानच्या लोकांवर आपला अंमल बसला आहे त्या लोकांना निरंतर नरकवासाहून दुसरी गतीच नाहीं. ह्या जातीपैकीं जे कांहीं थोडे लोक प्रमुख होते त्यांना जर अकबरानें पूर्वी विचारलें असतें, कीं या हिंदु लोकांचा आपणांवर भरंवसा बसेल व त्यांचें आपलें मन मिळेल असें करून त्यांच्या बुद्धीचे भ्रम नाहींसे करतां येतील कीं नाहीं, तर त्यांनीं, ही गोष्ट घडणें अशक्य आहे, असें साफ उत्तर दिलें असतें. अशा लोकांच्या हातून हें काम करविण्याचा मुख्य आधार म्हटला म्हणजे, अकबराच्या मनाची स्थिति कशी होती, आणि स्वधर्मी लोकांच्या विचाराहून अगदीं भिन्न अशा विचारांविषयीं मनाची समता ठेवून व कोणत्याही प्रकारचा पक्षपात न करतां योग्य दिसेल तो आपला अभिप्राय ठरवून त्या विचारांचा स्वीकार करण्याविषयीं त्याचें सामर्थ्य कितीं होतें, यावरच सर्वस्वी अवलंबून होता. या प्रकरणीं मनाचा कोतेपणा टाकून देऊन उदार बुद्धीनें सुधारणा करण्याला तो काळ वास्तविक पाहतां अगदीं प्रतिकूल होता यांत संशय नाहीं.

मुसलमान लोक केवळ राज्यें काबीज करणारेच होते असें नाहीं. तर ते तरवारीच्या जोरावर आपल्या धर्माचा प्रसारही करणारे होते. त्यांच्यांतील विशेष आग्रही व धर्मनिष्ठ लोक हिंदु धर्म व हिंदु लोक यांविषयीं किती तिरस्कार व धिक्कार दर्शवीत असत, हें तत्कालीन ग्रंथकारांपैकीं बदौनी याच्या ग्रंथांतील प्रत्येक ओळीवरून व्यक्त होतें. ही अशा प्रकारची त्यांची बुद्धि केवळ हिंदुधर्मापुरतीच होती असें नाहीं. महंमदी धर्माशिवाय इतर सर्व धर्मांविषयींही त्यांचा तोच प्रकार होता.

अकबराचा जन्म मुसलमानी धर्मांत झाला होता. परंतु त्याचें मन उपजतच चौकस व चिकित्सक असून कोणचीही गोष्ट गृहीत धरून तो कधींही चालत नसे. त्याचे मुसलमान सरदार हे, हिंदु राजे लोकांना, केवळ त्यांच्या धर्मामुळेंच ते खास अनंत नरकवास भोगणार, असें समजत असत. त्या लोकांच्या अंगीं असलेले सद्गुण, त्यांचा विश्वासूपणा, त्यांची स्वामिभक्ति, व त्यांच्या मनाचा उदात्त-

---

१ बदौनी—मुल्ला अबदुलकादर बदौनी—हा हि० स० ९४७ त दिल्लीजवळ बदौन येथें जन्मला. त्याचा बाप त्याच्या विसाव्या वर्षी वारला. त्याचें नांव मुलूकशहा असें होतें. बदौनी यानें तत्कालीन मोठमोठ्या विद्वानांजवळ पुष्कळ शास्त्रग्रंथांचें अध्ययन केलें होतें. त्यानें 'मुन्तखाबुत्तवारीख' किंवा 'इतिहाससार' नांवाचा उत्तम ग्रंथ लिहिला आहे. तो संगीत, ज्योतिष, व इतिहास इतक्या शास्त्रांत निष्णात होता, व त्याच्याकडे बादशाही इमामाचें काम असे. जलालखान कुर्ची याच्या मार्फत त्याचा लौकरच अकबराच्या दरबारांत प्रवेश झाला. तव्हांपासून सुमारें चाळीस वर्षें तो शेख मुबारक, फैजी व अबुलफजल यांच्या सहवासांत राहिला. पण तो त्यांना नास्तिक समजत असे, व ते लोक त्याला अगदीं आवडत नसत. अकबराच्या आज्ञेनें त्यानें रामायणाचें भाषांतर केलें, त्याबद्दल त्याला १५० मोहरा व १०००० टांक मिळाले होते. तसेंच महाभारताच्या कांहीं भागाचेंही त्यानें भाषांतर केलें. याशिवाय त्यानें पुष्कळ फारशी ग्रंथ लिहि[illegible]त. त्या सर्वांत वरील इतिहासग्रंथ फार प्रसिद्ध व उपयोगी आहे. क[illegible]ांत त्यानें अकबराच्या सर्व कृत्यांबद्दल आपलीं खरीं खरीं मतें व[illegible]लीन लोकांबद्दल विश्वसनीय माहिती दिली आहे. हा ग्रंथ त्यानें अ[illegible]च्या हयातींत प्रसिद्ध केला नाहीं. तो पुढें जहांगीर गादीवर बसल्यानंत[illegible] हा वर्षांनीं त्याच्या मुलांनीं प्रकट केला. त्याच्यांत हि० सं० १००४ पर्यंतची हकीकत दिली आहे. बदौनी अकबरापूर्वीं अकरा वर्षें मरण पावला होता.

पणा हे उत्तम गुण अवलोकन करण्याची अकबराला त्याच्या शिक्षणाच्या काळांत पुष्कळ वेळां संधी मिळाली होती. हे राजेरजवाडे व व त्यांच्याचसारख्या विचाराचे लोक यांचाच आपल्या सर्व प्रजेंत फार मोठा भरणा आहे हें तो जाणून होता. तसेंच त्यांच्यांतील पुष्कळ, व तेही विशेष महत्त्वाचे व विश्वासू असे राजे लोक, यांना एके प्रकारें राज्यकर्त्यांचा धर्म स्वीकारण्यापासून निदान लौकिकदृष्ट्या तरी पुष्कळ फायदा होण्यासारखा असूनही, ते आपल्याच धर्मास मोठ्या आग्रहानें धरून रहात आहेत, हेंही त्याच्या लक्षांत पक्कें येऊन गेलें होतें. राज्यकर्ता राजा जन्मतः मुसलमान आहे, त्या अर्थी सर्व मानवजातीला खरा व उत्तम गति देणारा असा धर्म काय तो मुसलमानी धर्मच आहे, ही गोष्ट त्याच्या विचारी मनाला प्रथमपासूनच मान्य नव्हती. पुढें हळू हळू हेच विचार त्याच्या तोंडून बाहेर पडूं लागले. तो ह्मणे, 'मला स्वतः कोणी मार्गदर्शक मिळाला नाहीं, त्यापूर्वीच मीं लोकांना मार्ग दाखविण्याचा अधिकार कां घ्यावा?' पुढें जसजसें त्यानें, दुसरीं निरनिराळीं धर्ममतें व धर्मपंथ यांविषयींचें विवेचन ऐकिलें, तसतशा त्याच्या मनांतील पूर्वीच्या खऱ्या शंका दृढ होत गेल्या; व हळू हळू प्रत्येक धर्माच्या मतवाद्यांच्या मनाचा व मतांचा आकुंचितपणा, वेडगळपणा, व हटवादीपणा पाहून, 'सर्वांशीं समतेनें वागणें हेंच बरें,' याच मताचें अवलंबन करण्याला तो दिवसेंदिवस प्रवृत्त झाला.

त्याच्या विचारांत वरील प्रकारचा जो फरक झाला तो एकदम झाला असें नाहीं. बदौनी हा इतिहासकार मुसलमानी धर्माचा कट्टा अभिमानी होता. त्याला, धर्माच्या कामीं बादशहाचें अशा प्रकारें मागें पाऊल पडलेंसें वाटून मोठा खेद होत असे. तो याबद्दल लिहितो कीं, 'अगदीं बालपणापासून तारुण्यावस्थेपर्यंत, व तारुण्यावस्थेपासून वृद्ध होईपर्यंत, बादशहाचे मनांत अनंत प्रकारचे धर्मविचार येऊन गेले आहेत; त्यानें सर्व प्रकारच्या धर्मांप्रमाणें आचरण केलें आहे; व निरनिराळ्या धर्मप्रतिपादक ग्रंथांत आढळून येणाऱ्या कित्येक गोष्टींचा स्वतःच्याच अलौकिक चाणाक्ष बुद्धीनें—पण मुसलमानी धर्माच्या प्रत्येक तत्त्वास विरुद्ध अशा चिकित्सक बुद्धीनें—संग्रह

केला आहे. या योगानें, कित्येक नव्या मूलतत्त्वांवर अवलंबून असणारा असा एक नवीनच धर्म त्याच्या हृत्पट्टिकेवर अभिव्यक्त झाला, व अशा प्रकारें, ज्यांच्या योगानें त्याच्या मनावर नानाप्रकारचे परिणाम घडले त्या सर्व गोष्टींचें साररूप चित्र, त्याच्या मनोमय शिळेवर हळू हळू उमटत चाललें. त्या गोष्टी ह्या कीं, सर्व धर्मांच्या लोकांमध्यें शहाणे व सारासार विचार करणारे असे पुरुष असतात, व अलौकिक सामर्थ्य अंगीं असणारे लोकही सर्व जातींत व राष्ट्रांत असतात; आणि अशा रीतीनें थोडें थोडें ज्ञान प्रत्येक ठिकाणीं आढळून येत असतां, ज्याला प्रचारांत येऊन पुरीं हजार वर्षेंही झालीं नाहींत असा इतर धर्मांच्या मानानें केवळ नवीन जो मुसलमानी धर्म, तोच काय तो सत्य आहे, असें कसें मानतां येईल ? तसेंच एका पंथानें खरी मानलेली गोष्ट दुसऱ्यानें खोटी कां ह्मणावी ? व एकाला पूर्ण श्रेष्ठता प्राप्त झाल्यावांचून त्यानें इतर सर्वांहून आपण श्रेष्ठ आहों असा डौल कां मिरवावा ? '

बदौनी आणखी असें लिहितो कीं, ' ब्राह्मण व सुमानी[१] या लोकांबरोबर अकबर नेहमीं धर्मसंबंधानें विचार करीत असे; व त्यांच्या मतांचा त्याच्या मनावर असा परिणाम झाला कीं, पुनर्जन्म खरा आहे हें तत्त्व त्यानें मान्य केलें.' फैजी व अबुलफजल हे दोघे बंधु अकबराप्रमाणें जन्मतःच मुसलमानी धर्माचे असून त्याच धर्मांत ते लहानाचे मोठे झाले होते, व त्याच्या धर्मविचारास त्यांनीं पुष्कळ अंशीं चांगलें वळण लाविलें यांत शंका नाहीं. अशा या सुप्रसिद्ध, थोर व वजनदार बंधुद्वयाविषयीं थोडेंसें सविस्तर लिहिणें इष्ट आहे. ते शेख मुबारक नांवाच्या एका अरब शेखाचे पुत्र असून त्यांचे पूर्वज राजपुतान्यांत नगर येथें येऊन राहिले होते. शेख मुबारक यानें वाडवडिलांच्या धर्माचें पूर्णपणें अध्ययन केलें असून त्याला त्यांतील एकून एक रहस्य अवगत होतें. तो मोठा जिज्ञासु व चिकित्सक होता, व त्याची बुद्धि फारच विशाळ

१ सुमानी या नांवाचा एक धर्मपंथ सिंध देशांत होता. त्या मताचे लोक पुनर्जन्म मानीत असत. या पंथाच्या लोकांच्या सहवासानचें अकबराचीही पुनर्जन्म असण्याविषयीं खात्री झाली होती.

व कुशाग्र होती. त्याचें अध्ययन व ज्ञान वाढत गेलें तसतसे त्याचे विचारही पोक्त होत गेले. त्यानें आपल्या मुलांकडून फार सुरेख अध्ययन करविलें. त्यांची ग्राहकशक्ति व धारणाशक्ति तशीच विलक्षण असल्यामुळें कोणत्याही लोकसमाजांत प्रतिष्ठा मिळविण्याजोगे ते झाले यांत नवल नाहीं. शेख मुबारक नगराहून आग्र्याजवळ इ० स० १५४७ त येऊन राहिला होता. तेथेंच त्याचा वडील मुलगा शेख फैजी हा जन्मास आला. तो अकबराहून पांच वर्षांनीं लहान होता. अकबरानें वायव्य प्रदेश पुनः जिंकून घेतला त्या सुमारास फैजीचें वय वीस वर्षांचें होतें. त्यानें वाङ्मय व हकिमी—वैद्यकी—यांचा साधा व शांततेचा व्यासंग चालविला होता. पुढें लौकरच कवित्वाविषयींही त्याची बरीच प्रसिद्धि होत चालली. तो आत्याच उदार मनाचा होता. त्याला वैद्यकीच्या धंद्यांत बरीच प्राप्ती होत असे; यामुळें तो नेहमीं अनेक प्रकारचे दानधर्म करीत असे. गरीब लोकांना धर्मार्थ औषधें देण्याचाही त्यानें पाठ घातला होता.

तो बापाप्रमाणेंच शिया पंथाचा होता. हा पंथ त्या वेळीं लोकांस विशेष आवडत नव्हता. असें सांगतात कीं, त्यानें एकदां थोडीशी जमीन मिळण्याविषयीं कद्र¹ नांवाच्या सरकारी अंमलदाराकडे अर्ज केला. तो अंमलदार सुनी व हा शिया असल्यामुळें त्यानें याचा अर्ज नामंजूर केला इतकेंच नाहीं, तर त्याचा धिक्कार करून त्याला कचेरींतून घालवून दिलें! इतक्यांत अकबरानें, तो मोठा गुणी व विद्वान् असल्याचें ऐकून त्याला हुजूर बोलाविलें. अकबर त्या वेळीं चितोड गडाला वेढा घालून बसला होता. फैजीचे शत्रु विशेषतः सुनी पंथाच्या मुसलमानांत पुष्कळच होते. त्यांनीं ही संधी साधून, बादशहाकडून फैजीस निमंत्रण आलें तें त्याच्यावर मुकदमा करून त्याला शासन करण्याकरितांच आलें आहे असा त्याचा गर्भ केला; व आग्र्याच्या किल्लेदाराला, फैजी वाटेंत पळून न जाईल असा बंदोबस्त ठेवावा ह्मणून सुचविलें. फैजीच्या मनांत

¹ कद्र म्हणजे लोकांच्या अर्ज्या घेऊन निःपक्षपातानें निकाल करण्याकरितां नेमलेला कामगार.

पळून जाण्याचा विचार मुळींच नव्हता; तरी त्याला अकबरापुढें कैद्याप्रमाणेंच नेलें. परंतु त्या थोर बादशहानें त्याचें चांगलें स्वागत केलें. त्याच्या अंगचे अनेक गुण व बुद्धिचातुर्य हीं पाहून त्याला परम संतोष झाला,व त्यानें त्याला लौकरच आपल्या पुत्रांना तत्त्वज्ञान शिकविण्याकरितां शिक्षक नेमून आपल्या दरबारीं ठेविलें त्याला केव्हां केव्हां परराज्यसंबंधी वकिलाच्या कामावरही बादशहा पाठवीत असे.

फैजीला फुरसत पुष्कळ सांपडे, तींत तो कविता करीत असे. त्याच्या तेहतिसाव्या वर्षी त्याला दरबारच्या 'कविराजा'ची जागा मिळाली. पुढें सात वर्षांनीं तो मरण पावला. त्याच्यावरची अकबराची मर्जी कधींच कमी झाली नाहीं. अकबराला त्याचा सहवास फार आवडत असे, व त्याच्या संभाषणापासून त्याला अत्यानंद होत असे. त्यानें एकशें एक ग्रंथ लिहिले असें ह्मणतात. त्यानें ग्रंथसंग्रह फारच चांगला केला होता. त्यांत चार हजार तनिशें सुंदर हस्तलिखित ग्रंथ होते. तो ग्रंथसंग्रह बादशहानें आपल्या ग्रंथसंग्रहांत सामील केला.

शेख फैजीवर अकबराची पूर्ण मर्जी होती. पण त्याचा धाकटा भाऊ शेख अबुलफजल, आईन-ए-अकबरी ग्रंथाचा कर्ता, याजवर तर त्याची मर्जी त्याहूनही जास्त होती. अबुलफजल ता० १४ जानेवारी इ० स० १५५१ रोजीं आग्र्यानजीक जन्मला. अबुलफजल यासही त्याच्या भावाप्रमाणेंच बापाच्या विविधविषयक व विस्तीर्ण शिक्षणाचा मोठा उपयोग झाला. त्याच्या बापाच्या उदात्त व चिकित्सक मनाच्या प्रौढ व अकुंठित विचारसरणिमुळें त्याला प्राप्त झालेल्या नवीन वळणाबद्दल तत्कालीन जुन्या तऱ्हेचे विद्वान् लोक त्याचा अव्हेर करीत, व त्याचा बिलकूल संपर्क होऊं देत नसत. ही गोष्ट अबुलफजल याच्या लक्षांत आल्यावांचून राहिली नाहीं, व ती त्याच्या मनांत फार डांचत असे. याचा परिणाम या मुलाच्या मनावर असा झाला कीं, त्याला, सर्व धर्ममतांविषयीं समताबुद्धि ठेवणेंच योग्य आहे, असें वाटूं लागलें; खेरीज ह्या वेळची याची स्थिति अशी होती कीं, तीमुळें त्याला अभ्यास अतिशय परिश्रम घेऊन करावा लागला. आपल्या वयाच्या पंधराव्या वर्षीच त्यानें न्याय, सिद्धांतमतवाद, इत्यादि शास्त्रशाखांवरील सर्व ग्रंथांचें

पठण केलें होतें, व विसावें वर्ष लागण्यापूर्वीच त्यानें शिक्षकाचें काम सुरू केलें होतें.

प्रोफेसर ब्लाकमन यानें लिहिलें आहे कीं, 'या वेळीं एक गोष्ट घडून आली, तीवरून त्या वयांत देखील त्याचा ग्रंथवाचनाचा व्यासंग केवढा जबर होता, हें दिसून येतें. इस्फहानी कवीच्या अप्रतिम व दुर्मिळ ग्रंथाची एक हस्तलिखित प्रत त्याच्या हातीं पडली. दुर्दैवानें त्या प्रतीचा उभा अर्धा भाग जळून जाऊन अगदीं दुर्बोध झाला होता. या दुर्मिळ ग्रंथाची पूर्तता करण्याचा अबुलफजल यानें निश्चय केला. त्यानें जळालेला दुर्बोध भाग कापून टाकून त्या प्रतीला तितकींच कोरीं पानें बेतानें डकविलीं, व प्रत्येक ओळीचा नष्ट झालेला अर्धा भाग, फार विचार करून व सर्व ग्रंथाचें अनेक वेळ मनन करून, शेवटीं आपल्या बुद्धीनें लिहून तयार केला. पुढें कर्मधर्मसंयोगानें त्या ग्रंथाची एक पुरी प्रत उपलब्ध झाली. तिच्याशीं त्यानें तयार केलेल्या प्रतीची तुलना करून पाहतां, कांहीं कांहीं जागीं भिन्न भिन्न शब्द पडले होते, व कांहीं भागांत नवीन प्रमाणेंही आलीं होतीं. पण एकंदरींत नवीन तयार केलेल्या भागांत व मुळांत इतकें कांहीं विलक्षण साम्य आढळून आलें कीं, अशा दुर्बोध काव्याची भाषासरणी व विचारसादृश्य पूर्णपणें साध्य होण्याइतकें त्याच्या यत्नांत त्याला यश आलेलें पाहून त्याच्या मित्रांना फारच आश्चर्य वाटलें !

अबुलफजल जात्याच विद्याव्यसनी होता, यामुळें त्याला अकबरानें आपल्या दरबारीं येण्याविषयीं जें निमंत्रण पाठविलें, त्यास त्यानें कांहीं दिवसपर्यंत अनुकूल उत्तर दिलेंच नाहीं. परंतु मागें लिहिल्याप्रमाणें त्याचा वडील भाऊ फैजी व अकबर यांच्यांत स्नेह जडला, तेव्हां अर्थातच अकबराच्या मनांत त्याच्याशीं निकट सहवास असावा अशी जी इच्छा होती ती पूर्ण होण्यास मार्ग झाला. इ० स० १५७४ त अबुलफजल दरबारांत आला, व फैजीचा भाऊ म्हणून

---

१ यानें आईन-ए-अकबरी या ग्रंथाचें फारच शोधकपणानें भाषांतर लिहून प्रसिद्ध केलें आहे. त्याचा या मूळ ग्रंथाला व भाषांतराला जागजागीं पुष्कळ आधार घेतला आहे.

बादशहास त्याला भेटविण्यांत आलें. तेव्हां बादशहानें त्याचें इतकें उत्तम स्वागत केलें कीं, त्याला, ' आपण आपल्याच डौलांत एकांतवासांत राहूं ' असा केलेला आपला निश्चय बदलावासें वाटलें. त्या वेळीं त्याचें वय केवळ तेवीस वर्षांचें होतें. पण तितक्या वयांत त्यानें स्वदेशांत उपलब्ध असणाऱ्या ज्ञानसंपादनाच्या सर्व साधनांचा उपयोग करून घेतला होता. त्यानें स्वतःच लिहिलें आहे कीं, ' माझ्या मनाला स्वस्थता किंवा शांति नव्हती, व माझ्या अंतःकरणाच्या वृत्ति, मोंगोलियांतील महात्मे किंवा लिबानानें[1] पर्वतावरील साधुजनांच्या सहवासाकडे आपोआप वळूं लागल्या. तसेंच तिबेटांतील लामा लोक किंवा पोर्तुगालांतील पाद्री यांच्या गांठी घ्याव्या अशी मला उत्कट इच्छा झाली; आणि पारशी लोकांचे मोबेद किंवा गुरु, आणि झेंदावस्तांमध्यें[2] प्रवीण असे विद्वान् लोक यांजकडे जाऊन सुखानें त्यांच्या सहवासांत रहावें असें मला वाटलें. माझ्या देशांतील विद्वान् म्हणविणाऱ्या लोकांचा मला अत्यंत त्रास आला होता. '

या वेळेपासून अबुलफजल हा बादशहाच्या दरबारांत राहिला. पुढें हळू हळू त्या उभयतांमध्यें एकमेकांविषयीं जी पूज्यबुद्धि व सहानुभूति उत्पन्न झाली, तिच्या योगानें त्या परस्परांमध्यें अत्यंत उच्च प्रतीचा व निरपेक्ष असा स्नेहभाव उत्पन्न झाला. अशा प्रकारचा स्नेहभाव हा खरोखर संसारांत अत्यंत आल्हादकारक होय. बादशहा फारच योग्य व सत्पात्र शिष्य आहे असें अबुलफजल याला दिसून आलें शिकारीची मजा, राज्यकारभाराची अनेक प्रकारची काळजी, लढायांची दगदग, अशा अनेक प्रकारच्या गडबडींमध्यें, अकबराला, आपला परमपूज्य मित्र अबुलफजल व त्याला वादांत जिंकूं पहाणारे तत्कालीन महान् महान् मुसलमान मुल्ला व काजी, यांचा वादविवाद ऐकून जो कांहीं आनंद होत असे, तसा आनंद दुसऱ्या कोणच्याही गोष्टीपासून होत नसे. त्याच्या कारकीर्दींत या बाद-

---

१ लिबानान् हा पर्वत एशियामायनर प्रांतांत आहे. त्याच्यावर ख्रिस्ती व मुसलमान धर्मांचे महात्मे व साधु राहत असत. आपल्या इकडील योगी व संन्यासी यांच्याप्रमाणेंच त्यांची मोठी प्रसिद्धि होती.

२ हा पारशी लोकांचा धर्मग्रंथ आहे.

विवादांचें मोठें प्रस्थच माजलें होतें. याविषयीं सूक्ष्म रीतीनें विचार केल्यावांचून अकबराचा खरा स्वभाव कळणें अशक्य आहे. सर्व धर्मांविषयीं समदृष्टि, व सर्वांविषयीं राज्यकारभारांत सारखेपणा ठेवणें, हीं महातत्त्वें—ज्यांच्यामुळें हिंदुस्थानाच्या इतिहासांत एक नवीन मन्वंतरच सुरू झालें—त्या तत्त्वांचा त्याच्या मनांत एकदम अकस्मात् उदय झाला असा अर्थ नाहीं. त्याला वीस वर्षेंपर्यंत, राज्यसत्ता कायम राखण्याकरितां नवीन मुलूख सर करावे लागले. बंगाला, बहार, ओरिसा, पश्चिम-हिंदुस्थान, गुजराथ, व खानदेश, या प्रांतांतील प्राचीन पराभूत राजघराण्यांतील पुरुष, थोडीशी सवड सांपडतांच डोकें उचलण्याला तयार होते. अशा स्थितींत स्वस्थ बसणें ह्मणजे त्या लोकांना आपल्यावर हल्ला करण्यास बोलावण्यासारखेंच होतें. यामुळें त्याला पुढें पाऊल टाकणें भाग पडलें. पूर्वीं घडलेल्या गोष्टींचा अनुभव, व नेहमीं त्याच्या देखत घडत असलेल्या गोष्टी, यांचा विचार करतां, सर्व हिंदुस्थानांत एकच सार्वभौम राजा असणें अवश्य आहे, व असें असेल तरच हिंदुस्थानाला अंतस्थ स्वस्थतेचें खरें सुख प्राप्त होईल, हें स्पष्टपणें सिद्ध झालें होतें.

या वीस वर्षांत अकबराला वेळोवेळीं पुष्कळ फुरसत सांपडली. तिचा उपयोग त्यानें, आपण जिंकून घेतलेल्या मुलखाच्या राज्यव्यवस्थेसंबंधानें आपल्या दरबारच्या लोकांशीं वादविवाद व ऊहापोह करण्याकडे केला. ही राज्यव्यवस्था, त्या त्या मुलखांतील लोकांचें जेणेंकरून आपणावर प्रेम बसून त्या योगानें ते मुलूख आपणाकडे कायम राहतील अशा प्रकारची असावी, असा त्याचा उद्देश होता. या संबंधानें जुन्या राज्यपद्धती अगदीं निरुपयोगी आहेत अशी त्याच्या मनाची खात्री झाली होती. तसेंच निरनिराळ्या प्रदेशांत कायमच्या फौजा ठेवून, तेथील लोकांच्या समजुती, त्यांच्या दंतकथा, त्यांच्या उमेदी, व त्यांच्या महत्त्वाकांक्षा यांच्याविषयीं बिलकूल विचार न करितां, सर्व देश कबज्यांत ठेवण्याचा यत्न करणें अशक्य आहे, हेंही त्यास पक्कें समजून आलें होतें. कारण हिंदु लोक हे दुनियेंतील सर्व जातींच्या लोकांपेक्षां मनोविकार व कल्पनासृष्टि यांमध्यें अत्यंत दंग असणारे, व वाडवडिलांच्या दंतकथा आणि पूर्वपीठिका यांच्या-

विषयीं अभिमानजनक अशा दृढ पाशांनीं बद्ध झालेले आहेत, ही गोष्ट पूर्णपणें त्याच्या लक्षांत येऊन चुकली होती.

वर सांगितलेली जुनी राज्यपद्धति सुमारें चार शतकेंपर्यंत सारखी चालू होती, व ती चालू करणाऱ्याच्या कारकीर्दीपर्यंतच, किंवा फार तर त्याच्या पुढच्या एक दोन राजांच्या कारकीर्दीपर्यंत कायम राहून नेमानें मोडत गेली होती. इतकें झालें तरी अकबराच्या पूर्वी होऊन गेलेल्या कोणत्याही राजानें इच्याशिवाय दुसरी राज्यपद्धति चालू करण्याचा यत्नच केला नव्हता. त्याचा प्रख्यात आजा बाबर बादशहा याला अशा राज्यपद्धतीची उणीव भासूं लागली होती, पण त्याला ती चालू करण्याला फुरसतच मिळाली नाहीं; कारण त्यालाही आपलें राज्य कायम राखण्याकरितां नवीन मुलख जिंकावा लागला. हुमायुनाच्यापूर्वी होऊन गेलेले अफगाण राजेही हें कोडें सोडविण्याचा प्रयत्न करून थकले होते. पण हुमायुनानें तर त्या संबंधानें हातच टेकले होते. हुमायुनाचा प्रतिस्पर्धी शीरशहा—जो त्याच्याहून विशेष पराक्रमी होता—त्यानें त्याला जिंकल्याबरोबर त्याची बरबर स्थापित झालेली अशी राज्यपद्धति तेव्हांच लयास गेली, व तिचा पुढें मागमूसही राहिला नाहीं. तेव्हां एक नवीन व कायमची राज्यपद्धति सुरू करण्याची अवश्यकता आहे असें अकबराच्या पक्के ध्यानांत येऊन चुकलें. राज्यकर्ते व प्रजा यांच्या मनांत परस्परांविषयी खरा पूज्यभाव, व जात, धर्म, दंतकथा, पूर्वपीठिका, इत्यादिकांच्या भेदांविषयीं समदृष्टि, सर्वांच्या बऱ्यावाइटाविषयीं एकच भाव, तसेंच 'कमानींतील शिरोभागचा दगड पडला तर सर्व कमान ढांसळते' हें तत्त्व, इत्यादि गोष्टी त्याच्या हृदयांत पूर्णपणें बाणून गेल्या; आणि आपल्या कारकीर्दीच्या पहिल्या वीस वर्षांत जिंकून घेतलेल्या प्रजेच्या मनांत, आपल्या राज्याविषयीं भरंवसा व खात्री उत्पन्न होईल अशा तऱ्हेची राज्यव्यवस्था कशी सुरू करितां येईल, याविषयीं त्यानें आपल्या पदरचे विद्वान् व दरबारी लोक यांच्याशीं पुष्कळ वादविवाद केला.

अबुलफजल याचा व अकबराचा परिचय होण्यापूर्वी वरील कामांत यश येण्याविषयीं अकबरानें बहुतेक आशा सोडली होती. जुन्या

मंडळीकडून तर त्याला या कामीं पोक्त सल्लामसलत न मिळतां उलटा परधर्मासंबंधानें द्वेष व विषमभाव मनांत वागविण्याविषयींच उपदेश होत गेला. त्याच्या पूर्व परिचयाच्या मंत्र्यांकडूनही या कामीं मदत मिळण्याची त्याला बिलकूल आशा नव्हती. या लोकांच्या वितंडवादाचा अकबराला वीट येऊन गेला होता. तसेंच मुसलमान लोकांतही, आपसांत धर्मविषयक मतभेद व विरुद्ध मतवाद्यांचा छळ करण्याकडे प्रवृत्ति असलेली पाहून, त्याला त्या संबंधानें फारच तिरस्कार उत्पन्न झालेला होता. तेव्हां कोणचीही चांगली राज्यव्यवस्था चालू करण्यापूर्वी, प्रथमतः दरबारांतील हटवादी मौलवी व मुफ्ती यांच्याशीं झगडा केला पाहिजे ही गोष्ट, अबुलफजल याच्या प्रौढ व उदात्त शिक्षणाचा दृढ परिचय होण्यापूर्वींच अकबराच्या लक्षांत पक्की येऊन, तसें करण्याचा त्यानें निश्चय केला होता. हे मौलवी व मुफ्ती म्हणजे त्याच्या राज्यांत एक मोठेंच प्रस्थ होतें. ब्लाकमन साहेबानें लिहिलें आहे कीं, 'आपल्या हिंदु प्रजेच्या योग्यतेविषयीं त्याच्या मनांत चांगल्या तऱ्हेचा ग्रह झाला होता, व फत्तेपूर-शिक्री येथील दगडी चौत्र्यावर संध्याकाळच्या वेळीं एकांतीं बसून तो याविषयीं विचार करीत असतां, आपल्या राज्यांतील सर्व जातींच्या प्रजेस सारख्या रीतीनें वागविण्याचा त्यानें निश्चय केला होता. परंतु विद्वान् काज़ी व मुफ्ती लोक यांचीं मतें व विचार अगदीं एकदेशीय असल्यामुळें, राजा व प्रजा यांच्यांतील दुही नाहींशी न होतां ती अधिकच माजविण्याचा ते यत्न करीत असत. तेव्हां बादशहानें या संबंधानें वादविवाद करण्याचें काम सुरू केलें. कारण या बाबतींत आपलीं मतें कदाचित् चुकीचीं असतील असें त्यास वाटून, राज्यकर्ता या नात्यानें याविषयींची मीमांसा करणें हें आपलें कर्तव्यकर्म आहे असें तो समजत असे. हे वादविवाद मागें वर्णिल्याप्रमाणें फत्तेपूर-शिक्री येथें बुद्धया या कामाकरितां बांधविलेल्या इबादतखान्यांत प्रतिगुरुवारीं रात्रीं होत असत.

अबुलफजल यानें या वादांत कांहीं काळ स्वतः फारसें लक्ष पुरविलें नाहीं. फक्त तो, निरनिराळ्या मुसलमान मतवाद्यांना आपसांत वाद करून एकमेकांचें खंडण करण्याविषयीं प्रोत्साहन देत असे. या

मतवाद्यांच्या पुढाऱ्यांचा हटवादीपणा व अदूरदर्शित्व पाहून अकबरास त्यांचा अगदीं तिरस्कार आला. ते लोक असें प्रतिपादन करीत कीं, हिंदु व इतर जे कोणी मुसलमान नाहींत, त्यांचा छळ करणें रास्त आहे खेरीज ते आपापसांतही एकमेकांवर नास्तिकपणाचे आरोप करीत असत. अशा प्रकारें मुसलमानी धर्माच्या लोकांत ऐक्य मुळींच नसून अनेक भेद व शाखा आहेत, असें बादशहास दिसून आलें. तसेंच दरबारांत मोठमोठ्या हुद्यांवर असणाऱ्या अनेक धर्ममतवाद्यांचें एकमेकांशीं ग्राम्यपणाचें वर्तन पाहून त्यास त्या संबंधानें अतिशयच तिरस्कार उत्पन्न झाला. एक वेळ तर, पुनः कोणी असा ग्राम्यपणा केला तर त्याला इबादतखान्यांत येऊं दिलें जाणार नाहीं, असें त्याला साफ बोलून दाखवावें लागलें. शेवटीं एका गुरुवारीं अबुल्फजल यानें हा वाद अगदीं निकरास आणिला. आपल्या ह्मणण्याला पुष्कळ लोक आड येतील हें जाणूनही त्यानें, 'राजा ऐहिकसंबंधानें प्रजेचा गुरु आहे, त्याचप्रमाणें पारमार्थिक विषयासंबंधानेंही तो सर्व प्रजेचा गुरु आहे असें मानलें पाहिजे,' असा विषय वादासाठीं आणला.

ह्या मतानें मुसलमानी धर्माच्या मुख्य मूलतत्त्वावरच कुठारप्रहार झाला. कारण त्या धर्माचें मुख्य तत्त्व म्हटलें म्हणजे, कुराण हें सर्व मानवी धर्मवचनांहून श्रेष्ठ व महत्त्वाचें मानणें, हें होय. परंतु पूर्वी विद्वान् लोकांनीं या संबंधानें वादविवाद करितांना कुराणांतील निरनिराळ्या वचनांच्या अर्थाविषयीं भिन्न भिन्न मतें प्रकट केलीं होतीं एवढेंच नाहीं, तर प्रत्यक्ष महंमदाच्या गुणावगुणांविषयींही त्यांनीं भिन्न मतें प्रकट केलीं होतीं. या गोष्टीवर अबुल्फजल याचा मोठा कटाक्ष होता, यामुळें अर्थातच त्याच्या सिद्धांतावर मोठा खडाजंगीचा वाद झाला. या सिद्धांतानें मुसलमानी धर्माच्या मूळ तत्त्वावर हल्ला होतो, असें प्रत्येक विद्वानाच्या तेव्हांच लक्षांत येऊन चुकलें; तथापि त्यांच्यांतच जे दूरदर्शी व विचारी होते, त्यांच्या सहज ध्यानांत आलें कीं, पूर्वीच्या वादांत आपण जे पूर्वपक्ष उत्तरपक्ष केले व जे सिद्धांत प्रतिपादिले, तेच अत्यंत उत्तम धर्म व उघड व्यवहार या दोहोंचाही मजबूत बांध फोडून टाकण्यास कारणीभूत झाले आहेत.

परंतु खुद्द अकबर बादशहाच्या अधिकारासंबंधी सिद्धांत कसा मोडून काढावा याविषयीं त्या विद्वान् लोकांना मोठें संकट पडलें. अबुलफजल यानें पुढें आणलेल्या गोष्टीचा जो त्यांनीं निकाल केला, त्याचा अर्थ आपण दोन्ही बाजूंचा मेळ घालून दिला असा ते आपल्या मनांत समजले; परंतु वास्तविक पहातां या बाबतींत त्यांनीं आपला पक्ष मुळींच सोडून दिला असें म्हटलें पाहिजे. असो. त्यांनीं जो निकाल केला त्या संबधानें त्यांनीं एक ठरावबंद[1] तयार केला. त्यांत त्यांनीं बादशहा हा परम न्यायी शास्ता असल्याचें स्पष्ट लिहून दिलें; व यामुळें त्यांनीं त्याला, मुजूताहिद किंवा मुसलमानी धर्मासंबंधानें सर्व गोष्टींमध्यें मुख्य व कधीं न चुकणारा अधिकारी, असें मान्य केलें. या ठरावानें अबुलफजल याच्या मनाप्रमाणें सर्व गोष्टी झाल्या. कारण त्याअन्वयें या परम न्यायी बादशहाची बुद्धीच सर्व धर्म व व्यवहार यांसंबंधाचे नियम, कायदेकानू, इत्यादिकांचें उगमस्थान ठरून गेली, व एकूनएक मौलवी व काजी लोक यांनीं अकबराचे सर्व धर्मसंबंधी ठराव शिरसा मान्य करण्याचें कबूल केलें.

अबुलफजल यानें अकबरनाम्यांत लिहिलें आहे कीं, 'ह्या ठरावामुळें पुढें लिहिल्याप्रमाणें फारच चांगले परिणाम घडून आले. ते हे: (१) बादशहाचें दरबार सर्व जातींचे व धर्मांचे विद्वान् साधु व महात्मे लोक यांचें एकत्र जमण्याचें स्थान बनलें; सर्व धर्मांतील उत्तम उत्तम तत्त्वांची निवड होऊन तीं ग्राह्य ठरलीं; व त्यांच्यांतील दोषामुळें त्यांच्या गुणांचा अव्हेर होण्याचें बंद झालें. (२) सर्व धर्मांच्या लोकांविषयीं सार्वत्रिक समसमान वृत्ति कायम झाली, व तंटे मोडले. आणि (३) बादशहाचे निरपेक्ष हेतु पाहून दुष्ट व कुत्सित लोकांच्या तोंडाला काळोखी आली, व त्यांना त्याच्या अवकृपारूप कारागृहांत वास करावा लागला.' परधर्मी लोकांचा छळ करण्याविषयीं आग्रह धरणाऱ्या पुढारी मुसलमान मतवाद्यांपैकीं दोघां प्रमुख गृहस्थांनीं या ठरावावर, अगदीं नाखुषीनें कां होईना, पण आपल्या सह्या केल्या, ही गोष्ट

---

१ हा ठराव ब्लाकमनकृत आईन-ए-अकबरीच्या भाषांतराच्या १८० व्या पृष्ठांत दिला आहे. हा सर्व मुसलमानी धर्माच्या इतिहासांत केवळ अद्वितीय आहे, असेंही त्यानें म्हटलें आहे.

कबूल केली पाहिजे. परंतु अबुलफजल याच्या बापानें मुसलमानी धर्माच्या सर्व शाखांचें पूर्णपणें अध्ययन केलें होतें, व त्यांतील सर्व रहस्यें त्यास अवगत झालीं होतीं, यामुळें त्यानें मोठ्या आनंदानें व उल्हासानें वरील ठरावावर सही केली; शिवाय अशा या सुधारणेचा उत्तम परिणाम झालेला पाहण्याची आपल्याला फार दिवसांपासून उत्कंठा होती, असेंही त्यानें आपल्या सहीखालीं लिहून ठेविलें."

हा ठरावबंद तयार होऊन त्याच्यावर तत्कालीन सर्व विद्वान् लोकांच्या सह्या झाल्या तेव्हांपासून अकबराच्या कारकिर्दीस व आयुष्यक्रमास एक निराळीच दिशा लागली. गादीवर बसल्यापासून त्याला खरी स्वतंत्रता काय ती या वेळीं आली. सर्व जातींच्या लोकांविषयीं समानबुद्धि, व प्रत्येक मनुष्याच्या मानसिक विचारांना योग्य मान देण्याची इच्छा, या दोहोंना पूर्णपणें उत्तेजन देण्याला त्याला आतां सवड सांपडली. तसेंच हिंदु, ख्रिस्ती, पारशी, या लोकांना प्रशस्तपणें आपल्या सल्लामसलतींत घेण्याला त्याला कोणत्याही प्रकारचा प्रत्यवाय राहिला नाहीं. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील राजेरजवाडे व आग्रा येथील सार्वभौम सत्ताधिकारी यांचें राजकारणाच्या संबंधांत अगदीं एकीकरण करण्याचा त्याच्या मनांत फार दिवसांपासून बेत होता, तो अमलांत आणण्याचा यत्न करण्यासही आतां त्याला हरकत नाहींशी झाली. ही कलमबंदी वस्तुतः त्याच्या कारकीर्दीतली 'माग्ना चार्टा' किंवा 'हक्काची मुख्य सनद' च झाली.

ही सनद अकबरास कशी प्राप्त झाली, याविषयीं इतकें सविस्तर वर्णन बुद्ध्या केलें याचें कारण हेंच कीं, ही सनद म्हणजे, या बादशहानें पुढें अमलांत आणलेले कायदेकानू व राज्यव्यवस्था या सर्वांचा मूळाधार आहे. तिच्या योगानेंच त्याला मुसलमानी धर्मानें लावून दिलेल्या अकुंचित मर्यादांचें उल्लंघन करितां आलें, व अबुलफजल याचें अत्यंत हित होऊन त्याला अकबराच्या निस्सीम व अढळ स्नेहाचा लाभ झाला. पण इकडे उलट असेंही झालें कीं, त्याच्या

इंग्लंडांतील लोकांच्या स्वातंत्र्याची मुख्य व पहिली सनद माग्ना चार्टा ही होय. ही जॉन् राजापासून इंग्लंडचे प्रमुख सरदार व सभ्य लोक यांनीं इ० स० १२१५ त आपल्या एकीच्या जोरावर मिळविली.

वर तत्कालीन धर्मवेड्या हटवादी लोकांच्या तिरस्काराचा एकसमयावच्छेदेंकरून वर्षाव झाला, व त्यामुळेंच अखेरीस, मागील भागांत वर्णन केल्याप्रमाणें त्याचा मारेकऱ्याकडून खून झाला.

याप्रमाणें मिळालेल्या अधिकाराचा पहिला उपयोग बादशहानें न्यायखात्याची सुधारणा करून लबाड अधिकारी काढून टाकण्याकडे केला. त्याचा मुख्य न्यायाधीश एक सुनी पंथाचा दुराग्रही काजी होता. त्यानें आपल्या अधिकाराच्या बळावर सर्व शिया पंथाचे लोकांचा, तसेंच इतर पाखंडी मानलेल्या लोकांचा, व त्यांतच फैजी व अबुलफजल यांचाही छळ करण्याचा क्रम चालविला होता. त्याचा बाह्यात्कारीं बहुमान करून त्यास बादशहानें मक्केस हद्दपार केलें; तसेंच दुसऱ्या एका दुराग्रही अधिकाऱ्याचीही तशीच त्यानें वाट लाविली; आणि सर्व लोकांना स्पष्टपणें असें समजावून दिलें कीं, न्यायइनसाफाच्या कामांत धर्मसंबंधी मतभेदाचा बिलकूल विचार करतां कामा नये, व सर्व लोक—मग ते सुनी किंवा शिया पंथाचे, हिंदु किंवा मुसलमान, कोणत्याही धर्माचे असोत—त्यांना सारख्या रीतीनें वागविलें जावें. सारांश, दिवाणी किंवा फौजदारी अधिकाऱ्यांच्यापुढें चाललेल्या कोणत्याही प्रकरणांत धर्मसंबंधाचा विचारच होतां कामा नये, अशी त्यानें व्यवस्था केली.

यानंतर बादशहानें आपलें राज्य मजबूत करण्याच्या किंवा सुधारण्याच्या संबंधांत जे जे विचार केले, त्या सर्वांत फैजी व अबुलफजल हे उभयता बंधु त्याचे परम विश्वासू व मुख्य सल्लागार असत. त्यानें त्या दोघांनाही लष्करी खात्यांत जागा दिल्या. कारण दरबारांत त्यांची खरी योग्यता व मानमरातब कायम होण्याला हेंच एक उत्तम साधन होतें. ते बहुधा त्याच्या प्रत्येक स्वारीशिकारींत त्याच्याबरोबर असत. ते त्याला राज्याची जमाबंदी व काळीचें काम यांत वेळोवेळीं सुधारणेच्या गोष्टी सुचवीत; व शिवाय त्याच्या मताचें पुष्टीकरण करण्यास व त्याला सल्लामसलत देण्यास नेहमीं त्याच्याजवळ तत्पर असत.

इकडे अकबर हा, तत्कालीन लोकस्थितीचें व लोकांच्या विचारांचें मान लक्षांत आणून, आपल्या दृष्टीनें बहुतेक सर्व प्रजेस मान्य होईल अशा तऱ्हेनें धर्माचे व व्यवहाराचे नियम व कायदे तयार

करून प्रसिद्ध करण्यांत गुंतला होता. या नवीन धर्माला त्यानें 'दीनेइलाही' किंवा 'परमेश्वरी धर्म' असें नांव दिलें. त्यांतील मुख्य तत्त्वें म्हटलीं म्हणजे, परमेश्वर एकच आहे, व या भूमंडळावर अकबर हा त्याचा खलीफा–पैगंबर किंवा प्रेषित–आहे, हीं होतीं. मुसलमानी प्रार्थनांत अर्थ चांगला प्रशस्त नाहीं असें पाहून त्यानें त्या रद्द केल्या, व त्यांच्या ऐवजीं पारशी लोकांच्या प्रार्थनांच्या नमुन्यावर विशेष उदात्त व प्रौढ अशा प्रार्थना चालू केल्या; तसेंच धर्मसंबंधी विधि व संस्कार हे हिंदुधर्मांतून घेतले. सर्व सरकारी कागदपत्रांच्या व सणावारांच्या संबंधानें त्यानें जो नवा संवत् सुरू केला तो निवळ पारशी लोकांचाच होता. या नवीन सुरू केलेल्या गोष्टींच्या संबंधानें मुसलमान लोकांनीं साधारणपणें फारसा उघड विरुद्धपणा दाखविला नाहीं. तरी त्यांच्यांत जे कोणी दुराग्रही व तामसी लोक होते त्यांनीं, या कामांत बादशहाचा मुख्य सल्लागार जो मनुष्य आहे ह्मणून ते समजत होते, त्याजविषयीं कमी तिरस्कार दाखविला असें नाहीं. हिंदु राजेरजवाडे व सरदार यांना दरबारांत मोठमोठीं कामें व फौजेंत मोठमोठे अधिकार दिलेले पाहून तर त्यांविषयीं त्यांनीं फारच मत्सर प्रदर्शित केला. राजा भगवानदास, मानसिंग, तोडरमल्ल, बिरबल, यांच्यासारखे लोक केवळ अद्वितीय योग्यतेचे असतांही त्यांजबद्दल त्यांना कांहींच वाटत नव्हतें. हे लोक हिंदु होते, एवढ्या एकाच गोष्टीमुळें तत्कालीन मुसलमान इतिहासकारांनीं त्यांच्या नांवांचा उल्लेख करितांना त्यांच्या धर्माविषयीं तिरस्कारबुद्धि प्रकट केली असून, परलोकीं त्यांची जी काय गति–त्यांच्या मतें दुर्गति–होणार, तिच्या संबंधानें त्यांनीं त्यांचा उपहास केलेला आहे.

गोव्यास वस्ती करून राहिलेल्या पोर्तुगीज लोकांच्या धर्माविषयीं कांहीं प्रत्यक्ष व खरी माहिती करून घेण्याविषयीं अकबरानें दाखविलेल्या उत्सुकतेवरून त्याच्या मनाचा जिज्ञासुपणा व्यक्त होतो. त्यानें 'नव्या करारा'[१]चें फारशी भाषेंत मुळाबरहुकूम शुद्ध भाषांतर तयार करण्याविषयीं फैजीस सांगितलें, व गोव्यांतील जेसुईट

१ ख्रिस्ती धर्मपुस्तकाचे दोन भाग आहेत : जुना करार व नवा करार.

पंथाचा पाद्री रोडाल्फो अक्काव्हिवा याचें आग्र्यास येण्याविषयीं मन वळवून त्यास तेथें नेलें.

हा पाद्री आग्र्यास असतांना इबादतखान्यांत एक धर्मविषयक सुप्रसिद्ध वाद झाला. या प्रसंगीं सर्व प्रख्यात विद्वान् काजी, मौलवी व हकीम, तसेंच ब्राह्मण, जैन, बौद्ध, सांख्यवादी हिंदु, ख्रिस्ती, यहुदी व पारशी, या सर्वांनीं पाळीपाळीनें भाषणें केलीं. अबुलफजल यानें याविषयीं लिहिलें आहे कीं, "प्रत्येकजण निर्भयपणानें आपलीं मतें व सिद्धांत प्रतिपादन करीत होता, व हे वादविवाद व ही भवतिनभवति मोठ्या कडाक्यानें व फार वेळ चालली होती. प्रत्येक पंथाच्या लोकांनीं आपल्याच गर्वांत व घमेंडीत प्रतिपक्षाच्या वचनांवर नेटानें हल्ला करून त्यांचा पाडाव करण्याचा यत्न केला. एके दिवशीं रात्रीं इबादतखान्यांत पाद्री रोडाल्फो हा आल्यानें त्यास विशेषच शोभा आली. विद्वत्ता व ज्ञान यांत त्याच्या तोडीचा त्या वेळीं साऱ्या पाद्रीमंडळांत कोणी नव्हता. त्याच्यावर अनेक छिद्रान्वेषी लोकांनीं हल्ले केले; तेव्हां त्या वादविवादांत प्रत्येक गोष्टीचा शांतपणें विचार करून तिजविषयीं आपलें मत निःपक्षपातानें प्रकट करण्याविषयींच्या सभासदांच्या शैलीचें खरें स्वरूप व्यक्त होण्याची संधि आली. या लोकांनीं पूर्वीपासून चालत आलेल्या शाब्दिक सिद्धांतांचें नुसतें प्रतिपादन केलें; पण नीट शास्त्रोक्त साधक बाधक प्रमाणें पुढें आणून खरें तत्त्व शोधून काढण्याचा यत्न मुळींच केला नाहीं. तेव्हां अर्थातच त्यांचें ह्मणणें व त्यांचे सिद्धांत यांच्या अगदीं चिंधड्या उडून गेल्या त्यांनीं बायबलांतील परस्पर विरोधी गोष्टींवर मोठें काहूर आणलें तेव्हां तर त्यांची बहुतेक फजिती उडून जाऊन त्यांना आपलें म्हणणें मुळींच खरें करून देतां आलें नाहीं. त्या पाद्री गृहस्थानें पूर्ण शांतपणानें, व आपल्या म्हणण्याच्या सत्यतेविषयीं आपल्या मनाची पक्की खात्री झालेली आहे अशा तऱ्हेनें, त्यांच्या पूर्वपक्षाचीं यथास्थित उत्तरें दिलीं. नंतर तो पुढीलप्रमाणें बोलला:—

'आमच्या धर्मग्रंथाविषयीं या लोकांचें असेंच मत असलें, व कुराण हेंच एक खरें ईश्वरदत्त धर्मपुस्तक आहे असें ते मानीत असले, तर असें करा कीं, एक मोठा अग्नि तयार करा; मग मी आपलें

बाहुबल हातांत घेतों, व उलेमा ( विद्वान् मुसलमान ) लोकांनीं आपलें कुराण हातांत घ्यावें; आणि या वादग्रस्त गोष्टीच्या सत्यासत्यतेची निवड होण्याकरितां त्या अग्नींतून आह्मी चालत जाऊं, ह्मणजे खरें कोणतें आहे त्याचा तेव्हांच निवाडा होईल.' ते दुष्ट अंतःकरणाचे व हलकट मनाचे त्याचे प्रतिपक्षी, त्यानें हें सुचविलेलें दिव्य[1] करण्यास कबूल झाले नाहींत, व त्यांनीं 'शेषं कोपेन पूरयेत' या न्यायानें त्यास कांहीं तरी उत्तरें दिलीं. हा आग्रहाचा व मूर्खपणाचा प्रकार पाहून त्या न्यायी व निःपक्षपाती बादशहाच्या मनाला फार त्रास झाला. तो मोठ्या मार्मिकपणानें व विचारपूर्वक म्हणाला:—

'आपल्या मनाची खात्री नसतां मनुष्यानें बाह्यात्कारीं धर्माचें अवडंबर दाखविणें, आणि मुसलमानी धर्मशास्त्रांत निष्णात असल्याचा नुसता डौल मिरविणें, या गोष्टींचा कांहीं एक उपयोग नाहीं. मीं आजपर्यंत आपल्या अधिकारबलाच्या धाकानें अनेक ब्राह्मण लोकांस आमच्या पिढीजाद धर्माचा स्वीकार करण्यास लाविलें आहे. पण सांप्रत माझ्या अंतःकरणांत सत्यरूप किरणांचा प्रकाश पडला असल्यामुळें माझी पक्की खात्री झाली आहे कीं, अहंभावरूप अभ्रपटल व स्वमताभिमानरूप धुकें यांचें तुम्हां सर्वांच्या मनाभोंवतीं आवरण पडलें आहे; आणि प्रत्यक्ष प्रमाणरूप ज्योतीच्या उजेडावांचून आतां एक पाऊलही पुढें ठेवण्याची सवड राहिली नाहीं. पूर्ण विचार करून निर्मळ अंतःकरणानें जो मार्ग मनुष्य स्वीकारील तोच त्यास हितप्रद होणार आहे. केवळ धर्मांत सांगितलेले मंत्र तोंडानें म्हणणें, सुंता करणें, किंवा राजभयामुळें साष्टांग नमस्कार घालणें, यांपासून परमेश्वराच्या दृष्टीनें कांहीं उपयोग होणार नाहीं. परमेश्वराच्या आज्ञा पाळणें म्हणजे

---

१ कोणत्याही पक्षाची सत्यता सिद्ध करण्याकरितां दैविक उपाय पूर्वी करीत असत त्यांना दिव्य ह्मणतात. हीं दिव्यें अनेक प्रकारचीं आहेत : अग्नींत उडी टाकून कांहीं इजा न होतां बाहेर पडणें; तापलेला लोखंडाचा गोळा हातावर घेऊन कांहीं पावलें चालणें, व तोंवर हाताला फोड न येणें; कड्यावरून उडी टाकणें व कांहीं इजा न होणें; पाण्यांत बुडून पुनः निघणें; सर्पादिकांकडून दंश करवून कांहीं अपाय न होणें, वगैरे. हे बहुतेक प्रकार हल्लीं बंद असून कायद्याविरुद्ध मानलेले आहेत.

केवळ साष्टांग नमस्कार घालणें नव्हे; तर जें काय करणें तें खऱ्या भावानें अंतःकरणपूर्वकच केलें पाहिजे; कारण खरा भाव हा कांहीं मनुष्याच्या बाह्य स्वरूपावरून समजावयाचा नाहीं.'"

या एकंदर वादविवादाविषयीं, व तो पाद्री गृहस्थ जें अग्निदिव्य करतों म्हणून म्हणाला त्याविषयीं कोणाचें कसेंही मत असलें तरी त्यावरून एवढें सिद्ध होतें कीं, त्या इबादतखान्यांत त्या वेळीं धर्मसंबंधाच्या वादविवादास पूर्ण स्वतंत्रता होती. तसेंच त्यावरून विशेषतः अकबराच्या मनाचा कल कसा होता हेंही स्पष्ट दिसून येतें. याकरितां या गोष्टीचें अभिनंदनच केलें पाहिजे. वस्तुतः सर्व तऱ्हेनें वादविवाद व विचार करून बादशहानें तत्कालीन हरएक तऱ्हेचीं धर्ममतें व धर्मपंथ यांच्यापासून आपलें मन अगदीं अलिप्त करून घेतलें होतें. तीं धर्ममतें व ते धर्मपंथ यांच्या ऐवजीं फक्त सृष्टिकर्त्या सर्वशक्तिमान् परमेश्वराला मात्र तो मानीत असे; आणि सर्व लोकांस सुखकारक असे त्या परमेश्वराचे नियम, म्हणजे सर्वांविषयीं समताबुद्धि, निःपक्षपातीपणाचा न्यायइनसाफ, व प्रत्येकास आपल्या अंतःकरणाच्या वृत्तीप्रमाणें धर्मसेवन करण्याविषयीं स्वतंत्रता—अर्थात् जिच्या योगानें दुसऱ्याच्या जिवास धोका येणार नाहीं अशी स्वतंत्रता—इत्यादि गोष्टींचा या जगतीतलावर सारखा प्रसार करण्याकरितां आपणास मुख्य अधिकारी नेमिलें आहे, असें तो मानीत असे. त्याचें मुसलमानांशीं फार कडक वर्तन असे. कारण त्या लोकांचाच जिकडे तिकडे वरचढपणा असून ते नेहमीं परधर्मी लोकांचा छळ करण्यास प्रवृत्त होतात हें तो खूब समजून असे. तो सर्वांचीं मतें संथपणें ऐकून घेत असे; पण सर्वशक्तिमान् परमेश्वराच्या उदात्त, उदार, सर्वव्यापी, व सार्वत्रिक गुणांचा प्रत्येक धर्मपंथांतील आपमतलबी धर्माधिकाऱ्यांनीं अपलाप केल्याचीं चिन्हें स्पष्टपणें जेव्हां त्याच्या नजरेस आलीं, तेव्हां तो त्यांचीं थोतांडें चटसारीं गुंडाळून ठेवून, सर्व जगाला मान्य अशा परमेश्वरापुढें मात्र दीन व लीन होत असे.

सूर्यमंडळ परमेश्वराची प्रत्यक्ष विभूति आहे असें तो मानीत असे. यावरून तो पारशी धर्माचा होता असें कोणी कोणी म्हणतात;

आणि पारशी धर्माचा साधेपणा त्यास फारच आवडे यांत शंका नाहीं. त्यानें स्वतः तयार केलेल्या धर्मपद्धतीमध्यें धर्माधिकारीवर्ग मुळींच ठेविला नव्हता. या भूमंडळावर परमेश्वराचे मुख्य प्रतिनिधि आपण आहों असें मानून त्यानें प्रत्येक धर्मातील चांगल्या गोष्टी निवडून घेतल्या, व धर्म ह्मणजे केवळ दुसऱ्याचा छळ करण्याचें साधन न होतां, तो सर्वांस सर्व तऱ्हेनें साहाय्य होण्याचें साधन व्हावें अशी व्यवस्था केली. त्याच्या राज्यव्यवस्थेच्या प्रौढ विचारांप्रमाणेंच त्याच्या नवीन धर्मव्यवस्थेचे हे पोक्त विचार तत्कालीन सामान्य जनांच्या बुद्धीच्या आटोक्याबाहेर होते. ह्या त्याच्याच मताला सर्व लोक येऊन मिळण्याला, त्याच्यामागून त्याच्यासारखेच राजे झाले पाहिजे होते; पण असें होणें अशक्य होतें, व पुढेंही होणार नाहीं. यामुळें त्याची नवीन राज्यपद्धति त्याच्या मरणानंतर हळू हळू बदलत जाऊन लौकरच जुन्या पद्धतींत मिळाली, व त्याचा नवा धर्म तर त्याच्याबरोबरच लयास गेला. त्याच्या पश्चात् जे दोन मुसलमान बादशहा झाले, त्यांचा धर्मसंबंधानें कोणत्याही बाजूकडे फारसा ओढा नव्हता. त्यांच्या कारकीर्दीनंतर प्रजेचा धर्मसंबंधानें पुनः छळ सुरू झाला, व अकबरानें पोक्त विचार करून शहाणपणानें चालू केलेल्या सर्व चांगल्या गोष्टी पार लयास गेल्या. या योगानें बादशाही घराण्याच्या मुख्य व बलवत्तर तत्त्वांचा ऱ्हास झाला, व सर्वांस सारखा न्याय देणें व सर्वांविषयीं धर्मसंबंधांत समसमान दृष्टि ठेवणें हीं जीं परम थोर अशा अकबर बादशहाच्या राज्यनीतीचीं मुख्य तत्त्वें, त्यांचें पुनरुज्जीवन करणाऱ्या अशा एका परकी राष्ट्राची सत्ता या देशांत होण्याला साधन झालें.

वरील विवेचनांत, धर्मसंबंधानें आपापल्या अंतःकरणाच्या वृत्तींप्रमाणें–पण दुसऱ्याच्या जिवाला धोका न होई अशा तऱ्हेनें–वागण्याची अकबरानें प्रत्येकाला मोकळीक दिली होती, असा उल्लेख आला आहे. याचें ढळढळीत उदाहरण, त्यानें सती जाण्याच्या कामांत हात घालतांना दाखविलें. सती या शब्दाचा अर्थ 'पतिव्रता' किंवा 'गुणवती' असा असून, सती जाणें म्हणजे स्त्रीनें आपल्या पतीच्या चितेवर जिवंत जाळून घेणें होय हें सांगावयास नकोच. ही सती

जाण्याची चाल उंच वर्णाच्या हिंदु स्त्रियांमध्यें प्राचीन काळापासून चालत आलेली असून ती इतकी मान्य होऊन गेली होती कीं, विधवेनें सती न जाणें ह्मणजे आपण पतिव्रता नाहीं असा आपणच आपल्यावर दोषारोप करून घेणें होय, अशी लोकांची समजूत झालेली होती. तरी जिवाची आशा बळकट व दुस्तर असते, यामुळें केव्हां केव्हां कांहीं विधवा, स्वतःच्या पातिव्रत्याविषयीं पक्की खात्री असूनही, व्यर्थ कल्पनासृष्टीला भुलून अग्निप्रवेश करण्यास तयार होत नसत. अशा प्रसंगीं त्यांचे उपाध्याय, त्यांना भावी नरकयातनांचें भय किंवा पारलौकिक सुखाची आशा दाखवून व मानसिक प्रोत्साहन देऊन सहगमन करण्याला तात्पुरचें राजी करण्याचा प्रयत्न करीत असत.

अकबराचें अंतःकरण कोमल असल्यामुळें वरील कृत्यांचा त्याच्या मनाला मोठा तिटकारा आला, व होईल तितकें करून ही चाल बंद पाडण्याविषयीं त्यानें यत्न केला. राजपुतान्यांतील राजेरजवाड्यांशीं त्याचा निकट संबंध असून त्या लोकांत ही चाल फारच श्रेष्ठ मानीत असत. हें कृत्य धर्मानुशासन समजून केलेंच पाहिजे, अशी पूर्वापार समजूत होऊन गेली होती. अशा स्थितींत प्रत्यक्ष एखाद्या स्त्रीनें सहगमन करण्याविषयीं उत्कट इच्छा प्रकट केली असतां तिला प्रतिबंध करण्याइतका त्यांच्या परंपरागत रुढीमध्यें अकबराला हात घालतां येईना. तेव्हां सरकारांतून याची सक्त मनाई करण्यापूर्वी, आपण चालू केलेल्या नूतन तत्त्वांचा राजे लोकांच्या अंतःपुरांत थोडासा प्रवेश होण्याला कांहीं काळ गेला पाहिजे, असें त्याला वाटलें. तरी कोणत्याही स्त्रीनें सहगमनाविषयीं यत्किंचितही नाखुपी दाखविली तर तिला सती जाऊं देऊं नये असा त्यानें हुकूम फर्माविला.

तो केवळ असे हुकूम देऊनच राहिला नाहीं. एक वेळ तो अजमिरास असतांना त्याचा परम विश्वासू मुखत्यार, अंबरचा राजा बिहारीमल्ल, याचा पुतण्या जयमल्ल हा बंगाल्यांतील सरदारांकडे कांहीं सरकारी कामाकरितां गेला होता, तो चौसा येथें मरण पावल्याचें वर्तमान आलें. जयमल्लावर अकबराची फारच मर्जी होती; कारण राजपुतान्यांतील सर्व राजेरजवाड्यांत त्यानेंच प्रथम बादशहाचें

ताबेदारी पतकरली होती, व शेवटपर्यंत त्यानें त्याची इमानेंइतबारें सेवा केली होती. जोधपूरचा राजा उदेसिंग याच्या मुलीशीं जयमल्लाचें लग्न झालें होतें. ही राजकन्या मोठी निश्चयी व धीट होती. तिनें जयमल्ल मरण पावल्याचें वर्तमान ऐकलें तेव्हां आपण साफ सती जात नाहीं म्हणून सांगितलें, व बादशहाच्या हुकूमाप्रमाणें तिला या बाबतींत वाटेल तसें करण्याचा पूर्ण अधिकार होता. पण जेव्हां तिनें या बाबतींत त्या अधिकाराचा उपयोग केला, तेव्हां तिचा पुत्र उदेसिंग व इतर लोक यांनीं मोठें काहूर करून सोडलें, व अखेरीस तिला जबरदस्तीनें सती घालविण्याचा ठराव केला. हें वर्तमान अकबराला कळतांच त्यानें त्या जुलमाचा प्रतिकार करण्याचा निश्चय केला, व आपले हस्तक तिकडे पाठविले. यांतच जयमल्लाचा चुलता होता. ते येऊन पोहोंचतात तों चिता पेटवून सर्व तयारी झालेली होती. तेव्हां त्यांनीं उदेसिंगाला पकडून, सर्व जमलेले लोक हांकून लाविले, व त्या राजकन्येचे प्राण वांचविले

फैजी व अबुल्फजल हे दोघे भाऊ मोठे विद्वान् व उदार मनाचे होते. त्यांजविषयीं अकबराच्या मनांत स्नेहभाव व आदरबुद्धि विशेष होती. यामुळें, मनापासून विद्याभ्यासंग करणाऱ्या व ज्ञानप्राप्तीविषयीं कळकळीनें झटणाऱ्या सर्व लोकांना तो चांगलें उत्तेजन देत असे. व्यर्थ अवडंबर घालणाऱ्या व थोतांड माजविणाऱ्या लोकांचा मात्र तो फार तिरस्कार करीत असे. दरबारांतील उलेमा लोकांत अशाच प्रकारचे लोक पुष्कळ आहेत, असें त्याच्या तेव्हांच नजरेस आलें; व त्यांचें खरें स्वरूप त्याला कळलें तेव्हांपासून त्याला त्यांचा तिरस्कार आला, व पुढें वेळोवेळीं त्यांची फजिती केल्यावांचून तो अगदीं रहात नसे

ब्लाकमन साहेबानें लिहिलें आहे कीं, 'दांभिक व गर्विष्ठ लोकांची अकबर केव्हांही गय करीत नसे. त्यांतून विद्येविषयींचा दांभिकपणा व गर्व यांचा तर त्याला अत्यंत तिटकारा असे.' त्याच्या या वर्तनामुळें फजित झालेले लोक, विद्या व विद्वान् लोक यांना हा उत्तेजन देत नाहीं, असा गवगवा करीत. पण वास्तविक तो तसें कांहींएक करीत नसे इतकेंच नव्हे, तर खऱ्या विद्वत्तेला उत्तम प्रकारें उत्तेजन देणारा

हिंदुस्थानांत, त्याच्यासारखा दुसरा राजाच झाला नाहीं. हल्लींच्या राज्यकर्त्यांना देखील या बाबतींत त्याच्यापासून बरेंच शिकून घेतां येण्याजोगें आहे.

त्याच्या प्रिय उपमातेचा पुत्र, खानआजम मिरजा हा तत्कालीन सर्व विद्वान् लोकांत अग्रणी होता. तो इतिहासांत अतिशय निपुण असून, महाबुद्धिमान् व खरा शोधक होता. तो प्रथम जुन्या मताचा कट्टा अभिमानी असून अकबराच्या नव्या धर्माची थट्टा करीत असे; त्यांतही फैजी व अबुलफजल यांची तर तो फारच टर उडवीत असे. त्यानें त्यांना निंदापर टोंपण नांवेंही दिलीं होतीं. परंतु पुढें तो एकदां मक्केच्या यात्रेस गेला असतां तेथें त्याला काजी लोकांनीं इतकें ठकविलें व लुबाडलें कीं, त्यामुळें त्याची मुसलमानी धर्माविषयींची श्रद्धा व उत्साह हीं आपोआपच थंड पडलीं; व आग्र्यास परत आल्यावर तो 'दीनेइलाही' ह्या अकबराच्या नव्या पंथांत सामील झाला. तो कविता चांगली करी. शहाणपणा व बोलण्याचालण्याची सुरेख शैली यांविषयीं त्याची फार प्रसिद्धि असे. त्याच्या अनेक सुभाषितांपैकीं एक हल्लीं उपलब्ध आहे, तें येणेंप्रमाणें : 'पुरुषानें चार बायका कराव्या—इराणी स्त्री बोलाचालायाला; खुरासानी स्त्री गृहकृत्याकरितां; हिंदु स्त्री मुलांची जोपासना करण्याकरितां; आणि तुर्की स्त्री वरच्या तिघींना वचक बसण्यासाठीं रोज चाबकाखालीं बडवण्याकरितां!'

अकबराचा गुरु बैरामखान याचा पुत्र मिरजा अबदुलरहीम या नांवाचा होता. तो अकबराच्या सर्व सरदारांत हुशार, शूर व उदार असा होता. तो पुष्कळ वर्षेंपर्यंत खानखानान किंवा मुख्य सेनापति या हुद्यावर होता. तो जसा मोठा योद्धा होता तसाच विद्वान्ही होता. त्यानें बाबराच्या चरित्राचें तुर्की भाषेंतून दरबारी फारशी भाषेंत भाषांतर तयार करून त्याची एक प्रत बादशहास नजर केली. हें चरित्र म्हणजे 'व्यवहारज्ञानाचा सागरच' आहे असे अबुलफजल यानें त्याचें वर्णन केलें आहे, व तें यथार्थ आहे. 'तबकात-ई-अकबरी' अथवा 'अकबराच्या कारकीर्दीचा इतिहास' या ग्रंथाचा कर्ता निजामुद्दीन अहंमद; 'तारीख ई-अल्फी' अथवा 'हजार

वर्षांचा मुसलमानी धर्माचा इतिहास' यांचे कर्ते; व या सर्वांहूनही विशेष योग्यतेचा असा जुन्या [illegible] पद्धतीचा इतिहासकार 'तारीख-ई-बदौनी' अथवा 'बदौनीचा इतिहास' या ग्रंथाचा कर्ता अबुलकादर बदौनी, हे तत्कालीन [illegible] इतर विद्वान् इतिहासकारांत विशेष प्रख्यात आहेत. बदौनी [illegible] यानें वरील ग्रंथाखेरीज काश्मीरचा इतिहासही तपासून तयार केलेला आहे.

बदौनी हा मोठा विलक्षण पुरुष होता. तो अकबराहून दोन वर्षांनीं वडील होता. तत्कालीन उत्तम विद्वान् लोकांच्या हाताखालीं त्यानें अनेक शास्त्रांचा बाळपणापासून चांगला अभ्यास केला असून संगीत, इतिहास, व ज्योतिष, या शास्त्रांत तो फार प्रवीण होता. त्याच्या मधुर आवाजावरून त्याला दरबारी इमामाची जागा मिळाली होती. तो चाळीस वर्षेंपर्यंत शेख मुबारक व त्याचे पुत्र फैजी व अबुलफजल यांच्या सहवासांत दरबारामध्यें सारखा राहिला. पण त्याचा त्यांच्याशीं खरा स्नेह जुळाला नाहीं; कारण तो त्यांना पाखंडी समजत असे. अकबराच्या सांगण्यावरून त्यानें साग्र रामायणाचें व महाभारताच्या कांहीं भागाचें संस्कृतांतून फारशींत भाषांतर केलें. मागें सांगतलेला, तारीख-ई-बदौनी' किंवा 'मुंतखबात्उल्तवारिख' ह्मणजे 'इतिहाससार' या नांवानें प्रसिद्ध असलेला त्याचा ग्रंथ विशेष उपयोगी व महत्त्वाचा आहे; कारण त्यांत अकबराच्या धर्ममतांचें चांगलें दिग्दर्शन केलेलें आहे, व त्याच्या कारकीर्दीतील प्रसिद्ध पुरुषांचीं चरित्रेंही त्यांत दिलेलीं आहेत.

बदौनी अकबरापूर्वी अकरा वर्षें मरण पावला. त्याचा मोठा मुख्य ग्रंथ म्हणजे 'इतिहाससार' हा त्यानें मोठ्या काळजीनें छपवून ठेविला होता. तो जहांगीर बादशहा गादीवर बसून कांहीं काळ जाई तोंपर्यंत प्रसिद्ध झाला नव्हता. हा ग्रंथ, ज्यांना अकबराचीं नवीं मतें आवडत नसत अशा धर्माभिमानी व दुराग्रही मुसलमान लोकांस फार प्रिय झाला; व पुढें हळू हळू अकबरानें केलेल्या सुधारणा जसजशा लयास जाऊं लागल्या व मतवैचित्र्याबद्दल लोकांचा छळ होण्यास सुरवात झाली, तसतसा तो अधिकाधिक लोकप्रिय होत चालला.

वर सांगितल्याखेरीज ज्या इतर विद्वान् लोकांनीं आपली बुद्धिमत्ता, विद्या व व्यासंग यांच्या योगानें अकबराची कारकीर्द सुशोभित केली, त्यांजविषयीं सविस्तर माहिती येथें देण्याची फारशी अवश्यकता दिसत नाहीं. ज्याची कीर्ति कधींही लयास जावयाची नाहीं अशा **आईन-ए-अकबरी** या ग्रंथांत त्या सर्व लाहनमोठ्या ग्रंथकारांचीं नांवें आहेत. परंतु विद्या व कला यांना या बादशहानें स्वतः जें उत्तेजन दिलें, त्याविषयीं चार शब्द लिहिणें रास्त आहे. परदेशांतून आणविलेले व तसेच स्वदेशांतील सर्व उपलब्ध ग्रंथ यांचा आपल्या पुस्तकालयांत चांगला भरणा करण्याकडे तो फार लक्ष देत होता असें दिसतें. या ग्रंथांची तो फारशी भाषेंत भाषांतरें करवीत असे. या संबंधानें आईन-ए-अकबरींत असें लिहिलें आहे: ‘ या पुस्तकालयाचे अनेक निरनिराळे भाग आहेत. कांहीं पुस्तकें अंतःपुरांत व कांहीं बाहेर ठेवलीं आहेत. पुस्तकसंग्रहाच्या प्रत्येक भागाचे, त्याच्यांतील ग्रंथांच्या योग्यतेप्रमाणें व त्या ग्रंथांत विवेचन केलेल्या शास्त्रांस मिळत असलेल्या महत्त्वाच्या मानानें पोटविभाग केलेले आहेत. गद्यग्रंथ, पद्यग्रंथ, हिंदी, फारशी, यूनानी, काश्मिरी व अरबी, असे सर्व ग्रंथ निरनिराळे ठेविलेले आहेत. याच व्यवस्थेनें त्यांची तपासणी होते. अनुभवी व हुशार लोक प्रतिदिवशीं तीं पुस्तकें आणून बादशहापुढें वाचतात. बादशहा प्रत्येक पुस्तक साग्र ऐकतो. दररोज वाचन झाल्यावर बादशहा त्या पुस्तकावर, वांचन झालें असेल त्या पानावर, आपल्या हातानें खूण करितो; व वाचकाला, त्यानें पानें वाचलीं असतील त्या मानानें इनाम देतो. प्रसिद्ध ग्रंथांपैकीं बादशहाच्या पुढें वाचले गेले नाहींत असे ग्रंथ फारच थोडे असतील. प्राचीनकाळच्या ध्यानांत ठेवण्याजोग्या व महत्त्वाच्या ऐतिहासिक गोष्टी, शास्त्रीय चमत्कार, किंवा शास्त्रीय वादापैकीं चांगले चांगले मुद्दे, यांपैकीं कोणतीही गोष्ट या निःपक्षपाती व साधुजनधुरीण बादशहाला माहीत नाहीं असें क्वचितच असेल. ’ इतकें सांगून वरील ग्रंथकारानें बादशहाला विशेष आवडणाऱ्या ग्रंथांची एक मोठी याद दिली आहे. त्या यादींतील कांहीं ग्रंथांचें दिग्दर्शन वर झालें आहे.

विद्या व विद्वान् लोक यांच्या योगानें अकबराच्या कारकीर्दीवर झालेल्या चांगल्या परिणामाचें येथवर बरेंच वर्णन झालें असें वाटतें. विशेषतः फैजी व अबुलफजल या दोघां विद्वान् बंधूंचें वजन राज्यांत आमरण चांगलें कायम राहिलें. अबुलफजल याचें वजन तर त्याच्या पश्चात्‌ही कायम राहिलें; कारण त्यानें अकबरास जें शिक्षण लावून दिलें होतें त्याच्या योगानें त्याच्या अंगचे नैसर्गिक गुण दृढतर झाले होते. या दोघां बंधूंना आवडणारीं तत्त्वेंच अकबराला स्वभावतः प्रिय होतीं. इतर लोकांच्या धर्ममतांविषयीं अत्यंत समताबुद्धि; जात व धर्म हीं मनांत न आणतां सर्वांना सारखा न्याय देणें; शेतकरी लोकांवरील सर्व तऱ्हेचा भार होईल तितका कमी करणें; सर्व जातींचे व सर्व स्थितींतले लोक, म्हणजे आपल्या प्राचीन कुळाविषयीं अभिमान धरणारे व नवीन स्वारी करून आलेल्या मुसलमान लोकांना अगदीं परकी व अंत्यजाप्रमाणें मानणारे रजपूत राजेरजवाडे, तसेंच आपण हा देश जिंकून घेतला आहे तेव्हां तो सर्व तऱ्हेनें आपलाच आहे, व त्यांतील सर्व प्रजाजन आपले गुलाम होण्यासच लायक आहेत, असे मानणारे उजबक व मोंगल सरदार, त्याचप्रमाणें चारशें वर्षांपासून इकडे येऊन राहिलेले व या देशांतील लोकांत मिसळून जाऊन जणों त्यांच्यांतलेच बनलेले असे अफगाण लोकांचे वंशज, आणि चांगल्या रीतीनें व ममतेनें वागविल्यानें तेव्हांच आपलेसे होण्यास तत्पर असे मूळचे हिंदु लोक, या सर्व प्रजाजनांचें हितैक्य करणें, हींच वरील तत्त्वें होतीं.

अशा तऱ्हेनें वागवूनही आपलेसे कधींही न होणारे असे एका वर्गाचे मात्र लोक होते. ते कोणते तर ज्यांच्या पूर्वजांनीं हिंदुस्थानांत पूर्वी राज्य केलें असून जे हल्लीं राज्यभ्रष्ट झाले होते, व ज्यांना पुनः कधीं तरी राज्य मिळवूं अशी आशा होती, असे हे मुसलमान लोक होते. बंगाल, बहार, ओरिसा, व पश्चिम हिंदुस्थानाचा बराचसा भाग यांत यांपैकीं बऱ्याच लोकांचा ठिकठिकाणीं अंमल होता, व ते मोठमोठया फौजा बाळगून असत. दिल्लीच्या तक्तावर अकबरापेक्षां आपला अधिक हक्क आहे असें ते समजत असत. पण आपले पूर्वज केवळ वर वर राज्य करीत होते, आणि अकबर आपल्या

राज्याचीं मुळें या राष्ट्रांत फार खोल घालवीत आहे, या गोष्टी ते ध्यानांत आणीत नसत, व त्याचा अधिकार मानीत नसत. अशा लोकांशीं देखील अकबरानें सलोखा करण्याचा कसा यत्न केला, पण त्यांच्या वर्तणुकीमुळें त्यांना समूळ बुडविणें त्याला कसें भाग पडलें, याचें मागें वर्णन आलेंच आहे.

राज्यव्यवस्थेंत उदार बुद्धीनें वागण्याचें अकबराच्या अंगचें स्वाभाविक तत्त्व फैजी व अबुल्फजल यांच्या सहवासानें दृढतर झालें होतें. या सुधारणाप्रिय बादशहानें चालू केलेल्या राज्यव्यवस्थेवर या त्याच्या उदार बुद्धीचा कसा काय परिणाम झाला तें पाहणें जरूर आहे. मागें एके ठिकाणीं अकबराच्या तोंडचेंच एक वाक्य दिलें आहे, त्यांत त्यानें आपल्या कारकीर्दींत एक वेळ ब्राह्मणांस जबरदस्तीनें बाटवून मुसलमान केल्याचा उल्लेख आहे. स्वतः अकबरानेंच असें म्हटलें आहे, तेव्हां ही गोष्ट खरी असावी; बाकी अशा तऱ्हेनें जबरदस्तीनें ब्राह्मणांस किंवा दुसऱ्या कोणास त्यानें बाटविल्याचा दुसरीकडे कोठें दाखला आढळत नाहीं. ही गोष्ट, तो लहान असतांना, व सर्व राज्यसत्ता बैरामखानाच्या हातीं असतांना घडली असावी. सर्व राज्यसत्ता बैरामखानाकडे होती ती आपल्या हातीं घेऊन त्याला मक्केस जाण्याची परवानगी दिल्यानंतर त्यानें लागलीच हिंदु व मुसलमान यांच्यांत कांहींएक भेद न मानतां सर्वांना सारख्या तऱ्हेनें सरकारी कामें द्यावयाचीं असा निश्चय केला, व तो त्याचा निश्चय कधींही ढळला नाहीं. विजयी सैन्यांतील शिपायांनीं शत्रूंचीं बायकामुलें व आश्रित लोक कैद करून त्यांना जबरदस्तीनें विकण्याची किंवा आपल्या घरीं गुलाम करून ठेवण्याची परंपरागत चाल होती, ती अकबरानें आपल्या वयाच्या एकविसाव्या म्हणजे आपल्या कारकीर्दीच्या सातव्या वर्षीं भगदीं बंद करून टाकली. शत्रूनें कांहीं अपराध केले असले तरी, त्याचीं मुलें माणसें व त्याचे आश्रित लोक यांना, बादशहानें प्रसिद्ध केलेल्या जाहिरनाम्याप्रमाणें, आपल्या किंवा आपल्या आप्तइष्टांच्या घरीं जाण्याला मोकळीक होती. लहान किंवा मोठा, कोणी कसाही असो, त्याला गुलाम करून ठेवण्याचा कोणासही हुकूम नसे. तो उदार मनाचा बादशहा नेहमीं असें म्हणे कीं,

'नवऱ्यानें वाईट कर्म केलें, तर त्यांत बायकोचा काय दोष? किंवा बापानें बंड केलें, ह्मणून त्याचें प्रायश्चित्त मुलांना काय म्हणून?'

इतर वाईट गोष्टींची सुधारणा करण्याच्या संबंधांतही त्यानें अशाच तऱ्हेची उदारपणाची व दूरदृष्टीची व्यवस्था सारख्या नेटानें व जोरानें चालविली होती. पुढील वर्षीं एक फार फायदेशीर, पण त्याच्या मतानें खरोखर हिंदु प्रजेच्या अंतःकरणास घरे पाडणारा असा कर बंद करण्याचा त्यानें निश्चय केला. पृथ्वीच्या पाठीवर हिंदु लोकांप्रमाणें यात्राप्रिय लोक दुसरे कोणी नसतील. त्यांचीं विवक्षित व निरनिराळीं अशीं तीर्थें हिंदुस्थानाच्या प्रत्येक प्रदेशांत पुष्कळ आहेत. त्या प्रत्येक ठिकाणीं निरनिराळे विशिष्ट संप्रदायाचे साधु असून त्या त्या ठिकाणचें माहात्म्यही तसेंच निरनिराळें मानलें आहे. या यात्रेकरू लोकांना फार दूरदूरचे व कष्टदायक प्रवास करावे लागतात, व हे प्रवास जितके अधिक दूरदूरचे असतील, तितकें यात्रेचें अधिक पुण्य बहुधा ते लोक मानतात. मोंगलांच्या पूर्वीं होऊन गेलेल्या अफगाण बादशहांना या यात्रा जणों एक कामधेनुच झाल्या होत्या. ते प्रत्येक यात्रेकरूच्या द्रव्याचा जसा शोध लागेल किंवा लौकिक असेल त्या मानानें त्याच्यावर कर बसवीत असत. या कराचें उत्पन्न कोटयावधि रुपयांचें होतें असें अबुलफजल ह्मणतो. परंतु त्यापासून हिंदु प्रजेला फारच त्रास होत असे. हिंदु लोकांच्या दृष्टीनें यात्रा करणें हें प्रत्येकाचें मुख्य कर्तव्यकर्म आहे, व त्याविषयीं त्याला धर्मशास्त्राच्या सक्त आज्ञा आहेत; निदान त्यांचे गुरु ब्राह्मण हे त्यांस तसें सांगत आले आहेत. या यात्रेकरू लोकांचें म्हणणें असें असे कीं, आह्मी आपल्या शरिराला नाहीं नाहीं तसले कष्ट करून घेत आहों; कधीं कधीं शेंकडों कोस नमस्कार घालीत जात आहों; असें असतां राजानें आणखी आमच्या द्रव्याचा अपहार करावा, हा कोठचा न्याय! हा या संबंधाचा हिंदु प्रजेचा गिल्ला बादशहाच्या कानीं लौकरच गेला. हा कर ह्मणजे एक चांगली व सोपी उत्पन्नाची बाब आहे असें समजणारे दरबारचे लोक बादशहाला असें समजावीत कीं, हिंदु लोक यात्रा करितात हा त्यांचा केवळ दांभिकपणा व धर्म-

भोळेपणा आहे. ते ह्या यात्रा करण्याचें कधींही बंद करणार नाहींत; व हा कर हटकून वसूल होणारा व कधीं कमी न होणारा असल्यामुळें, तो बंद करणें म्हणजे वसुलाचे बाबतींत मोठी चूक करणें होय. परंतु बादशहाचें असें म्हणणें पडलें कीं, बहुजनसमाजाच्या धर्मभोळेपणावर हा कर असून, प्रत्येक हिंदूला यात्रा न करितां घरीं राहिल्यानें हा कर देणें चुकवितां येईल. तरी यात्रा करणें हें हिंदुधर्माचें एक अंग आहे, व त्या लोकांच्या मतानें तो एक सर्वशक्तिमान् परमेश्वराच्या पूजनाचा मार्ग आहे. अशा स्थितींत परमेश्वराच्या ह्मणून मानलेल्या आज्ञेप्रमाणें वर्तन करण्याच्या कामांत यत्किंचित्‌ही अडथळा आणणें अगदीं अयोग्य आहे. या मुद्यावर अकबरानें तो कर बंद केला.

याचप्रमाणें मुसलमान राजांनीं परधर्मी प्रजेवर बसविलेल्या 'जझिया' किंवा डोईपट्टी नांवाच्या कराची व्यवस्था होती. हा कर मूळारंभीं अफगाण मुसलमान राजांनीं हा देश जिंकून घेतला तेव्हांपासून बसविलेला होता. सर्व हिंदु प्रजेच्या मनाला याहून अधिक त्रासदायक, व सरकारी अंमलदारांना प्रजेवर येथेच्छ जबरदस्ती करण्याला साधनीभूत अशी दुसरी कोणचीही बाब नव्हती. अकबराच्या पूर्वी होऊन गेलेल्या राजांना मूळ राहिवाशी प्रजेचें मन कां मिळवून घेतां आलें नाहीं याचीं कारणें, या कराच्या वसुलासंबंधानें जी वहिवाट व व्यवस्था चालू होती, तिच्या वर्णनावरून सहज ध्यानांत येतील. तारीख-ई फिरोजशाही या ग्रंथाच्या कर्त्यानें लिहिलें आहे कीं, 'दरबारचे कामगार हिंदु लोकांजवळ या कराचे पैसे मागतील तेव्हां त्यांनीं ते ताबडतोब मोठ्या नम्रपणानें व हीनदीन होऊन दिले पाहिजेत, व कामगारांच्या मनांत त्यांच्या तोंडांत थुंकावें असें आलें तर त्यांना थुंकू देण्याकरितां त्यांनीं धर्मभ्रष्ट होण्याची शंका अगदीं मनांत न आणितां मुकाट्यानें तोंड पसरलें पाहिजे. अशा तऱ्हेनें त्यांची पायमल्ली करण्याचा व तोंडांत थुंकण्याचा हेतु एवढाच आहे कीं, आपल्या छायेखालीं स्वस्थतेंत राहणाऱ्या परधर्मी प्रजेची ताबेदारी व्यक्त व्हावी, व ईश्वरदत्त खऱ्या मुसलमानी धर्माचें वैभव व खोट्या धर्माविषयीं तिरस्कारबुद्धि व्यक्त व्हावी.' वरीलवरून

प्रमाणें वर्तन करणारे कामगार वास्तविक खऱ्या मुसलमानी धर्माच्या मूळतत्त्वाच्या विरुद्ध वागत होते, हें उघड आहे; याविषयीं येथें वादविवाद करण्याची अवश्यकता नाहीं. दुराग्रही धर्माभिमान्यांच्या विलक्षण दांडगाईमुळें ज्याचें नुकसान झालें नाहीं असा एकही धर्म नाहीं. निदान मुसलमानी धर्माचें तरी इतर धर्मांप्रमाणेंच नुकसान झालें आहे यांत संशय नाहीं. फिरोजशहासारख्या अत्यंत थोर व हुशार राजाच्या कामगारांना देखील, पादाक्रांत झालेल्या प्रजेची धर्माच्या नांवानें मनसोक्त पायमल्ली करण्याला, व असें करण्यांत त्या धर्माच्या मूळतत्त्वाविरुद्ध वर्तन करण्याला कशी सवड होत असे, ही गोष्ट वरील उताऱ्यावरून स्पष्ट दिसते.

असला कर वसूल करण्याच्या कामीं कामगार लोकांस सहजच प्रजेवर जुलूम करण्यास सवड सांपडते ही गोष्ट अकबराच्या लक्ष्यांत आलीच; पण शिवाय हा करच मुळीं अतिशय वाईट असल्याचेंही त्याच्या ध्यानांत आलें. नास्तिक किंवा पाखंडी हा नुसता शब्द ऐकून देखील त्याला तिरस्कार येत असे. ‘ आपणच अगदीं खरे आहों अशी कोणाची खात्री आहे ? ’ असें तो वरचेवर ह्मणत असे. प्रत्येक धर्मांत चांगुलपणा आहे अशी त्याची पक्की समजूत झाली असल्यामुळें, एखाद्यानें आपला धर्म खरा आहे असें अंतःकरणपूर्वक मानलें असतां त्यावर कर बसविणें सर्वथैव अयोग्य आहे असें तो मानीत असे; म्हणून आपल्या कारकीर्दीच्या नवव्या म्हणजे आपल्या वयाच्या तेविसाव्या वर्षी, फैजी किंवा अबुलफजल यांचा सहवास सुरू होण्यापूर्वी सुमारें तीन वर्षें, कोणती गोष्ट कोणच्या ठिकाणीं सर्वदा शोभते याविषयींचा त्यानें आपला स्वतःचा अभिप्राय बनवून ‘ जजिया ’ कर बंद करण्याविषयींचा फरमान जारी केला. तेव्हांपासून त्याच्या राज्यांत असा नियम होऊन गेला कीं, जगाचा नियंता जो एकच परमेश्वर, त्याच्या छायेखालीं सर्व धर्मांच्या मनुष्यांस सारखेच हक्क आहेत असें मानलें जावें.

हिंदु लोकांवर धर्ममतांच्या संबंधानें जो त्रासदायक कर बसलेला होता तो उठवूनच अकबर स्वस्थ राहिला नाहीं. त्यानें, अधिकाराचा जोर बहुतकरून मुळींच न दाखवितां, सामोपचारानें व

हिकमतीनेंच; त्या लोकांच्या हिताच्या व सुखाच्या आड येणाऱ्या गोष्टी नाहींतशा करून टाकण्याचा प्रयत्न केला. सतीविषयीं त्यानें काय केलें तें पूर्वी आलेंच आहे. या चालीच्याच अनुषंगानें असणारी जी विधवाविवाहाची गोष्ट, तिलाही त्यानें अतिशय उत्तेजन दिलें इतकेंच नाहीं, तर विधवाविवाह कायदेशीर असल्याविषयीं, तसेंच मुलगे व मुली वयांत येण्यापूर्वीच त्यांचीं लग्नें करण्याची पूर्वापार व हल्लींही चालू असलेली चाल बंद करण्याविषयीं, त्यानें हुकूम जारी केले. वास्तविक पहातां ही चाल त्यांच्यांतल्याच मोठमोठ्या पंडितांनीं मनापासून निषिद्ध मानलेली आहे. असो. याखेरीज त्यानें, बलिदानाकरितां पशुहिंसा करणें, व दिव्य करणें, ह्याही गोष्टी बंद केल्या. ज्या धर्माच्या लोकांत त्याचा जन्म झाला होता त्यांच्याशींही तो कमी कडकपणानें वागला असें नाहीं. मात्र त्यांच्या संबंधांत तो शिरस्त्याप्रमाणें हुकूम फारसे जारी न करितां, स्वतःच्या उदाहरणानें त्यांची समजूत पाडून त्यांची कानउघाडणी करीत असे.

त्यानें प्रार्थना, उपवास, दानधर्म, व यात्रा या गोष्टी अतिशय न होऊं देण्याचा यत्न केला. पण त्या गोष्टी प्रत्येक व्यक्तीच्या आवडीवर अवलंबून असल्यामुळें, त्यांविषयीं त्यानें कोणास सक्तीनें मनाई केली नाहीं. तथापि अशा गोष्टी मोठ्या डामडौलानें व उघड उघड करण्यांत बहुतेक लोक केवळ ढोंग करितात ही गोष्ट अकबराला पक्की ठाऊक होती. तसेंच केवळ धर्माच्या नांवानें दुर्मुखलेलें होऊन थोतांड माजवीत बसण्यापेक्षां, व फार वेळ प्रार्थना करीत बसण्यापेक्षां, आपलें आयुष्य दुसऱ्या पुष्कळ चांगल्या रीतींनीं घालवितां येण्याजोगें आहे, हेंही तो पक्कें समजून होता. मुसलमान लोकांतील सुंता करण्याची चाल अगदीं बंद करितां येण्याजोगी नव्हती, तरी तो संस्कार मुलगा बारा वर्षांचा होईपर्यंत करूं नये, असें त्यानें ठरविलें. हिंदु लोकांना धर्मसंबंधी कल्पनांमध्यें जरा खप वाटावें म्हणून त्यानें गोवध करण्याचें मान कमी केलें, व इकडे डुकरें ठेवण्यासाठीं त्यानें गोवध करण्याचें मान कमी केलें, व इकडे डुकरें मारणें व त्यांचें मांस खाणें सशास्त्र ठरविलें. मुसलमान लोक कुत्र्यांना पूर्वीपासून अपवित्र समजत असत, व हल्लींही खरे मुसलमान लोक जे आहेत ते त्यांना तसेंच मानितात; पण अकबरानें

ते अपवित्र नाहींत असें ठरविलें. मुसलमानी धर्मांत मद्यपानाचा अगदीं निषेध केला आहे, तथापि अकबरानें तें माफक घेण्यास उत्तेजन दिलें.

आपल्या कारकीर्दीच्या शेवटीं शेवटीं म्हणजे इ० स० १५९२ च्या सुमारास, अकबरानें दाढी काढण्याची चाल प्रचारांत आणली. ही गोष्ट त्याच्या दरबारांतील सर्व जुन्या संप्रदायाच्या मुसलमानांस अतिशय वाईट वाटली. हिंदुस्थानासारख्या उष्ण प्रदेशांत वरचेवर श्मश्रू करविल्यापासून होणाऱ्या फायद्यांविषयीं पाल्हाळ करण्याचें हें स्थळ नव्हें; तथापि दाढी काढविण्याविषयीं कोणावर सक्ती होती असें नाहीं. तरी या नव्या वहिवाटीप्रमाणें वागणें अगर न वागणें यावरून बादशहाचे दरबारांत कोण मनुष्य कोणच्या पक्षाचा आहे हें सहज ओळखूं येऊं लागलें. खऱ्या भाविक मुसलमानाला दाढी काढविण्याइतकी दुसऱ्या कोणच्याही गोष्टीची चीड नाहीं, अशी स्थिति तेव्हां होती व हल्लींही आहे. यामुळें, त्या वेळीं बादशहानें हें उदाहरण घालून दिल्याबद्दल त्या लोकांत टीका व धुसपूस चालली होती.

अकबराच्या इतर नैसर्गिक गुणांप्रमाणेंच आप्तइष्टांविषयींचें त्याचें प्रेमही वर्णन करण्याजोगें होतें. यांपैकीं त्याच्या एका दूधभावानें वेळोवेळीं बुद्ध्या अपराध केल्यावरून त्याला थोडीशी शिक्षा देतांना अकबर म्हणाला, ‘ अजीजच्या व माझ्यामध्यें एक क्षीरनदी आहे, ती मी ओलांडूं शकत नाहीं. ’ आपल्या सर्व संबंधी लोकांशीं वर्तन करण्यांत या वाक्यांतील मुख्य तत्त्व नेहमीं त्याच्या मनापुढें उभें असे. ते लोक अगदींच सुधारण्याची आशा नसेल किंवा त्यांच्या हातून कोणाचे खूनच झाले असतील, तर मात्र त्याचा इलाज नसे. बाकी त्यांच्या हातून इतर कोणतेही अपराध घडले असले तरी तो त्यांना सौम्यपणा व मनाचें औदार्य दाखवूनच ताळ्यावर आणण्याचा यत्न करीत असे. मनुष्याला क्षमा करणें, त्याचा अधिकार

---

अजीज हें त्या दूधभावाचें नांव असावें. अवतरणांतील शब्दांचा अर्थ असा घ्यावयाचा कीं,‘त्याच्या व माझ्यामध्यें प्रेमरूपी नदी जी सारखी वाहत आहे, तिचें उल्लंघन माझ्यानें करवत नाहीं.’

काढून घेतला असला तरी फिरून तो त्याला देणें, व त्याजवर विश्वास ठेवणें, या गोष्टींची त्याला आवड असे. या सद्गुणांचें अवलंबन केल्यानें केव्हां केव्हां तो फसे; तरी शेवटीं त्यापासून चांगला परिणाम झाल्यावांचून रहात नसे. तो स्वतः पुत्र या नात्यानें मोठा गुणवान् व पति या नात्यानें अत्यंत प्रेमळ असून, पिता या नात्यानें पुत्रांचे अंमळ फाजील लाड करणारा होता.

त्याचे पुत्र गर्भश्रीमंतींत लहानाचे मोठे झाले ही गोष्ट एके प्रकारें दुर्दैवाचीच समजली पाहिजे; कां कीं, ती स्थिति त्यांना बिघडण्याला कारण झाली. त्यांपैकीं शहाजादा दानियल हा तर फारच होतकरू होता. परंतु वाईट प्रकारच्या मोहपाशांत पाडणाऱ्या ज्या अनेक गोष्टींचा त्याच्याशीं नेहमीं संबंध घडत असे, त्यांचें त्याच्या शिक्षकांच्या हातून निराकरण न झाल्यानें तो अकालीं मृत्युमुखीं पडला. शहाजादा मुराद याचीही तीच स्थिति झाली. त्याचा पुत्र जहांगीर, जो त्याच्यामागून गादीवर बसला, तो तर सर्वच गोष्टींत त्याच्या अगदीं उलट होता. बाप जिवंत असतांना स्वतः स्वतंत्र राजा होण्याचा यत्न केल्याचें जें वाईट उदाहरण अकबराच्या कारकीर्दीच्या अखेरीस त्यानें घालून दिलें, तें मोंगल-घराण्यांतील प्रत्येक युवराजानें वळविल्यामुळें, त्यापासून सर्व प्रकारें वाईट परिणाम झाला. जहांगिरानें याकरितां आपल्या बापाचा परममित्र अबुलफजल याला मारेकऱ्याकडून ठार मारविलें. आपल्या कीर्तीस कलंक लावणाऱ्या या अयोग्य पुत्राशीं अकबरानें जें अतिशय क्षमाशीलतेचें व शांततेचें वर्तन केलें, तसें उदाहरण इतिहासांत इतर क्वचितच सांपडेल. शिवाय अकबराला क्रूरपणाचा अतिशय तिरस्कार असे. आपलें कर्तव्य उत्तम प्रकारें बजावणें हेंच परमेश्वराचें भजनपूजन आहे, असें तो समजत असे. या संबंधानें क्षुल्लक किंवा महत्त्वाच्या कामांत तो फारसा फरक मानीत नसे.

कोणत्याही गोष्टीसंबंधानें अमुक तऱ्हेचा हुकूम जारी करावा," असें सांगूनच तो स्वस्थ राहत नसे. त्या हुकमाचा अंमल व परिणाम कसा काय होतो तें पाहून, त्यापासून फायदा होतो असें दिसलें तर त्याची तो पूर्तता करीत

असे. निरनिराळ्या जातींच्या लोकांवर त्याचा परिणाम काय काय होतो हेंही तो लक्षपूर्वक पहात असे. लोकांविषयीं त्याचीं जीं मतें होत तीं खरीं असल्याबद्दल त्याची मनापासून खात्री असे. त्याला चेहऱ्यावरूनच माणसाची चांगली परीक्षा करितां येत असे; व ही गोष्ट सर्व लोक कबूल करीत. अबुलफजल यानें लिहिलें आहे कीं, 'कांहीं लोकांना पाहतांक्षणींच ते कसे आहेत हें त्याला पक्कें समजत असे.' बदौनी यानें देखील ही गोष्ट कबूल केली आहे. हिंदु लोकांच्या संबंधाच्या प्रत्येक गोष्टीची हेटाळणी करण्याची बदौनी याला संवयच लागून गेली होती, तिला अनुसरून त्यानें, 'हा मन-कवडेपणाचा गुण अकबराला जोगी लोकांकडून प्राप्त झाला,' असें लिहिलें आहे.

अकबराच्या अंगीं इतका मनाचा मोठेपणा व उदारपणा होता, तरी तो स्वतः धर्मभोळेपणापासून अगदीं अलिप्त होता असें नाहीं. वेळाच्या शुभाशुभतेवर त्याचा भरंवसा असे. पारशी लोकांच्या धर्माचें विशेष पर्यालोचन केल्यानें हें वेड त्याच्या मनांत शिरलें, असें ब्लाकमन यानें लिहिलें आहे. त्या धर्मांत या गोष्टीचें बरेंच माहात्म्य आहे. त्याच्या दरबारचे लोक—त्यांतूनही ज्यांना त्याचीं नवीन धर्ममतें आवडत नसत—ते असें ह्मणत कीं, याला जें प्रत्येक गोष्टींत यश प्राप्त होतें तें याच्या सुदैवामुळेंच प्राप्त होतें. त्याचप्रमाणें बदौनी यानेंही त्याजविषयीं असें ह्मटलें आहे कीं, 'हुजूर मोअल्लाच्या(बादशहाच्या)नेहमींच्या सुदैवानें त्याचे सर्व शत्रु नष्ट झाले.' पण वास्तविक पाहिलें असतां, त्यानें कायदेकानू जे केले ते मोठ्या विचारानें, दूरदर्शीपणानें, व आपल्या मंत्र्यांच्या सल्ल्यानें केले असून, त्यांचा कसा काय परिणाम घडतो हें वेळोवेळीं लक्षपूर्वक पाहून त्यांत त्यानें सुधारणा केली, यामुळेंच त्याला अशा प्रकारचें यश मिळत गेलें यांत शंका नाहीं.

अकबराला स्वारीशिकारीचा फार नाद असे. परंतु त्याच्या मागून गादीवर बसलेला त्याचा पुत्र जहांगीर याचा जन्म झाल्यानंतर त्यानें शुक्रवारीं शिकार खेळणें सोडलें होतें. जहांगिरानें जें लिहून ठेविलें आहे तें खरें मानलें तर, जहांगीर जन्मास येण्यापूर्वींच, आपल्या प्रियपत्नीची या बाळंतपणांतून सुखानें सुटका

झाली तर शुक्रवारीं शिकार करणें आपण सोडून देऊं असा अकबरानें नवस केला होता, व तो त्याप्रमाणें शेवटपर्यंत वागला, असें दिसतें. अकबराला संगीत फार आवडत होतें एवढेंच नव्हे, तर तो स्वतः त्यांत चांगला निपुण होता, अशाबद्दल पुष्कळ आधार आहेत. ख्वाजेम कवीच्या प्राचीन पदांची त्याला फार आवड असे, व त्यानें त्यां आबालवृद्धांस आवडणाऱ्या पदांच्या चालींवर दोनशें कवनें स्वतः केलीं होतीं असें अबुलफजल म्हणतो. तसेंच चांगल्या शिकलेल्या प्रवीण गवय्यांपेक्षांही त्याला गायनाचें अधिक ज्ञान होतें, असेंही त्यानें लिहिलें आहे. त्याच्या दरबारांत प्रतिदिवशीं गायनवादनाचा सपाटा चालत असे. या कलेचा इकडील राजे लोकांना नेहमींचाच शौक असतो. असो. नवीन युक्ति शोधून काढण्याकडेही अकबराच्या बुद्धीची प्रवृत्ति बरीच होती. त्यानें एक गाडी, बंदुका साफ करण्याचें एक चक्र, व एक हत्तीचा साज, हीं तयार करण्याची नवीन युक्ति शोधून काढली, असें आइन-ए-अकबरीमध्यें म्हटलें आहे. तसेंच आपल्या फौजेच्या पोषाकांत व तोफखान्यांतही त्यानें कशी सुधारणा केली, याविषयींहीं वर्णन केलेलें आढळतें.

अकबराचें खाणेंपिणेंही अगदीं साधें असे, व तो दररोज एक वेळ जेवीत असे. त्याला मांस आवडत नसल्यामुळें कधीं कधीं महिनेचे महिने तो त्याला शिवतही नसे. त्याला फळफळावळ फार आवडत असून ती तयार करण्याचा त्याला मोठा नाद असे. अबुलफजल म्हणतो, फळें म्हणजे 'परमेश्वराची एक अत्युत्तम व अतिश्रेष्ठ देणगी आहे, असें तो मानीत असे.' त्यानें इराण व तुराण येथून बागवान लोक बुद्धया आणवून आग्र्यास व फत्तेपूर शिक्रीस त्यांची वस्ती करविली. तसेंच 'सर्दे व द्राक्षें, हीं जिकडे तिकडे उत्तम व विपुल झालीं आहेत; कलिंगडें, पीच किंवा आडू, बदाम, पिस्ते, डाळिंबें, इत्यादिकांची सर्वत्र समृद्धि झाली आहे,' असेंही त्यानें म्हटलेलें आहे. त्याचप्रमाणें काबूल, कंदाहार, काश्मीर, बदक्शान, व थेट समरकंद येथून या देशांत फळफळावळ येत असे, असेंही त्यानें आणखी लिहिलें आहे. आईन-ए-अकबरींत या फळांची एक लांबच लांब याद दिली आहे. ती वाचून, या देशाची ज्याला

चांगली माहिती आहे त्याला मोठा आनंद होणार आहे. हल्लींप्रमाणेंच त्या काळींही, हिंदुस्थानांतील सर्व मधुर फळांत आंब्यालाच मुख्य व उत्तम म्हटलेलें आहे ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. हें फळ रंग, सुगंध व रुची या सर्वांत अगदीं अप्रतिम असून, 'तुराण व इराणचे कित्येक रसिक लोक यास मुष्की टरबूज किंवा द्राक्षें यांहूनही श्रेष्ठ मानतात,' असेंही वर्णन केलेलें आहे.

अकबराची आग्रा व फत्तेपूर-शिक्री येथील दिनचर्या कशी होती याविषयीं दोन शब्द लिहिणें इष्ट आहे. तो रात्रीं फार वेळ पर्यंत—पहांटेपर्यंत देखील—जागत असे. हा काळ तो विद्वान् लोकांशीं संभाषण व वादविवाद करण्यांत घालवीत असे. अबुलफजल यानें लिहिलें आहे कीं, तो पहांटेच्या प्रहररात्रीपर्यंत ह्या गोष्टींत निमग्न झालेला असे. नंतर गाणेंबजावणें सुरू होई. पुढें सूर्योदयाबरोबर तो उठून जनानखान्यांत जाई. तेथें प्रातर्विधि उरकून पोषाक करून सुमारें एका तासानें तो दरबारांत येई. तेथें दरबारी लोकांचे मुजरे झाल्यावर सरकारी काम चालू होई तें बहुधा दोन प्रहर होण्यापूर्वींच आटपत असे. नंतर त्याचें रोजचें एक वेळचें ठरींव जेवण होई. तथापि ही त्याची जेवणाची वेळ अगदीं नियमित होती असें नाहीं. त्याची तिसरे प्रहरची वेळ झोंप घेण्याची ठरलेली होती. कधीं कधीं तो पहांटची व सकाळची वेळ शिकारींतही घालवी, व संध्याकाळीं बरीच रात्र होईपर्यंत चौगान किंवा कर्तब खेळत असे. चौगान खेळण्याला पळसाच्या लांकडाचे गोळे तयार करीत असत. दिवसा अतिशय उष्णता असे ती वेळ तो आराम घेऊन ताजातवाना होण्यांत घालवीत असे.

गादीवर बसून फार दिवस झाले नाहींत तोंच अकबराच्या लक्षांत आलें कीं, आपल्याला राजपुतान्यांतील राजेरजवाड्यांशीं नुसता स्नेहभावच नव्हे, तर त्याहूनही अधिक निकट संबंध जोडणें फार अगत्याचें आहे. आजवर सर्व रजपूत राजेरजवाडे, किंबहुना सर्व हिंदु लोक, असा संबंध घडून येण्यांत आपल्याला कलंक लागतो असें समजत होते. उंच कुळांतल्या रजपूत राजे लोकांच्या मनांतील अशा संबंधाविषयींची चीड व तिरस्कार हीं अकबरानें कशीं नाहींतशीं केलीं, व त्यांना या गोष्टीला त्यानें कसें राजी केलें, या गोष्टी मोठ्या

चमत्कार वाटण्यासारख्या आहेत. त्याचा बाप हुमायून यानें या संबंधाची बरीच तयारी यापूर्वीं करून ठेविलेली होती असें दिसतें. कर्नल टॉड् यानें आपल्या विद्वत्तप्रचूर व मनोहर अशा 'राजस्थानच्या इतिहासांत एके जागीं असें लिहिलें आहे कीं, हुमायुनानें आपल्या कारकीर्दीच्या आरंभीं, चितोडची राजकन्या करुणावती इचा पक्ष स्वीकारून नेहमीं तिला साहाय्य करण्याविषयीं वचन दिलें होतें. त्यानें ही कामगिरी फार आस्थापूर्वक बजाविली. तो त्या राजकन्येला नेहमीं 'प्रिय व सद्गुणी भगिनी' असें लिहीत असे. तसेंच अंबरचा राजा बिहारीमल्ल याचेंही हुमायुनानें प्रेम संपादिलें होतें. बिहारीमल्लाचा प्रसिद्ध पुत्र भगवानदास याजविषयींचा उल्लेख या ग्रंथांत अनेक ठिकाणीं आलेला आहे.

पुढें अकबरानें बिहारीमल्लाच्या कन्येशीं लग्न केलें. याप्रमाणें जयपूरच्या राजघराण्याशीं त्याचा शरीरसंबंध झाला, तेव्हां राजा भगवानदास व त्याचा पुतण्या मानसिंग—ज्याला भगवानदासानें दत्तक घेतलें होतें—या दोघांशीं त्याचा पक्का व कायमचा स्नेह जुळला. राजा मानसिंग याची अकबराच्या उत्तम सेनापतींत गणना होती. असो. भगवानदासाविषयीं दुसऱ्या एका जागीं लिहितांना कर्नल टॉड् यानें असें म्हटलें आहे कीं, 'तो अकबराचा मित्र होता, व अकबरही अशा लोकांशीं आपला स्नेह असणें किती महत्त्वाचें आहे हें जाणून होता.' तसेंच त्यानें पुढें लिहिलें आहे कीं, 'रजपूत राजेरजवाड्यांशीं दृढ परिचय होण्याची संधी अकबराप्रमाणें फारच थोड्या लोकांस प्राप्त झाली होती. पण मुसलमान लोकांशीं शरीरसंबंध करण्याचें लच्छन करून रजपुतांच्या नांवास व कुलास आरंभीं कलंक लावणारा म्हणून कुलांगार म्हणून भगवादासाच्या नांवाची सर्व लोक छी थू करतात.' स्वाभिमान नेहमींच बलवत्तर असतो, पण त्यांतही जात्यभिमान फारच कठिण असतो!

राजा भगवानदास व त्याचा पुतण्या मानसिंग यांच्याप्रमाणें थोर मनाचे व खरे वैभवशाली लोक राजपुतान्यांत आजवर जन्मास आलेच नाहींत. त्यांचा अकबराशीं निकट संबंध झाला ही एकच गोष्ट, मोंगल लोकांचें वर्चस्व रजपूत लोकांना हळू हळू मान्य होत

जाण्याला इतर सर्व गोष्टींपेक्षां अधिक कारणीभूत झाली. राजा भगवानदास याच्या कन्येशीं सलीमाचें लग्न झालें, यामुळें वरील संबंध पुढें विशेष दृढ झाला. अकबराच्या राज्यव्यवस्थेचा या शूर जातीच्या लोकांवर कसा परिणाम झाला हें, कर्नल टॉड् यानें त्याच्या कारकीर्दीविषयीं जें थोडेंसें वर्णन दिलें आहे, त्यावरून लक्षांत येण्याजोगें आहे. रजपुतांविषयींच्या अभिमानाच्या संबंधानें पाहूं गेले असतां कर्नल टॉड् हा खुद्द रजपुतांहूनही अधिक रजपूत होता असें म्हणण्यास हरकत नाहीं.

कर्नल टॉड् म्हणतो, 'मोंगल बादशाहीचा खरा संस्थापक व रजपूत-स्वातंत्र्यावर प्रथम खरी छाप बसविणारा अकबर बादशहाच होय. या कामीं त्याला त्याच्या अंगच्या सद्गुणांचीच चांगली मदत झाली; कारण, मनोविकारांचें खरें पृथक्करण करून ते स्वाधीन करून घेण्याचें उत्तम साधन त्यानें मोठ्या चतुराईनें शोधून काढून उपयोगांत आणिलें; यामुळें त्याला त्या लोकांच्या पायांत घालण्याच्या शृंखळांवर सोनेरी मुलामा देतां आला. या शृंखळा त्यांना नेहमींच्या सहवासानें तितक्या असह्य वाटेनातशा झाल्या. त्यांतूनही विशेषतः जेव्हां बादशहा त्यांच्या देशाभिमानाला संतुष्ट करणारें एखादें कार्य घडवून आणी, किंवा क्षुल्लक व हलकट गोष्टींच्या संबंधाच्या देखील त्यांच्या वासना तृप्त करी, तेव्हां तर त्या शृंखळा त्यांच्या फारच अंगवळणीं पडत. सर्व राज्य एकछत्री व एकवट करण्याकरितांच नवीं राज्यें जिंकावयाचीं, हें अकबराचें मुख्य तत्त्व बहुधा कर्नल टॉड याच्या लक्षांत आलें नाहींसें दिसतें; व त्यानें त्याला पूर्वींच्या अफगाण व पठाण राजे लोकांप्रमाणें मानून राज्यतृष्णेबद्दल फार दोष दिला आहे. तरी त्याला देखील शेवटीं त्याजविषयीं असें लिहावें लागलें कीं, 'महत्त्वाकांक्षे-मुळें त्यानें लोकांच्या मनावर ज्या जबर जखमा केल्या होत्या, त्या बऱ्या करण्याचेंही यश अखेरीस त्यानेंच घेतलें; व मुसलमान जातीच्या कोणाही राजाला कधींही प्राप्त न झालेल्या अशा कोट्या-वधि प्रजेच्या स्तुतीला व धन्यवादाला तो पात्र झाला.' कोट्यावधि प्रजेला सुख देणें ही गोष्ट राजाचें मुख्य कर्तव्य आहे असें जर मानलें, व तें साध्य करून घेण्यांत दुसऱ्यांचीं राज्यें काबीज करणें

अवश्यच असलें, तर तसें करण्यांत, साध्य वस्तूच्या चांगुलपणामुळें साधनासही चांगुलपणा येतो, असेंच ह्मटलें पाहिजे. अकबरानें राजपुतान्यावर स्वाऱ्या करून तो प्रदेश जिंकून घेण्याचा यत्न केला, तो तेथें स्वतःचें राज्य स्थापन करण्याकरितां नव्हे, तर आपल्या राज्यांत आपल्या सौम्य रीतीच्या अमलाखालीं आपल्या प्रजेला जें सौख्य व जी भरभराटी प्राप्त होते, ती प्रत्येक रजपूत राजाला आपापल्या राज्यांत स्वतंत्रपणानें राहूनही प्राप्त व्हावी, या उद्देशानें केला.

त्या वेळीं जोधपूरचा राजा उदेसिंग हा सर्व रजपूत राजांत अत्यंत प्रबळ होता. त्याची कन्या अकबरानें आपला पुत्र जहांगीर याजकरितां संपादन केली. तिच्या पोटीं जो राजपुत्र जन्मास आला तोच पुढें शहाजहान या नांवानें बादशहा झाला. त्याच्यामुळें रजपूत लोकांना या देशांत जी योग्यता प्राप्त झाली, तशा प्रकारची योग्यता त्यांना यापूर्वीं कधींच प्राप्त झाली नव्हती. या लग्नाचा परिणाम एकंदरींनें चांगला झाला. त्याविषयीं कर्नल टॉड् यानें म्हटलें आहे कीं, 'हें लग्न, जोधपूरच्या राजास नवीन चार जिल्हे लच्चादाखल जहागीर देऊन, अकबरानें जुळवून आणिलें; व या देणगीनें मारवाडची जहागीर दुप्पट झाली.' तो पुढें म्हणतो, 'अंबर व मारवाड येथील राजांचीं उदाहरणें प्रत्यक्ष पाहून, अशा प्रकारची लालूच पुढें आली असतां आपला निश्चय कायम राखण्याचें ज्यांना सामर्थ्य नव्हतें असे राजस्थानांतील बरेच लहानमोठे संस्थानिक, आपल्या अगणित शूर आश्रितांसह दिल्लीपतीचे ताबेदार झाले; व या योगानें त्या बहुतेकांचें महत्त्व वाढलें. या लोकांना 'राज्याचे आधारस्तंभ व भूषणें' असें जें मोंगल इतिहासकारानें म्हटलें आहे, तें अगदीं खरें आहे.'

कर्नल टॉड् हा रजपुतांचा पूर्ण कैवारी व त्यांच्या हिताविषयीं अत्यंत दक्ष असा असल्यामुळें, राजपुताना व तेथील राजेरजवाडे यांच्या संबंधानें अकबरानें जी वर्तणूक केली तिच्या समर्थनाविषयीं त्या ग्रंथकाराच्या लेखाइतका दुसरा साधक पुरावा मिळणें मुष्किलीचें आहे.

सांप्रत बादशाही घराण्यांतील लग्नांच्या संबंधाचें जें हें विवेचन चाललें आहे, त्याबरोबरच येथें स्वतः अकबराच्या विवाहित स्त्रियां-

विषयींही लिहिणें इष्ट आहे. त्याला पुष्कळ स्त्रिया होत्या असें ह्मणतात. पण त्यांपैकीं आठजणींविषयीं मात्र खात्रीलायक माहिती मिळते. त्याची पहिली बायको, त्याचा चुलता हिंदाल मिरजा याची कन्या होती, तिला संतति झाली नाहीं. ती त्याच्या पश्चात् आपल्या वयाच्या ८४ व्या वर्षी मरण पावली. त्याची दुसरी बायको, ही त्याची आत ह्मणजे बाबराची कन्या व मिरजा नुरुद्दीन महंमद यांची मुलगी होती. ती चांगली कवयित्री होती. मख्फी (गुप्त) या टोंपणनांवावर तिच्या कविता प्रसिद्ध आहेत. अकबराची तिसरी बायको, जयपुरचा राजा बिहारीमल्ल याची कन्या, ह्मणजे राजा भगवानदास याची बहीण होती. तिच्याशीं त्याचें लग्न इ० स० १५६० त झालें. त्याच्या चवथ्या बायकोची सौंदर्याविषयीं फार ख्याति होती, तिचें प्रथम लग्न अबदुल वासी याच्याशीं झालें होतें. पांचवी जहांगिराची आई जोधबाई, ही जोधपूरची राजकन्या होती. युवराजांची मातुश्री या नात्यानें अंतःपुरांत तिला मुख्य मान असे. सहावी, सातवी, व आठवी, या बायका मुसलमान जातीच्या होत्या.

राज्याचा अंतस्थ बंदोबस्त करितांना अकबरानें सारा वसूल करण्याच्या पद्धतीकडे चांगलें लक्ष्य दिलें होतें. त्याच्या बापास ज्यानें पळवून लाविलें होतें, त्या शीरशहानें या संबंधानें चालू केलेली पद्धतीच त्या वेळेपर्यंत एकसारखी सुरू असल्याचें त्यास आढळून आलें. ही पद्धति पुढील तत्त्वांवर बसविलेली होती: (१) जमिनीची बरोबर मोजणी; (२) जमिनीचें बिघेवारीनें सरासरी उत्पन्न किती होतें तें ठरविणें; (३) या उत्पन्नांतून शेतकऱ्यानें सरकारांत किती हिस्सा द्यावयाचा तें ठरविणें; आणि (४) वरील ऐनजिनसी उत्पन्नाच्या ठरलेल्या हिश्शाचा रोकड आकार नक्की करणें. अकबरानें या व्यवस्थेंत फारशी ढवळाढवळ न करितां तिचाच जास्ती फैलाव करण्याचें जोजिलें; व या हेतूनें, आजवर भूमापनाचीं निरनिराळ्या जागीं निरनिराळीं प्रमाणें होतीं, त्यांच्या ऐवजीं एक सार्वत्रिक प्रमाण त्यानें कायम केलें.

आईन-ए-अकबरींत लिहिलें आहे कीं, 'या उत्तम नियमांच्या योगानें जमाबंदी वसूल करणाऱ्या कामगारांच्या मनावरील अस्थिरता-

रूप मळ नाहींसा झाला, व प्रजेच्या डोक्यावरील अनेक प्रकारच्या जुलुमाचा भार हलका झाला; तसेंच वसूल अधिक वाढला, व राज्याची भरभराटी झाली.' अकबरानें नवीन सुधारलेलीं मोजणीचीं यंत्रें उपयोगांत आणविलीं, व त्यांनीं आपल्या राज्यांतील सर्व लागवडीलायक जमिनीची मोजणी करून जमाबंदी ठरविली. वरील ग्रंथांत आणखी असें लिहिलें आहे कीं, 'तो प्रत्येक बिघ्यामागें सरकारचा अंश म्हणून दहा शेर धान्य घेत असे. पुढें कांहीं दिवसांनीं या धान्याच्या ऐवजीं कायमचा पैशाचा आकार ठरविण्यांत आला. सरकारी जनावरांस लागणारें धान्य सांठविण्याकरितां, शेतकऱ्यांना पेरणीचे वेळीं बीं देण्याकरितां, दुष्काळ पडल्यास हातीं शिलक असण्याकरितां, आणि गोरगरिबांस धर्मार्थ वांटण्याकरितां, धान्यांचीं कोठारें प्रत्येक जिल्ह्यांत कायम केलीं होतीं. हीं कोठारें वृद्धया चांगल्या अनुभवी व विश्वासू अधिकाऱ्यांच्या ताब्यांत ठेवलीं होतीं.'

अकबराच्या कारकीर्दीच्या आरंभीं, उत्पन्नाच्या मानानें सर्व जमिनीच्या तीन प्रती करून, प्रत्येक प्रतींतील एकेक बिघा अशा तीन बिघ्यांच्या उत्पन्नाची सरासरी काढून, तिच्यावरून जमाबंदी ठरविलेली होती. शेतकऱ्याला ही सरासरी कबूल नसली तर त्याला आपल्या जमिनींतील पिकाची हक्कानें आकारणी करवून घेण्याचा हक्क होता. याचप्रमाणें कराचा बोजा सर्वत्र सारखा पडावा व पूर वगैरेंनीं होणारें नुकसान वांचावें या हेतूनें जमिनीचे पांच वर्ग केले होते. तसेंच निरनिराळ्या प्रतींच्या जमिनींची निवड होण्याकरितांही चांगले नियम केले होते. या सर्व काळजीपूर्वक केलेल्या नियमांचा उद्देश, सरकार व रयत या दोघांसही योग्य अशी जमाबंदीची पद्धत मुक्रर करणें हा होता.

मागें सांगितल्याप्रमाणें, हळूहळू राज्य जसजसें स्थिरस्थावर होत चाललें तसतशी सरकारी महसुलाचा ऐवज ठरविण्याची फार चांगली पद्धत अमलांत आली. या कामाकरितां गांवच्या जमीनदारांकडून, मोजणी होण्याच्या पूर्वीच्या एकोणीस वर्षांच्या बाजारभावांचीं पत्रकें मागविलीं होतीं. त्यांवरून सरासरी दर काढून त्या

सालच्या शेतकीच्या उत्पन्नाची किंमत ठरविण्यांत आली. आरंभीं या पट्टेबंद्या दरसाल होत होत्या. पण दरसालचे भाव पाहून जमा ठरविण्यास फार त्रास पडूं लागला, तेव्हां पूर्वीच्या दहा सालांच्या सरासरीच्या मानावर दहासाली पट्टेबंदी करण्याचें ठरलें.

ही काळीची व जमाबंदीची व्यवस्था पुरी करण्यासाठीं अकबरानें सर्व राज्याचे नवीन तऱ्हेनें विभाग केले. यांत सर्व प्रदेशाचे एकेक कोट टांक किंवा १०००० रुपये इतक्या वसुलाचे भाग पाडण्यांत आले. या विभागांच्या वसुली कामगाराला करोडी ह्मणत. करोडी यास, १००० रुपये वसूल होतांच जिल्ह्याच्या मुख्य खजानजीकडे त्याचा भरणा करावा लागे. अशा प्रकारें केवळ गणिताच्या तऱ्हेवर लक्ष देऊन केलेल्या विभागांपासून घोंटाळा होऊं लागला, व हिंदु लोकांस पूर्वीपासून आवडणाऱ्या जुन्या विभागपद्धतीची फेरपालट होऊं लागली, असें दिसून आलें तेव्हां ही मुद्दाम केलेली विभागपद्धति थोडे दिवस अमलांत आणून त्याबद्दलचा अनुभव पाहिल्यावर सोडून देण्यांत आली. यामुळें थोड्या दिवसांनीं लोकांची जुनी वहिवाट होती तीच पुनः अमलांत आली. या वहिवाटीप्रमाणें म्हटलें म्हणजे देशांतील नद्या, डोंगर, इत्यादिकांवरून, आणि गांव वसले होते त्याप्रमाणें, जमिनींचे विभाग केलेले असत.

गांव, तालुके किंवा महाल मक्त्यानें देण्यांत रयतेवर हटकून जुलूम होतो, असें जाणून या पद्धतीचा अकबर फार तिरस्कार करी. होईल तेथवर गांवच्या जमीनदाराला सोडून प्रत्यक्ष रयतेशीं विशेष संबंध ठेवण्याविषयीं त्यानें आपल्या मुलकी कामगारांस ताकीद दिली होती. ही तऱ्हा अगदींच नवीन असल्यामुळें, जरी तिचे उद्देश फार उत्तम होते तरी तिचा नेहमीं व्हावा तसा उपयोग होत नसे. हिंदुस्थानांत पूर्वापार चालीचें मोठें माहात्म्य आहे. या पूर्वापार चालीप्रमाणें गांवच्या मुख्य ज़मीनदारामार्फतच या संबंधाचा सर्व बंदोबस्त होणें योग्य आहे असें सर्वत्र ठाम मत होऊन गेलें होतें. सबब अखेरीस त्याच्याच मार्फत, निदान त्याच्या साहाय्यानें, सर्व व्यवस्था करणें भाग पडलें.

ज़मिनीच्या मालकीच्या हक्कासंबंधानें सर्व गोष्टींचा कच्चा विचार

करतांना, पूर्वीच्या राजांनीं अयोग्य लोकांनां इनामें दिल्याचें अकबराला अनेक प्रसंगीं आढळून आलें इतकेंच नाहीं, तर प्रत्यक्ष आपले कामगार व मुत्सद्दी लोकही थेडीबहुत लांच-लुचपत घेऊन अन्याय करितात असेंही त्याला स्पष्ट दिसून आलें. शेख फैजी त्याच्या कंपूंत येऊन दाखल होऊन त्याचें चांगलें वजन बसल्यावर लौकरच हे अन्याय बादशहाच्या नजरेस आले. बाह्यतः अतिशय धार्मिकपणा दाखवून दंभ माजविणाऱ्या लोकांच्या हातूनच मुख्यत्वेंकरून अशीं कुकर्मे अधिक घडल्याचें पाहून त्याला फारच तिरस्कार व खेद वाटला. तेव्हां त्यानें तावडतोब ह्या लोकांची मक्कस रवानगी केली, व अशा तऱ्हेनें त्यांच्या कृत्यांबद्दल त्यांची चांगली संभावना झाली. यानंतर त्या साऱ्या खात्याची झाडून तपासणी झाली. ज्यांना सरकारी खर्चातून बादशहानें मदत करणें जरूर होतें, अशा लोकांचे चार वर्ग होते. पहिल्या वर्गांत केवळ विद्याव्यसनी, पण उदरनिर्वाहाचें ज्यांना साधन नव्हतें असे लोक होते. अशा लोकांना रोजच्या निर्वाहाची काळजी असणें योग्य नाहीं असें मानीत असत. दुसऱ्या वर्गांत, महापरिश्रमानें सर्वसंगपरित्याग करून षड्रिपूंचें दमन करण्याकरितां केवळ अरण्यवास करणारे साधु लोक होते. तिसऱ्या वर्गांत अपंग, अशक्त व दरिद्री पण परिश्रम करण्यास असमर्थ असे लोक होते; व चौथ्या वर्गांत, थोर घराण्यांत उत्पन्न झाल्यामुळें पूज्य परंतु अंगीं विशेष ज्ञान नसल्यानें एकादा धंदा करून पोटास मिळविण्याचें सामर्थ्य ज्यांना नव्हतें, असे लोक होते.

या चाऱ्ही वर्गांतील लोकांच्या अर्जांची नीटपणें चौकशी करण्याकरितां एक अनुभवी, व हजार वाट्यांनीं खऱ्या बुद्धीचा, असा कामगार नेमलेला होता. त्याला ‘सद्र’ असें ह्मणत. त्याची योग्यता काजी व न्यायाधीश यांच्याहून मोठी मानीत असत. फैजीच्या सांगण्यावरून या खात्याची चौकशी करण्यांत आली. तेव्हां तें सर्व खातें लांचलुचपतीचें आगर असल्याचें दिसून आलें. हें पाहून अकबरानें त्या खात्यांतील सद्रापासून तों यःकश्चित् काजीपर्यंत सर्व कामगार काढून टाकले, व त्यांच्या ऐवजीं दुसऱ्याच प्रकारच्या

अगदीं नव्या लोकांची भरती केली; आणि सक्त कायदे करून त्यांचे सर्व अधिकार नियमित केले.

अकबर यास सार्वभौम बादशाह या नात्यानें, गादीची उत्तम नोकरी बजावणाऱ्या लोकांना जमिनी व जहागिरी द्याव्या लागत. मनसबदार किंवा फौजेंतील मोठमोठे अधिकारी यांनाही रोकड तनख्याच्या ऐवजीं तो कांहीं वेळापुरत्या जमिनी इनाम देत असे. पूर्वींच्या सर्व बादशहांमध्यें शीरशहा हा बादशहा अत्यंत प्रबळ असून त्यानें आपल्याबरोबरच्या बहुतेक अफगाण लोकांना पुष्कळच जहागिरी दिल्या असल्याचें अकबराला आढळून आलें. या जहागिरी आरंभीं कशा दिल्या गेल्या याविषयीं नीटपणें चौकशी करवून अकबरानें त्यांपैकीं पुष्कळ परत घेतल्या, व त्या आपल्या पदरच्या लोकांस दिल्या.

वरीलप्रमाणें जहागिरी काढून घेण्याचे कामीं त्यानें पूर्वींच्या राजांचेंच अनुकरण केलें हें खरें, तरी तसें करण्यांत त्यास दुसराही एक सबळ आधार सांपडला. जहागिरीच्या सनदेंत लिहिलेल्या व जहागिरदाराच्या कबज्यांत असलेल्या जमिनीचा क्वचितच मेळ असल्याचें त्याला दिसून आलें. तसेंच कांहीं कांहीं सनदांतील मजकूर असा कांहीं संदिग्ध दिसून येई कीं, त्यामुळें काजी व जिल्ह्याचा सद्र यांना यथास्थित लांच देऊन जहागीरदाराला मनास वाटेल तितके पाय फैलावण्यास सवड सांपडे. तेव्हां न्यायदृष्ट्या, व राजा आणि प्रजा या दोघांच्या हिताहिताचा विचार करून पाहतां, चौकशीअंतीं सनदेहून अधिक असलेला जहागिरीचा सर्व भाग जप्त करून घेण्याला त्याला पूर्ण अधिकार होता यांत संशय नाहीं. तसेंच त्याच्या बालपणीं, व फौजीची व त्याची गांठ पडून त्याच्या सांगण्यावरून याविषयीं चौकशी होण्यापूर्वीं, उलेमा लोक—ज्यांच्याविषयीं अकबराला पुढें पुढें फारच वीट आला—त्यांनीं बराच आडवा हात मारला असल्याचें त्याला आढळून आलें. ह्मणून त्यानें त्यांच्या सनदांविषयीं फार बारकाईनें चौकशी केली. त्यांत कांहीं दोष आढळला किंवा त्या लबाडीनें मिळविल्या असल्याचें त्याच्या नजरेस आलें कीं तो त्यांचीं उत्पन्नें एकदम जप्त करून त्यांना सिंध प्रांतांत बक्कर येथें किंवा बंगाल्यांत घालवून देत असे. या दोन्ही ठिकाणची हवा

फार वाईट असल्याविषयीं त्या वेळीं प्रसिद्धि होती. ही सुधारणा करण्याचे वेळींच त्यानें सदर ह्या कामगाराकडील पुष्कळ अधिकार कमी करून ते बहुतेक आपल्याकडेच घेतले.

जमिनीच्या व जमाबंदीच्या संबंधांत अकबरानें ज्या ज्या सुधारणा चालू केल्या, त्यांच्या एकंदर परिणामासंबंधानें मौंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन हा प्रसिद्ध इतिहासकार आपल्या हिंदुस्थानाच्या इतिहासांत असें म्हणतो कीं, 'त्याच्या प्रजेचें त्याच्या या व्यवस्थेपासून पुष्कळ हित झालें, तरी तिच्यांत लोकांच्या सुधारणेचें पाऊल नेहमीं पुढें पडत जाण्याच्या तत्त्वाचा अभाव होता, व शेतकरी लोकांची उमेद वाढण्याची अगदीं आशा नव्हती; तसेंच त्यांना दुसरा कोणताही धंदा किंवा अंगमेहनत करून नांवालौकिकास येण्याचें साधन नव्हतें.' अशा मोठ्या सन्मान्य ग्रंथकाराचे मताविरुद्ध प्रतिपादन करण्याचा जरी मला संकोच वाटतो, तरी हें त्याचें मत बरोबर नाहीं असेंच मला म्हटलें पाहिजे. अकबरानें आपल्या समकालीन लोकांच्या सुखाची वृद्धि केली, यांत मुळींच शंका नाहीं. एल्फिन्स्टन साहेबाच्या मताप्रमाणें व्यवस्था करण्याचें त्यानें मनांत आणिलें असतें, तर त्याला त्या वेळच्या हिंदुसमाजाच्या अस्तित्वास मूळ आधारभूत अशा एका तत्त्वाचा त्याग करावा लागला असता. जमीनदारांस सोडून प्रत्यक्ष शेतकरी लोकांशींच सरकारचा संबंध ठेवण्याचा त्यानें जो प्रयत्न केला, त्यांत त्यानें या तत्त्वाचा बहुतेक त्याग केलाच होता असें म्हटलें तरी चालेल. परंतु पूर्वापार चालत आल्यामुळें बहुतेक कायद्याच्याच योग्यतेस पोहोंचलेल्या चालीरीती बदलण्याचा यत्न करण्याच्या कामीं फार सावधगिरी ठेविली पाहिजे ही गोष्ट वेळेवरच त्याच्या ध्यानांत आली, व त्यानें तो प्रयत्न सोडून देऊन आपला पहिला हुकूम रद्द केला.

मुलकी, जमाबंदी, व चलनी नाणें या संबंधाच्या खात्यांत त्याचा मुख्य मंत्री राजा तोडरमल्ल हा होता. याच्याविषयीं मागील भागांत सविस्तर उल्लेख आलाच आहे. तो मोठा हुशार व अनुभवी असून त्याचा प्रामाणिकपणा कसोटीस उतरलेला होता. मुसलमान बादशहाच्या दरबारांत असूनही तो कट्टा हिंदूधर्मी

होता, व तो आपल्या धर्माप्रमाणें सर्व नित्यकर्में व नेमधर्म श्रद्धेनें आचरीत असे. एकदां तो अकबराबरोबर पंजाबांत जात असतां; निघण्याच्या गडबडींत त्याचे देव मागें राहिले; आणि त्याचा तर निश्चय असा होता कीं रोजची पूजाअर्चा होईपर्यंत कोणत्याही कामाला हात म्हणून लावावयाचा नाहीं; यामुळें तो बरेच दिवस अन्न-पाणी ग्रहण न करितां तसाच राहिला! अखेर बादशहानें मोठ्या कष्टानें त्याची समजूत केली.

अकबराच्या फौजेंत मुख्य भरणा स्वारांचा होता. लढाईच्या तयारींत हत्तींचें बरेंच प्रस्थ असे. फौजेंत हत्ती असले म्हणजे त्या फौजेबरोबर बादशहा आहे असें बहुतकरून समजत असत, किंबहुना हत्ती नसले तर बादशहा फौजेबरोबर असावयाचा नाहीं अशीच समज होऊन गेली होती. या समजुतीमुळेंच, सुदैवानें बादशहाच्या एका प्रबल शत्रूच्या हातून एके वेळीं एक मोठी चूक घडली, तिजबद्दल मागील भागांत उल्लेख आलाच आहे. असो. विंध्याद्रीच्या उत्तरेकडील सर्व राज्याचे बारा सुभे किंवा भाग केले होते. त्या प्रत्येकावर एकेक स्वतंत्र सुभेदार नेमलेला असे, व त्याच्या-वर हुकूम काय तो बादशहाचाच असे. जोंपर्यंत तो चांगल्या रीतीनें काम करी, तोंपर्यंत तो आपल्या हुद्यावर कायम राहत असे. हरएक बाबतींत बादशहाचे हुकूम निमूटपणें बजावणें हें त्याचें काम असे. त्याचे हाताखालीं तेवढ्याच भागापुरते लष्करी कामगार असत, त्यांना फौजदार म्हणत. हे त्या त्या भागापुरते पोलीस व लष्करी अधिकारी असत. स्वस्थता व बंदोबस्त ठेवण्याचें काम त्यांच्याकडे असे. तसेंच तेथील फौजेसंबंधी सर्व कामाची देखरेख व फौजेचें मुख्य आधिपत्य त्यांच्याकडे असे; आणि साधारणतः दंगेधोपे मोड-ण्याचें कामही त्यांच्याकडे असे.

न्यायइनसाफाचें काम, पूर्वीच्या अफगाण राजांनीं चालू केलेल्या पद्धतीनेंच बहुतेक चालत असे. सर्व कायदेकानूंना मूळ आधार कुराणाचाच असे, पण पूर्वीच्या अधिकाऱ्यांनीं केलेल्या न्यायाच्या दाखल्यावरून वरील कायदेकानूंच्या अक्षरशः अर्थांत तफावत होत असे. कायद्याचा रोख फारसा कडकपणाकडे असेल तेथें बादशहा

किंवा त्याचे सल्लागार यांच्या सूचनेप्रमाणें त्यांत फेरफार होत असे. या सर्व सूचनांचा रोंख, *न्यायइनसाफ दयार्द्र अंतःकरणानें होत* जाण्याकडेच होता. देहान्तशिक्षा होईल तेथवर कमी देण्याविषयीं मोठमोठ्या अधिकाऱ्यांना ताकीद असे. या संबंधानें गुजराथच्या सुभेदाराच्या नांवानें एक हुकूम सुटला होता, त्यांत भयंकर राजद्रोह करणाऱ्या गुन्हेगाराखेरीज इतर कोणालाही देहान्त शिक्षा देणें ती, सर्व कागदपत्र बादशहाकडे पाठवून त्याची मंजुरी घेतल्याशिवाय देऊं नये, असें त्या अंमलदाराला लिहिलें होतें.

विंध्याद्रीच्या पलीकडे दक्षिणेंतील बादशाही मुलखाचे मुख्य तीन भाग केले होते. पुढें आणखी काबीज झालेला मुलूख त्यांत सामील झाल्यावर त्याचे सहा सुभे करण्यांत आले. अकबराच्या पागून हे सर्व भाग एकाच मुख्य सुभेदाराच्या स्वाधीन करण्यांत आले. त्याच्या बरोबरच, पण त्याच्या हाताखालीं, एक मुलकी व जमाबंदी काम जाणणारा दिवाण नेमण्यांत येत असे. या वरील सुभेदारांतूनच पुढें निजाम उदयास आला.

अकबर हा मोठा वैभवशाली बादशहा होता. त्याची स्वतःची राहणी अगदीं साधी होती, तरी प्राच्य लोकांवर राज्य करण्यांत, राजानें नेहमीं आपल्या वैभवाचा डामडौल व भपका दाखविणें हें एक मुख्य तत्त्व आहे ही गोष्ट त्याच्या लक्षांत आली होती. हीच गोष्ट हिंदुस्थानचा थोर गव्हर्नर-जनरल ( लॉर्ड लिटन् ) याच्याही लक्षांत येऊन चुकली होती. आणि वास्तविक पहातां, ज्या व्यक्तीला सर्व प्रजा केवळ परमेश्वराचा अंश मानते व जिच्या नुसत्या नेत्र-कटाक्षावर लक्षावधि प्रजेचें बरें वाईट अवलंबून असतें अशी सर्वांची समजूत असते, त्या प्रमुख व्यक्तीनें आपल्या सत्तेच्या व वैभवाच्या पूर्ण डामडौलानें सर्व प्रजेच्या दृष्टीस पडणें अवश्य होय, ही केवळ कल्पना आहे असें नाहीं. हल्लीं देखील, हिंदुस्थानांतील सर्व लोक, अधिकारी लोकांशीं बोलतांना त्यांच्याविषयीं जे शब्द उच्चारतात, त्यांवरून त्यांच्या मनांत अशा प्रकारचे विचार कसे घोळत असतात हें दिसून येतें. ज्याच्या हातीं मुख्य सत्ता असते तो अधिकारी पुरुष प्रत्यक्ष परमेश्वराच्या जागीं आहे अशी त्यांची समजूत

असते. त्याच्या तोंडांतून जीं अक्षरें निघतील त्यांवर सर्व प्रजेचें बरें वाईट अवलंबून असतें. तेव्हां महोत्सवाच्या दिवशीं अशा या समर्थ व्यक्तीनें आपलीं सर्व राजचिन्हें व राजवैभव धारण करून आपल्या अत्युच्च स्थितीस अनुरूप डामडौल करणें व लवाजमा बरोबर ठेवणें जरूर आहे, असें ते समजतात. अकबर या सर्व गोष्टी पूर्णपणें जाणून होता, व तो त्याप्रमाणें वागत असे.

त्याच्या वेळच्या उत्सव-समारंभांचें व अतुल वैभवाचें आणि डामडौलाचें वर्णन केवळ आईन-ए-अकबरीवरूनच उपलब्ध आहे असें नाहीं. हिंदु इतिहासकारांनींही, अकबराचे पांच हजार हत्ती व बारा हजार खासे घोडे, खान्याकरितां, व्यायामाकरितां व आरामाकरितां रंगीबेरंगी व मौल्यवान् कपडयाचे बनविलेले त्याच्या भव्य व सुंदर छावणींतील विस्तीर्ण व शोभायमान डेरे व तंबू, इत्यादिकांचें सविस्तर वर्णन केलेलें आहे. तसेंच त्या ग्रंथकारांनीं विशेष महोत्सवाच्या प्रसंगांसंबंधानें बादशहाच्या दरबाराचें वर्णन केलें आहे. त्यांत असें ह्मटलें आहे कीं, 'एका बाजूनें खुला असलेल्या तीन बिघे विस्तीर्ण भरगच्ची मंडपांत मशरूच्या अतिशय नरम गाद्या टाकलेल्या बिछायतीच्या मध्यभागीं बादशहा विराजमान होऊन सरदार लोकांचे मुजरे घेत असे. या सरदार लोकांचे डेरे बादशाही डेऱ्यांहून शोभेंत किंचित् कमी असत. या दरबारांत जमलेल्या सर्व लोकांसमक्ष निरनिराळ्या वस्तूंबरोबर बादशहाची तुला करून त्या सर्व वस्तु गरजू लोकांस वांटीत असत. बादशहाच्या वयाच्या वर्षांइतकीं मेंढरें, बकरीं, कोंबडीं वगैरे, जो कोणी पाळील त्याला इनाम देत असत; तसेंच अनेक लहान पाळींव जनावेंरही सोडून देत असत; आणि बादशहा स्वतः आपल्या हातानें दरबारी लोकांस बदाम वगैरे फळें वांटीत असे.'

या तुळा करण्याच्या समारंभाच्या दिवशीं अकबर रत्नभूषणमंडित होऊन आपल्या सिंहासनावर बसत असे. त्याचे मुख्य मुख्य सरदार तशाच थाटानें त्याच्या सभोंवार बसत. नंतर त्याच्यापुढें सर्वांची हजिरी होई. रत्नखचित व सुवर्णमय शिरोभूषणें व बगल्या घातलेले हत्ती, उत्तमोत्तम व मौल्यवान् साज घातलेले खासे

घोडे, गेंडे, सिंह, वाघ, चित्ते, तेंदवे, शिकारी कुत्रे, बाज वगैरें सर्व सरकारी जनावरें ओळीनें बादशहापुढें येत, व सर्वांच्या मागून उत्तम श्रृंगारलेले स्वार येत. हें बादशाही दरबारचें चित्र केवळ काल्पनिक आहे असें कांहीं नाहीं. अकबराचा पुत्र सलीम याच्या कारकीर्दींत हा सर्व प्रकार, हाकिन्स, रो, टेरी इत्यादि इंग्रज प्रवासी ग्रंथकारांनीं पाहिला असून त्यांनीं त्याचें फार सुंदर व सविस्तर वर्णन केलें आहे.

हे सर्व थाटमाटाचे देखावे मोठ्या उत्सव-समारंभाच्या दिवशीं मात्र होत असत. बाकीच्या प्रसंगीं अकबराची वृत्ति अगदीं साधी, निरभिमानी, उत्सुक व सत्याभिलाषी अशी असे. त्यानें सिद्धीस नेलेलें मोठें कामच त्याच्या या वृत्तीची साक्ष देत आहे. तें काम कोणतें म्हणाल तर, चारशें वर्षांपासून मुसलमान राजांनीं फाडफाडून तुकडे करून टाकलेलें, व इतक्या वर्षांत स्वस्थता व एकत्रटपणास न पावलेलें असें जें हें विस्तीर्ण राज्य, त्याचें एकीकरण करणें हें होय. या चारशें वर्षांत अफगाण सरदारांनीं कुराणांतील सिद्धांतांचा, दुराग्रही आणि साधारण सृष्टिक्रमाच्या विरुद्ध असा वेडानांकडा अर्थ करून, त्याच्या आधारानें हिंदु प्रजेला लुटून धुळीस मिळविलें होतें. अकबराच्या पूर्वींच्या सर्व राजांत सुलतान फिरोजशहा हा मोठा चांगला बादशहा होऊन गेला. तो फार दयाळू व उदार मनाचा होता, असें एका इंग्रज ग्रंथकारानेंही लिहिलें आहे. पण तो देखील मुसलमानी धर्माचा स्वीकार न करणाऱ्या प्रजाजनांचा कसा छळ करीत असे, याचें त्या ग्रंथकारानें स्वतःच वर्णन केलेलें आहे. धर्माकरितां छळ करण्याचीं हीं तत्त्वें थेट अकबर गादीवर बसेपर्यंत अव्याहत चालू होतीं.

सर्व हिंदुस्थान एकछत्री अमलाखालीं आणण्याचा अकबराचा मुख्य हेतु होता. हिंदुस्थानांतील सर्व प्रजेचें धर्माच्या बाबतींत ऐक्य होणें दुरापास्त आहे ही गोष्ट आरंभींच त्याच्या ध्यानांत येऊन चुकली होती. तेव्हां त्या लोकांचें ऐक्य करण्याचा मार्ग म्हटला म्हणजे त्यांच्या ऐहिक हितासंबंधानेंच काय तो राहिला होता. त्याकरितां प्रथम सर्व देश जिंकून घेणें जरूर होतें; व दुसरें असें कीं, सर्वांच्या मनानें घेतलेले धर्म व ईश्वरपूजनाचे सर्व तऱ्हेचे प्रकार यांस

योग्य मान देणें अवश्य होतें. ही गोष्ट घडवून आणण्याला त्यानें मुसलमानी धर्मसंस्कारांची मिळेल तेवढीच मदत घेतली. मुसलमानी धर्माचा मुख्य कलमा म्हटला म्हणजे 'परमेश्वर केवळ एकच आहे, व महंमद त्याचा पैगंबर आहे' असा आहे. त्याच्यामुळेंच आजवर इतके छळ व अनन्वित प्रकार घडले. तेव्हां त्याच्यांत त्यानें फेरफार केला, व 'परमेश्वर केवळ एकच आहे व अकबर त्याचा या जगांत प्रतिनिधि आहे' असा कलमा त्याच्या ऐवजीं कायम केला. तो म्हणे कीं, 'पैगंबर हे पृथ्वीवरील मूर्तिपूजकांना परमेश्वराचा एकपणा व ऐक्यभाव यांचा उपदेश करण्यास अवतरले असून, त्यांपैकीं महंमद हा वरील लोकांना हें शुभ वर्तमान सांगण्याकरितां अवतरला होता. पण परमेश्वराचा ऐक्यभाव प्रतिपादन करणाऱ्या पैगंबराच्या धर्मवचनांच्या अर्थाचा विपर्यास करून या मताचा प्रसार तरवारीच्या जोरानें केला पाहिजे असा हल्लीं त्याचा विपरीत अर्थ केलेला आहे.'

वरील विपरीत अर्थास अनुसरून चालण्याचा परिणाम निदान हिंदुस्थानांत तरी वाईट झाला, असें अकबराचें मत होतें. या परिणामाच्या वाईटपणाची साक्ष पूर्वींची चारशें वर्षांची मुसलमानी राजांची कारकीर्द हीच होय. अकबराला नुकतें एकविसावें वर्ष लागलें तोंच, या परंपरागत तत्त्वावर राज्य चालविलें असतां प्रजेचीं मनें खास विटून जातील असें त्याच्या नजरेस आलें. सर्वांस एकत्र करून परस्परांचा मेळ व एकजीव करण्याचा, व ज्यांच्यापासून सर्व प्रजेचें हितैक्य उत्पन्न होईल अशीं तत्त्वें अमलांत आणण्याचा त्याचा उद्देश होता, ही गोष्ट जितके वेळां सांगावी तितकी थोडीच असें म्हटलें पाहिजे ! वर लिहिल्याप्रमाणें कलम्यांत केलेला फरक हाच या तत्त्वाचें बीज होय. महंमदाच्या धर्मवचनांचा विपरीत अर्थ करून त्यांचा दुरुपयोग केला तर त्यापासून खचित फाटाफूट व्हावयाची हें जाणून अकबरानें असें मनांत आणलें कीं, माझें राज्य आहे तोंवर व मी आहें तोंवर पैगंबराचें स्थान मलाच पत्करलें पाहिजे, व सर्वशक्तिमान् परमेश्वराच्या उदार आणि सदय आज्ञांचा मनुष्यजातीला खरा अर्थ मलाच सांगितला पाहिजे.

आपण स्वतः पैगंबर असेपर्यंत राज्यकर्त्याच्या धर्माचा प्रसार

तरवारीच्या जोरावर कधींही करूं द्यावयाचा नाहीं, असा त्याचा संकल्प होता; इतकेंच नव्हे, तर पूर्वी या मार्गाचें अवलंबन झाल्यानें हिंदुस्थान देशाला जागजागीं जे भयंकर घाव पडले होते ते बरे करण्याचें श्रेय घ्यावें, पूर्वी झालेल्या छळाचें स्मरण बुजवावें, प्रत्येकास आपापल्या मनाप्रमाणें धर्माचरण करण्याची मोकळीक असल्याचें सर्वत्र प्रकट करून त्या योगें सर्वांच्या संबंधानें समतेचा भाव उत्पन्न करावा, असा त्याचा हेतु होता. हा धर्मासंबंधी तत्त्वांतला फरक हळूहळू सर्वमान्य झाल्यावर, हिंदुस्थानांतील राजेरजवाडे व प्रजा यांच्याकडून, त्यांचा छळ बिलकूल न करितां संरक्षण मात्र करणाऱ्या अशा एकाच सार्वभौम बादशहाचा अधिकार कबूल करविण्याचा त्याचा हेतु होता. मी जी सुधारणा अमलांत आणीत आहें ती माझ्या एकट्याच्याच हिताकरितां आहे असें नाहीं, तर सुमारें चारशें वर्षेंपर्यंत परचक्रामुळें, अंतस्थ दंग्याधोप्यांमुळें, व त्यानंतरच्या छळामुळें गांजून गेलेल्या कोट्यावधि प्रजेच्या हिताकरितां आहे, असें त्या सर्वांना सांगण्याचा अकबराचा हेतु होता.

हा आपला हेतु ज्यांस अकबरानें कळविला ते लोकही अगदीं अविचारी किंवा दुराग्रही होते असें नाहीं. फक्त एक चितोड, म्हणजे हल्लीं उदेपूर म्हणून जें प्रसिद्ध आहे, तेथील राण्याशिवाय बहुतेक सर्व रजपूत राजेरजवाडे व उत्तर-हिंदुस्थानांतील अतिशय महत्त्वाच्या प्रदेशांतील बहुतेक प्रजाजन त्याच्या वरील हेतूस अनुकूल झाले. जयपूर व जोधपूर येथील बलाढ्य संस्थानिक हिंदु असूनही त्याचे उत्तम व विश्वासू सल्लागार झाले, व त्यांनीं त्याला सर्वपरी साहाय्य केलें. ते त्याचे अत्यंत भरंवशाचे सेनापति असून, त्यांचे शिपाई मोठे शूर होते. त्यांसह त्यांनीं त्याला साहाय्य केलें. या कामांत अकबराला त्याच्या दुराग्रही दरबारी लोकांकडूनच अडथळा फार झाला. तसेंच बंगाल, बहार, ओरिसा व पश्चिम-हिंदुस्थान यांत पूर्वी स्वतःच्या करून राज्यें स्थापन करून राहिलेल्या अफगाण लोकांच्या वंशजांकडूनही त्यास पुष्कळ त्रास झाला. वर सांगितलेला त्याचा सार्वजनिक हिताचा बेत सिद्धीस जाण्याकरितां त्याला या सर्व लोकांना आपल्या अंकित करणें भाग पडलें. त्यानें प्रथम त्यांना आपले हस्तक म्हणून त्यांच्या पूर्वीच्या

अधिकारांवर कायम ठेवण्याचा यत्न केला. त्यांनीं सकृद्दर्शनीं ही गोष्ट मान्य केली, पण आपणास बंड करतां यावें असा त्यांचा त्यांत अंतस्थ हेतु दिसून आला तेव्हां शेवटीं त्यांना अगदीं पादाक्रांत केल्या-वांचून गत्यंतरच नव्हतें. सबब त्याप्रमाणें अकबरानें केलें. हें झाल्या-नंतर, धर्मसंबंधानें सर्वांस आपापल्या वृत्तीप्रमाणें वागण्याविषयीं सारखे लागू असणारे असे कायदेकानू, व सर्वांस सारखा न्याय-इनसाफ मिळणें, या गोष्टी सर्वत्र सारख्या चालू झाल्या.

याप्रमाणें, हिंदुस्थानावर ज्या अनेक मुसलमान वीरांनीं स्वाऱ्या केल्या, त्यांपैकीं जिंकून घेतलेला मुलूख एकत्र करण्याचें श्रेय ज्यानें घेतलें तो हाच पहिला पुरुष होय. जेथपर्यंत त्याची तरवार चालली तेथपर्यंतचा सर्व देश यानें एकछत्री अमलाखालीं आणिला. 'जेथ-पर्यंत त्याची तरवार चालली' असें ह्मणण्याचें कारण एवढेंच कीं, दक्षिण-हिंदुस्थानाचा कांहीं भाग अखेरपर्यंत त्याच्या हातीं आला नव्हता. असो. अकबराच्या ह्याच सत्कृत्यांमुळें पुढील प्रजेनें त्याला पूज्य मानावें अशी त्याची योग्यता होऊन गेलेली आहे.

वरील सर्व गोष्टी त्यानें कसकशा घडवून आणल्या हें सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें, व यांत त्याचे हेतु काय होते हेंही बारकाईनें लक्षांत आणिलें, ह्मणजे त्याच्या हेतूंची खरी योग्यता व त्याच्या मनाचा खरा शुद्धपणा कळून येतो. लोकांनीं आपणास परमेश्वराप्रमाणें मानून आपल्या आज्ञा पाळाव्या अशी त्याची इच्छा आहे असें त्याच्या दरबारचे दुराग्रही लोक ह्मणत असत. पण वास्तविक तशांतला प्रकार मुळींच कांहीं नसून, परोपकार, भूतदया, धर्मविषयीं समानदृष्टि, व धर्म-मतांकडे लक्ष न देतां सर्वत्र सारखा न्यायइनसाफ होणें, इत्यादि जीं धर्माचीं मुख्य व अप्रतिम तत्त्वें पूर्वी पैगंबरानें परमेश्वराकडून या भूलोकीं आणिलीं, त्या तत्त्वांचें खरें स्वरूप समजून त्याप्रमाणें वर्तन ठेवण्याविषयीं लोकांस मार्गदर्शक होणें, याकरितांच आपला जन्म आहे असें तो नेहमी म्हणत असे. त्याचें हें धर्मानुशासन सर्व राज्यकर्त्यांना व सर्व साम्राज्य स्थापन करणाऱ्यांना अत्यंत उपयो-गाचें आहे.

अकबर नेहमीं असें ह्मणे कीं, 'प्रत्येक धर्मांत कांहीं तरी चांगलें

आहेच. चांगलें असेल त्याचा आपण स्वीकार करूं, व बाकीचें सोडून देऊं.' हिंदुधर्माचें परोपकारी व सात्विक स्वरूप, आपापल्या कुटुंबांतील लोकांची काळजी घेण्याविषयीं त्यांत असलेल्या आज्ञा, व परधर्मी लोकांस बाटविण्याविषयीं त्यांत मुळींच प्रवृत्ति नाहीं, ह्या त्या धर्मातील गोष्टीं-वरून त्यानें वरील तत्त्व काढलें. झोरास्टरचे अनुयायी (पारशी लोक) यांच्या साध्या धर्मांत व ख्रिस्ती धर्मांतही तेंच तत्त्व त्याला दिसून आलें. सारांश, त्याच्या दृष्टीनें सर्व धर्मांत कांहीं तरी चांगलेपणा असून, सर्व लोकांत कांहीं ना कांहीं चांगुलपणा असतो अशी त्याच्या मनाची खात्री होती. त्याच्या अंगी क्षमाशीलत्व व दया-शीलत्व अतिशय वास करीत होतें; आणि ह्मणूनच, कोणा मनुष्याची सुधारणा होण्याची यत्किंचित्‌ही आशा असेल तोंवर तो त्याला शिक्षा करीत नसे. 'जा, पुनः पातक करूं नको,' हें महावाक्य जणों त्याच्या सर्व वर्तनाचें सार होतें.

मोंगल बादशाही घराण्याचा खरा संस्थापक अकबर हा पुरुष एकंदरीनें अशा प्रकारचा होता, व ती बादशाही स्थापन करण्याला त्याला खरीं साहाय्यभूत झालेलीं तत्त्वें वर लिहिल्याप्रमाणें होतीं. त्या सर्व तत्त्वांचें अवलंबन झालें असतें तर ती बादशाही अद्यापि कायम राहिली असती; आणि त्या तत्त्वांचें अवलंबन केल्यानेंच त्याच्या पश्चात् सांप्रतच्या पाश्चिमात्य राज्यकर्त्यांनीं आपली बादशाही अद्यापपर्यंत कायम राखिली आहे.

अकबर बादशहा व त्यानें केलेले पराक्रम यांजविषयीं येथवर जें वर्णन केलें, तें हल्लींच्या राजांशींच आपण जणूं काय त्याची तुलना करीत आहों, अशा तऱ्हेनें केलें आहे. वास्तविक पहातां त्या काळास आज सुमारें तीनशें वर्षें लोटून गेलीं असल्यामुळें, या तुल-नेंत अकबराचा थोडा गौणपक्ष दिसण्यास कारण आहे; तथापि अशा रितींतही त्याचा ह्या तुलनेंत कमीपणा दिसून येत नाहीं. अकब-राच्या वेळचे युरोपियन राजे खरोखर आपापल्या देशांत उत्तम म्हणून गणले जात होते. तो इकडे हिंदुस्थानांत राज्य स्थापीत असतां इंग्लंडांत इलिझाबेथ राणी व फ्रान्सांत चौथा हेन्री राजा राज्य करीत होता. तरी वरील एकंदर राज्यकर्त्यांशीं त्याची तुलना केली असतांही

त्याचा कांहींएक उणेपणा दिसून येण्यासारखा नाहीं. त्यानें केलेलीं जीं महत्कृत्यें त्याच्यामागें टिकलीं आहेत, त्यांवरच त्याची लौकिक अवलंबून आहे. अकबराच्या मागून जहांगीर गादीवर बसला; तो त्याच्या मागून न बसतां हुमायुनाच्या मागून बसला असता तर, त्याला वडिलोपार्जित किंवा नवीनें जिंकून घेतलेल्या विस्खलित प्रदेशाचा एकजीव करून, त्यांतील लोकांस आपलेसें करून घेतां आलें असतें असें कोणासही वाटणार नाहीं. त्याचा स्वभाव रागीट व दुराग्रही होता, यामुळें ही गोष्ट अशक्यच झाली असती. पण अकबरानें घातलेला पाया इतका खोल व मजबूत होता कीं, जहांगीर याचा स्वभाव अकबराच्या अगदीं उलट असूनही, त्याला बापाच्या उत्तम राज्यव्यवस्थातत्त्वांमुळें तें एकजीव झालेलें राज्य आजन्म कायम राखतां आलें. अकबरानें काय काय गोष्टी केल्या व त्याही कोणत्या काळांत केल्या, त्या करण्याकरितां त्यानें कोणती शिस्त योजिली, इत्यादी गोष्टींचा सूक्ष्म रीतीनें विचार केला असतां त्याची खरी योग्यता दिसून येणार आहे. आह्मी तर असें म्हणतों कीं, एखाद्या राष्ट्रास अवनत दशा प्राप्त झाली असतां त्याला, ज्या स्वस्थतेच्या व धर्मसंबंधी समानवृत्तीच्या मार्गानें गेलें असतां कोट्यावधि प्रजाजनांस सुखाचें साधन मिळणार आहे, त्या मार्गाला पुन: लावण्याकरितां, परमसमर्थ परमेश्वर वेळोवेळीं ज्या विभूति या जगांत पाठवितो, त्या विभूतींपैकींच अकबर हा एक होता, असें अवश्य मानलें पाहिजे !